म. ग्रं. सं. ठाणें

विषय	सन
संग्रहालय क्रमांक	

लेखक नारा. — गोडी

पुस्तकाचें नांव इं. १८६६ सालचा सैन्यिक इतिहास [illegible]

९८१.

४ वी.

MUMBAI ... Sl. No. 259 ... Sl.

इंग्लंडचा संक्षिप्त इतिहास

व

हिंदुस्थान वगैरे देशांचें भूवर्णन वगैरे.

हें पुस्तक

रु 200 सन 1900

नारायण धोंडदेव जोशी

धुळें, ट्रेनिंगस्कुलांतील पहिले असिस्टंट

यांनीं रचिलें.

तें.

"आर्यविजय" छापखान्यांत

मुक्काम पुणें एथें

छापून प्रसिद्ध

केलें.

(कांचे सर्व हक्क मालकानें आपलेकडे ठेविले आहेत.)

सन १९०० इ.

किंमत १। रुपया.

पुणें

येथें "आर्यविजय" छापखान्यांत छापिलें.

प्रस्तावना.

ट्रेनिंग कालेजें व स्कुलें एथे दुसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांकरितां रावबहादूर नारायण विष्णु बापट, माजी मुंबईचे क्युरेटर, यांजकडून सरकारानें एक भाषांतर करविले आहे. परंतु तो ग्रंथ फार मोठा असल्यामुळे एका वर्षांत सर्व ग्रंथ शिकणें फार कठीण जाऊं लागलें म्हणून तो ग्रंथ तिसरे वर्षास पूर्ण व दुसरे वर्षास संक्षिप्त असें अलीकडे सरकारानें ठरविले आहे. आतां त्यांतील संक्षेप करून सांगणें किंवा घेणें सुलभ नसल्यामुळें हा ग्रंथ त्यांच्या सोईकरितां रचिला आहे. या ग्रंथास आधारभूत असा एकच ग्रंथ घेतला नसून अनेक इंग्रजी ग्रंथ घेऊन त्यांतील विशेष महत्त्वाच्या गोष्टी मात्र या ग्रंथांत घतल्या आहेत.

ट्रेनिंग कालेजें व स्कुलें यांत इंग्लंडच्या इतिहाससंबंधानेंच ब्रिटिशबेटांचें भूवर्णन शिकवावें लागते. त्यास मराठींत आधारभूत ग्रंथ नसल्यामुळें शिक्षकांस ती माहिती उतरून द्यावी लागते. व विद्यार्थ्यांस उतरून घ्यावी लागते. ही आडचण व श्रम निवारण करण्याकरितां इतिहासापुढें ब्रिटिशभूवर्णन व इंग्लंडच्या बाहेरील इतिहास संबंधाचीं स्थळें यांचे वर्णनाचा लहानसा ग्रंथ जोडिला आहे. त्यास आधारभूत ग्रंथ, विशेषेंकरून ए. वोर्डमनचें "ऐतिहासिक भूगोलवर्णन" हा घेतला आहे व कांहीं माहिती इतर ग्रंथांतूनहि घेतली आहे.

कांहीं ठिकाणीं राहिलेल्या चुका शुद्ध करून ग्रंथाचे आरंभीं शुद्धिपत्रांत दिल्या आहेत. आणखी कांहीं राहिल्या असल्यास विद्वानांनीं परोपकारबुद्धीनें कळविल्यास त्यांचा आदर होऊन दुसरे आवृतींत घालण्यास उपयोग होईल.

ग्रंथाच्या प्रति फार थोड्या म्हणजे ५०० काढिल्या आहेत. कारण या ग्रंथाचा उपयोग पुणें, कोल्हापूर, धुळें व कदाचित् अकोला एथेंच कायतो वर्षांतून एकदा होणार आहे. प्रति जितक्या कमी किंवा जास्त निघतात त्या मानानें त्या ग्रंथाची किंमत जास्त किंवा कमी होते. हें मनांत आणिलें असतां या ग्रंथाची किंमत सवा रुपया ठेविली आहे ही फार वाटणार नाहीं.

ग्रंथकार.

शुद्धिपत्र.

—:०:—

पृष्ठ,	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
११	१२	८१७ मध्यें	८७१ मध्यें
१४	४	सन ९६५ त	सन ९५५ त.
३४	१६	११३५ रावर्ताचें मरण	११३४ रावर्ताचें मरण
४३	२२	फ्यान्साचा	फ्रान्साचा.
४६	१५	स० १२१५	स० १२१५
५६	५	इ० स० १२९८	इ० स० १३०५
७३	२५	इ० स० १५१३	इ० स० १४१३
७५	२०	इ० स० १४३५	इ. स. १४१५
८४	४	इ. स. १४६१-१४८५	इ. स. १४६१-१४८३
११०	१६	सन १५९७	सन १५८७
१३१	१०	सन १८६२ (अस्पष्ट)	सन १६६२
१६६	१४	सन १७६६	सन १७६५

अनुक्रमणिका.

इतिहास.

	पृष्ठ.
पहिला भाग—	१
प्राचीन इतिहास	,,
रोमन कारकीर्द	३
पहिली साक्सन कारकीर्द	७
ड्यानिश कारकीर्द...	१५
दुसरी साक्सन कारकीर्द...	१६
सॉंडकचें किंवा साक्सन घराणें	१८
पहिले भागांतील कालक्रमगत गोष्टी	१९
दुसरा भाग—उइलियम दि कांकरर	२२
दुसरा उइलियम	२६
पहिला हेन्री	२९
स्राड आणि स्टीफन	३२
नार्मन वंशवेल	३३
नार्मनघराण्यांतील कालगत गोष्टी	३४
तिसरा भाग—अन्जूकारकीर्द...	३५
दुसरा हेन्री	,,
पहिला रिचर्ड	४१
जॉन	४५
तिसरा हेन्री	४८
पहिला एड्वर्ड	५२
दुसरा एड्वर्ड	५७
तिसरा एड्वर्ड	५९
दुसरा रिचर्ड	६४
अंजुनियन वंशाविस्तार	६८
अंजूघराण्यांतिल मुख्य गोष्टी	६९

चवथा भाग-लांकयास्ट्रियन व यार्क घराणीं ... ७१
चवथा हेन्री ... ... ,,
पांचवा हेन्री ७४
सहावा हेन्री ७८
लांकयास्ट्रियन घराण्यांतील मुख्य गोष्टी ... ८३
यार्क कारकीर्द-चवथा एड्वर्ड ८४
पांचवा एडवर्ड ८६
तिसरा रिचर्ड ८७
लांकयास्टर व यार्क यांचा वंशविस्तार ... ९१
यार्ककारकीर्दीतील मुख्य गोष्टी ९३
पांचवा भाग—ट्यूडर कारकीर्द ९४
सातवा हेन्री ... ... ,,
आठवा हेन्री ९९
सहावा एड्वर्ड... ... ... १०५
पहिली मेरी १०७
इलिजाबेथ १०९
ट्यूडर वंशविस्तार ११४
ट्यूडर घराण्यांतील मुख्य गोष्टी... ... ... ,,
साहवा भाग—पहिली स्टयूअर्ट कारकीर्द ... ११६
पहिला जेम्स ... ... ,,
पहिला चार्ल्स १२१
लोकसत्ता १२७
दुसरी स्टयूअर्ट कारकीर्द... ... ... १३१
दुसरा चार्ल्स ... ... ,,
दुसरा जेम्स १३६
तिसरा उइलियम व दुसरी मेरी १३९
आन राणी १४३

स्टयूअर्ट वंशविस्तार १४७
स्टयूअर्ट घराण्यांतील मुख्य गोष्टी १४८
सातवा भाग—ब्रन्स्विक घराणें १५१
पाहला जार्ज ... ... ,,
दुसरा जार्ज १५८
तिसरा जार्ज १६४
युवराजसत्ता १७३
चवथा जार्ज १७७
चवथा उइलियम १८०
व्हिक्टोरिया १८४
ब्रन्स्विक वंशविस्तार १९८
ब्रन्स्विक घराण्यांतील मुख्य गोष्टी २००
आठवा भाग—राज्यपद्धति वगैरे २०३
इतिहासांतील मुख्य गोष्टी २०९

ब्रिटिश बेटांचें भूवर्णन.

भाग पहिला—उपोद्घात १
इंग्लंड ८
वेल्स ३१
दुसरा भाग—स्काट्लंड ३४
तिसरा भाग—आयर्लंड ४१
चवथा भाग—वसाहती परदेशीय संस्थानें वगैरे ... ४७
इंग्लंडापासून हिंदुस्थानास रस्ते ४८
ब्रिटिश बेटांबाहेरील इंग्लिश इतिहाससंबंधी स्थळें वगैरे युरोपांत ४९
आशियांत ५७
आफ्रिकेंत ६३
अमेरिकेंत ६४

इंग्लंडचा संक्षिप्त इतिहास.

पहिला भाग.

ब्रिटन लोकांची प्राचीन कारकीर्द,–इ० स० पूर्वी ५५ पर्यंत.
रोमन कारकीर्द, इ० स० पूर्वी ५५–इ० स० ४४९ पर्यंत.
पहिली साक्सन कारकीर्द, इ० स० ४४९–१०१७ पर्यंत.
डॅनिश कारकीर्द, इ० स० १०१७–१०४२ पर्यंत.
दुसरी साक्सन कारकीर्द, इ० स० १०४२–१०६६ पर्यंत.

या आपल्या **भरतखंडावर** आजकाल जे सार्वभौम-त्वानें अधिकार चालवीत आहेत ते **इंग्रज** लोक कोठून येतात, त्यांची पूर्व स्थिति कशी होती, उत्कर्ष कसा होत गेला, त्यांची राजसत्ता, उद्योग, कारस्थानीपणा, कला कौशल्य व नवीन शोध लावण्याविषयीं प्रयत्न, इत्यादि गोष्टींचें आपल्यास ज्ञान होणें विशेष महत्वाचें व अगत्याचें नव्हे काय ?

प्राचीन इतिहास.

आपण पृथ्वीच्या ज्या गोलार्धांत राहतों त्यास पूर्व गोलार्ध म्हणतात. त्या गोलार्धाचे नकाशांत पाहिलें असतां वायव्य कोपऱ्यांत जीं दोन मोठालीं बेटें दिसतात, तीं त्या सार्वभौमांचें मूळ ठिकाण होय. त्यांतील मोठ्या बेटास **ग्रेटब्रिटन** व धाकट्या बेटास **आयर्लंड** म्हणतात. मोठ्या बेटांत दक्षिणेस **इंग्लंड** व **वेल्स** आणि उत्तरेस **स्काटलंड** असे तीन देश आहेत. आपले सध्यांचे अधिकारी राणीसाहेब त्या इंग्लंड देशांतल्या

राहणाऱ्या आहेत, व गव्हरनर जनरल, गव्हरनर, चीफ कमीश्नर वगैरे मोठमोठे अधिकारी जे इकडे नेमून येतात ते हिंदुस्थानातून येतात.

सुमारें दोन हजार वर्षांपूर्वी तेथील लोक अगदीं अप्रसिद्ध असून अत्यंत रानटी स्थितींत होते. त्यांना राहावयास घरें नव्हतीं, खावयास धान्य नव्हतें व पांघरावयास वस्त्रें नव्हतीं. ते अरण्यांत मोकळीशी जागा पाहून बोरूंच्या झोंपड्या करून राहत. पांघरण्यास जनावरांचीं कांतडीं घेत, व त्यांस खाण्यास दूध, कंदमुळें, मासे, व मांस हीं असत. त्यांचे हात व मांड्यांपासून खालीं पाय उघडे असून ते व इतर भाग निरनिराळ्या रंगानें रंगविलेले असत. गाल (फ्रान्स) देशांतील लोकांनीं एथें प्राचीन काळीं वसाहती केल्या असें अनुमान आहे. त्या सेल्ट लोकांचे कांहीं वंशज आज मितीस स्काटलंड देशाच्या डोंगराळ प्रांतांत, आयर्लेंडांत व वेल्स प्रांतांत आढळतात, व त्यांतील कांहीं लोक अद्याप आपली जुनी गेलीक (फ्रांसांतील) भाषाही बोलतात. जुन्या लोकांच्या रीतिभाती, धर्म आणि राजनीति गालच्या लोकांप्रमाणेंच असत. त्यांच्या उपाध्यायांस ड्रूइड (ओकदैवत) म्हणत व त्यांच्याच हातीं त्यांच्या राज्याच्या सर्व दोऱ्या असत. उत्तरे कडील लोकांचा विशेषेंकरून शिकार व कंदमुळें यांवर निर्वाह होत असे. परंतु गाल लोकांच्या सहवासानें दक्षिणे कडील लोकांत थोडीशी सुधारणा होऊन त्यांमध्यें कांहीं स्थैर्यपणा आला होता, व त्यांनीं राज्येंहि स्थापिलीं होतीं. त्यांत हमेश कलह होऊन लढाया होत. अरिस्टाटल या ग्रीक तत्व वेत्त्यानें इ. स. पू. ३५० त्या सालीं या बेटांची ब्रिटानिया किंवा ब्रिटिश्श बेटें या नांवानें माहिती दिली आहे. त्या पूर्वी या बेटांची माहिती कोठेंहि दिलेली आढळत नाहीं. तो म्हणतो कीं

कार्थेज एथील फिनिशियन लोक त्या बेटांशीं व्यापार करीत असत व ते त्या बेटांना कथिलांचीं बेटें म्हणत.

ग्रेटब्रिटनाच्या नैर्ऋत्येस कार्नवाल प्रांतांत कथील, शिसें, तांबें, कातडीं, शिकारी कुत्रे आणि गुलाम यांचा व्यापार गाल (फ्रान्स) देशा मार्फत फिनिशियन लोकांबरोबर चाले. घोडीशी सुधारणा झाल्यावर धान्य, जनावरें, सोनें, रुपें, हलकीं मोतीं आणि लोखंड यांचाहि व्यापार चालू लागला.

रोमन कारकीर्द.

(इ. स. पू. ५५-इ. स. ४४१ पर्यंत.)

इंग्लिश लोक पहिल्यापासून फार धीट व पराक्रमी आहेत. रोमन लोकांचा सरदार ज्यूलिअस सीजर हा गाल एथें लढत असतां तेथील कांहीं लोकांस ब्रिटन एथील कांहीं लोकांनीं साह्य केलें होतें. तो सूड उगविण्या करितां ज्यूलिअस सीजरानें ब्रिटन देशावर स्वारी केली. तो इंग्लंडच्या किनारीं ८० जहाजें व चारा हजार लोक यांनिशीं इ. स. पू. ५५ सालीं आगष्टच्या २६ व्या तारिखेस डील गांवाजवळ येऊन उतरला. त्यास ब्रिटन लोकांनीं थोडा वेळ बराच त्रास देऊन घाबरें केलें, परंतु त्यानें अश्वेरीस त्यांस जेरीस आणून हस्तगत केलें. तोंडीं पहिंवाळा आला होता व विशेष जरूरीचीं कामें तुंबलीं होतीं म्हणून सीजरास मागें वळावें लागलें. पुढील वर्षी म्हणजे इ. स. पू. ५४ या वर्षी त्यानें पुन्हा त्या बेटांवर ८०० जहाजें व ३२००० पायदळ आणि २९०० घोडा इतक्या सैन्यानिशीं स्वारी केली. तेव्हां ट्रिनोव्यान्टीस (सध्यांचे एसेक्स व मिडलसेक्स एथील लोक) यांचा राजा कयासिव्हिलानस हा मोठ्या सैन्यासह येऊन त्यास लढाई देणार होता, परंतु त्याचे शिपाई विनकवाईतीचे असल्यामुळें ते सीझरास मिळून पळून गेले.

सीजरानें त्यांचे राजधानीचें शहर व्हेरुलेमियम् (सेंटआल्बन्स्) जाळून फस्त केलें, आणि त्या राज्यावर मांडुब्रोशिअस् व्यास स्थापून व त्यापासून खंडणी ठरवून घेऊन सीजर गाल देशास परत गेला.

सीजर गेल्यानंतर ब्रिटन देश सुमारें १०० वर्षे अगदीं निर्धास्त स्थितींत राहिला होता. कारण रोमन लोकांस इटली एथील तंटे मिटवितांना तिकडे लक्ष पोंहचविण्यास बिलकूल फावलें नाहीं. त्या योगानें ब्रिटन देशांत तंटे माजून तेथील सरदारांनीं त्यांच्या वेरिक ह्या अधिकाऱ्यास हद्दपार केलें. त्यानें इ. स. ४३ त रोमन लोकांचा बादशाह क्लाडिअस ह्यानें आलस ग्लाशिअस ह्यास सैन्य देऊन ब्रिटन देशावर स्वारी करण्याकरितां पाठविलें. त्यानें ब्रिटन देशावर स्वारी करून टेम्स नदीपर्यंत दक्षिणे कडील सर्व मुलूख जिंकून घेतला. (इ. स. ४३). पुढें आलस ग्लाशिअस ह्याच्या जागेवर आलेला सरदार आस्टोरिअस स्कयाप्युला यानें कोलचेस्टर एथें वसहात करून आव्हन व सेवर्न ह्या दोन नद्यांच्या कांठीं किल्याची एक रांग बांधून तटबंदी केली. त्या योगानें ते जिंकलेलें लोक त्यांच्या बरेच स्वाधीन झाले. ब्रिटन लोकांचे दंगे चालूच होते. त्यांचा कयारेक्टेकस झणून एक मेंढा धीट सरदार होता. त्यास जिंकण्या करितां क्लाडिअस बादशाहानें दुसरा एक हुशार सरदार पाठवून व त्या सरदारास इ. स. ५१ मध्यें पकडून व बेड्या घालून रोम शहरीं आणविलें. तेथें त्यानें मोठ्या शौर्यानें आपले हक्क दाखविल्यावरून क्लाडिअस ह्यानें त्यास बंधमुक्त करून त्याची मोठी बरदास्त ठेवण्यास सांगितलें. क्यारेक्टेकस ह्यास धरून रोमास पाठविलें, हें कित्येकांस न आवडून त्यांनीं बंड केलें. त्यांना आंतून भर देणारे त्यांचे उपाध्याय

रोमन कारकीर्द

डुइड हे होते व त्यांचे त्या वेळेस त्या बेटांत फारच प्राबल्य असे. त्यांचीं मुख्य ठिकाणें मोना व आंगलसी हीं बेटें होतीं, तीं त्यानें जिंकून घेतलीं. लंडन एथील रोमन लोकांचा अधिकारी व त्याचे साथी त्यांनीं आइसिनी (नारफक आणि सफक एथील) लोकांची राणी बोआडिशिया हिच्या मुलीच्या पातिव्रत्याचा भंग केल्यामुळें तिनें चवताळून लंडन व कोल्चेस्टर हीं शहरें जाळिलीं आणि लंडनचा सरदार व अधिकरी स्यूटोनिअस पालिनस त्याशीं लढून त्यास फार जर्जर केलें. परंतु शेवटपर्यंत आपला टिकाव लागणार नाहीं, असें वाटून तिनें रोमन लोकांच्या स्वाधीन न होतां विष खाऊन आत्महत्या केली (इ. स. ६१). त्या लढाईत तिचें ८०,००० सैन्य मेलें.

व्हेस्पेशिअन बादशाह हा अग्रिकोला ह्या सरदारास ब्रिटन एथें (सन ७८) त पाठवीतों पर्यंत इंग्लंड देश पूर्णपणें स्वाधीन झाला नव्हता. उत्तरेकडून क्यालेडोनिअन लोक हल्ले करून उपद्रव देत होते. त्या उपद्रवांपासून देशाचें संरक्षण होण्याकरितां अग्रिकोलाचानें फोर्थ आणि क्लाइड ह्या खाड्यांमध्यें एक नवीन किल्लयाची तटबंदी केली (इ. स. ८१), आणि देशांत पुष्कळ सुधारणा, चांगले कायदे, रोमन लोकांच्या कला, व लाटिन भाषा ह्यांची माहिती करून देऊन लोकांचीं मनें आपलेकडे वळवून घेतलीं. तो ब्रिटनवर सन ७८-८४ पर्यंत होता. इ. स. ८५ मध्यें रोमन लोक आणि क्यालेडोनियन (स्कॉच) लोकांचा सरदार ग्यालगेकस ह्यांमध्यें ग्रांपियन पर्वताच्या पायथ्याशीं मोठी भयंकर लढाई होऊन एकाच लोकांचा पराभव झाला. तथापि उत्तरेकडील दंग्यांचा बीमोड होईना म्हणून पाड्रिअन बादशाहानें इ. स. १२१ मध्यें टाइन नदी व सालवेखाडी ह्यांमध्यें आणखी एक तटबंदी

केली. पुढें अंटोनिअस पायस या बादशहाचे कारकीर्दीत आग्निकलाचे भिंतीचे जागीं आणखी दुसरी एक दगडी तटबंदी इ. स. १३९ मध्यें फोर्थ आणि क्लाइड यांच्यामध्यें जाहली. सिव्हीरस बादशाहाच्या कारकीर्दीत रोमन लोकांचे राज्य स्कॉटलंडच्या उत्तरेपर्यंत वाढलें. त्यानें एडिंबरा बादशहाच्या भितीची आणि दुसऱ्याही भितींची मजबुती केली (इ. स. २१०). या वेळेस रोमन लोकांच्या राजधानीचें शहर यार्क हें होतें, व तेथेंच इ. स. २११ त सिव्हिरस बादशाहा मरण पावला.

इटाली देशावर व इतर प्रांतांवर गाथ लोकांचा सरदार आलरिक याचे व दुसऱ्या जर्मन लोकांचे हल्ले वारंवार होऊं लागल्यामुळें होनोरिअस बादशहानें इ. स. ४१० मध्यें असा विचार केला कीं आपलें सैन्य व आपले सरदार असा विकट प्रसंगीं दूर ठेवण्यानें आपली फार हानि होणार आहे. म्हणून त्यानें ब्रिटन देशांतील आपलें सैन्य व सरदार त्यांस परत येण्यास सांगून ब्रिटन लोकांनीं आपलें राज्य सांभाळावें असें त्यांस लिहून पाठविलें.

रोमन लोकांचें राज्य याप्रमाणें ब्रिटन देशावर ४०० वर्षे असल्यामुळें ब्रिटिश लोकांच्या आंगचें शौर्य, दूरदृष्टि, व कारस्थानीपणा हीं अगदीं नष्ट झालीं होतीं. या योगानें उत्तरेकडील पिक्ट व स्काट लोकांपासून आपला बचाव करण्यास त्यांचें भंगीं आवांका राहिला नव्हता. म्हणून त्यांनीं आपल्यास मदत मिळण्याकरितां रोमन लोकांचें पुष्कळ आर्जव केलें. परंतु आजकडून मिळण्यासारखी मदत न मिळाल्या कारणानें त्यांस दुसरें घर पाहावें लागलें. त्यावेळेस त्यांचा राजा व्होर्टिजर्न नामें होता.

पहिली साक्सन कारकीर्द.

(इ. स. ४४९-इ. स. १०१७ पर्यंत)

व्होर्टिजर्न राजानें साक्सन लोकांस मदतीबद्दल कांहीं पैसा देण्याचें कबूल करून त्यांजकडून कांहीं सैन्य मागितलें. तें आमंत्रण त्यांनीं मोठ्या आनंदानें पुढील आशेवर पतकरून, हेंजिस्ट आणि होर्सा या चांचे सरदारांबरोबर ३ जहाजांत १६०० लोक भरून इ. स. ४५० त मदत पाठविली. त्यांनीं त्या उत्तरेकडील लोकांस हांकून लाविलें. त्यांच्या मदतीचा उपयोग झाला असें पाहून व्होर्टिजर्न त्यानें आणखीही वेळोवेळीं त्यांची मदत आणविली. दुसऱ्या वेळेस जी मदत आली, त्याबरोबर हेंजिस्ट याची रूपवती मुलगी रोवेना ही आली होती. तिने व्होर्टिजर्न राजाचा मुलगा व्होर्टिमर यास वरल्यावर व्होर्टिजर्न राजानें आणखी ४० जहाजें मदतीस आणविलीं. याप्रमाणें त्यांचा व्यवहार उत्तम रीतीनें चालला असतां, साक्सन लोकांची मति स्वार्थाकडे वळून भांडणें सुरू झालीं. इ. स. ४५५ त पेल्सफर्ड एथें मोठी लढाई होऊन होर्सा मरण पावला व हेंजिस्ट यास स्वदेशीं निघून जावें लागलें. पुढें हेंजिस्ट याचा जांवई व व्होर्टिजर्नचा मुलगा व्होर्टिमर हा मेल्यावर हेंजिस्ट यानें परत येऊन, इंग्लंडची गादी बळकाविली, व दंगा करणाऱ्या ब्रिटन सरदारांची कत्तल उडवून ब्रितन लोकांस वश करून घेतलें. हेंजिस्ट आणि होर्सा यांच्या जन्माची बातमी चोहोंकडे पसरल्यावर त्यांच्याच जातीच्या दुसऱ्या लोकांत महत्वाकांक्षा उत्पन्न होऊन झुंडीच्या झुंडी ब्रिटन देशावर येऊन कोसळल्या. त्यांत स्लेस्विग एथील अँग्ल लोक आणि जटलंड एथील ज्यूट लोक हे प्रमुख होते. त्यांनीं सापडेल तेथें ताव मारून वसाहती व राज्यें स्थापिलीं.

त्या लुटारू लोकांनीं त्याप्रमाणें जीं राज्यें ठिकठिकाणीं स्थापिलीं, त्यांतील ७ प्रमुख झालीं, म्हणून त्यांस साक्सन राज्यसप्तक असें म्हणतात. तीं राज्यें एकेवेळीं स्थापन झालीं नसून एकानें स्थापिलीं, असेंही नव्हतें.

(१) **केंटचें** राज्य सन ४५७ त सुरू होऊन सन ८२७ पर्यंत चाललें होतें. हें **हेंजिस्टचा** मुलगा एरिक यानें स्थापिलें होतें. त्यावर १७ राजे झाले. त्या राज्यांत सध्यांचा **केंट** प्रांत मोडत असे. हें राज्य ज्यूटांचें होतें.

(२) **ससियाचें** राज्य सन ५८६ पासून ८२७ पर्यंत चाललें होतें व त्यांत (इंग्लंडचा) मध्यप्रांत मोडत असे. हें राज्य क्रीडा यानें सन ५८६त स्थापान केलें होतें. हें **आंग्लांचें** राज्य होतें.

(३) **नार्थंब्रियाचें** राज्य सन ५४७ त **इडा** यानें स्थापिलें व तें सन ७९२ त लयास गेलें. त्या मुदतींत त्यावर २३ राजे झाले. हें **आंग्ल** लोकांचें होतें.

(४) पूर्व आंग्लियाचे राज्याची स्थापना उफा यानें ५७१ त केली. तें सन ७९३ पर्यंत चाललें होतें. त्या राज्यांत सध्यांचे **नार्फक, सफक, केंब्रिज** आणि **हेंडफर्डचा** कांहीं भाग यांचा समावेश होई. हें हीं आंग्लांचें हातें.

(५) **एसेक्स** एथील (पूर्व साक्सनांचें) राज्य ५२७ पासून सन ७४७ पयत चालू होतें. त्यावर १४ राजे झाले. याची स्थापना अर्कोन्विन यानें केली. यांत **एसेक्स** व **मिड्लसेक्स** हे प्रांत मोडत होते.

(६) **ससेक्स** एथील (दक्षिणेकडील साक्सनांचें) राज्य ऐली यानें ४१० त स्थापिलें. तें सन ६०० पर्यंत चाललें

होतें व त्यावर ५ राजे झाले. त्यांत **ससेक्स** म **सरेचा** बराच भाग मोडे.

(७)° **वेसेक्सचें** (पश्चिम **साक्सन** लोकांचें) राज्य सन ५१९ त **सर्डिक** व **सिम्रिक** यांनीं स्थापिलें. तें अक्षेर पर्यंत टिकलें. त्यांत **हाम्पप्रांत, बर्कप्रांत, उइल्ट्प्रांत, डार्सेट**• प्रांत, **समरसेट** आणि **डेव्हानप्रांत** यांचा समावेश होई. त्यांवर **इना** झणून एक प्रसिद्ध राजा होऊन गेला. त्यानें पुष्कळ कायदे केले व ब्रिटन लोकांचें उत्तम रीतीनें संरक्षण केलें. त्यानें **रोम** एथें आपल्या लोकांकरितां शाळा स्थापनकरून धर्म खात्याकडे पुष्कळ पैसा खर्च केला. तो सन ६८८—७२८ पर्यंत राज्य करीत होता.

कँटचा राजा **एथलबर्ट** त्यानें **ख्रिस्ती** धर्माचा स्वीकार प्रथम केला आणि कायद्यांचा उपयोग लोकांस उत्तम रितीनें करून दिला. तो इ. सन ५६० पासून ६१६ पर्यंत राज्य करीत होता.

हीं वर सांगितलेली ७ राज्यें अगदीं स्वतंत्र होतीं, परंतु त्यांवरील राजांमध्यें अभिलाषबुद्धि उत्पन्न होऊन, "बळी तो कान पिळी" ह्या न्यायानें कित्येकांनीं आपले शेजारचीं राज्यें आपल्या एशांत उतराविलीं. सन ८०० च्या सुमारास,त्या सातांचीं ३ राज्यें **नार्थंब्रिया, मर्शिया** आणि **एसेक्स** हीं झालीं. **एसेक्सचा** राजा **एग्बर्ट** हा **इना** चे भावाचा वंशज होता. त्यास कांहीं अडचणींमुळें **फ्रान्स** एथें **शार्लमेन** राजाच्या दरबारीं जावें लागलें होतें. इंग्लंडच्या राज्याची त्याप्रमाणें झालेली डळमळ व अव्यवस्था आणि त्यांवरील राजांचे मनांतील परस्परांचें वैमनस्य इत्यादि गोष्टींचा विचार करून **एग्बर्ट** यानें फ्रेंच राजाच्या साह्यानें त्या तीन राज्यांचें एक राज्य करून

टाकिलें. याप्रमाणें **साक्सन** लोकांनीं ४०० वर्षें श्रम केल्यावर इंग्लंडचें सर्व राज्य इ० स० ८२७ त त्यांचे स्वाधीन झालें. **एग्बर्ट** यास सन ८०० मध्यें **वेसेक्सचे** राज्यावर बसविलें.

जे लुटारू लोक **ब्रिटन** देशांत ४०० वर्षें खपत होते. त्या सर्वांची भाषा, धर्म रीतिभाति, बहुतेक एक असल्यामुळें सर्व देशाचें राज्य त्यांचे ताब्यांत आल्यावर त्यांनीं त्या देशास **इं-ग्लंड** (आंगल्-लांड-आंग्ल लोकांचा देश) हे नांव ठेविलें आणि तेथें आपली भाषा सुरू केली.

एग्बर्ट हा ब्रिटनमध्यें जन्मलेला असून फ्रान्स ए-थील दरबारीं बरेच दिवस असल्यामुळें तो त्याच्या भाऊबंदां पेक्षां बराच विद्वान् व सुशिक्षित झाला होता. त्याला इंग्लंडचें राज्य मिळाल्यावर त्यानें आपलें राज्यांत बरीच सुधारणा केली. त्यानें **साक्सन** लोकांमध्यें ३ प्रति केल्या.-सरदार (क्षत्रिय), वैश्य (शेतकी करणारे) आणि गुलाम (शूद्र).

स्कान्डेनेव्हिया (**नार्वे व स्वीडन**) व डेन्मार्क एथील लोक इ० स० ७८७ सालापासून ब्रिटन बेटाचे उत्तर भागावर लूट करून पीडा देत असत. ते **एग्बर्टा**चे कारकीर्दीत दक्षिणेस उतरून केल्ट प्रांतांतील लोकांच्या साह्यानें त्यांनीं बराच उपद्रव सुरू केला. तेव्हां **एग्बर्टा**नें त्यांवर स्वारी करून त्यांचा **कार्न-वाल** एथें **हेंग्स्डौन** टेंकडीजवळ इ. स. ८३५ त पराभव केला. परंतु त्या जयाचा आंनद फार दिवस टिकला नाहीं. **एग्बर्ट** इ० स० ८३७ त मेल्यावर त्याचा मुलगा **एथेलउल्फ** हा गादीवर बसला. तो मोठा शहाणा, शूर, व बलवान् पु-रुष होता. त्याचे व त्याच्या ३ मुलांच्या कारकीर्दीत डेन्स लोकांनीं इंग्लिश लोकांचा इतका पिच्छा पुरविला की इंग्लं-

डॉन इंग्लिश लोकांचे राज्य राहतें किंवा नष्ट होतें, याविषयीं शंका येऊं लागली.

एथेलउल्फ इ० स० ८५८ मेल्यावर त्याचा मुलगा एथलूबाल्ड हा गादीवर बसला. त्यानें आपल्या सावत्र आईशीं लग्न करण्या करितां खटपट केली. या अमानुष कृत्याविषयीं त्याचें राज्य प्रसिद्ध आहे. तो० स० ८६० मध्यें मेल्यावर त्याचा धाकटा भाऊ एथलबर्ट हा राजा झाला. त्याचे मागून त्याचा धाकटा भाऊ एथेलरेड हा इ० स० ८६६ मध्यें गादीवर ब० सला. त्यास डेन्स लोकांबरोबर केलेल्या युद्धांत कधीं जय व कधीं अपजय येतां येतां एके लढाईंत मोठी जखम होऊन स० ८७१ मध्यें तो प्राणास मुकला. त्याचे मागून त्याचा भाऊ अल्फ्रेड दी ग्रेट (महान्) हा गादीवर बसला.

अल्फ्रेड दी ग्रेट हा गादीवर बसला तेव्हां त्याचें वय २० वर्षांचे होतें. तो एथेल् उल्फाचा पांचवा मुलगा होता. तो लहानपणा पासून मोठा उद्योगी असे. तो शूर, धीट, धोरणी व कारस्थानी होता. परंतु त्याला लहानपणा पासून विद्येची विशेष गोडी होती, त्यामुळें त्याचें चित्त विद्येशिवाय इतर गोष्टीकडे क्वचित् लागे. त्या कारणामुळें चांचे लोकांचा सरदार गथ्रम त्यासीं टक्कर देण्यास त्यास अमळ जड गेलें. त्यानें एकाएकीं चोहोंकडून हल्ले केल्यामुळें अल्फ्रेड राजास आपलें राज्य सोडून समरसेट प्रांता नजीक अथेल्नी बेटांत ५ महिने अज्ञात वासांत घालवावे लागले.

अल्फ्रेड राजानें निराश न होतां आंतून धीर ठेवून डेन्स दरबाराची चौकशी चालविली होती, व तो स्वतः किनरी वाल्याच्या वेषानें त्यांच्या लष्करांत जाऊन त्यांचीं कारस्थानें ध्यानांत ठेवीत असे. अल्फ्रेडचे सरदार त्यास कधीं कधीं भेटत असत व गुप्त

रीतीनें हल्ला करण्याच्या उद्योगांत होते. डेन्स लोक निश्चिंत झाले आहेत, व लष्करांत अव्यवस्था झाली आहे, असें पाहून अल्फ्रेडानें त्यांच्या सरदारावर एकदम हल्ला करून त्याचा व त्याचे १२०० सैन्याचा पराजय केला, व त्यांचा प्राण घेतला. नंतर आपल्या सरदारांस बोलावून आणून त्यानें डेन्स लोकांस पुनः एथॉन्डम् एथें मोठी लढाई दिली, व तींत त्यांस जेरीस आणिलें. सन ८७८ सालीं डेन्स लोकांनीं घेतलेल्या प्रांतांतील कांहीं भाग आपले स्वाधीन करून घेऊन बाकीच्या भागाबद्दल त्यांपासून खंडणी ठरवून घेतली. याप्रमाणें त्यांचा व इंग्लिश लोकांचा पेड्मोर एथे तह झाल्यावर इंगलंडच्या राज्याचे ड्यानिश व इंग्लिश असे २ भाग झाले. इंग्लिश व डेन्स ह्यांची भाषा, चाली व धर्म हे बहुतेक एकच असल्यामुळें त्यांचें उत्तरोत्तर सख्य होऊन दोन्ही राष्ट्रांचें एकच राष्ट्र बनलें.

अल्फ्रेड् राजानें उत्तम कायदे करून लोकांस अतिशय सुख दिलें. ते कायदे इतके उत्तम होते कीं, आजकालच्या इंग्लिश कायद्यांची मूळ तत्वें, त्या राजाच्याच कायद्यांतून घेतलीं आहेत असें झटलें तरी चालेल. त्याचे कारकीर्दीत रस्त्यांत पडलेल्या सोन्यास कोणी हात लाविला, असें आढळलें नाहीं. त्यानें ठिकठिकाणीं किल्ले बांधून देशाचा उत्तम बंदोबस्त केला होता, व चांचे लोकांच्या उपद्रवाचे बंदोबस्ताकरितां त्यानें लढाऊ गलबतें तयार केलीं होतीं. त्यानें शाळा घालून लोकांस विद्येची गोडी लाविली, हे सर्व सद्गुण त्यानें आईपासून संपादिले होते.

डेन्स लोकांच्या येणाऱ्या नवीन टोळ्यांबरोबर त्यास पुष्कळ लढाया कराव्या लागल्या, व त्यांत त्याला जयच मिळे. तो इ. स. ९०१ मध्यें मरण पावला ते वेळेस त्याचें वय ५२ वर्षांचें होतें. त्याचे मागून त्याचा पहिला

मुलगा **एड्वर्ड** किंवा **एड्वर्ड** दि **एल्डर** (वडील) हा गादीवर बसला. तो राजा विद्येचा भोक्ता होता व बापाप्रमाणें शूरही होता. त्यानें **आक्सफर्ड** एथील **युनिवर्सिटी** (विश्वविद्यालय) स्थापन केलें असें ह्मणतात. कोणी त्याचे बापानें तें स्थापिलें असेंही ह्मणतात. राज्यकारभारांत त्याच्या बहिणीची त्याला फार महत असे. त्यानें सन ९०१ ते ९२५ पर्यंत राज्य केलें. तो मेल्यावर त्याचा मुलगा पहिला **एथेल्स्टन्** हा (स. ९२५) त गादीचा मालक झाला. त्याचे कारकीर्दींत "**नार्थंब्रिया**" एथील राजा मेल्यावर तो प्रांत त्यानें खालसा करून आपले राज्यास जोडिला, व **वेल्स** प्रांतावर खंडणी ठरविली. तसेंच **स्काट्लंड** देशही त्यानें आपल्या राज्याखालीं आणिला. इ. स. ९३७ मध्यें **नार्थंब्रियाच्या** मेलेल्या राजाचा मुलगा **आन्लाफ** यानें **नार्वे, डेन्मार्क** व **स्काट्लंड** एथील. लोकांशीं आणि जुन्या **ब्रिटन** लोकांशीं तह करून ६०० जहाजांनिशीं **हंबर** एथें तळ दिला. सद्दीचा जोर होता तोंपर्यंत त्यानें तरवारही चांगली गाजविली. परंतु **ब्रुन्यान्बुर्ग** एथें जी लढाई झाली तींत त्याचे अति नुकसान होऊन त्याला **आथेल्स्टन** राजाचे स्वाधीन व्हावें लागलें. **एथेल्स्टन** मोठा शूर, विद्वान् व कारस्थानी होता ह्मणून महाद्विपांतही त्याची वरीच वचक बसली होती. त्यानें व्यापारास व विद्येस फारच उत्तेजन दिलें होतें. तो मेल्यावर त्याचा भाऊ पहिला **एड्मंड** किंवा **एड्मंड** दी एल्डर (वडील) हा सन ९४० त गादीवर बसला. त्यानें ६ वर्षें राज्य केल्यावर त्यास **आन्लाफ्** यानें मारेकऱ्यांकडून मारिलें. त्याचे कारकीर्दींत **डेन** लोकांनीं पुनः उठून राजापासून उत्तरेकडील सर्व भाग हिरावून घेतला. त्याला २ मुलगे होते. परंतु ते फारच लहान

असल्यामुळें त्याचा भाऊ **एड्रेड** हा इ. स. ९४६ त गादीवर बसला. त्यानें ९ वर्षें राज्य केल्यावर **एड्मंडाचा** वडील मुलगा किंवा राजाचा पुतण्या **एड्वी** हा सन ९६५ त गादीवर बसला. तो २ वर्षांनीं मारला गेल्यावर **एडमंड्चा** दुसरा मुलगा **एड्गर** हा इ. स. ९५८ त गादीचा मालक झाला. तो मोठा दयाळू, शहाणा व पराक्रमी होता. त्यानें **स्काट्लंड** देशांत आपला अंमल बसवून, **वेल्स** प्रांतापासून खंडणीदाखल लांडग्यांचा उपद्रव कमी व्हावा म्हणून लांडग्यांचीं ३०० डोकीं आणून देण्याचा ठराव करून घेतला. त्या योगानें ४ वर्षांत लांडग्यांचा उपद्रव अगदीं कमी झाला. त्याची कारकीर्द लोकांस इतकी सुखावह झाली कीं, त्यांनीं त्यास **पीसफुल** (शांत) हा किताब दिला होता. तो इ. स. ९७५ त मेल्यावर त्याच्या मागून दुसरा **एड्वर्ड** सन ९७५ ते १७९ पर्यंत व दुसरा **एथल्रेड** ९७९ ते १०१६ पर्यंत अनुक्रमें राज्य करीत होते. त्यांचे व **डेन** लोकांचे तंटे चालले होते. दुसरा **एथल्रेड** किंवा **एथल्रेड, दी अन्रेडी** (सुस्त) या राजानें **नार्मंडीचा** ड्यूक, दुसरा **रिचर्ड** ह्याची मुलगी **एमा** हिच्याशीं, लग्न केलें होतें. त्यानें **डेन्स** लोकांस प्रथम कांहीं लालूच दाखवून त्यांची इ. स. १००२ सालीं मोठी कत्तल उडविली. तींत **डेन्मार्काचा** राजा **स्वेन** ह्याची बहीण मारिली गेल्यामुळें त्यानें सूड उगविण्याकरितां **इंग्लंडावर** स्वारी केली. **एथल्रेड** राजानें त्यास स. १०१३ त लढाई दिली, परंतु त्याचा पराभव झाल्यामुळें त्यास **फ्रान्सास** पळून जावें लागलें. **स्वेन** राजा मेल्याबरोबर त्यानें **इंग्लंडास** परत येऊन राज्य मिळविण्याची खटपट केली. परंतु **स्वेन** राजाचा मुलगा **कान्यूट** त्यानें त्यास जिंकून लंडन एथें कैदेत ठेविलें होतें. दुसरा **एथेल्रेड** इ. स. १०१६

त मेल्यावर त्याचा मुलगा दुसरा एड्मंड किंवा एडमंड दी आयरनःसाइड (लोहहृदय) ह्यास साक्सन लोकांनीं राज्याधिकारी ठरविलें. परंतु क्यान्यूटा पुढें त्याचा टिकाव न लागून त्यानें राज्याची भागी करण्याचें कबूल केलें. पुढें थोड-क्याच दिवसांत तो दुसरा एड्मन्ड मारला जाऊन इंग्लंडचें सर्व राज्य कान्यूट ह्यास इ. स. १०१७ त आयतेंच मिळालें.

ड्यानिश् कारकीर्द.

(१०१७-१०४२)

क्यान्यूटानें आपले सरदार व अनुयायी यांचा प्रेम संपादण्याकरितां लोकांवर जबर कर बसविले होते, परंतु त्या लोकांची संपत्ति व प्राण त्यानें उत्तम राज्य करून सुरक्षित ठेविले होते. त्यानें साक्सन लोकांच्या चालींप्रमाणें वागून आपल्या व त्यांच्या जातींमध्यें भेद ठेविला नव्हता. तो मोठा धार्मिक होता, व तो रोमास धर्मयात्रेसही गेला होता. तिकडून परत आल्यावर त्यानें स्कान्डलंडचा राजा व त्याचा पुतण्या कम्ब-र्लंडचाराजा, डंकन यास सन १०३० त जिंकिलें. तो १०३५ मेला तेव्हां त्यास पहिले बायकोपासून स्वेन आणि हारल्ड असे दोघे मुलगे होते आणि त्याची दुसरी बायको दुसऱ्या एथल्रेडची विधवा एमा, इच्यापासून हार्डीकयान्यूट हा मुलगा झाला होता. त्या दुसऱ्या लग्नाच्या अटीप्रमाणें हार्डी, क्यान्यूट हा इंग्लडच्या राज्याचा हकदार होता. परंतु तो तेथें ते वेळेस नसल्यामुळें हारल्ड यानें तें राज्य बळकाविलें. त्या दोघांमध्यें लढाई होणार होती, परंतु एमा हिनें मध्यस्तीस पडून दक्षिणेकडील सर्व राज्य तिनें आपल्या ताब्यांत घेतल्यामुळें ती लढाई टळली.

पहिल्या **हारल्डा**च्या (१०३५-१०४०) कारकीर्दीत केन्टचा अर्ल **गाड्विन** यानें विश्वासघातानें **एथल्रेड**चा मुलगा **आल्फ्रेड** यास मारविलें. हारल्ड सन १०४० त मरण पावल्यावर त्याचा भाऊ **हार्डीकयान्यूट** हा गादीवर बसला. परंतु तो मोठा निर्दय, क्रूर, व अतिशय अंमल करणारा असल्यामुळें त्याचा त्यांतच लवकर नाश झाला. तो मेल्यावर **ड्यानिश** कारकीर्द लयास जाऊन **सॅक्सन** (साक्सन) घराण्याची दुसरी कारकीर्द सन १०४२ त पुनः सुरू झाली.

दुसरी साक्सन कारकीर्द.

इ. स. १०४१-१०६६ पर्यंत.

एडवर्ड दी कान्फेसर (स्वधर्म दुःखभोगी) हा एमा व **एथल्रेड** यांचा मुलगा होता. तो **नार्मंडीस** आजोळीं बरेच दिवस असल्यामुळें त्यास सर्व रीतिभाती तिकडल्याच लाग ल्या होत्या, व त्याचा **नार्मन** लोकांवर प्रेमही जडला होता. **एड्वर्ड**राजानें २५ वर्षें राज्य केलें. त्यास संतान नव्हतें. तो इ. स. १०६६ मध्यें मरण पावल्यावर राज्यांत बंडाळी होऊन त्याचें राज्य **विटन** सभेनें त्याचा मेहुणा व **गाड्विन**चा मुलगा **हारल्ड** ह्यास दिलें. कारण **एड्गर एथलिंग** हा/ते वेळेस फारच लहान होता. एडवर्ड (स्वधर्म दुःखभोगी) हा जिवंत असतानां ती बंडाळी सुरूच होती. तो आसन्न होतांच त्यानें आपलें राज्य आपला नातेवाईक व **नार्मंडी**चा ड्यूक **उइलियम** ह्यास द्यावें ह्मणून आपली इच्छा दर्शविली होती. कारण **उइलियम** त्या. वेळेस तसाच मोठा पराक्रमी युरोपभर गाजत होता. शिवाय **एडवर्ड फ्रान्सा**हून इकडे येतांना त्याची व ड्यूकाची आणभाक अशी झाली होती कीं, **एडवर्डा**चेमागून **इंग्लंड**चें राज्य ड्युकास मिळावें.

एडवर्डाची मरणाची बातमी कळतांच उइलियमानें कित्येक राजांच्या व दुसऱ्या अलेक्झांडर पोपाच्या सल्लयानें मोठी कडेकोट तयारी करून नावेंची ३०० लढाऊ जहाजें हंबर नदीच्या मुखाकडे पाठवून आपण ६०००० सैन्यासह ससेक्स प्रांतांत पिव्हेन्सी एथें उतरून हेस्टिंग्स् एथें तळ दिला. हारल्ड राजानें उत्तरेकडे आलेल्या नार्वेजिएन लोकांचा राजा हारल्ड हाड्रा व स्वतांचा भाऊ टोस्टी यांजबरोबर यार्क एथें लढून त्यांचे मुख्य सरदार मारल्यावर तो विसांवा घेत आहे तों दक्षिणेकडील वातमी जाऊन पोंहचली. त्याबरोबर तो दक्षिणेकडे येऊन उतरला, परंतु उइलियमा बरोबर त्यानें कोणतीही गोष्ट कबूल न केल्यामुळें लढाई होऊन तो प्राणास मुकला. ह्याप्रमाणें इंग्लंडचें राज्य नार्मंडीचा ड्यूक उइलियम ह्यास इ. स. १०६६ च्या आक्टोबरच्या १४ तारखेस निर्वेध प्राप्त झालें. त्या लढाईत १५००० नार्मन व ब्रेंच जास्त इंग्लिश प्राणास मुकले.

नार्मन (उत्तरेकडील) लोकांचें चांचेपणाचे धंदे सुमारें २०० वर्षें चालले होते, व त्यांच्या योगानें युरोपाच्या दक्षिण व पश्चिम किनाऱ्यांवरील देश अति त्रासून गेले होते. त्यांचा कांहीं जहाजें सेन नदींतून पारिस शहरापर्यंत येऊन तें शहर त्यांनीं जाळून टाकिलें. तेव्हां फ्रान्सांतील एका राजानें त्यास लांच देऊन शांत केलें. इ. स. ९१२ त नार्मन लोकांचा एक सरदार रोलो ह्यानें फ्रान्समध्यें येऊन चार्ल्स् दी सिंपल (साधा) ह्या राजापासून फ्रान्स देशाच्या वायव्येकडील बराच भाग व त्याची मुलगी हीं जुलमानें आपले स्वाधीन करून घेतलीं. त्यानें त्या स्थापन केलेल्या राज्यास पुढें नार्मंडी असें नांव पडलें. उइलियम हा, नार्मंडीचा ६ वा ड्यूक, राबर्ट दी डेव्हिल

(विशाच) याचा व फ्रुथांडरचा मुलगा, मार्टिल्डा, यांचा मुलगा होता.

ख्रिस्ती धर्माचा प्रसार इंग्लंड देशांत रोमन लोकांचे कारकीर्दीत कांहीं शाला; परंतु **साक्सन** लोकांचे कारकीर्दीत मूर्तिपूजा पुनः सुरू झाली होती. तो, **ग्रेगरी** पोपानें कांहीं उपदेशक पाठवून व बरेच दिवस खटपट करून **ख्रिस्ती** धर्माची स्थापना केली. व तोच धर्म तेथें अद्याप चालू आहे.

साक्सन किंवा साक्सन घराणें.

एग्बर्ट स. ८३९—८५८.

एथेल्वुल्फ.

एथेल्वाल्ड स. ८५८–६०	**एथेल्बर्ट** स. ८६०–६६	पहिला **एथेल्रेड** स. ८६६–८७१	**आल्फ्रेड दिग्रेट.** स. ८७१–९०१

एड्वर्ड दि एल्डर (वडील) स. ९०१–९२५	**एथेलरेड**

एथेलस्टन स. ९२५–९४०	पहिला **एडमंड** स. ९४०–९४६	**एड्रेड** स. ९४६–९५५

एड्वी स. ९५५–५९	**एडगर दी पीसफुल** (शांत) स. ९५९–९७५

एडवर्ड दी पीस्फुल

एडवर्ड दि मार्टर (धर्मार्थ मरणारा)
स. ९७५—९७९

एथेलरेड दि अन्रेडी (मंद)
स. ९७९—१०१६.

एडवर्ड दि आयर्नसाइड (लोहहृदय)

एडवर्ड दि कान्फेसर
(स्वधर्म दुःखभागी)
स. १०४२—१०५५.

एडवर्ड

एडगर एथलिंग

मार्गरेट
तिसऱ्या मात्ल्कमची बायको)

एडिथ (माटिल्हा)
पहिले हेन्रीची बायको)

ज्यानिश कारकीर्द
क्यान्यूट (क्रूट) स. १०१६—१०३५

पहिला हारल्ड
स. १०३५–१०४०

हार्डी कान्यूट.
१०४०–१०४२

दुसरा हारल्ड
गाड्विनच्या अर्लाचा मुलगा याला विटन सभेने नेमिले हा स. १०६६त हेस्टिंग्स-च्या लढाईत मरण पावला.

सॅक्सन वंशावळी

एडमंड आयर्नसाइड

एडवर्ड दि एक्साइल

मार्गरेट
स्कॉटलंडच्या मात्ल्कमची बायको

एडगर एथलिंग

मॉड
पहिल्या हेन्रीची बायको

मार्गरेट
तिसऱ्या मात्ल्कमची बायको

एडिथ (माटिल्हा)
पहिले हेन्रीची बायको)

+ स. ५१ **क्यारेक्टेकस** यास **रोमास** नेलें.
५९ **बोआडिशिया** इनें लंडन जाळिले.
७६-८४ **आग्रिकला ब्रिटनचा** अधिकारी झाला, व त्याची कारकीर्द.
८५ **ग्रांपियन** एथील लढाई.
१२१ **एड्रिअनाची** तटंबंदी.
२१० **सिव्हीरस** याची तटबंदी व दुरुस्ती.
४१० **होनेारिअस** यानें रोमन सैन्य परत नेले.
४४९ इंग्लिश लोक **हेन्जिस्ट** व **होर्सा** यांबरोबर ब्रिटनांत आले.
४५५ **ऐल्सफर्ड** एथील लढाई.
४८७ **हेंजिस्टानें केंटचें** राज्य स्थापिलें.
४९७ **इलीयानें वेसेक्सचें** राज्य स्थापिलें.
५१९ **सर्डिक** यानें **वेसेक्सचें** राज्य स्थापिलें.
५२७ **एसेक्सचें** राज्य **आर्केन्विन** यानें स्थापिलें.
५४७ **नार्थंब्रियाचें** राज्य **इडा** यानें स्थापिलें.
५७१ **आंग्लियाचें** राज्य **उफा** याने स्थापिलें.
५८६ **मर्शियाचें** राज्य **क्रीडा** याने स्थापिलें.
८०० **सप्तराज्यांचें** त्रिराज्य झालें.
८२७ **एग्बर्ट** गादीवर बसला.
८२७-१०१७ पहिली **साक्सन** कारकीर्द.
८३९ **एथेल्वुल्फ** गादीवर बसला.
८५८ **एथेल्बाल्ड** राजा झाला.
८६० **एथेल्बर्ट** राजा झाला.
८६६ **एथेल्रेड** गादीवर बसला.

८७१ अल्फ्रेड दि ग्रेट राज्यारूढ झाला.
८७७ अल्फ्रेडानें अपलें राज्य जिंकून परत घेतलें.
९०१ एड्वर्ड दि एल्डर गादीवर बसला.
९२५ आथेलस्टन राजा झाला.
९४० पहिला एडमंड राजा झाला.
९३६ एड्रेड राजा झाला.
९५५ एड्वी राजा झाला.
९६९ एड्गर दि पीस्फुल राजा झाला.
९७५ एड्वर्ड दि मार्टर राजा झाला.
९७९ एथेलरेड दि अन्रेडी राजा झाला.
१०१६ कान्यूट राजा झाला.
१०१६-१०४२ डयानिश कारकीर्द.
१०३५ पहिला हारल्ड राजा झाला.
१०४० हार्डीकान्यूट राजा झाला.
१०४२ एड्वर्ड दि कान्फेसर राजा झाला.
१०४२-१०६६ दुसरी साक्सन कारकीर्द.
१०६६ दुसरा हारल्ड राजा झाला.
१०६६ उइलियम विजयी यानें हेस्टिंग्स एथील लढाई जिंकून गादीवर बसला.

दुसरा भाग.

नार्मन कारकीर्द.

इ. स० १०६६-११५४-८८ वर्षांची कारकीर्द.

१ उइलियम दि कांकरर १०६६-१०८७.
२ उइलियम रूफस १०८७-११००.
३ पहिला हेनरी (बोक्लार्क) ११००-११३५.
४ स्टीफन (ब्लाईसचा अर्ल) ११३५-११५४.

उइलियम दि कांकरर (विजयी).

उइलियमादिकांकरर (विजयी) हा **हेस्टिंग्स** एथें विजयी झाल्यावर त्यास **वेस्टमिन्स्टर** एथें **यार्क** एथील धर्माधिकाऱ्यानें राज्याभिषेक केला, आणि **उइलियम** याजकडून "मी कायदे पाळीन व इंग्लिश लोकांस निःपक्षपातानें वागवीन" अशा शपथा घेवविल्या. परंतु **साक्सन** लोकांच्या मनांत **एड्गार एथ्लिंग** यास राजा करण्याचें घोळत होतें तें सिद्धीस न जावें ह्मणून त्यास, व त्याच्या मदत गारांतील पुढाऱ्यांस बरोबर घेऊन आणि **इंग्लंड** एथील राज्य कारभार पाहण्यास आपले बंधु **ओडो** आणि '**उइलियम फिट्झ् आसबोर्न** यांस नेमून **विजयी विल्यम नार्मन्डी** एथील बंदोबस्ता करितां निघून गेला. मागे ओडो आणि **उइलिअम फिट्झ** यांचा जुल्म सहन न होऊन **साक्सन** लोकांनीं बंडें केलीं आणि **नार्मन** लोकांची एका रात्रींत कत्तल करून टाकावी असा बेत केला. पण तें वर्तमान **उइलियमास** कळल्यावर तो तिकडून इतका चवताळून आला कीं, त्यानें पूर्वी वाहिलेल्या शपथा एकीकडे ठेवून प्रांतांचे प्रांत कत्तलीनें किंवा आगीनें उद्ध्वस्त करून टाकिले, आणि बंडखोरांच्या जिंदग्या व वतनें जप्त करून तीं आपल्या

बरोबर आलेल्या **नार्मन** लोकांस दिलीं व त्यांजपासून लढाईच्या प्रसंगीं आह्मी मदत करूं असें कबूल करून घेतलें. याप्रमाणें **फान्सांतील फ्यूडल सिस्टम** (जमिनीचा सारा सरकारास न देतां त्याबद्दल सरकारास जरूर लागेल तेव्हां सैन्यांत नौकरी करण्याची चाल) इंग्लंडांत सुरू झाली. त्या दंग्यांत १,००,००० लोकांची प्राणहानि झाली.

उइलियम राजाचें याप्रमाणें वैभव व अधिकार होता तरी त्याची गृहास्थिति सुखकारक नव्हती. त्यास **राबर्ट, रिचर्ड उइलियम** आणि **हेन्री** असे चवघे मुलगे होते व **आडिला** नांवाची एक मुलगी होती. परंतु त्याचे व त्यांचें सूत नव्हतें. **रिचर्ड** हा लहानपणींच मेला होता. **राबर्ट** स्वभावानें धीट होता, परंतु फार रागीट असे. एकदा ते तिघे मुलगे खेळत असतां एका भावानें त्याच्या आंगावर पाणी टाकिलें. त्यासरसा **राबर्ट** चवताळून त्याच्या आंगावर इतक्या आवेशानें गेला कीं, **उइलियम** राजा मध्यें न पडता तर त्यानें आपल्या भावाचा प्राणच घेतला असता. **राबर्टानें** त्यावेळेस भावाची गय केली, परंतु ती बापाची मध्यस्ती त्यास न आवडून तो बापाचा सूड उगविण्याकरितां संधि पाहत होता. त्यानें **फ्रान्सांत** जाऊन बंड केलें. तो इ० स० १०७८ त "**जरविराइ**" एथील किल्यांत असतां **उइलियम** यानें त्या किल्ल्याला वेढा दिला. तेव्हां **राबर्टास** कित्येक वेळां बापाशीं लढण्याचा प्रसंग आला. एक वेळ तर दोघांनीं शिरस्त्राणें घातलीं असल्यामुळें त्यांनीं एक मेकांस न ओळखून लढाईच्या भरांत **राबर्टानें** बापास वार करून घोड्या खालीं पाडिलें; व आणखी एक वार होता तर बाप मेलाच असता. परंतु बापाचें शिरस्त्राण एकीकडे पडून मेलोरे मेलों असें तो ओरडल्यामुळें **राबर्टानें** बापास ओळखिलें

झणून तो वांचला. आपले हातून पितृहत्या होणार होती यावद्दल **रावर्टास** फार वाईट वाटून त्यानें बापास दंडवत घालून क्षमा मागितली आणि इतःपर अशी अवज्ञा करणार नाहीं असें वचन दिलें. **उइलियम** कांहीं दिवस त्याशीं उदासीन होता, परंतु पुढें **रावर्टा**ची वर्तणूक सुधारल्यावर तो त्याजवर पूर्ववत् प्रेम करूं लागला.

उइलियमाचे कारकीर्दींत ध्यानांत ठेवण्याजोग्या गोष्टी झटल्या तर **डूम्स् डेबुक, कर्फ्युवेल** आणि '**न्यू फारेस्ट**' त्या तीन घडल्या. **डूम्स डेबुक** ही एक मोठी कीर्द असे. तींत देशांतील जमिनी कोणाच्या नांवावर किती आहेत, त्या कोठें आहेत, त्यांचें क्षेत्रफळ किती आहे, सारा किती आहे, कोणतीं गांवें किती वस्तीचीं आहेत, त्यांत घरें किती, प्रत्येक घरांत माणसें किती, इत्यादि गोष्टी लिहून ठेविलेल्या असत. त्या कीर्दीचा उपयोग तो प्रसंग पडेल तेव्हां कोणापासून किती जर्मीन किंवा उत्पन्न हिसकावून घेऊन **नार्मन** लोकांस देण्याच्या कामांत करीत असे. त्या कीर्दीचा खर्डा इ० स० १०८३ त सुरू होऊन इ० स० १०८६ त पुरा झाला. **कर्फ्यूवेळ**-ही एक घंटा होती, ती प्रत्येक खेड्यांत टांगेलली असे. रात्रीं ८ वाजल्यावरोबर गांवांतील लोकांनीं दिवे व विस्तव विझवावे, याकरितां ती वाजवीत असत. हिचा उद्देश असा होता कीं राजा विरुद्ध कट, मसलती वगैरे कामें रात्रीं स्वस्थपणांत कोणास करितां येऊं नयेत. त्या घंटेची सुरुवात इ० स० १०८६ त झाली. **उइलियम** राजास शिकारीचा नाद फार होता झणून त्यानें **न्यूफारेस्ट** (नवीन रान) हें एक नवीन जंगल तयार केलें होतें. तें तयार करण्याकरितां **उइंचेस्टर** पासून समुद्रा पर्यंत सर्व **हाम्पशायर**ची (हाम्प प्रांताची) वस्ती उठवून उजाड केला होता. त्याचा एकंदर घेर १५ कोसांचा होता. त्या जंग-

लांत शिकार करण्याचा हक्क दुसरे कोणास नसावा म्हणून इतके कायदे कडक केले होते कीं, कोणी त्यांतील हरण किंवा डुकर मारिल्यास त्यास डोळे काढण्याची शिक्षा होई. परंतु राज्यांत कोणी मनुष्यवध केल्यास दंडाची मात्र शिक्षा होई. हें अरण्य इ० स० १०७९ त तयार झालें.

इ० स० १०८७ सालीं **उइलियम** आणि **फ्रान्सचा** राजा पहिला **फिलिप** यांमध्यें लढाई जुंपून **उइलियम** यानें **मांटिस** शहर एकदम हल्ला करून घेतलें, आणि त्यास आग लावून दिली. आगीची मजा पहात व घोडा फिरवीत असतां घोड्याचे पाय फुपाट्यांत पोळून त्यानें धाडकन् आंग टाकिलें. त्या सरसा **उइलियम** घोड्यावरून पडून पुष्कळ जखमी झाला आणि त्याच दुखण्यानें इ० स० १०८७ त मरण पावला. मरते वेळेस त्यानें आपलें **इंग्लंडचें** राज्य दुसरा मुलगा **उइलियम रूफस** यास द्यावें व **नार्मंडीचें** राज्य **राबर्ट** यास द्यावें आणि आपली बायको **माटिल्डा** हिची जिंदगी व वतन **हेन्री**स द्यावें असें लिहून ठेविलें होतें. **उइलियम** यानें **इंग्लंडचें** राज्य २१ वर्षें आणि **नार्मंडीचें** राज्य ४४ वर्षें केलें.

उइलियमराजाच्या अंगीं शौर्य व अधिकार चालविण्याची कर्तबगारी होती; तो अतीच महत्त्वाकांक्षी व कारस्थानी होता; परंतु निर्दय, खुनशी व लुटारू होता. त्याला डौल फार आवडत असे. तो एकादे वेळेस अतिशय कंजूषपणा करी, व दुसरे वेळेस अतिशय उधळेपणा करी. तो महत्कृत्यांमध्यें जरी उतावळा व तिडकेच्या होता तरी प्रसंग आला असतां मोठा धूर्त, विचारी व शांत असे. त्याची उंची आठ फूट असून बांधाही व्यवस्थित होता. त्याची शक्ति एवढी होती कीं त्याचें धनुष्य दुसरे कोणास उचलत नसे. त्याला बोलायाला फार आवडत नसे. तो

कयांटरबरीच्या धर्माध्यक्षाशिवाय कोणाशीं नीट नसे. त्यांशीं मात्र तो ताटाखालचें मांजर असे. तो जरी कोणाशीं ममतेनें वागत नसे, तरी त्याची आपल्या संततीवर फार प्रीति असे. तो राज्यकारभारांत फार चतुर होता. त्यानें मिळाविलेलें राज्य त्याच्या वंशजांकडे अद्याप चालत आहे.

दुसरा उइलियम किंवा उइलियम रूफस (तांबडा)

इ० स० १०८७–११०० पर्यंत.

खरें पाहूं गेलें असतां **इंग्लंड**चें राज्य **उइलियमा**चा वडील मुलगा **राबर्ट** यास मिळावें हें योग्य होते. परंतु त्याचे दुर्वर्तनामुळें त्याच्या बापाचे मनांत त्याविषयीं जी आढी पडली होती, तिच्या योगानें **इंग्लंड**चें राज्य त्यास न मिळतां दुसऱ्या मुलास मिळालें. दुसऱ्या **उइलियमा**चे केंस व चेहरा लाल होता म्हणून त्यास **रूफस** (लाल) असें म्हणत. तो स० १०६० त जन्मला होता. तो स्वभावानें आपल्या वडील भावासारखाच होता, परंतु कमी तापट असल्यामुळें तो तितका कळण्यांत येत नसे. त्याला तें राज्य मिळवून देण्यांत **कांटरबेरी**चा धर्माध्यक्ष, **लांफ्रक्यांक** यानें फार मेहनत घेतली होती. **उइलियम** व **राबर्ट** या दोघांच्या मनांत **इंग्लंड** व **नार्मंडी** एथील राज्यें आपल्यास मिळावीं असें होतें, म्हणून दोघांचे तंटे होतां होतां असें झालें कीं, एका लढाईंत **राबर्टा**चा पूर्ण पराभव होऊन त्यास **नार्मंडी**चा कांहीं भाग **उइलियमास** सन १०९० त द्यावा लागला; आणि तह करून असें ठरवावें लागलें कीं, दोघां पैकीं जो कोणी मागें राहील त्यानें दोन्ही राज्यें द्यावीं. ह्या तहांत **हेन्री**विषयीं अगदींच विचार केला

नव्हता, म्हणून त्यानें **नार्मंडीवर** हल्ला केला, परंतु **सेंट-मायकेल्सभौंट** एथें स० १०९१ त त्याचा पराभव होऊन त्याला **उइलियमा**चे स्वाधीन व्हावें लागलें. पुढें कांहीं दिवस **उइलियम** आणि **राबर्ट** यांचें सख्य होतें. **स्काट्लंड**चा राजा तिसरा **मालकम्** यानें **इंग्लंडा**वर स्वारी केली होती, परंतु त्याचा **अलन्विक** एथें इ० स० १०९३ त मोड करून लढाईच्या खर्चाबद्दल त्याजपासून **कंबर्लंड** हा प्रांत घेतला व तो **इंग्लंडा**चे राज्यास जोडिला.

एशूखिस्ताचें थडगें **एशिया**तील **तुर्कस्था**नांत **जरुसिलेम** शहरीं आहे. त्याचें दर्शन घेण्यास **खिस्ती** लोक जात असत. **जरुसिलेम** शहर मुसलमान लोकांच्या ताब्यांत असल्यामुळें तेथें जाणाऱ्या **खिस्ती** यात्रेकऱ्यांचे फार हाल होत असत. **फ्रान्सां**तील एक मनुष्य **पीटर दी हर्मिट** (वैरागी) हा त्या यात्रेस गेला असतां त्याचे फार हाल होऊन त्या मुसलमान लोकांविषयीं त्याचे मनांत इतका तिटकारा आला कीं, त्यांचे हातून तें थडगें सोडवीन तर जिवंत राहीन अशी त्यानें प्रतिज्ञा केली; व **रोम** एथील **पोपा**चे बळावर सर्व **यूरोप** खंडांत शूर, सरदार व राजे यांस तें सोडविण्याकरितां तो परमार्थ बुद्धीनें उपदेश करीत फिरला. तो उपदेश फार चित्तवेधक व चेव आणणारा असल्यामुळें अनेक राजांनीं, सरदारांनीं व शूरांनीं आपआपलीं राज्यें, वतनें, किंवा जिंदगी व जवाहीर गहाण टाकून अथवा विकून पैसे केले; आणि तें थडगें सोडविण्या करितां त्या ठिकाणीं स्वाऱ्या केल्या. त्या स्वाऱ्यांस **क्रुसेडस्** (धर्मयुद्धें) असें म्हणतात. त्यांतील पहिले स्वारींत **नार्मंडीचा ड्यूक राबर्ट** हा एक पुढारी होता. त्यानें सन १०९५ त आपलें **नार्मंडी**चें व **मेन**चें राज्य

उइलियमाकडे १०,००० मार्कांस (फ्रेंच नाणें) गहाण ठेविलें होतें. इ. स. १०९९ मध्यें फ्रान्सांतील गीएन प्रांताचा डयूक व पाइट्रियर्स शहराचा कौंट यांनींही आपलीं वतनें त्याच कामास जाण्याकरितां उइलियम याजकडे गहाण ठेविलीं होतीं. इ. स. १०९८ त नार्वेचा राजा मास्नस यानें इंग्लंडावर स्वारी केली होती; परंतु श्रूज्बेरीच्या अर्लानें त्याचा पराभव करून त्यास पळवून लाविलें.

दुसरा उइलियम बापाप्रमाणें स्वभावानें दुष्ट, हट्टी, नादी, घातुक, लोभी, पक्षपाती, व मृगया सक्त होता. त्यानें न्यू फारेस्टची हद्द जास्त वाढविली. त्यांतील पाळींव हरणें मारिलीं अशा आरोपावरून कित्येक सभ्य कुळांतील गृहस्थांस त्यानें कैदेत टाकिलें होतें. दुसरा उइलियम नित्य शिकारीस जाई, तेव्हां त्याचे बरोबर वाट टिरेल नामें एक फ्रेंच गृहस्थ असे. एके दिवशीं शिकार चालली असतां आधला बाण लागून पडलेलें हरण जिवंत आहे कां मेलें आहे, हें पाहण्याकरितां राजा पुढें चालला असतां वाट टिरेल यानें मारलेला बाण नेम चुकून एका झाडास आडखळून राजाचे उरांत बसला. त्यासरसा राजा खालीं पडून मरण पावला. तें पाहून वाट टिरेल फ्रान्सांत पळून गेला आणि धर्मयुद्धास जाणाऱ्या लोकांस मिळाला. कोणी म्हणतात कीं, तें कृत्य मुद्दाम त्याजकडून कोणीं करविलें होतें. राजाचें प्रेत दुसरे दिवशीं रानांतल्या लोकांस सांपडून तें त्यांनीं घोड्यावर आडवें घालून आणून समारंभ वगैरे न करितां उइन्चे स्टर एथें इ. स. ११००. त पुरिलें. त्यानें १३ वर्षें राज्य केलें.

पहिला हेन्री (बोक्लार्क).

इ. स. ११००—११३५ पर्यंत.

राबर्ट पशिया खंडांत धर्मयुद्धांत गुंतला होता म्हणून दुसरे **उ**इलियमाची गादी **हे**न्रीस मिळाली. **हे**न्री हाही त्यावेळेस जवळ नव्हता; परंतु त्यास **उ**इलियमाचे मरणाची वातमी पोहचतांच त्यानें जलदीनें **उ**इंचेस्टर एथें येऊन प्रथम खजीना स्वाधीन करून घेतला, व आपले हातानें आपल्या डोक्यास मुकुट घातला. नंतर मी धर्म संस्थापना करीन व लोकांचे आणि सरदारांचे हक्क राखीन अशी त्यानें शपथ घेतली. ही बातमी जिकडे तिकडे पसरते आहे तोंच **रा**बर्ट परत आला व सैन्य मिळवून इंग्लंडचें राज्य मागूं लागला. **रा**बर्टास मुख्यत्वें द्रव्याची जरूरी होती, हें पाहून **हे**न्रीनें त्यास पुष्कळ द्रव्य (३,००० मार्क) देऊन वर्षासन करून दिलें, आणि **क**यांटरबेरीच्या आर्चबिशपच्या (मुख्य धर्माधिकाऱ्याच्या मार्फत आणखी अरा ठराव केला कीं, दोघांपैकीं कोणी निपुत्रिक मेल्यास त्याचें राज्य जिवंत असणारानें घ्यावें व तोंपर्यंत **रा**बर्टानें नार्मंडी एथें स्वस्थ राहावें. हेन्रीनें तो करार लवकरच मोडिल्यामुळें **रा**बर्टानें इंग्लंडावर स्वारी केली. परंतु तींत त्यास यश न येतां उलट त्याचें वर्षासनही बंद झालें. पुढें **हे**न्रीनें लोभाविष्टपणानें **नार्मंडी**चें राज्य घेण्या करितां इ० स. ११०६ मध्यें मोठ्या सैन्यानिशीं **फ्रा**न्सांत जाऊन भावाशीं लढाई केली. तींत **रा**बर्टाचा **टें**चिब्राई एथें पराजय होऊन तो भावाचे हातीं सांपडला. **हे**न्रीनें त्यास **कार्डिफ** किल्यांत ठेवून तो पळून जाईल म्हणून त्याचे डोळे काढिले होते. **रा**बर्ट ३० वर्षे कैदेंत होता व तेथेंच इ. स. ११३५त मरण पावला. तेव्हां त्याचें वय ८० वर्षांचें होतें. **रा**बर्टास **उ**इलियम नांवाचा एक मुलगा होता. **फ्रा**न्साचा राजा त्याचा पक्ष स्वीकारून लढा-

ईस उठला होता, परंतु सन १११९ त पराजय झाल्यामुळें त्याचा पक्ष त्यास सोडावा लागला. **उइलियम** पुढें इ. स. ११२८ त मारला गेला.

हेन्रीस चांगलें लिहितां वाचतां येत होतें म्हणून त्यास **बोक्लार्क** (चांगला लेखक) म्हणत. त्याचें लग्न **एड्गर एथ्लिंग** राजाची भाची व **स्काट्लंड**चा राजा **मालकम** याची मुलगी **माड**, इ. च्याशीं झालें होतें व याप्रमाणें **साक्सन** घराण्याचा **नार्मन** घराण्याशीं संबंध जोडिला होता. **माड** हिला त्यास देण्याचा उद्देश असा होता कीं, ती कदाचित् **हेन्री**ला वळवून **इंग्लिश** लोकांवर कांहीं कृपा करवील. **हेन्री**ची मुलगी **माटिल्डा** ही जर्मनीच्या बादशहाची बायको झाली होती. **इंग्लंड**चें व **नार्मंडी**चें राज्य चालविण्या जोगता एक १८।१९ वर्षांचा छाव, हुशार असा त्यास मुलगा होता व त्यावेळीं त्याजवरोवर भांडण्यास दुसरा कोणी राज्यांत उरला नसल्यामुळें जिकडे तिकडे शांतता होती. अशा वैभवाच्या भरांत **हेन्री** असतां त्यास अशी इच्छा झाली कीं, आपल्यामागें आपल्या मुलांस **नार्मंडी** एथें कोणी ओळखणार नाहीं व पुसणारही नाहीं म्हणून एक वेळ त्यास **नार्मंडी** एथील मुत्सद्यांस नेऊन भेटवून आणावें, असें मनांत येऊन तो त्याप्रमाणें त्यास घेऊन गेला होता. त्या दोघांचा तेथील सरदारांकडून मानमरातव योग्य झाल्यावर ते परत येत असतां राजपुत्र व त्याचे सोबती राजावरोवर न निघतां थोडे मागाहून निघाले. त्यांनीं व त्यांच्या खलाशांनीं अंमल केला होता, त्यामुळें त्यांचें जहाज खडकास लागून फुटलें. राजपुत्र व कांहीं सोबती एक होडी टाकून व तींत उतरून ती हाकारतात तों फुटलेल्या जहाजावर राहिलेल्या राजकन्येचा दुःखस्वर ऐकूं आला. राजकन्येस होडींत घ्यावी म्हणून त्यानीं होडी मागें वळविली आणि जहाजापाशीं आणिली

तों तिजवर त्या जहाजावरून इतक्या लोकांनीं उड्या टाकिल्या कीं, ती होडी राजपुत्रासहित तत्काळ बुडाली (इ० स०११२०). त्या जहाजावर एक खाटीक डोलकाठीस धरून राहिला होता. त्यास दुसरे दिवशीं तिकडून येणाऱ्या एका मच्छीवाल्यानें होडींत घेऊन इंग्लंडास आणिलें. त्याप्रसंगीं मोठ्या कुळांतील असे १४० तरूण ब्रांड-मेले असें सांगतात. त्या पुत्रशोकानें हेन्रीस एवढा धक्का बसला कीं, त्या दिवसापासून तो कधीं हांसला असे दिसलें नाहीं. त्याचे मुलीचा पहिला नवरा मेला म्हणून ती हेन्रीनें अंजूचा ड्यूक जाफ्री प्लांटाजिनेट यास दिली होती. तींच कायती आतां त्याची वारस राहिली होती.

पहिल्या हेन्रीच्या कारकीर्दींत त्याचे बाहू इतकी यार्डाची लांबी ठरली. नाण्याची दुरूस्ती झाली. साऱ्यावरील पैसा घ्यावा असें ठरले.-जंगलाचे व कफ्यूंवेलचे कायदे शिथिल झाले, आणि नाइट टेंप्लर ही धर्माधिकाऱ्यांत एक नवीन प्रत सुरू झाली. लोकरीचें कापड याचेच राज्यांत निघालें.

हेन्री राजा इ० स० ११३५ त रूएन एथें अजीर्ण होऊन मरण पावला, व त्याचे गादीवर त्याची मुलगी माड ही बसली. हेन्रीनें मरतांना ब्यारन व नोबल यांपासून (सरदारांपासून) त्याचे मुलीविषयीं राजनिष्ठा सोडणार नाहीं अशी शपथ वाहून घेतली होती. तसेंच त्याचा भाचा स्टीफन यास तिच्या आज्ञेंत वागावें व तिला राज्य कारभरांत मदत करावी असें सांगून ठेविलें होतें. हेन्री मेला तेव्हां त्याचें वय ६५ वर्षांचें होतें.

दुसरा भाग

माड आणि स्टीफन.

इ० स० ११३५—११५४ पर्यंत.

हेन्रीची बहीण **माडिला** ही **ब्लाइस** एथील अर्लास दिली होती. **स्टीफन** हा तिचा मुलगा होता तो मोठा लोकप्रिय असल्यामुळें त्यानें **माड**ची डाळ शिजूं दिली नाहीं. कित्येक सरदार, धर्माधिकारी व गृहस्थ यांसही स्त्रीसत्ता न आवडून त्यांनीं **स्टीफन** यास गादीवर बसविलें. त्यानें त्यांस **डेनिगेल्ट** (डेन लोकांनी बसविलेला कर) सोडीन व किल्ले बांधूं देईन व आपल्या अरण्यांत शिकार करूं देईन असें त्यांजपाशीं कबूल केलें होतें.

स्काटलंडचा राजा **डेव्हिड** यानें **माड**चा पक्ष धरून उत्तरेकडे **नार्थंबर्लंड** व **यार्क** एथें येऊन बरीच धुमाळी मांडिली. परंतु **स्टीफन**चे सरदारांनीं त्यास **नार्थ अलर्टन** एथें जिंकून त्यास हांकून लाविलें (इ. स. ११३८). या लढाईस **स्टांडर्ड**ची लढाई **म**णतात. कारण **इंग्लिश** लोकांनीं आपल्या सैन्यामध्यें एक मोठा **क्रास** गाडींत घालून सैन्यापुढें चालविला होता.

माटिल्डेचा पक्ष तिचा भाऊ **ग्लुस्टर**चा अर्ल यानें स्वीकारून **स्टीफन** यास **लिंकन** एथें लढाई दिली. तींत इ.स.११४१ त **स्टीफन**चा पराजय करून त्यास **ब्रिस्टल** एथें कैदेत ठेविलें. याप्रमाणें **माटिल्डा** पुन्हा एकवार गादीवर बसली. तिचा खाक्या स्वभाव लोकांस न आवडून **स्टीफन**चे साथ्यांनीं तिचा मुख्य साथ करणारा **ग्लुस्टर**चा **आर्ल, राबर्ट**, यास **विंचेस्टर** एथें कैद करून तिला पदच्युत केले. व **ग्लुस्टर**चा अर्ल व **स्टीफन** यांचा तुरुंगांत मोबदला करून **स्टीफन** यास गादीवर बसविलें (इ. स. ११४८). पुढें इ. स. ११५२त **माड**चा मुलगा **हेन्री** यानें **इंग्लंड**वर स्वारी केली. तेव्हां दोघांचा असा

तह ठरला कीं, स्टीफन यानें तहाहयात राज्य चालवावें व त्याचे मागें तें माटिल्डेचा मुलगा हेन्री प्लांटाजिनेट यास यावें.

स्टीफन पुढें फार दिवस वांचला नाहीं. तो इ. स. ११५४ त मरण पावल्यावर त्याचें राज्य अंजूचे किंवा प्लांटाजिनेटचे घराण्यांत गेलें. हेन्रीचा बाप जाफ्री हा आपले टोपीत प्लांटा जेनिस्टा (सिंदीची पात) खोंवीत असे, म्हणून त्याच्या घराण्याला प्लांटा जेनिस्टा हें नांव पडलें होतें. स्टीफनचे कारकीर्दीत नवीन १२५ किल्ले बांधिले, सरदार लोक प्रबळ झाले, दुसरें धर्मयुद्ध ११४७ त सुरू झालें. तो शूर, मोकळ्या मनाचा व उदार असा होता. त्याला ५ मुलें होतीं.

नार्मन वंशवेल.

उइलियम (विजयी.)

१०६६।१०८७

रार्बर्ट	दुसरा उइलियम	पहिला हेन्री	आडिला
	१०८७-११००	११००-११३५	(ब्लाइसचे
			अर्लाशीं लग्न)
उइलियम			
			स्टीफन
			११३५-११५४
		माड (माटिल्डा)	
		(जर्मनीचा बादशाहा याशीं पहिलें लग्न	
		दुसरें लग्न आन्जूचा जाफ्री याशीं)	
		दुसरा हेन्री.	

नार्मन घराण्यांतील कालक्रमगत गोष्टी.

१०६६ पहिला **उइलियम** (विजयी) राजा झाला.
१०७९ **न्यूफारेस्ट** तयार झालें.
१०८१ **डूम्सडेकीर्दी**चा आरंभ.
१०८६ **कर्फ्यूघंटा** वाजविण्याची सुरुवात.
१०८७ **मॉट्रिस** शहर **उइलियम**ानें घेतलें व जाळलें.
१०८७ दुसरा **उइलियम** (रूफस-ताम्रमुखी).
१०९३ **अलनविक** एथील लढाई, **कंबर्लेड इंग्लंड**ास जोडिलें.
१०९५ **नार्मेंडी**चें व **मेन**चें राज्य **इंग्लंड**ाकडे आलें.
१०१८ **नार्वे**चे राजाचा पराजय.
१०९९ **गिएन इंग्लंड**ाकडे गहाण ठेविला.
११०० पहिला **हेन्री** (**बोक्लार्क**-उत्तम लेखक.)
११०६ **राबर्ट**ाचा **टेंचिब्राइ** एथें पराजय.
११३५ **राबर्ट**ाचें मरण.
११३५ **स्तीफन** व **माद** राजा झाला.
११३८ **नार्थ आलर्टन** एथील लढाई.
११४१ **स्टीफन**चा पराजय.
११४७ **स्टीफन** यास कैदेंतून सोडविलें व **ग्लुस्टर** यास टाकिलें.
११५२ **स्टीफन** व **हेन्री** यांचा तह.
११५४ **स्तीफन**चा मृत्यु, दुसरा **हेन्री** राजा झाला.

तिसरा भाग.

अन्जू किंवा प्लांटाजिनेट कारकीर्द.

इ० स० ११५४–१३९९. (३४५ वर्षांची कारकीर्द).

१ दुसरा हेनरी (कर्ट मांटल) ११५४ राजा झाला.
२ पहिला रिचर्ड (सिंह हृदय) ११८९.
३ जान (देश बुडव्या) ११९९.
४ तिसरा हेन्री (उइंचेस्टरचा) १२१६.
५ पहिला एड्वर्ड (लांबटांग्या) १२७२.
६ दुसरा एड्वर्ड (कर्नार्व्हनचा) १३०७.
७ तिसरा एड्वर्ड १३२७.
८ दुसरा रिचर्ड (बोर्डक्या) १३७७–९९.

दुसरा हेन्री (कर्टमान्टल)

(इ० स० ११५४ ते ११८९ पर्यंत.)

दुसरे हेन्री राजास इंग्लंडचे राज्यावर ता. १९ माहे डिसेंबर सन ११५४ सालीं अभिषेक झाला. ते वेळेस त्याचें वय २३ वर्षांचें होतें. हेन्री हा आपल्या आईच्या आईकडून साक्सन घराण्यांतील होता व आईकडून नार्मन घराण्यांतील होता. हा राजा त्यावेळेस मोठा बलिष्ट असे. त्याचे ताब्यांत इंग्लंड आणि फ्रान्सांतील आन्जू (बापाकडून मिळालेला); नार्मंडी, टुरेन, मेन (आईकडून); पाइटू व गियन हे प्रांत (दुसरे बायको कडून) होते. त्यानें चोहोंकडे फिरून देशाची सुधारणा चांगली केली व शेट्टरांतील लोकांना स्वतंत्र केलें. त्यानें उत्तम लोक मिळवून ज्यांत जुलूम किंवा पक्षपात यत्किंचित् दिसणार नाहीं असे कायदे केले. पहिले हेन्रीचा कायदा कायम

करून तो त्यानें चालू केला, बॉरन (सरदार) लोकांचा पगडा न चालूं देण्याकारितां पहिले हेनरीनें बांधून दिलेले नवीन किल्ले पाडून टाकिले, नाण्यांची दुरस्ती केली, देशांतील लुटालूट व जुलूम हीं बंद केली. स्टीफन राजानें भाडोत्री आणिलेलें सैन्य वेल्स देशाचे हद्दीवर बंदोबस्ता करितां पाठवून आपण ही इ० स० ११५७ मध्यें तिकडे गेला होता. परंतु त्यापासून कांहीं उपयोग न होतां उलट कोलस्हिल एथें पराभव मात करून घेतला. पुढें त्यानें इंग्लंडाचें उत्तरेस उपद्रव देणाऱ्या स्काच लोकांस हांकून लावून त्यांचा राजा चौथा मालकम यास हांटिंग्डन एथील अर्लडम (सरदारी) वर कायम केलें. दुसरे हेन्रीस उस्टर एथें इ. स. ११५७ सालीं पुनः राज्याभिषेक झाला.

इ. स. ११५८ त दुसरे हेन्रीचा भाऊ जाफी मेला तेव्हां त्यास भावाचे ताब्यांतील मुलूख आपले ताब्यांत घेण्याकरितां फ्रान्सास जावें लागलें. हेन्रीनें आपला भाऊ जाफी याजपासून इ. स. ११५६ आन्जू प्रांत व कांहीं किल्ले हिसकावून घेतले तेव्हां तो ब्रिटनी प्रांतांत न्यांटिस एथें जाऊन तेथील कौन्ट झाला होता. जाफी मेल्यावर न्यांटिस हें संस्थान ब्रिटनीचा ड्यूक कोनन यानें बळकाविलें होतें. तो प्रांत बायकोच्या भांदणापैकीं होता म्हणून तो मिळविण्याकारितां त्यानें स. ११५९ त टौलौस शहरास वेढा दिला. त्यास फ्रान्साचा राजा सातवा लुई याचें सहाय असल्यामुळें आपलें चालत नाहीं असें पाहून हेनरीनें लुई राजास वश करून इ. स. ११६० त तह केला, आणि आपल्या पांच वर्षांच्या मुलास (हेन्रीस) लुईची तान्ही मुलगी मार्गरेट इची मागणी कबूल केली. हा तह झा. ल्यावरोबर न्यांटीस संस्थान हेन्रीस मिळालें व ब्रिटनीच्या ड्यूकाचे मुलीस आपला मुलगा जाफी याचे साठीं मागणी घा-

लावी लागली. ब्रिटनी पांतही तो डयक मेल्यावर ह्मणजे सुमारें सात वर्षांनीं हेन्रीस मिळाला. हेन्रीने पुनः इ. स. ११६५ त वेल्स देशावर स्वारी करून तो देश जिंकून घेतला. परंतु तेथील लोकांनीं पुनः सैन्य जमवून लढाईची तयारी केल्यामुळें हेन्रीस परत यावें लागलें.

हेन्री राजाची याप्रमाणें स्थिति असतां थामस आ बेकेट यानें त्यास बराच त्रास दिला होता, त्या योगानें तो अगदीं उद्विग्न झाला होता. थामस आ बेकेट हा एका श्रीमान् इंग्लिश व्यापाऱ्याचा मुलगा होता. तो कांटरबेरी एथील धर्माधिकारी थिओबाल्ड याचे घरीं लहानपणापासून विद्याभ्यासास असे. तो पुढें इरलींत बोलोगना एथील प्रसिद्ध पाठशाळेंत कायद्यांचा अभ्यास करण्यास गेला होता. तेथून परत येतांना त्यास कांटरबेरी एथील उपधर्माध्यक्षाची जागा मिळाली. हेन्री गादीवर बसल्यावर त्यानें त्यास चान्सेलरची (मुख्य मंत्र्याची) जागा दिली. हेन्रीचे समांत धर्मखात्याचा अधिकार कमी करावा व त्या कामास बेकेट हा मनुष्य बरा आहे, असें वाटून त्यानें थिओबाल्ड मेल्यावर ती जागा त्यास दिली. हा अधिकार प्राप्त झाल्यावर त्यानें आपला पूर्व इतमाम अगदीं कमी करून खाण्यास भाकरी, पिण्यास पाणी, आच्छादनास गोणपाटाची बंडी, इत्यादिकांचा उपयोग करण्यास आरंभ केला. नित्य १३ भिक्षुकांचे पाय धुऊन त्यांस तो चांगली दक्षणा देत असे. याप्रमाणें बरेंच ढोंग माजवितां धर्मखात्यांतील गुन्हेगार लोकांना शिक्षा देण्याचा अधिकार राजास नाहीं असें एका प्रसंगीं बोलून दाखविलें. तें प्रकरण चिरडीस जाऊन राजानें इ० स० ११६४ मध्यें क्लॅरेंडन एथें मुलकी अधिकारी व धर्माधिकारी लोकांची एक सभा भरवून सर्वानुमतें सोळा कलमें ठरविलीं, त्या योगानें

कोणत्याही बाबतींत राजाचे परवानगी शिवाय धर्माधिकाऱ्यास जातां येईनासे झालें, व धर्म खात्यांतील अपराध्यांस मुलकी खात्यांतील अधिकाऱ्यांनीं शिक्षा देण्याचें ठरलें. त्या सभेनें मुलकी खात्याचेंही कांहीं कायदे केले, परंतु ते ११७६ पर्यंत मान्य झाले नव्हते. त्या कायद्यास **आसाइज आफ क्लारेंडन** (क्लारेंडन एथील कायदे) म्हणतात. तीं सोळा कलमें सर्व धर्माधिकाऱ्यांनीं मान्य केलीं होतीं, म्हणून बेकेटालाही तीं नाइलाजानें मान्य करावीं लागलीं. एकवेळ बेकेट यानें धर्म खात्यांतील उत्पन्नाचा वगैरे हिशेब द्यावा म्हणून बेकेटास बोलावून आणून जबाब घेतला, त्यांत तो पूर्ण अपराधी ठरल्यामुळें त्यास ६ वर्षें फ्रान्सांत पळून जाऊन अज्ञातवासांत काढावीं लागलीं. त्या मुदतींत त्यानें फ्रन्सचा राजा व पोप त्यांचें साह्य मिळवून बेकेटास त्याचा अधिकार पुनः न दिल्यास हेन्री राजास बहिष्कृत करीन अशी पोपकडून धमकी घातली, व फ्रान्साचे सातव्या लुईकडून तुझ्या देशावर हल्ला करवीन अशी ही भीति घातली. तेव्हां हेन्री अगदीं भिऊन जाऊन त्यानें बेकेटास पुनः धर्माधिकाऱ्याचे गादीवर बसविलें. बेकेटास इतका गर्व झाला कीं मी करीन ती पूर्व दिशा, असें वाटून त्यानें हेन्रीस इतका त्रास दिला होता कीं, एके दिवशीं हेन्री फरान्सांत मेजवानीस बसला असतां त्याचे तोंडांतून असे सहज शब्द निघून गेले कीं मला त्या भांडाळ बेकेटाच्या त्रासांतून सोडविल असा मायेचा-पूत माझ्या पंक्तीस नित्य जेवणाऱ्यांमध्यें कोणीही सांपडणार नाहीं काय! ते उद्गार ऐकून चौघेजण नकळत इंग्लंडास निघून जाऊन बेकेट सायंकाळची उपासना करीत आहे असे संधीस यांनीं त्याचा अवचित सन ११७० त प्राण घेतला. ही गोष्ट हेन्रीस कळतांच तो या अनुचित कर्मांबद्दल फार हळहळला.

त स्याचे उद्गार आसल्यामुळें अविचाराचे व अपक्व होते. रोम-
चा पोप भाल्यास वाळींत टाकील अशा भीतीनें स्यानें बेकें-
टास मोठ्या थाटानें पुरून व पुष्कळ खर्च करून स्याची
कबर बांधिली. पोपास ही बातमी कळल्यावरोबर स्यानें
लिहून पाठविलें कीं हेन्री राजा जर बेकेटाचे थडग्याकडे
अनवाणी चालत जाऊन सांष्टांग दंडवत घालील व
उघड्या पाठीवर शेवटास गांठ दिलेल्या चाबकाचा मार सोसील
तर स्यानें केलेल्या अपराधाची माफी मिळेल. हेन्रीनें तें सर्व
मतकरून आपणास मुक्त करून घेतलें. बेकेटाची पुढें संतमध्यें ग-
णना होऊन त्याची यात्रा भरूं लागली. एक वेळ तर स्या यात्रे-
स १००००० वर यात्रेकरी जमले होते. तें थडगें पुढें ८ वे
हेन्रीनें खणून काढून ती यात्रा नाहींशी करून टाकिली.

या वेळेस लीन्स्टर, अलस्टर, मन्स्टर, कानाट आणि मीथ असे आयर्लंडाच्च मुख्य पांच प्रांत असून स्यांत पोट संस्थानें अनेक होतीं. स्या पांची प्रांतांवर वेगवेगळाले स्वतंत्र राजे असून विशेष प्रसंगीं ते सर्व एकेक्यानें वागत. लीन्स्टरचा राजा डर्माठ मॉक्मरो यानें मीथच्या राजाचे मुलीस भ्रष्ट केल्यावरून स्यास सर्वांनुमतें देशांतून हांकून लाविलें. स्यानें इंग्लंडास येऊन माझें राज्य मला घाल तर मी तुमचा मांडलिक होईन असें हेन्रीपाशीं बोलणें लाविलें. हेन्रीच्या मनांत आयर्लंड जिंकण्याविषयींची गोष्ट फार दिवस घोळत होती व स्यानें ती गोष्ट मतकरून लागलीच तयारी केली आणि पेम्ब्रो-कचा अर्ल स्ट्रांग्बो याजबरोबर सैन्य देऊन स्यास इ० सन ११६९ त तिकडे पाठविलें. स्यानें तें बेट स० ११७१ त जिंकिल्यावर हेन्रीनें इ० स० ११७२ त तें पुनः जिंकून घेतलें. तो दंगा तीन वर्षें चालला होता. स्या योगानें पॅरिश

लोकांनीं थकून जाऊन **राडरिक ओकानर** यास हेन्रीकडे वकील पाठवून कांहीं तहाची कलमें ठरवून घेतलीं. याप्रमाणें **आयर्लंड**चेट हेन्रीनें आपले राज्यास जोडिलें.

हेन्रीचे अखेरचे दिवस कुटुंबांतील भांडणांत गेले. त्यानें **फ्रान्स**चे पांचवे लुई राजाचे विधवा स्त्रीशीं लग्न केलें होतें. तें केवळ तिच्या दौलतीकरितां केलें होतें. तो तिच्याशीं सत्य धर्मानें कधीं वागत नसे. त्याचें खरें प्रीतिपात्र **फेयर** (सुंदर) **क्लिफर्ड रोजामंड**ही होती. तिची व राणीची गांठ पडूं नये म्हणून तिला व्यूहरूपी एका बागेंत ठेविलें होतें. राणीनें तिचा पत्ता लावून व दोरीच्या साह्यानें त्या व्यूहरूपी बागेंत जाऊन त्या रांडेचा प्राण घेतला. **हेन्री** आपले बायकोशीं प्रेमानें वागत नव्हता म्हणून त्याच्या मुलाचें त्याशीं सूत नव्हतें. **हेन्री**ला **हेन्री, जाफ्री, रिचर्ड** व **जान** असे चार मुलगे होते. **हेन्री** राजपुत्राच्या मनांत आपलेकडे कांहीं कारभार असावा असें होतें. तें राजानें पतकरलें नाहीं म्हणून त्यानें आपले धाकटें भावाचें मन वळवून **इलियानॉर** आईच्या सल्यानें बंड केलें. त्यांस **स्काटलंड**चा राजा व **फ्रान्स**चा राजा यांनीं साह्य देऊन **फ्रान्स**तील प्रांतांस वेढा दिला. **हेन्री** राजा तिकडील बंड मोडितो आहे तों **स्काटलन्ड**चा राजा **उइलियम** (सिंह) यानें इंग्लंडावर स्वारी केली. **हेन्री**नें मोठ्या आवेशानें स्वदेशीं येऊन त्यास इ० स० ११७४ त **अल्नाविक** एथें जिंकून कैद केलें. परंतु त्यानें मी इंग्लंडचा माडलिक आहें असें कबूल केल्यावर त्यानें **उइलियम** यास मुक्त केलें. **हेन्री**चे दोघे मुलगे **हेन्री** व **जाफ्री** हे भांडणाच्या पायीं लवकरच अनुक्रमानें स० ११८३ व ११८६ मध्यें मारले गेले. तें पाहून **रिचर्ड**नें क्षमा मागून बापाची प्रीति संपादिली होती. परंतु **फ्रान्स**चे राजाचे नादीं

ठाणून त्यानें इंग्लंडांत पुनः बरीच धामधूम व लुटालूट चालविली. तेणेंकरून व आपला धाकटा मुलगा जान हाही त्या बंडांत सामील आहे असें ऐकून हेन्रीचें धैर्य अगदीं खचून गेलें. तो अशा मोठ्या विवंचनेत असतां वयाचे ५८ वे वर्षी निरास्थितींत मरण पावला त्यानें ३५ वर्षें राज्य केलें. त्या सारखा शूर, कारस्थानी, शहाणा, विचारी, न्यायी व बलाढ्य असा दुसरा राजा त्या काळीं युरोप खंडांत क्वचितच असेल. तो मेला तेव्हां त्याला रिचर्ड व जान हे दोन मुलगे व तिघी मुली होत्या. त्याचे पश्चात् रिचर्ड हा गादीवर बसला.

हेन्रीचे कारकीर्दीत लंडन हें राजधानीचें शहर झालें. आतां पर्यंत विंचेस्टर हें गादीचें ठिकाण असे. तें मध्यबिंदूपासून दूर्‌यांमध्यें उद्धस्त होऊन अगदीं मोडकळीस आलें होतें, म्हणून हेन्रीनें तेथून ती राजधानी उठविली. त्यानें एक्सचेकरचा (वसुलाची) एक आणि राजकारभाराची एक अशा दोन कचेऱ्या केल्या व फिरणारे न्यायाधीश नेमिले. त्यानें कित्येक करही बसाविले होते.

पहिला रिचर्ड (सिंहहृदय).

(इ० स. ११८९-११९९).

रिचर्ड राजाचें जन्म सन ११५७ त आक्सफर्ड एथें झालें होतें व त्यास तारीख ३ सप्टेंबर सन ११८९ सालीं राज्याभिषेक झाला. त्याची महाशक्ति, अनिवार्य धैर्य, आणि युद्धसामर्थ्य यां वरून त्यास सिंहहृदय हें नांव पडलें होतें तो शौर्याच्या कामास जितका योग्य होता तितका तो राज्यकारभारास योग्य नव्हता. सन ११८७ सालीं सलाडिन या तुर्की राजानें जरुसलेम शहर वेढा देऊन घेतलें. तेव्हां सर्व ख्रिस्ती लोकांस राग येऊन त्यांनीं धर्मयुद्ध करण्याचा विचार चालविला.

रिचर्डाचे मनांत धर्मयुद्धास जाण्याचें फार घोळत होतें, म्हणून त्यानें राज्यांतील मोठमोठ्या जागा, आणि वसुलाचें काम हीं मक्त्यानें देऊन स्काट्लंडाचा राजा उइलियम (सिंह) याजपासून १०,००० मार्क घेऊन त्यास स्वतंत्र केलें. याप्रमाणें पुष्कळ पैसा जमवून त्यानें इ. स. ११९० च्या एप्रिल महिन्यांत फ्रान्साचा राजा फिलिप यासह मार्सेलिस एथून धर्मयुद्धास जाण्याचें ठरविलें. परंतु दैव अनुकूळ नसल्यामुळें त्यास मेसिना एथें हिवाळा काढावा लागला. त्याचें लग्न न्याव्हेर एथील राजाचे मुलीशीं इ० स० ११९१ च्या मे महिन्यांत झाल्यावर तीहि त्याजबरोबर प्यालेस्टाईन एथें जाण्यास निघाली. रिचर्ड राजानें वाटेंत सायप्रसबेट व एकर शहर लढून घेतलीं त्या शहरास आस्ट्रियाचा ड्यूक लिओपोल्ड व दुसरे कित्येक शूर गांनीं दोन वर्षें वेढा दिला होता, परंतु तें त्यांच्या हस्तगत न होतां रिचर्ड राजानें तेव्हांच सर करून घेतलें. तेव्हां ड्यूक व फिलिप यांनीं आपलें रिचर्डापुढें तेज पडत नाहीं असें पाहून तें धर्मयुद्ध सोडून देऊन एकर शहरापासूनच आपआपल्या देशांत निघून परत आले. त्या लढाईंत रिचर्डाचा पुष्कळ नाश झाला. तरी त्यानें किनाऱ्यानें जाऊन एशिया मैनरांतील आस्केलन शहर हस्तगत करून घेतलें. पुढें त्यानें जरूसिलेम शहरास जाण्याचा दोनदां प्रयत्न केला परंतु त्याचे सैन्याचे अंगीं ताकद नसून हरूप मात्र राहिला होता. तेवढ्यावर तें काम तडीस नेतां येईल असा भरवंसा रिचर्डास न येऊन त्यानें तुर्कस्थानचा राजा सालाडिन यासीं तह केला (इ० स० ११९२). त्यांतील मुख्य कलमें दोन होतीं. एकर, जापा व कांहीं समुद्र किनारा ख्रिस्ती लोकांच्या ताब्यांत रहावा, व जरूसिलेम एथें यात्रेकऱ्यांस फुकट जाऊं द्यावें.

आस्ट्रियाचा ड्यूक आणि फ्रान्साचा राजा फिलिप यांचें मन आपल्या विषयीं शुद्ध नाहीं हें मनांत आणून फ्रान्सा-कडून स्वदेशांत न जातां जर्मनींतून जावें असा रिचर्ड राजानें बेत केला. दैव प्रतिकूल असलें क्षणज तें कधींही नाडल्या शिवाय सोडीत नाहीं. रिचर्ड राजानें आड्रिआटीक समुद्रानें महा-द्वीपांतून स्वदेशीं जावें असा बेत करून जहाज हांकारलें तों तें या समुद्राचे उत्तरभागीं खडकास लागून फुटलें. रिचर्ड व त्याचे दोघे चाकर जेमतेम तिरास लागल्यावर ते यात्रेकऱ्याचे वेषानें व्हियेना शहरास गेले. तेथें ते ओळखले जाऊन त्यांस त्याचा शत्रु आस्ट्रियाचा ड्यूक लिओपोल्ड यानें इ. स. ११९२ त दिसेंबर महिन्यांत धरून कैद केलें. पुढें जर्मनीचा बादशहा सहावा हेनरी यानें त्यास त्याजपासून मागून घेऊन टायरोल येथील किल्ल्यांत कैदेंत ठेविलें होतें. त्याचा शोध ब्लांडेल नामें एका किनरीवाल्यानें लाविल्यावर त्यास सोडविण्या विषयीं इंग्लं-डांत मोठी खटपट होऊन खंडणी देण्याकरितां १,५०,००० मार्क जमविले. जर्मनीचा राजा त्यास सोडीना. त्या अयोग्य कृत्या-बद्दल पोपानें जर्मन बादशहास जेव्हां बहिष्कार घालण्याची भीति घातली तेव्हां त्यानें ती खंडणी घेऊन रिचर्डास सोडून दिलें (इ० स० ११९३).

रिचर्ड राजा कैदेंत पडल्याचें वर्तमान इंग्लंडास पोंचलें-तेव्हां रिचर्डाचा धाकटा भाऊ जान आणि फ्रान्सचा राजा फिलिप यांनीं बंड करून बराच बखेडा मांडिला होता. परंतु रिचर्डानें आपल्या मागें इंग्लंडांत जे अधिकारी नेमिले होते. त्यांनीं तें बंड मोडून फिलिपास नार्मंडीमध्यें हांकून दिलें व जॉना बरोबर तह केला. रिचर्ड सुटल्याची बातमी पोंचतांच फिलीपानें जॉनास लिहून कळविलें कीं चाकाळ

सुटलारे सुटला, सावध रहा. रिचर्ड राजा सुटून आल्यावर इ० स० ११९४ त त्यास पुनः राज्याभिषेक झाला. जॉनानें आपले अपराधाबद्दल माफी मागितल्यावरून रिचर्ड राजानें त्याचे अपराधाची क्षमा केली आणि फिलिप याचा मूळ उगाविण्याकरितां नार्मेंडी एथें जाऊन त्याजबरोबर बरेच दिवस युद्ध केलें. अखेरीस दोघांमध्यें पांच वर्षांचा तह ठरला. त्यांतील दहा महिने पुरे झाले नाहींत तों रिचर्ड राजा पाइटू एथील चालूझ किल्यास वेढा देत असतां किल्याच्या भिंतीवरून एक बाण येऊन व त्याच्या खांद्यास लागून त्यास मोठी जखम झाली. ती जखम अनभ्यस्त वैद्याच्या हातीं गेल्यामुळें जास्त सुजून व चरून राजाचे मरणास कारण झाली. तो इ० स ११९९ त वयाचे ४२ वे वर्षी मरण पावला.

रिचर्ड राजानें एकंदर १० वर्षें राज्य केलें. त्या मुदती पैकीं तो निमीं वर्षें परदेशीं होता. त्याच्या अढाया व खंडणी या खालीं त्याची सर्व रयत अगदीं नागवून गेली होती. तिला सुख झणून कवडीचें लागलें नाहीं. त्याचे कारकीर्दीत वजनें व मापें राज्यभर सारखीं झालीं व त्याचेच कारकीर्दीत राबीनहुड नांवाचा प्रसिद्ध बंडखोर झाला होता. रिचर्ड मेल्यावर त्याचें राज्य त्याचा धाकटा भाऊ जॉन यास मिळालें.

जॉन (देशबुडव्या).
(इ० स० ११९९-१२१६).

जान स. ११६६ त आक्सफर्ड एथें जन्मला होता. तो गादीवर बसतांच जाफ्रीचा मुलगा अर्थर यानें फिलिप राजाचें साह्य घेऊन मोठे सैन्यासह इंग्लंडावर स्वारी केली. प्रथम त्याचें पाऊल पुढे पडत गेलें. परंतु जॉन राजानें त्यास अवचित गांठून कैद केल्यावर त्यास क्याले ६थील किल्यांत ठेविलें होतें. कोणी सांगतात कीं तो सुटण्याचे उद्देशानें तटावर चढत असतां पडून मरण पावला, व कित्येक सांगतात कीं त्यास जॉन राजानें आपले हातीं मारिलें. हें त्याचें निर्दयपणाचें कृत्य व त्याची निर्बलता इंग्लिश लोकांस न आवडून तो त्यांचे मर्जीतून उतरला. ही संधि फिलिपानें साधून फ्रान्स देशांतील इंग्लिश प्रांतांवर स्वारी केली व ते प्रांत त्यानें आपले ताब्यांत घेतले. ते प्रांत इंग्लिशास पुनः परत मिळाले नाहींत. या कारणावरूनच त्यास देशबुडव्या असें नांव पडलें होतें.

जान निर्बल आहे असें पाहून पोपानें कांटरबेरी एथील जोग्यांस लिहून पाठविलें कीं राजाचें मत न घेतां आर्चबिशप (मुख्य धर्माधिकारी) याची जागा बेलाशक भरावी. त्याबद्दल जानास राग येऊन त्यानें दोन नाइट्स (शूरलोक) पाठवून त्या जोग्यांस त्यांचे मठातून हांकून लाविलें. तेव्हां पोपानें इंग्लंडचे राज्यावर बहिष्कार घातला. त्यामुळें कोणी कोणास सलाम करीना, देवळें लागलीं, देवळांत होणारे धर्मसंस्कार स्मशानांत होऊं लागले, मेलेलीं माणसें शेतांत किंवा रस्त्याचे बाजूस संस्कारां शिवाय पुरूं लागले, देवळांतल्या घांटा उतरून ठेविल्या, मांस खाण्याचें बंद झाले इत्यादि गोष्टी झाल्या तेव्हां जिकडे तिकडे औदासिन्य, शोक व दुःख यांचीं चिन्हें दिसूं

लागलीं. या सर्वांस कारण राजा असल्यामुळें त्याविषयीं लोकांची अप्रीति उत्तरोत्तर वाढत गेली. इतक्यांत पोपानें लिहून पाठविलें कीं राजास पदच्युत केलें आहे व त्याचें राज्य फ्रेंच राजपुत्रास दिलें आहे, ती परवशता जानास न अवडून त्यानें पोपास कळविलें कीं मी आपली आज्ञा मानण्यास तयार आहें व हें राज्य आपण मला दिलें आहे असें समजून मी आपल्यास मागील ती वार्षिक खंडणी देत जाईन. तेव्हां पोपानें राज्यावरील बहिष्कार काढून सर्व धर्मविधि पूर्ववत् चालवावे ह्मणून लिहून कळविलें.

ज्यारन लोकांनीं जान राजाचे जुलमास कंटाळून सर्वानुमतें एक कायदा केला. तो कायदा इंग्लिश लोकांच्या स्वातंत्र्याचा पुढे पाया झाला त्याला माग्नाचार्टा (मोठा कायदा) असे ह्मणतात. पुढें उइंजर शहरा नजीक रानिमीड या मैदानांत त्यांनीं राजास गांठून त्याची सही त्या कायद्यावर जुलुमानें करून घेतली (ता० १५ जून स० १२१५) त्या कायद्यांतील मुख्य कलमें अशीं होतीं–विशेष कारणाशिवाय व मुख्य सभेच्या अनुमताशिवाय रयतेवर कर बसवूं नये, जिकडे तिकडे एक माप व एक वजन चालू करावें, व्यापाऱ्यांस इकडे तिकडे जाण्यास व इकें तेव्हां येण्यास परवानगी असावी, फ्रीमेन (सुख वस्तु लोक) यांची चौकशी किंवा त्यास शिक्षा देणें झाल्यास देशाचे कायद्याप्रमाणें व पंचाचे सल्लयानें यावी, राजा जिकडे जाईल तिकडे न्यायाधिशानें न जातां न्यायस्थानें कायम ठिकाणीं करावीं, न्यायस्थानीं जाण्यास हवी त्यास परवानगी असावी, न्याय वेळचे वेळेस द्यावा, लांचणीवर विनाकारण टाकूं नये, लांच घेऊं नये किंवा देऊं नये इत्यादि.

जॉन राजाचे मनांत कायदा पाळावयाचा नव्हता. ह्मणून तो वाईट बेटांत जाऊन, परदेशीय भाडोत्री सैन्य जमवून व पो-

पापासून तो कायदा रद्द करण्याकरितां हुकूम मिळविण्याचे खटपटींत असता ब्यारन (सरदार) लोक गैरसावध आहेत असें पाहून त्यानें इंग्लंडावर एकाएकीं स्वारी केली आणि त्यांस जरजर करून सोडिलें. आतां आपलें चालत नाहीं असें पाहून ब्यारन लोकांनीं फ्रान्स देशांतील राजपुत्र लुई यास बोलावून त्यास इंग्लंडचें राज्य देण्याचें कबूल केलें. लुई राजा मोठे सैन्यानिशीं लंदन एथें येऊन थडकला व लोकांनीं त्यास येऊन मानही दिला. परंतु कांहीं लोकांनां ती परवशता न आवडून त्यांनीं जान राजास केंट प्रांतांतून परत बोलाविलें. परंतु तो समुद्र कांठानें येत असतां वाशा अखातांतून त्याचे आंगावर मोठी लाट येऊन त्याचें सैन्य, खजीना, वहाजें, व सामान वरेंच वाहून गेलें. तो स्वतः मोठ्या शर्तेनें वाचला. अशा स्थितींत वाटेच्या दगदगीनें तो अजारी पडून मोठ्या निराश स्थितींत स० १२१६ त परण पावला.

आजपर्यंत इंग्लंडांत जे मोठे जुलमी राजे झाले त्यांतील जान हा एक राजा होता त्यानें नवीन तर कांहींच संपादिलें नाहीं, परंतु होतें त्यांतूनही त्यानें बराच भाग गमविला. त्याचे अंगीं एकही चांगला गुण नसल्यामुळें तो लोकांत अतिशयच अप्रिय झाला होता. त्याचे मागून त्याचा वडील मुलगा हेन्री हा गादीवर बसला. तो फार लहान झणजे नऊ वर्षांचा होता झणून त्याचें राज्य चालविण्याकरितां मोठा शेहाणा, धूर्त व कारस्थानी असा त्याचे बहिणीचा नवरा पेंब्रोकचा अर्ल हा नेमून दिला होता त्याचे कारकीर्दींत चौथे धर्मयद्धाची तयारी झाली सन १२०८ ला वर्षी लंडन शहराला दरवर्षीं नवीन कोतवाल नेमावा असे ठरले. राजाने यहुदी लोकास निर्दयपणाने लुटलें. लंडनचा पूल तयार झाला. जॉन मोठा आळशी, गर्विष्ठ व मित्रा असा होता. त्याला पांच मुलें होतीं. दोन मुलगे व ३ मुली

तिसरा हेन्री (उइन्चेस्टर)

(इ० स० ११९६–१२७२).

पेम्ब्रोक यानें हेन्री राजास ग्लूस्टर एथें वाढवून त्यास राज्याभिषेक करविला आणि मोठ्या युक्तीनें व चतुराईनें बऱ्याच बंडखोर ब्यारन लोकांचें मन राजाकडे वळवून घेतलें **फ्रान्स** एथील राजपुत्राचे दंगे सुरूच होते, व तो परत जाण्यास कबूल नव्हता म्हणून ज्या ब्यारन लोकांनीं त्यास बोलाविलें होतें त्यांचें मन राजाकडे वळल्यामुळें त्यांनीं मोठी फौज जमवून त्यास इ० स० १२१७ मध्यें **लिंकन** एथे लढाई दिली व त्याचा पराजय करून त्यास **लंडन** एथे कैदेंत ठेविलें. आणि त्यास मदत करण्याकरितां **फ्रान्स**हून जी कांहीं लढाऊ गलबतांची कुमक आली होती तिचीही त्यांनीं दाणादाण करून टाकिली. लुई राजा शरण आल्यावर त्याशीं तह करून त्यानें स्वदेशीं निघून जावें व **फ्रान्सां**तील घेतलेले प्रांत परत द्यावे असें इ० स० १२१७ मध्यें ठरविलें.

पेम्ब्रोक स० १२१८ त मेल्यावर हेन्री राजा स्वछंदानें वागूं लागला. त्याच्या विधवा बहिणीनें लेस्टरचा अर्ल ह्याशीं लग्न केल्यावर तो अर्ल इंग्लंडचें राज्य आपले ताब्यांत आणण्याविषयीं प्रयत्न करूं लागला. राजा निर्बल असल्यामुळें तो प्रथम एका **फ्रेंच** पाद्र्याचे नादीं लागला होता. त्या योगानें त्याच्या बऱ्याच **फ्रेंच** स्नेह्यांचा इंग्लंडांत प्रवेश झाला. पुढें त्यानें प्राव्हेन्स एथील कौंटाची मुलगी एलिय. नार ह्याशीं स० १२३६ त लग्न केल्यामुळें तिच्या शिफारसीनें बऱ्याच **फ्रेंच** लोकांची इंग्लंडांत आणखी भरती झाली. तिसरा हेन्री पोपाचा अधिकार मानीत असे, त्या योगानें राज्यांतील धर्माधिकाऱ्यांच्या बऱ्याच जागा इटालियन लोकांस मिळत

असत. याप्रमाणें इंग्लंडचे राज्यांत बरेच परदेशीय लोक आल्यामुळें व राजाची विशेष भक्ति त्यांकडे असल्यामुळें आपसांत द्वेष व महत्वाकांक्षा वाढत चालली होती. त्या परकीय लोकांच्या इच्छा तृप्त करण्यांत हेन्रीनें इंग्लंडचे राज्यास बरेंच कर्ज केलें होतें. हेन्रीचे मनांत आपला दुसरा मुलगा एड्मंड यास सिसिलीचे राज्य पोपाकडून मिळवून द्यावयाचें होतें. त्या कामास द्रव्य पाहिजे म्हणून त्यानें नवीन कर बसविण्याचा बेत करून द्रव्याची मागणी करण्याकरितां सभा भरविली. त्या सभेस **मयाड पार्लमेंट** (वेडी सभा) म्हणतात.

तिसरे हेन्रीचे कारकीर्दीपर्यंत जी सभा भरत असे तींत मुख्य सरदार, मुख्य धर्माधिकारी, आणि मोठमोठे जमीनदार येत असत. ती वेडी सभा भरल्यावर सज्ज अशा ज्यारन लोकांनीं राजाची ती मागणी अशा अटीनें कबूल केली कीं, त्यानें मागा-चार्टा मान्य केला पाहिजे व त्याप्रमाणें वर्तन ठेविलें पाहिजे. हेन्रीनें तें सर्व मान्य करितांच त्यानें मागितलेलें द्रव्य देण्याचें त्यांनीं कबूल केलें. याप्रमाणें त्याचें कार्य झाल्यावर त्यानें आपला करार मोडून पूर्वीप्रमाणेंच आपल्या वर्तीं आपल्या परकीय स्नेही मंडळीस प्रजेस लुटण्याची व जुलूम करण्याची मोकळीक दिली. हा अन्याय ज्यारन लोकांस न आवडून त्यांनीं द्रव्य देण्याचें बंद केलें आणि नवीन राज्य पद्धति रचण्याकरितां नवीन सभा भरविण्याविषयीं परवानगी देण्यास राजास अगत्य पाडिलें. ती सभा आक्सफर्ड एथें भरली होती म्हणून राज्य सुधारण्याच्या कामांत जो त्यांनीं कायदा मंजूर केला त्यास प्रोव्हिजन्स ऑफ आक्सफर्ड (आक्सफर्ड एथील कानू) असें म्हणतात. ते कानू १२५८ मध्यें अमलांत आले व ते

अद्याप उपयोगीं पडत आहेत. ते कायदे असे होते. पार्लमेन्टाची परवानगी मिळाल्याशिवाय राजास कर बसविण्याचा अधिकार नाहीं, पार्लमेंट सभेस प्रत्येक कौंन्टीनें (प्रांतानें) चार नाइट लोक पाठवावें व त्यांनीं आपल्या गांवांतील पीडा व तक्रारी यांचा शोध करून त्या भरणाऱ्या पार्लमेंटपुढें आणाव्या, पार्लमेंट सभा वर्षांतून तीन वेळ भरावी. त्या पार्लमेंट सभेनें पूर्वीच्या सर्व अधिकाऱ्यांस कमी करून ती नवीन राज्य पद्धति अमलांत आणण्याकरितां २४ ब्यारन (अधिकारी) नेमिले होते. कित्येकांच्या मतें ते १२ होते. कित्येकांच्या मतें ते २० होते. त्यांत सायमन डि मान्टफर्ट हा मुख्य होता. त्या लोकांनीं आपली नेमणूक होतांना पार्लमेंटपासून असा करार करून घेतला होता कीं तिसरा हेन्री व त्याचा मुलगा एड्वर्ड यांचे कारकींर्दीपर्यंत सर्व राज्य सूत्रें त्यांचे हातीं राहिलीं पाहिजेत. ती गोष्ट राजा व राजपुत्र यांस अमान्य होऊन त्यांनीं बंड केलें व जिकडे तिकडे धामधूम मांडिली तेव्हां लेस्टरच्या अर्लानें त्यांवर सैन्य पाठवून त्यांजबरोबर ससेक्स प्रांतांत ल्यूइस एथें स० १२६४ त लढाई करून राजा व राजपुत्र यांचा पराजय केला व त्यांस कैद करून डोवर एथील किल्ल्यांत नेऊन ठेविलें. नंतर त्यानें राजाचें नांवानें राज्य चालविलें व पार्लमेन्ट भरविली. तींत पूर्वीप्रमाणें ब्यारन व धर्माधिकारी यांस बोलावून प्रत्येक प्रांतांतून दोन नाइट व प्रत्येक शहरांतून दोन पंच असे बोलाविले होते. ही सभा स. १२६५ त भरली होती. तिला सध्याच्या पार्लमेन्ट सभेच्या व कामन सभेच्या पायाचा मूळ दगड मानितात. त्या सभेनें पूर्वीची राजसत्ता चालवावी म्हणून आग्रह धरिल्यावरून राजपुत्रास बंदमुक्त करावें लागलें. कोणी सांगतात कीं राजपुत्र एड्वर्ड हा कैदेंत असतां त्यास हवा

खाण्यास जाण्याकरितां परवानगी असे, परंतु खाजबरोबर रखवालदार स्वार असत. असें कांहीं दिवस चाललें असतां एड्वर्ड यानें बरोबरीच्या स्वारांमध्यें आपआपसांत एक दिवस पैजा लावून शर्यति लाविल्या व आपण मौज पहात घोड्यावर स्वस्थ उभा होता. स्वारांचे घोडे पक्के थकले असें पाहून तो आपले घोड्यास टांच मारून पळून गेला. स्वारांनीं पाठलाग केला परंतु त्यांचें कांहीं चाललें नाहीं. **मान्टफर्ड** याचे राज्यलोभीपणास लोक कंटाळून गेले होतेच. राजपुत्र सुटतांच त्याजकडे ते लोक इतके जमले कीं त्यानें **मांटफर्ड** यास **ईव्हशाम** एथें तारीख ४ आगष्ट सन १२६५ त लढाई देऊन त्याचा पराजय केला व त्यास व त्याचे स्नेह्यांस ठार मारून **हेन्री** राजास पुनः **इंग्लंड**चे गादीवर बसविलें. **हेन्री** राजा मरावा ह्मणून त्यास **मांटफर्ड** यानें लढत असतां लबाडीनें आपले सैन्यापुढें ठेविलें होतें. परंतु ज्या वेळेस **एड्वर्डा**चा भडिमार सुरू झाला त्यावेळेस त्यानें भिऊन जाऊन "रे, मी, **हेन्री** राजा आहें, **हेन्री** राजा आहे" असें मोठ्यानें ओरडून आपले पुत्रास कळविलें, व त्यानें त्यास लागलेंच सोडाविलें.

याप्रमाणें त्या शूर **एड्वर्डा**नें बापास गादी मिळवून दिल्या. वर व घरांतील आणखी बारीकसारीक तंटे मिटविल्यावर तो **फ्रान्स**चा राजा ९ वा **लुई** याजबरोबर **पॅलेस्टैन** एथें धर्मयुद्धास आपली बायको **इलिअनॉर** इला घेऊन स. १२६९ त निघून गेला. तिकडे त्यानें बराच पराक्रम गाजवून व **बाबेलन** एथील सुलतानाशीं दहा वर्षांचा तह आपल्यास हवा तसा करून घेऊन परतत आहे तों त्यास त्याचे बापाचे मरणाची बातमी येऊन पोंचली. **एडवर्ड** तेवेळेस अजारी होता. त्यास एका बंडखोर व खुनशी मुसलमानानें विषारी बाण मारून अति घायाळ

केलें होतें परंतु त्याच्या वायकोनें तें विष चोखून घेऊन त्याचे प्राण वांचविले. नंतर तो तसाच इंग्लंडास निघून आला.

हेन्री राजा स. १२७२ त मरण पावला ते वेळेस त्याचें वय ६३ वर्षांचें होतें. हेन्रीनें ५५ वर्षें राज्य केलें. परंतु तो राजा म्हणण्यास योग्य नव्हता. त्याचे कारकीर्दीत जिकडे तिकडे बंडाळी व चोरटावा असल्यामुळें कोणी मनुष्य सुखी नव्हतें. त्याचे व त्याचे वापाचे अधिकारांत यहुदी लोकांस फार पीडा होत होती. त्याचे वापास एकदा द्रव्याची जरूर लागून त्यानें ब्रिस्टल एथील एका यहुद्यापाशीं १०,००० मार्क मागितले. तो देईना तेव्हां ते मार्क तो देईपर्यंत जान राजा दररोज त्याचा एक दांत पाडीत असे. याप्रमाणें त्याने त्याचे सात दांत पाडिले, तेव्हां तो निरुपायानें कबूल झाला असें सांगतात. विश्वविद्यालयें याचे कारकीर्दीत बरींच उदयास आलीं.

पहिला एड्वर्ड (लांबटांगरया)

(१२७२—१३०७)

पहिला एड्वर्ड सन १२१९ त वेस्टमिन्स्टर एथें जन्मला होता, त्यास तारीख १९ आगष्ट स. १२७२ रोजीं कँटर्बेरी एथें राज्याभिषेक झाला, तेव्हां प्रजेस मोठा आनंद झाला. कारण तो तसाच शूर, पराक्रमी, लोकप्रिय व परोपकारी होता. तो राज्यावर बसतांच वापाचे नेभळेपणामुळें जी राज्यांत अव्यवस्था झाली होती, ती मोडून टाकण्याविषयीं प्रयत्न करूं लागला. ज्या कामगारांचे हांतून गैरवर्तन झालें होतें, त्यांस त्यांच्या गुन्हयाप्रमाणें त्यानें दंड किंवा शिक्षा केली. जहागिरी योग्य रीतिनें चालत आहेत किंवा नाहींत त्याचा शोध केला. पार्लमेन्ट समेत सरदार व वतनदार येतील तेव्हां त्याजबरोबर प्रत्येक

शहरांतून एक किंवा दोन पंच आले पाहिजेत असें ठरविलें. याप्रमाणें पार्लमेन्टची रचना पूर्ण दशेस आल्यावर एड्वर्डचें चित्त वेल्सदेशाकडे वळलें.

वेल्स हा देश इंग्लंडाचे पश्चिम भागीं असून तेथील लोक मूळच्या ब्रिटन लोकांचें वंशज होते. रोमन, साक्सन व डेन यांच्या तडाक्यांतून ते त्या डोंगरी प्रदेशांत अगदीं अलग राहिले होते. ते जात्या रानटी, पहाडी, धीट व स्वतंत्र असून त्यांचे राजेही स्वतंत्र असत. ते हद्दीवरील लोकांस फार पीडा देत असत. इंग्लंडांत लढाई व बखेडे सुरू झाले झणजे त्यांचें तर फारच पिके. एड्वर्ड राजा गादीवर बसला तेव्हां त्यांचा राजा ल्युवेलिन हा होता. तो एड्वर्डास मानीनासा झाला तेव्हां एड्वर्डानें जिंकण्याकरितां मोठ्या फौजेनिशीं त्याजवर चाल करून त्याचा पराजय केला आणि त्यास धरून बिल्थ एथें वाय नदीच्याकाठीं जिवें मारिलें (इ. स. १२८२). नंतर त्याचा भाऊ डेव्हिड यास लपलेले ठिकाणापासून शोधून काढून हाल हाल करून फाशीं दिलें. वेल्स एथें लढाई चालत असतां तेथील कवि, शूरांस उत्तेजन येण्याकरितां मागील शूरांचे पोवाडे गात व त्यांस चेव आणीत. त्या लोकांचा एड्वर्डास संताप येऊन त्यांस एकत्र जमवून अतिनिर्दयपणानें ठार मारिलें. इतकें झालें तरी ते वेल्स प्रांतांतील लोक वश झाले नाहींत. त्यांनीं बंडें चालविलींच होतीं. एड्वर्डानें अलेरिस त्यांचा चांगला समाचार घेतल्यावर त्यांनीं असा तह केला कीं ज्यास दुसरी भाषा येत नाहीं व जो आमच्या देशांत जन्मलेला आहे असा राजा आम्हांस मिळाला पाहिजे. ती त्यांची समजूत करण्याकरितां एड्वर्ड राजा आपले राणीसहवर्तमान कर्नार्व्हन किल्ल्यांत एक वर्ष राहिला होता. तेथें राहण्याचा उद्देश असा

होता कीं तेथें एखादा आपल्यास मुलगा झाल्यास त्या मुलाला त्यांचा राजा करावें. त्या मुदतींत दैवयोगानें त्यास स० १२८४ त एक मुलगा होतांच त्यानें त्यांजकडून त्या मुलास आपला राजा मान्य करविलें, व वेल्स प्रांत आपले राज्यास जोडिला. त्या दिवसांपासून इंग्लंडच्या राजांच्या व राणींच्या पहिले मुलास प्रिन्स आफवेल्स (वेल्साचा राजा) हें नांव त्याकूं द्यावें.

वेल्स प्रांतांत यश आलें असें पाहून एड्वर्डाचे मनांत स्काट्लन्ड देशही जिंकावा असें आलें. मागील वृत्तांत मनांत आणिला म्हणजे तो देश इंग्लंडाचें एक संस्थान होतें, असें कळून येईल. परंतु तेथील शूर व स्वाभिमानी लोकांस ती परतंत्रता न आवडून त्यांनीं पहिले रिचर्ड राजास कांहीं द्रव्य देऊन आपली स्वतंत्रता करून घेतली होती. या वेळेस तिसरा अलेक्झांडर याचा नात नार्वेची माड मेल्यामुळें तेथील गादी रिकामी झाली होती. तीवर सुमारें ११ जण वारसा सांगत होते. परंतु त्यांत तीन मुख्य होते. त्या उमेदवारांचीं नांवें. जान बेलिअल, (ग्यालोवेचा लार्ड), राबर्ट ब्रूस (आनमेडलचा लार्ड) आणि जान हेस्टिन्स (एबरग्यावनीचा लार्ड) हीं होतीं. आपसांत रिकामा कलह माजविण्या पेक्षां कोणी वकील नेमून तंटा तोडावा असें सर्वानुमतें ठरून त्यांनीं एड्वर्ड राजास तें काम सांगितलें. एड्वर्डाचे मनोदया प्रमाणें प्रसंग प्राप्त झाल्यामुळें, त्यानें त्यांस उर्हाम एथें येण्यास सांगितलें. ते तेथें आले परंतु गैरसावध पणांत आल्यामुळें एड्वर्ड राजानें त्यांस कैद केलें, आणि सांगितलें कीं इंग्लंडचा मांडलीकपणा कबूल कराल तर तुह्मांस सोडितो, नाहीं तर तुमचा देश तुह्मांस पारखा होईल. तेव्हां त्यांनीं संकटांतून मुक्त होण्याकरितां ती गोष्ट मान्य केली. एड्व-

र्डानें तेथील किल्ले हस्तगत करून येऊन व त्या किल्यांत आपले शिपायी ठेवून देऊन, **जानबेलिअल** ह्यास **स्काट्लंड**ची गादी दिली. ते पारतंत्र्य **स्काच** लोकांस न आवडून त्यांनीं **बेलिअल** याजकडून बंड करविलें. **एड्वर्डा**नें त्यांशीं **डंघार** एथें स. १२९६ त सामना करून त्याचा पराजय केला. व त्यास कैद करून त्यानें **फ्रान्स** एथें गुपचिप जाऊन रहावें असें ठरविलें व त्यानें **स्काट्लंडावर वारेनऱ्या** अर्लास प्रतिनिधि नेमून दिलें. याप्रमाणें **स्काट्लन्ड** देश जरी परतंत्र झाला तरी त्या राष्ट्राच्या अंतःकरणांतील क्रोधाग्नि धुमसतच होता.

उइलिअम वालेस हा कोणी कामगार नव्हता किंवा त्यास कोणाचें पाठबळही नव्हतें. तो सामान्य मनुष्य असून स्वपराक्रमानें उदयास आला होता. त्याचे गांव जवळच **डंवार्टन** नामें किल्ला होता. तेथील **इंग्लिश** रखवालदारानें **उइलियम वालेस** याची बायको भ्रष्ट केली होती. तो अपराध छपाविण्या करितां त्या रखवालदारानें अशी बातमी पसरून दिली कीं **उइलियम वालेस** हा इकडे बंडाळी करून घरें लुटून व जाळून लोकांस पीडा देत आहे. त्या वेळेस **एड्वर्ड** हा दक्षिण किनारी **फ्रान्सा** बरोबर चाललेल्या लढाईत गुंतला होता. **स्काच** लोकांनीं **उइलियम वालेस** याचे स्वातंत्र्य प्रीतीचा फायदा साधून मोठा बंडावा केला आणि **इंग्लिश** प्रतिनिधि **वारेन** याचा **स्टार्लिंग** एथें सन १२९७ त पराजय केला तेव्हां **एड्वर्ड** राजास **फ्रान्सा**कडील संबंध सोडून स्वदेश रक्षण करण्या करितां फौजेनिशीं उत्तरेकडे वळावें लागलें दोन्ही सैन्याची **फाल्कर्क** एथें गांठ पडून मोठी लढाई झाली तींत जरी **स्काच** लोकांचा पराजय झाला तरी ते लोक शांत न होतां अधिकच त्रास देऊं लागले.

तथापि प्रत्येक प्रसंगीं इंग्लिशांचाच जय असे. उइालियम वालेस हा तोंड चुकवून दडत असे यामुळें लढाईंचा निकाल होईना शेवटीं त्यास एकानें धरून दिल्यावर त्याच्या पायांत बिब्या ठोकून लंडनास आणिलें, व टावरहिल एथें इ. स. १२९८ त फाशीं दिले.

वालेस मेल्यावर स्कॉच लोक शांत होतील असें एड्वर्डास वाटलें होतें. परंतु थोडक्याच दिवसांत त्यांनीं ब्रूस यास आपला मुख्य करून इंग्लिश लोकांस हद्दपार हांकून लाविलें. नंतर त्यांनीं त्यास आपला राजा केलें. इतका आपण त्रास दिला व प्रत्येक वेळीं त्यांस जेरीस आणिलें तरी आपणास स्कॉटलंडांत काडी मात्र उपयोग झाला नाहीं असें वाटून एड्वर्डास तिसऱ्यांदा चेव आला, व पूर्वी पेक्षां जास्त सैन्य जमवून एक वेळ आणखी प्रयत्न करून पहावा असें मनांत येऊन त्यानें ब्रूस बरोबर लढण्या करितां मोठी फौज रवाना केली व तो स्वतःही मागून गेला. आपली महत्वाकांक्षा तृप्त करण्यांत दुसऱ्याचें नुकसान विनाकारण केवढें होतें याचा विचार कोणी करीत नसतो. त्या योगानें देशाचे देश उजाड होऊन मोठी प्राणहानि होते. बरे महत्वाकांक्षी लोक जर ते ऐश्वर्य बरेच दिवस अनुभव येते, तरी एक पक्षीं सुख वाटलें असतें. परंतु ईश्वराच्या उलाढालींत त्या लोकांचें लवकरच वाढून ठेविलेलें असतें. एड्वर्ड राजा स्कॉट्लन्डास पोंचतो न पोंचतो तोंच त्यास कार्लाइल एथें मरणानें गांठून त्याचा ई० स० १३०७ त अंत केला. मरतांना आनें स्कॉच लोकांविषयीं आपले मुलास बुद्धिपुरःसर बजावून सांगितलें कीं स्कॉच लोकांस पूर्णपणें ताब्यांत आणिल्याशिवाय तूं लढाई बंद करूं नको व माझें प्रेत सैन्याचे अग्रभागीं नेत जा.

केवढा चमत्कार हा कीं मरते वेळेस सुद्धां दुष्ट मनुष्यांचे हेतु दुष्टच असतात, व हाव ही तशीच अतृप्त असते.

इतिहासकार पहिले एड्वर्डाची मोठी तारीफ करितात व ती कांहीं अंशीं खरीही आहे. कारण तो तसा शूर होता म्हणूनच त्यानें एवढ्या झटापटी करून इंग्लंडचें राज्य उत्कर्षास व वैभवास आणिलें. तो मोठा सुंदर होता, परंतु पायांकडून फार कांब असल्यामुळें त्यास लांबटांग्या असें म्हणत असत. तो मेला ते वेळेस त्याचें वय ६८ वर्षांचें असून कारकीर्दीचें ३५ वें होतें. त्यानंतर त्याचा वीस वर्षांचा मुलगा एड्वर्ड (कर्नार्व्हन) हा गादीवर बसला.

दुसरा एड्वर्ड (कर्नार्व्हन.)

(इ. स. १३०७—१३२७)

दुसरा एड्वर्ड, कर्नार्व्हन एथें सन १२८४ त जन्मला होता. तो राजा बापासारखा शूर व गुणी नव्हता. त्याचें लग्न फ्रान्साचा राजा ४ था फिलिप याची मुलगी इजाबेला इच्याशीं झालें होतें. फ्रान्सांतील आपले प्रांतांबद्दल फ्रान्साचे राजास मान देण्याकरितां एड्वर्ड राजा आपले बायकोसहवर्तमान इ. स. १३० त फ्रान्सास गेला, तेव्हां त्यानें इंग्लंडचे राज्यावर आपला स्नेही, पिअर्स ग्यावेस्टन, यास नेमिलें होतें. तो महा मूर्ख होता. त्यानें बऱ्यारन लोकांस फार पीडा दिली होती. एड्वर्ड परत आल्यावर त्यानें त्यास काढून दिलें, परंतु त्याच्या लोकांत पुनः वेड भरून त्यानें त्यास तो कारभार पुनः दिला. ते बऱ्यारन लोकांस न आवडून त्यांनीं आपले ताब्यांतील लोक सज्ज करून बंड केलें, आणि ग्यावेस्टन यास स्कार्बरो एथें पकडून त्याचा इ. स. १३१२ त शिरच्छेद करविला.

बापाचे सांगीप्रमाणें एडवर्डानें १,००,००० सैन्यानिशीं स्कॉटलंडावर स्वारी केली, परंतु ब्रूस यानें त्यास बानाक्बर्न एथें गांठून इ. स. १३१४त त्याचा मोड केला, व १३ वर्षांचा तह करून एड्यर्डास स्वदेशास लावून दिलें. तो लंडन एथें आल्यावर ड्यारन लोकांनीं पुनः बंड करून राजास मदत करण्याकरितां १६ सभासदांची नेमणूक करून दिली. राजा आपले मित्रांतील ह्यू डिड स्पेन्सर यास वाढवून त्याचे तंत्रानें चालूं लागला व त्यास संतुष्ट ठेविण्याकरितां त्यानें किल्येक श्रीमंत ड्यारन लोकांस नागविलें. ते ड्यारन लोकांस न आवडून त्यांनीं राजाचा भाऊ डयूक आफ् लांकास्टर याचे साह्यानें लंडनास वेढा दिला व स्पेन्सर यास राज्यांतून हांकून लाविलें (इ. सं. १३२१.) परंतु राजानें तें न पतकरून त्यानें स्पेन्सरास पुनः बोलाविलें व लांकास्टरच्या डयूकावर स्वारी करून त्याचा बरोब्रिज एथें पराजय व शिरच्छेद केला (इ. स. १३२२.)

इ. स. १३२५ त फ्रान्स देशाचा राजा ४ था फिलिफ मरून त्याचे गादीवर त्याचा मुलगा ४ था चार्लस हा बसला. तेवेळेस त्यास मान देण्याकरितां एड्वर्डास पुनः बोलावणें आलें. त्यावेळेस त्यानें स्वतः न जातां आपले बायकोस पाठविलें. तीं तिकडे गेल्यावर तिनें लिहून पाठविलें कीं स्पेन्सर यास राज्यांत ठेवित्यास मी परत येणार नाहीं. राजा तें कबूल करीत नाहीं असें पाहून तिनें आपले भावाचे सल्यानें व तेथें जाऊन राहिलेले लांकास्ट्रियन पक्षाचे लोक यांचें व राजर मार्टिमर (तिचा दोस्त) याचें साह्य घेऊन इंग्लंडावर स्वारी केली. तिला तिचे दीर नार्फक व केन्ट एथील अर्ल यांनीं साह्य केले आहे असें पाहून, राजा वेलस प्रांतांत पळून गेला. मागें त्या सरदारांनीं स्पेन्सरास धरून फांशीं दिलें आणि राजाचा पाठलाग

करून त्यास पकडलें. नंतर पार्लमेंट सभा राजाचे नांवें भरून त्यास पदच्युत केलें आणि बर्कले किल्यांत कैद करून ठेविलें. त्याचे रक्षवलिदारांतील कांहीं लोक फार दुष्ट व निर्दय होते. त्यांनीं त्याची फारच विटंबना करून इ. स. १३२७ त त्याची हत्याही केली. त्याचे राज्यांतील अव्यवस्थेसारखी अव्यवस्था व दुर्वर्तन दुसरे कोणतेही राज्यांत आढळणार नाहीं. त्यास ४ मुलें होतीं. **एड्वर्ड; कार्नवालचा अर्ल, जान;** आणि दोघी मुली. दुसरे **एड्वर्डानें** वीस वर्षें राज्य केलें. त्याचे मागून त्याचे गादीवर त्याचा १५ वर्षांचा वडील मुलगा, तिसरा **एडवर्ड** या नांवानें गादिवर बसला.

तिसरा एड्वर्ड.

(इ० स० १३२७–१३७७.)

तिसरा **एड्वर्ड** हा १४ वर्षांचा लहान होता म्हणून राजरक्षणार्थ **लांकास्टरचा** अर्ल व कारभार चालविण्याकरितां पंच नेमून दिले होते. तथापि सर्व कारभार त्याची आई **इजाबेला** व तिचा दोस्त **राजर मार्टिमर** हीं मुख्यत्वेंकरून पाहत होतीं. **एड्वर्डाचें** लग्न **हेनालटच्या फिलिपेशीं** झालें होतें. **स्काच** लोकांनीं **इंग्लंडाचें** उत्तरेस स्वारी केल्याबरून **एड्वर्डानें** त्यांवर स्वारी केली. परंतु **मार्टिमरच्या** मूर्खपणानें तींत यश न येतां **स्काटलंडास** स्वातंत्र्य द्यावें व **एड्वर्डाची** बहीण **स्काटलंडाचे** राजास द्यावी असा १३२८ त **नार्थ्याम्प्टन** एथें तह करावा लागला. **एड्वर्ड** राजास त्याची आई व **मार्टिमर** यांचा तान्हा व दुर्वर्तन न आवडून, त्यानें कित्येक उत्तम सरदारांचे व विद्वानांचे मतानें राज्य कारभार आपले हातीं घेण्याचा निश्चय केला. **मार्टिमर** दुराचरणानें

फार अप्रिय होत चालला होता. राणी व **मार्टिमर** हीं **नार्टिंगह्याम्** एथील किल्यांत राहत असत व तेथेंच **पार्लमेंट** सभा भरत असे **एड्वर्डानें** त्या किल्याचे रखवालदार वश करून घेऊन गुप्त वाटेनें कांहीं ब्यारन लोकांस आंत पाठविलें व **मार्टिमर** यास अवचित गांठून कैद केलें. नंतर त्याची **पार्लमेंट** सभेपुढें चौकशी करून तो दोषी ठरल्यावर त्यास **लंडन** एथें स. १३३० त फाशीची शिक्षा दिली. राणीस जिवदान दिलें व जन्मपर्यंत **राइजिंग्स** एथें कैदेंत ठेऊन तिला ४,००० पौंडाची नेमणूक करून दिली. **एड्वर्ड** तिला दरवर्षी मोठ्या थाटानें जाऊन भेटत असे. ती तशी तेथें २७ वर्षें कैदेंत होती. ती **मार्टिमरची** व राणीची पीडा नाहींशी केल्यावर **एड्वर्डानें स्काट्लंड** देश जिंकण्याचा पुन्हा बेत करून मोठी फौज जमविली. **राबर्ट ब्रूस** त्यावेळेस मेला होता. त्याचे गादीवर त्याचा मुलगा **एड्वर्डाचा** मेहुणा **डेव्हिड ब्रूस** हा होता.

एड्वर्डानें ह्यालिडन टेकडी जवळ मोठ्या सैन्यानिशीं जाऊन तळ दिला. लढाई मोठी भयंकर होऊन इ. स. १३३३ त **स्काच** लोकांचा पराभव झाला व त्यांचा मोठा नाश झाला. **स्काट्लंडचा** राजा **डेव्हिड ब्रूस** हा **फ्रान्सास** पळून गेला. ह्याचें राज्य चालविणारा **डुगलास** हा लढाईत पडला. त्या लढाईंत ३०,००० **स्काच** लोक प्राणास मुकले, असें सांगतात. याप्रमाणें **एड्वर्डास** जय मिळाल्यावर त्यानें **जान बेलिअल** याचा मुलगा **एड्वर्ड बेलिअल** यास गादीवर बसवून **स्काट्लंडचा** दक्षिणेकडील कांहीं भाग आपले राज्यास जोडिला. ती गोष्ट शूर **स्काच** लोकांस कबूल न होऊन **बेलिअल** यास इ. स. १३३४ त **फ्रान्सांत** हांकून दिलें.

तिसरा **एड्वर्डाच्या** मनांत **फ्रान्स** देश आपल्यास मिळावा

असें येऊन तो तेथील आपले मामाचे गादीवर आपला हक्क सांगू लागला. फ्रान्साचा राजा, ४ था फिलिप याचे तिन्ही पुत्र निपुत्रिक मेल्यामुळें त्या गादीवर व्हेलाइस एथील फिलिप हाही आपला वारसा सांगत होता. एड्वर्ड हा चवथे चार्लेसाची बहीण इजाबेला हिचा मुलगा होता, आणि व्हेलाईसचा फिलिप हा चार्लेसाचा सख्खा चुलत भाऊ होता सालिक कायदा असा होता कीं, फ्रेंच गादविर मुलीचा किंवा मुलीच्या वंशजांचा अगदीं वारसा नाहीं. तो कायदा जरी एड्वर्डाचे हक्कास विघ्न आणणारा होता तरी त्यानें मनगटाच्या जोरानें हक्क दाखवून लढाई देण्याचा निश्चय केला. परंतु चवथे चार्लेसाची गादी व्हेलाइसचे फिलिपास मिळून तो सहावा फिलिप झाला.

फ्रान्स हा स्काट्लंडचा मित्र होता, व स्काट्लंड हा इंग्लंडचा शत्रु होता, म्हणून फ्रान्सानें इंग्लंडाबरोबर लढाई करण्याचें प्रसिद्ध केलें. एड्वर्डानें मोठें सैन्य जमा करून जलमार्गानें इ. स. १३३८ त फ्रान्सावर स्वारी केली आणि स्लुईस एथें इ. स. १३४० त जय मिळविला. हा त्याचा जय समुद्रावरील पहिला होता. सन १३४६ त कृष्णकवची राजपुत्रानें फ्रेंचांस क्रेसी एथें गांठून त्यांचा पराजय केला. त्याच वर्षी स्काटांचा राजा डेव्हिड ब्रूस यानें इंग्लंडावर स्वारी केली होती. परंतु हेन्री पर्सी व राणी फिलिपा यांनीं त्यास जिंकून कैद केलें. त्या लढाईस नेव्हिलक्रासची लढाई म्हणतात. डेव्हिड ११ वर्षे कैदेंत होता. पुढें स्काच लोकांनीं त्याबद्दल एक लक्ष मार्क खंडणी देऊन त्यास मुक्त केलें. सन १३४९ त इंग्लंडांत महामारी सुरू होऊन फक्त लंडनांत ५०,००० लोक प्राणास मुकले. ती महामारी युरोपांत नरींच वर्षें चालू होती. त्यायोगानें इंग्लंड आणि फ्रान्स यांजमधील लढाईस बराच व्यत्यय आला होता. त्याचवेळेस फ्रां-

न्साचा राजा सहावा फिलिप मरून त्याचे गादीवर त्याचा मुलगा जान हा बसला होता. एडवर्डानें आपलें सैन्याचे दोन भाग करून एकावर आपण मुख्य झाला व काले शहर एक वर्ष वेढा देऊन घेतलें. दुसरा भाग आपला मुलगा याचे स्वाधीन करून त्यास गास्कनीचे किनाऱ्यावर पाठविलें. इंग्लंडच्या उत्तरेस स्काटांनीं दंगा केल्यामुळें एडवर्डास स्वदेशीं जाणें भाग पडून फ्रान्सांतील आपले सर्व सैन्याचा अधिकार आपले कृष्णकवच पुत्रास द्यावा लागला. कृष्णकवच राजपुत्र १२००० सैन्यासह दक्षिणेकडून येत असतां त्यानें वाटेंत पाइटिअर्स एथें ६०,००० सैन्यानिशीं फ्रान्साचा राजा जान यास सन १३५६ त गाठिलें. कृष्णकवच राजपुत्र एडवर्ड यास तें मोठें सैन्य पाहून भीति पडली. फ्रेंचांकडील पेरिगार्डचा धर्माधिकारी रक्तपात विनाकारण होऊं नये म्हणून मध्यस्ती करण्याकरितां तेथें आला होता, व एडवर्डही कोणत्याहि रीतीनें अपमान न होतां लढाई बंद होईल तर कबूल होता. परंतु जान राजाचे मनांत एडवर्डानें १०० शिपायांसह हस्तगत व्हावें असें असल्यामुळें एडवर्डानें निरोप पाठाविला कीं, माझे हातांत तरवार आहे तोंपर्यंत मी होऊन कोणाचा बंदिवान होणार नाहीं. तेव्हां दोहींकडे लढाईची तयारी होऊन मोठें तुंबळ युद्ध झालें, जान राजा, त्याचा मुलगा व त्याचे सरदार निकरानें लढले. परंतु त्यांचा इ. स. १३५६ त पराजय होऊन त्यांस एडवर्डाचे स्वाधीन व्हावें लागलें. जान व त्याचा पुत्र हे दोघे प्रथम सेव्हाय एथें व शेवटीं विंजर एथें कैदेंत ठेविले होते. जान राजास १५,००,००० पौंड खंडणी दिल्यास मुक्त करूं असें कबुलायतीनें फ्रांसास पाठविलें होतें. परंतु तें न जमल्यामुळें त्यास इंग्लंडास परत येऊन जन्मपर्यंत (इ. स. १३६४ पर्यंत) कैदेंत रहावें लागलें. एडवर्ड राजानें त्यास उत्तम रीतीनें वागविलें असा मोठा लौकिक आहे.

कृष्णकवच राजपुत्रास स्पेनचा राजा पेड्रो यानें आपला भाऊ हेन्री यानें केलेलें बंड मोडण्याकरितां बोलाविल्यावरून तो ३०,००० लोकांसह तेथें जाऊन तेथील राजासत्याचे गादीवर पुन्हा बसविलें. एड्वर्ड राजपुत्र परततांच त्या बंडखोरानें पेड्रो यास पुन्हा पदच्युत करून जिवें मारिलें. इ. स. १३६७ त राजपुत्र कृष्णकवच क्यास्ट्राईल (स्पेन) एथील वारसांचे तंट्यांत मध्यस्थी करून परत येत असतां अजारी पडला, व इ. स. १३७६ त मरण पावला. त्या दुःखानें त्याचा बाप तिसरा एड्वर्ड हाही लवकरच म्हणजे इ. स. १३७७ त मरण पावला. तिसरे एड्वर्डाचे कारकीर्दीत राजपुरुषांस ड्यूक ही पदवी आणि नाइट लोकांची एक नवीन प्रत (ऑर्डर ऑफ दि गार्टर) ही सुरू झाली. त्यानें दरबारांतून फ्रेंच भाषा काढून टाकिली, व वेस्टमिन्स्टर या नांवाचा वाडा बांधिला. उइक्लिफ हा निर्गुण धर्मप्रतिपादक व काथलिक धर्मद्वेष्टा, आणि चासर हा कवि त्याचेच कारकीर्दीत प्रसिद्धीस आले. क्रेसीच्या लढाईत बंदुकीच्या दारूचा प्रथम उपयोग झाला. रस्ते नीट करण्याबद्दल जकात याचेच कारकीर्दीत बसली. तिसरा एड्वर्ड मेला ते वेळेस त्यास ४ मुलगे, एक नातू व तीन मुली होत्या. लायोनेल (क्लुयारेन्सचा ड्यूक), जान ऑफ गांट (लयांकयास्टरचा ड्यूक), एड्मन्ड लयांग्रिल (यार्कचा ड्यूक), व टामस (ग्लुस्टरचा ड्यूक) हे चार मुलगे होते. क्लयारेन्सचे ड्यूकाची मुलगी मार्चाचा अर्ल, एड्मन्ड मार्टिमर, यास दिली होती. एडवर्डाचे मागून त्याचा वडील मुलगा एडवर्ड (कृष्णकवच) हा मयत असल्यामुळें त्याचा मुलगा दुसरा रिचर्ड हा गादीवर बसला.

दुसरा रिचर्ड.

(इ. स. १३७७–१३९९).

रिचर्ड हा सन १३६६ मध्यें बोर्डो एथे जन्मला होता, म्हणून त्यास बोर्डो हें पद मिळालें होतें. तो गादीवर इ. स. १३७७ त बसला. ते वेळेस तो ११ वर्षांचा इतका अल्पवयी असल्यामुळें त्याचें राज्य चालविण्यास त्याचे तीन चुलते नेमिले होते, व त्यांत लांकयास्टरचा ड्यूक जान हा प्रमुख होता. रिचर्डची पहिली बायको बोहेमिया एथील ॲन, व दुसरी फ्रांस एथील इजाबेला ही होती. त्या दोघींनाहि मूल झालें नाहीं. राजाचे अज्ञानपणांत फ्रान्सावरोबर ज्या रिकाम्या लढाया चालल्या होत्या त्यांच्या खर्चाकरितां पार्लमेंटानें १५ वर्षांच्या वरील पुरुषांवर दर माणशीं १२ पेन्सप्रमाणें सन १३७० त नवीन कर बसविला. तो कर गरीब व मातबर लोकांवरसारखा असल्यामुळें तो गरिबांस देण्यास फार जड गेलें. शिवाय, कराचा मक्ता घेणारे लोक महादुष्ट असल्यामुळें त्यांस फारच पीडा झाली. ते मक्तेवाले लोक वाट टाइलर या घिसाड्याकडे कर मागावयास गेले तेव्हां त्यानें आपल्याबद्दल कर देऊन त्यांस सांगितलें कीं मला मुलगा नाहीं. १५ वर्षांची एक मुलगी आहे. त्यावर त्या दुष्टांनीं ती मुलगीच कशाकरून अशी शंका घेऊन तिची फारच विटंबना केली. तें त्या घिसाड्यांस न सोसून त्यानें आपले हातांतील घण त्यांतील पुढाऱ्याचे डोक्यांत घालून त्यास तेथेंच ठार केलें. नंतर त्यानें आपले जातभाई, कामगार व मजूर लोक यांस गोळा करून व त्यांस कर न देण्याविषयीं उपदेश करून बंड केलें. त्यास इतर गांवकरीही मिळाले. पुढें त्यानें झालेल्या सर्व दुःखाच्या गोष्टींबद्दल व जुलुमाबद्दल एक अर्ज लिहून राजाकडे पाठविला. त्याचें उत्तर येईना तेव्हां त्यानें निवडक तिरंदाज-वाले,

तरवारवाले, बेलदार, घिसाडी व पाथरवट वगैरे ६०,००० कडवे व अशिक्षित अशा आपल्या साथ्यांसह तो लंडन एथें आपल्या अर्जाची दाद लावण्याकरितां स्मिथफील्ड एथें येऊन उतरला. त्यांचा हेतु उत्तम होता, परंतु त्या काळीं सध्यांप्रमाणें बंदोबस्त नसल्यामुळें वाटेनें येतांना त्यांनीं लोकांस लुटून, घरांस आग लावून व दारूच्या अमलांत स्त्रियांची विटंबना करून व हवें तसें बहकून लोकांस इतका त्रास दिला कीं, त्यावर सर्व लोक दांत ओंठ खात होते. तो घोळका स्मिथ-फील्ड एथें पोंचल्यावर त्यास राजा, लार्ड मेयर (मुख्य फौजदार) वालवर्थ, कांहीं सरदार व शिपाई यांसह येऊन भेटला. वाट टायलर राजाशीं बोलत असतां आपले हातां-तील कांठी अशी कांहीं हालवीत होता कीं, न जाणो तो राजास मारील, असें मुख्य फौजदार यास वाटून त्यानें वाट टायलर यास तरवारीचा वार केला. त्यासरसा तो खालीं पडून तत्काळ मरण पावला. तो राजापाशीं बोलण्यास एकटाच आला होता. त्याची सर्व मंडळी अमळ दूर उभी होती. तिनें आपला पुढारी मेला असें पाहून त्या मारणाराचा सूड उगविण्याकरितां एकदम मोठी गर्जना केली, आणि राजावर चाल केली. ती मंडळी आलीशी पाहून राजानें पुढें जाऊन त्यांस मोठ्याने परंतु शांत-पणानें ओरडून असें सांगितलें कीं रागावूं नका, व भिऊं नका, मी तुमचा पुढारी आहें. तुमचा अर्जे मजकडे आला आहे, तुम्हांवर जुलूम फार झाला यांत अगदीं शंका नाहीं. आतां मजबरोबर चला म्हणजे तुमचें इष्टकार्य होईल. असें बोलून राजा परततांच ती सर्व मंडळी त्याचे मागें निमूटपणें गेली. राजानें पार्लमेंटाकडून त्यांच्या इच्छेप्रमाणें ठराव करून घ्या वेळेस त्यांस वाटेस लाविलें (सन ११८१). तो ठराव पार्लमें-टानें फार दिवस पाळिला नाहीं.

रिचर्ड जसजसा मोठा होत गेला तसतशी त्याची बुद्धि व गुण हे वाढत गेले नाहींत. तो उत्तरोत्तर मूर्ख, भेकड, व्यसनी, व निष्काळजी दिसूं लागला. तें नोबळ (सरदार) लोकांच्या पसंतीस न पडून, त्यांनीं त्याजपासून सर्व राज्यकारभार आपले ताब्यांत घेतला. त्या स्थितींत एक दोन वर्षें काढिल्यावर राजानें कांहीं सांथी जमवून आपला चुलता ब संरक्षक **ग्लुस्टर**चा ड्यूक यास बिल्या घालून **क्याले** एथें पाठविलें. त्याचप्रमाणें दुसऱ्याहि कित्येक नामांकित लोकांची स्थिति करूव त्यांची इनामें व जमीनजुमला जुलमानें घेऊन तीं त्यानें आपल्या मित्र मंडळीस देऊन टाकिलीं. पुढें त्याचा चुलता **गांटचा जान** स. १३९९ त मेल्यावर त्याचीही जिंदगी राजानें आपलेकडे घेतली. तें **गान्ट**च्या **जाना**चा मुलगा, व **हियरफर्ड**चा ड्यूक, **हेनरी**, यास न आवडून व **रिचर्ड** राजा आपल्याशी कपटानें वागूं लागला, हें न साहून त्यानें बऱ्याच लोकांच्या साह्यानें, **रिचर्ड** राजा **आयर्लंड** एथें गेल्याची संधि साधून, इ. स. ११९९ त **यार्क**शायरमध्यें **राव्हेन्स्प** एथें पुष्कळ सैन्य जमविलें, आणि लंडन शहरावर स्वारी केली. **रिचर्डा**नें आपल्यामागें आपला चुलता **यार्क**चा ड्यूक याजकडे राज्याचें काम सोंपविलें होतें. परंतु **रिचर्डा**विषयीं कोणा एकासही प्रेम नसल्यामुळें **हेन्री**चाच जय झाला. पुढें राजाचा व त्याचा एक दोन ठिकाणीं सामना झाला, परंतु त्यांतही राजास यश न येतां त्यास तोंड चुकवून पळून जावें लागलें. **हेन्री**नें त्यास **वेल्स**प्रांतांत **कान्वे** एथें गांठून कैद केलें. तेव्हां पार्लमेंटानें त्याजपासून राज्य घेण्याविषयीं कायदा करून त्यास पदच्युत केलें, आणि त्याचे जागीं चवथा हेन्री या नांवानें **हेन्री हियरफर्ड** यास स. ११९९ त राजा केलें.

या हेन्रीचा बाप लांकयास्टरचा ड्युक होता म्हणून त्याचे घराण्यास लांकयास्टरचें घराणें असें म्हणतात. रिचर्ड्ड राजा कैदेत असतां तो मारेकऱ्यांच्या हातून सन १४०० मध्यें मरण पावला.

रिचर्ड्ड बलाढ्य होता, परंतु त्याचे अंगीं राज्य चालवण्याची हिकमत नव्हती. त्याचे कारकीर्दीत आर्टबुर्न ही चेव्हीचेजच्या पवाड्यांतील प्रसिद्ध लढाई स. १३८८ मध्यें झाली. तींत डुग्लास मरण पावला, आणि धाकटा परशीहाटस्पर यास कैद मिळून स्काटांचा जय झाला. सुधारक उइक्लिफ हा याचेच कारकीर्दीत होता. धर्माधिकाऱ्यांच्या श्रीमंतीनें व बौलानें त्याचें पित्त खवळलें. उइक्लिफच्या अनुयायी लोकांस लोलार्ड्ड म्हणतात. त्याने लाटिन बायबलाचें इंग्रजींत भाषांतर केलें. तो १३८४ त मरण पावला. इंग्लंडांतील आदिकवि जो चासर तो याचेच कारकीर्दीत प्रसिद्धीस आला. सन १३९३ त प्रिमिनियरचा कायदा होऊन पोपाकडून राजाविरुद्ध जो हुकूम मिळवील त्यास न्याय बहिष्कृत करण्याची शिक्षा मिळे व त्याची जिंदगी सरकारखालसा होत असे.

फ्रान्टाजिनेंट किंवा अन्जुवियन वंश विस्तार.

दुसरा हेन्री ११५४—८९.

- हेन्री, मृ. ११८३
- पहिला रिचर्ड, स. ११८९–९९
- जाफ्री
  - अर्थर
- जान, स. ११९९–१२१६
  - तिसरा हेन्री, स. १२१६—७२.
    - पहिला एड्वर्ड, स. १२७२—१३०७
      - दुसरा एड्वर्ड, स. १३०७—१३२७
        - तिसरा एड्वर्ड, स. १३२७—१३७७
          - एड्वर्ड (कृष्ण रुवच)
            - दुसरा रिचर्ड, १३७७—१३९९
    - एड्मन्ड, लांकेस्टरचा अर्ल
      - टामस
        - गान्टचा जॉन (लांकास्टरचा अर्ल) — (पुढें यार्क घराणें पहा) यांचें लग्न …
          - चवथा हेन्री, स. १३९९—१४११
      - हेन्री
        - हेन्री
          - …मुलगी (ब्लाची) (इच्याशी झालें.)
  - रिचर्ड

अन्जू कारकीर्दीतील मुख्य गोष्टी.

११५४ दुसरा हेन्री राजा झाला.
११५७ दुसरे हेन्रीस उर्स्टर एथे पुनः राज्याभिषेक झाला.
११६० फ्रान्सचे राजावरोवर तह.
११६४ क्लारेंडन एथील कायदे झाले.
११६५ वेल्सदेश जिंकून घेतला.
११७० टामस् आ बेकेटचा मृत्यु.
११६६ आयर्लंड जिंकून घेतलें.
११७२ आयर्लंड दुसऱ्यानें जिंकिलें.
११७४ आल्नवइक एथें स्काटलंडचा राजा उइलियम (सिंह) यास जिंकून कैद केलें.
११८७ पहिला सालाडिन यानें जरुशिलेम जिंकून घेतलें.
११८९ दुसरे हेन्रीचा मुत्यु व पहिला रिचर्ड राजा झाला.
११९० रिचर्ड फ्रान्सचे राजासह धर्मयुद्धास निघाला.
११९१ रिचर्डचें लग्न न्याव्हेरच्या राजकन्येशीं झालें.
११९२ तुर्कस्थ नचें राजावरोवर तह.
,, लिओपोलड (अस्ट्रियाचा राजा) यानें रिचर्डास कैद केलें.
११९३ रिचर्डास सोडविलें.
११९४ रिचर्डास पुनः राज्याभिषेक झाला.
१२९९ रिचर्डाचा मृत्यु व जान राजा झाला.
१२१५ मान्नाचार्टावर जानाची सही घेतली.
१२१६ जानचा मृत्यु व तिसरा हेन्री राजा झाला.
१२१७ लिंकन एथील लढाई व फ्रान्सचे राजाचा पराजय व त्याशीं तह.
१२३९ हेन्रीचें प्राव्हेन्सच्या राजकन्येशीं लग्न.
१२५८ प्रोव्हिजन्स आफ आक्सफर्ड (आक्सफर्डचे कानू).

१२६४ हेन्रीस लेस्टर यानें कैद केलें.
१२६५ राजा व राजपुत्र बंदमुक्त होतात.
१२६५ ईव्हशाम एथील लढाई, मॉटफर्डाचा पराजय, व राजास पुनः गादीवर बसाविलें.
१२६९ दुसरा रिचर्ड बायकोसह धर्मयुद्धास गेला.
१२७२ हेन्रीचा मृत्यु व पहिला एड्वर्ड राजा झाला.
१२९६ डंबार एथील लढाई स्काच लोकांचा पराजय.
१२९७ उइलियम वालेस यानें इंग्लिशाचा स्टर्लिंग एथें पराजय केला.
१२९८ उइलियम वालेस फांशीं दिला.
१३०७ पहिले एड्वर्डाचा मृत्यु व दुसरा एड्वर्ड राजा झाला.
१३१२ पिअर्स ग्याव्हेस्टन याचा शिरच्छेद.
१३१४ बानाक्बर्न एथील लढाई. इंग्लिशांचा स्काचांकडून पराजय.
१३२१ स्पेन्सर यास राज्यांतून घालविलें. व पुनः बोलाविलें,
१३२२ लांकेस्टरच्या ड्यूकाचा पराजय.
१३२५ फ्रान्साचा राजा चवथा फिलिप मेला.
१३२७ दुसरें एड्वर्डाचा मृत्यु व तिसरा एड्वर्ड राजा झाला.
१३२८ नार्थ्याम्प्टन एथील तह.
१३३० मार्टिमर यास फांशींची शिक्षा.
१३३३ हालिडन हिल एथील लढाई. स्काचांचा पराजय.
१३४३ स्लुइस एथें इंग्रजांचा जय.
१३४६ क्रेसी एथील लढाई व इंग्रजांस जय.
१३४९ इंग्लंडांत महामारी उटली.
१३५६ पाइटियर्स एथील लढाई व इंग्रजांचा जय.
१३६४ फ्रान्साचा राजा जान याचा विंजर एथें मृत्यु.

१३६७ स्पेन एथील वारसांचा तंटा.
१३७७ तिसरे एड्वर्डाचा मृत्यु व दुसरा रिचर्ड राजा झाला.
१३८२ वाट टाइलरचा दंगा व त्याचा मृत्यु.
१३९९ दुसरे रिचर्डास पदच्युत केलें व चवथे हेन्रीस गादीवर बसविलें.

चवथा भाग.

लयांकयास्टरघराणें व यार्कघराणें.

(इ. स. १३९९–इ. स. १४८५).

लयांकयास्टर घराणें.

(इ. स. १३९९—इ. स. १४६१).

चवथा हेन्री (बोलिंगब्रोक) इ. स. १३९९.
पांचवा हेन्री (मन्मौथ) इ. स. १४१३.
साहवा हेन्री (उइंसर) इ. स. १४२२.

यार्क घराणें.

(इ. स. १४६१–१४८५).

चवथा एड्वर्ड इ. स. १४६१.
पांचवा एड्वर्ड इ. स. १४८३.
तिसरा रिचर्ड इ. स. १४८३—८५.

चवथा हेन्री (बोलिंगब्रोक).

(इ. स. ११९९—१४१३).

चवथा हेन्री लिंकन प्रांतात बोलिंगब्रोक एथें इ. स. १३६६ जन्मला होता, व तो तिसऱ्या एडवर्डाचा मुलगा जान, याचा मुलगा होता, त्याची पहिली बायको बोहमची मेरी आणि दुसरी नाव्हेरच्या राजाची मुलगी, जेन, ही होती. तो गादीवर बसल्यानें कामन लोकांस फार आनंद झाला, कारण तो त्यांचा पक्ष हमेशा घरीत असे. नोबल लोकांनीं त्याजविरुद्ध एक कट

केला होता. परंतु तो रट्लंडच्या अर्लास कळून तो त्यानें लवकरच मोडला. हेन्रीने इ. स. १४०१ त पाखंडी लोकांविषयीं एक कायदा मंजूर केला. इ. स. १४०२ मध्यें डुग्लाब्चा अर्ल यानें इंग्लंडावर उत्तरेकडे स्वारी करून तेथील खेडीपाडीं लुटून व जाळून मोठा उपद्रव चालविला होता, परंतु नार्थंबर्लंडचा अर्ल पर्सी, व त्याचा मुलगा हारी हाट्स्फर, यांनीं त्यांना नेस्बिट्मूर व हामिल्डन एथे गांठून त्यांचा पराजय केला, व त्याचा मुख्य सरदार जेम्स डुग्लास व कांहीं स्काट नोबल (सरदार) यांस धरून कैद केलें. त्याच वर्षी वेल्सप्रांतांत रिचर्ड राजाचा स्नेही ओएन ग्लेंडावर यानें बंड करून लार्ड ग्रे आणि एड्मंड मार्टिमर (मार्चांच्या अर्लाचा चुलता) यांस धरून कैद केलें. नार्थंबर्लंडचा अर्ल, पर्सी, हा डुग्लास व स्काचनोबल यांजबद्दल खंडणी देऊन त्यांस सोडविणार होता, परंतु राजाचें मत तसें नसल्यामुळें पर्सी यास राग येऊन त्यानें त्याचा भाऊ उर्स्टरचा अर्ल आणि मुलगा हारी हाट्स्फर यांच्या सल्यानें डुग्लास आणि ग्लेंडावर यांजबरोबर कट करून मोठे बंड केलें. हाट्स्पर १२,००० सैन्यानिशीं ओएन ग्लेंडावर यास मिळण्यास जात असतां श्रूज्बेरी जवळ राजाचें सैन्य व राजपुत्र (मन्मौथ) यांची गाठ पडून मोठी लढाई झाली. तीत दोघा हारींनीं मोठें शौर्य दाखविलें. अखेरीस इ. स. १४०३ मध्यें हाट्स्फर हा मारला जाऊन उर्स्टर आणि डुग्लास हे कैद झाले. पुढें उर्स्टराचा शिरच्छेद होऊन नार्थंबर्लंडच्या अर्लास क्षमा मिळाली. त्यांचे दुसरे साथी, थामस मौब्रे व रिचर्ड स्क्रोप, यांस इ. स. १४०५ त येस्ट मोर्लंडच्या अर्लानें धरून फांशीं दिलें. नार्थंबर्लंडचा अर्ल पर्सी हा यार्क प्रांतामध्यें दुसरे एके प्रसंगीं ब्राहाम एथें लढत असतां मरला गेला (१४०७).

अल्बनीच्या ड्यूकानें स्काट्लंडचें राज्य मिळविण्याकरितां तेथील राजा तिसरा रावर्ट याच्या वडील मुलास धरून मारिलें, तेव्हां रावर्टानें आपला दुसरा मुलगा जेम्स हा वांचावा म्हणून त्यास फ्रान्स एथें पाठवून दिलें. परंतु इंग्लिशा लोकांनीं ही संधि साधून त्यांनीं त्यास इ. स. १४०५ त वाटेंत गांठून कैद केलें. तो पुढें इ. स. १४२४ त साहव्या हेन्रीच्या कारकीर्दींत मुक्त झाला.

हेन्रीच्या अखेरच्या दिवसांत त्याचा मुलगा हारी म्याडक्याप (अविचारी हारी) यानें त्यास फार त्रास दिला होता. तो जाला मोठा शूर व उदार होता, परंतु त्यास हलक्या लोकांची संगति असल्यामुळें त्याच्या हातून फार अनन्वित कृत्यें घडलीं. एकादिवशीं त्याच्या मित्रांनीं भर रस्त्यावर दरवडा घातल्यामुळें त्यांस पकडून न्यायाधिशापुढें नेलें. अविचारी हारीच्या मनांत त्यांस सोडवावें असें येऊन, तो त्या न्यायाधिशाकडे गेला, व त्यांस सोडाविण्याविषयीं सांगितलें. तीं त्याची विनंती अमान्य केल्यामुळें त्यानें न्यायाधिशाच्या एक थोबाडींत दिली. त्यावरोबर तो कैद होऊन त्यास तुरुंगांत पाठविलें. ही गोष्ट राजास कळतांच त्यास मोठा आनंद झाला, आणि म्हणाला कीं, माझ्या पदरीं कायद्याप्रमाणें कामें करणारा न्यायाधिश आहे, म्हणून मी मोठा नशिबवान आहें; आणि माझा मुलगा कायदा मान्य करणारा आहे, म्हणून मी मोठा सुखी आहें. त्यानें इंग्लंडचें राज्य ज्या न्यायानें मिळविलें त्याच न्यायानें त्यानें त्याचा उपभोग घेतला. त्यानें ज्याप्रकारें पूर्व राजाचा प्राण घेतला त्याच नमुन्यानें त्यास अपस्माराचा झटका येऊन मोठ्या कष्टांत त्यास मरण आलें (इ. स. १५१३). त्याचे मागून त्याचा वडील मुलगा पांचवा हेन्री अशा नांवानें गादीवर बसला.

चौथा हेन्री फार शूर व धैर्यवान् होता. हेन्री याचे

कारकीर्दीत असा एक नियम झाला होता कीं, जो कोणी बायबल (धर्म पुस्तक) वाचील किंवा पोपाचा अधिकार मानणार नाहीं, त्यास बांधून जाळावें. धर्माकरितां प्राण देणारा **उइक्लियम साट्र** हा याचे कारकीर्दीत झाला होता. त्याचेच कारकीर्दीत कामन लोकांच्या मताशिवाय राजास कर्ज मिळूं नये, व त्यांस खर्चाचा अधिकार आहे असें ठरलें होतें. **रोमन कथालिक** धर्मांतील चुकया उघडरीतीनें प्रसिद्ध करणारा **उइक्लिफ** व त्याचा स्नेही **सरजान** यांचे मतांचा प्रसार इंग्लंडांत बराच होत चालला होता. **हेन्**रीसुद्धां गादीवर बसण्यापूर्वी त्याच मताचा होता. परंतु पुढें त्याचें मत पालटून त्यानें त्यांचे अनुयायी **लोलर्ड** यांचा पाठलाग चालविला, त्यानें त्या पंथाच्या लोकांस **स्मिथफील्ड** एथें जिवंत जाळिलें. हा त्याचे नांवास मोठा डाग लागला आहे. त्यास **हेन्**री (**मन्मथ**), **थामस** (**क्लारेन्स**चा ड्यूक), **जान** (**बेडफर्ड**चा ड्यूक), **हंपफ्रे ग्लुस्टर**चा ड्युक) आणि दोन मुली अशी सहा मुलें पहिले बायकोपासून होती. दुसरीला मूल नव्हतें.

पांचवा हेन्री (मन्मथ).

(इ. स. १४१३—इ. स. १४२२).

पांचवे **हेन्री**चें जन्म इ. स. १३८८ त **मन्मथ** एथें झालें. तो चवथ्या **हेन्री**चा वडील मुलगा होता. त्यानें गादीवर बसल्यावर आपल्या पूर्व स्नेह्यांस बक्षिसांसहित सांगून पाठविलें कीं, मी आपली वृत्ति अगदीं बदलणार, तुम्ही आपला स्वभाव सुधारल्यास तुमचा स्नेह राहील, नाहीं तर नाहीं. नंतर ज्या **उइलियम ग्यास्काइन** न्यायाधिशानें त्यास कैदेंत टाकिलें होतें, त्यास सांगून पाठविलें कीं, तुम्ही मला

लवकर जागें केले, हें मजवर मोठे उपकार झाले, आतां तुह्मांस मुख्य न्यायाधीश केलें आहे, तर मला न्याय देण्यांत मदत करा. तसेंच त्यानें विद्वान व शहाणे अशा दुसऱ्या कित्येक लोकांस बोलावून आणून आपल्या पदरीं ठेविलें होतें.

इ. स. १४१४ पर्यंत लोलर्ड लोकांचा पाठलाग होऊन त्यांतील प्रमुख जो **सरजान ओल्ड कयासल**, लार्ड काबूहाम यास फांशीं दिलें. फ्रान्साचा राजा **चार्लस**, हा मतिभ्रष्ट झाल्यामुळें राज्य चालविण्याच्या संबंधानें त्याचा व त्याचा भाऊ ऑर्लियन्सचा डयूक यांमध्यें तंटा लागला. अखेरीस लढाई जुंपून बरंबडीच्या डयूकानें ऑर्लियन्सच्या डयूकास **पयारिस** शहराच्या भर रस्त्यांत मारून गुप्तपणें **हेनूरी**चें साह्य मागितलें. फ्रेंचांनींही त्या विकट प्रसंगीं **हेन्रीस** उघडपणें साह्यास बोलाविलें होतें. **हेन्री**नें ही संधि उत्तम आहे असें जाणून निरोप पाठविला कीं, फ्रेंच राजकन्या **कयाथराइन** ही जर मला द्याल व आमचे फ्रान्स देशांतील पूर्वीचे प्रांत आह्मांस परस मिळतील तर आमची मदत तयार आहे. फ्रेंचांस तें कबूल झालें नाहीं, परंतु **बरगंडी**च्या डयूकानें गुप्तपणें तह करून त्यास फ्रान्सास बोलाविलें. **हेन्री**नें मोठ्या सैन्यानिशीं फ्रान्सांत उतरून इ. स. १४३५ त **हारफ्लयुअर** शहर घेतलें, परंतु सैन्यामध्यें कांहीं रोग उत्पन्न होऊन **हेन्री** फार खराबसि आला. **हेन्री** इंग्लंडास परत जाण्याकरितां **कयाले** बंदराकडे निघाला तों फ्रेंचांनीं त्यास वाटेंत **एजिन्कोर्ट** एथें इ. स. १४१५ त मोठ्या सैन्यानिशीं गांठून त्यास लुढाई दिली. लढाई मोठ्या निकराची झाली. तींत मोठमोठे फ्रेंच सरदार व शिपाई फार मेले व **ऑर्लिएन्स** व **बुर्बान** हे सेनाधिपति कैद झाले. **अलेनचा** डयूक हा **हेन्री**स मारीन किंवा मरेन अशी

प्रतिज्ञा करून तेथें फ्रेंचांकडे लढण्यास आला होता, व तशा आवेशानें त्यानें हेन्रीवर एक वारही केला. परंतु त्यापासून हेन्रीस विशेष इजा न होतां तो डयूकच हेन्रीचे हातून मरण पावला. हेन्री राजा इंग्लंडास परत आल्यावर फ्रान्स देशांत दोन वर्षें तशींच भांडणें चाललीं होतीं. एजिन्कोर्टच्या लढाईंत ब्रूजबेरीचा अर्ल टालबाट या इंग्लिश सरदारानें मोठा पराक्रम गाजविला, ह्मणून त्यास इंग्लिश एकिलीज (इंग्रजांतील भीम) हें नांव मिळालें होतें. या लढाईवर व या राजावर शेक्सपिअर या कवीनें एक मोठें रसभरीत नाटक रचिलें आहे.

पुढें बरगंडीच्या डयूकानें हेन्रीचा पक्ष उघडपणें स्वीकारून रुन शहर इ० स० १४१८ त हल्ला करून घेतलें. तेव्हां फ्रेंच राजपुत्राचे मनांत त्या डयूकाशीं गुप्तपणें तह करावा असें आलें होतें, परंतु तो मसलतीच्या ठिकाणींच बर्गंडीच्या डयूकाकडून कपटानें मारला गेल्यामुळें, तें सर्व व्यर्थ गेलें. आपले वापास मारल्याबद्दल बरगंडीच्या डयूकाचा सूड उगवावयाकरितां फ्रेंच राजपुत्र फिलिप दि गुड (चांगुल) यानें हेन्रीशीं इच्छेप्रमाणें तह केला. तो तह ट्रायेज एथें इ० स० १४२० त पक्का झाल्यावर हेन्रीस फ्रान्स एथील राजाचा तूर्त प्रतिनिधि करावें, राजाच्या पश्चात् त्यास चार्लस असें नांव ठेवून राज्य द्यावें व राजकन्येशीं त्याचें लग्न करावें असें ठरलें. लग्न झाल्यावर त्या तहास हवी तसी बळकटी आली.

हेन्री राजा, आपला भाऊ, क्लारेन्सचा डयूक, यास फ्रान्सांत ठेवून इंग्लंडास परत आल्यावर इ. स. १४२१ त त्याचे राणीस अभिषेक झाला. आपला भाऊ, क्लारेन्सचा डयूक, याचे सैन्याचा फ्रेंचांनीं पराजय केला असें कळतांच हेन्रीनें फ्रान्सावर स्वारी केली आणि फ्रेंच राजपुत्रास जिंकून

त्यास लायर नदीच्या पलीकडे हांकून दिलें, व ओर्लियन्स शहरास वेढा दिला, परंतु अन्न सामग्रीची तूट आल्यामुळें तो वेढा उठवून त्यास पॅरिस एथें परत यावें लागलें. पुढें इ. स. १४२२ त त्यानें ती लढाई पुन्हा सुरू केली होती. परंतु तो एका-एकीं अजारी पडून तारीख ३१ आगष्ट रोजीं मरण पावल्यामुळें त्याचे सर्व मनोरथ व्यर्थ गेले. त्याला कॅथरीनपासून झालेला एक लहान मुलगा त्याचा वारस होता.

पांचवा हेन्री मोठा धूर्त, लढाऊ, मसलती पुरुष होता, परंतु त्याचे वाटेस जाणाऱ्यास तो फार निर्दयपणानें वागवीत असे. हेन्रीची विधवा कॅथरीन हिनें ओएन ट्यूडर नामें एका वेल्स गृहस्थावरोबर पुढें लग्न केलें व त्याच्यापासून तिला जो एडमंड झणून पुत्र झाला तो ट्यूडर घराण्याचा मूळपुरुष झाला.

हेन्रीचे कारकीर्दीत कामन लोकांच्या पसंतीस पडल्या-शिवाय कोणताही कायदा होऊं नये असा एक कायदा झाला व दुसरा कायदा, लंडन शहरांतील प्रत्येक घरवाल्यानें हिंवाळ्यांत आपल्या दारा पुढें कंदील लाविला पाहिजे असा झाल.

पांचवा हेन्री अगदीं मरणोन्मुख झाला तेव्हां इंग्लंड आणि फ्रान्स एथील राज्यें उत्तम चालावीं झणून त्यानें आपल्या मोठ्या विश्वासूक आणि कार्यधुरंधर अशा तिघां सरदारांस बोलावून आणून सांगितलें कीं, राजपुत्र सज्ञान होईपर्यंत बेडफर्ड यानें फ्रान्सांतील प्रतिनिधीचे काम करावें, ग्लास्टर यानें इंग्लंड एथील प्रतिनिधीचें काम पहावें, आणि लार्डवारिक यानें आपले अल्पवयी पुत्राचा शिक्षक व पालक व्हावें. फ्रान्स एथील राजपद मिळण्याकरितां बरगंडीच्या ड्यूकाशीं चांगल्या रीतीनें वागावें. तें पद कदाचित् नच मिळाल्यास नार्मंडी प्रांत तरी आपलेकडे

राहण्याविषयीं पुरी खटपट करावी. हेन्रीचे मागून त्याचा अल्पवयी मुलगा, साहवा हेन्री या नांवानें गादीवर बसला.

साहवा हेन्री (उइन्झर)
(इ. स. १४२२–१४६१)

साहवा हेन्री, उइंझर एथें सन १४२१ त जन्मला होता. तो गादीवर बसला तेव्हां अगदींच अल्पवयी झणजे नऊ महिन्याचा असल्यामुळें त्याचे राज्य चालविण्यास त्याचा चुलता ग्लुस्टरचा ड्यूक यास नेमिलें होतें. हेन्री राज्यारूढ झाल्यावर फ्रान्साचा राजा साहवा चार्लस हा सुमारें एक महिन्यानें मरण पावला. व त्याचे जागेवर सहाव्या हेन्रीस मागील ट्राइज एथील करारा-प्रमाणें प्यारिस एथें राज्याभिषेक झाला. खुद्द राजाचे संरक्षणार्थ वारिकचा अर्ल व उइंचेस्टरचा धर्माधिकारी हेन्री बोफर्ट यांस नेमिलें होतें. इंग्लंड व फ्रान्स एथील प्रतिनिधींचा स्वभाव परस्पराशी विपरीत असल्यामुळें इंग्लंड व फ्रान्स हे दोन्ही देश कलहांची आगरें बनून गेले. लायर नदीचे दक्षिणेकडील लोकांनीं फ्रेंच राजपुत्रास त्याचा बाप मेल्यावर त्यास सातवा चार्लस हें पद देऊन पाइटियर्स एथें राज्याभिषेक केला. त्यामुळें बेडफर्ड व फ्रेंच राजपुत्र यांच्या पुष्कळ झटापटी झाल्या, परंतु बेडफर्डास झणण्यासारखें यश आलें नाहीं. तथापि क्रेव्हान्ट व ठहर्न्यु एथिल ज्या लढाया इ. स. १४२३ व १४२४ त झाल्या त्यांत फ्रेंच लोकांचा पराजय होऊन त्यांचें व त्यांस मदत आलेल्या स्काच लोकांचें बरेंच नुकसान झालें. इंग्लंडात बोफर्ट व ग्लुस्टर यांचें वैनमस्य बरेंच वाढलें होतें. तें मिटविण्याकरितां बेडफर्ड यास फ्रान्स सोडून इंग्लंडास जावें लागलें. या वेळेपर्यंत ब्रिटनीचा ड्यूक इंग्लंडचे राजाचा स्नेही होता, परंतु बेडफर्ड इंग्लंडास

गेल्याची संधि पाहून त्यानें सातवे **चार्लसास** मिळून फ्रान्सांत वराच दंगा आरंभिला. **बेडफर्ड** यानें दंगा मिटविण्यारितां **सेन** व **लायर** या नद्यां मधील प्रदेशांत स्वारी करून **ओर्लियन्स** शहरास स. १४२९ त वेढा दिला. तें ठिकाण असें होतें कीं, तें स्वाधीन न झाल्यास सर्व फ्रान्स देश इंग्लिशांचा झाला असता. त्या वेळेस **लोरेन** प्रांताच्या हद्दींवर **डामरेमी** गांवांत **आर्कची जोआन** झणून एक २० वर्षांची मुलगी एका धर्मशाळेत तेथें येणाऱ्या वाटसरांच्या घोड्यांची चाकरी करण्यास नोकर झणून होती. तिनें जवान पुरुषाचा पोषाग करून घोड्यावर स्वार होऊन व हातांत भाला व कंबरेस तलवार अडकवून ती **ओर्लियन्स** एथें सातवे **चार्लसास** जाऊन भेटली. तिला घोड्यावर बसण्याची उत्तम माहिती होती. तिनें त्यास सांगितलें कीं, मला देवानें तें शहर संरक्षण करण्याकरितां पाठविलें आहे, तर चला माझ्या मागून, मीं कसें लढावें तें तुह्मांस शिकवितें. **फ्रेंचांस** तो सर्व मूर्खपणा वाटून त्यांनीं तिच्या बोलण्याकडे कांहीं वेळ लक्ष्य दिलें नाहीं. परंतु ती जेव्हां सैन्यापुढें जाऊन, ती वायको मनुष्य होऊन मोठ्या शौर्यानें लढते आहे, असें पाहिलें. तेव्हां त्यांस शरम वाटून त्यांनीं तिला योग्य मदत दिली. त्या योगानें तिनें त्या शहराचा वेढा उठवून **इंलिशांस** सन १४२९ त तेथून हांकून दिलें. तेव्हांपासून तिला **ओर्लियन्स**ची कुमारिका हें नांव पडलें. पुढें तिनें **ऱ्हीम्स** एथें फ्रेंच राजपुत्रास पुन्हा राज्यभिषेक केला. **इंग्लिशांनीं** तिला पुढें **कर्यापेन** एथें सन १४३० त धरून तिच्यावर चेटकेपणाचा आरोप ठपन एथें शाबीत केल्यावर तिला जिवंत जाळण्याची शिक्षा दिली, व तें कृत्य त्यांनीं फार क्रूरपणानें अमलांत आणिले.

'बेडफर्ड इ. स. १४३५ मेल्यावर त्याचे जाग्यावर यार्कचा

ड्यूक, रिचर्ड, याची नेमणूक झाली. परंतु सैन्याचे कमताई-मुळें त्याचा जागजागीं पराजय होऊन सन १४५१ त कयाले बंदराशिवाय इंग्लिशांनीं जिंकून घेतलेला सर्व प्रांत फ्रेंचास पुन्हा मिळाला.

साहवा **हेन्री** जसजसा यांत आला, तस तसा तो मूर्ख, सुस्त व राज्य चालविण्यास निरुपयोगी, असा दिसूं लागला, तेव्हां त्यार्चा शूर व कारस्थानी बायको, अन्जूची **मार्गरेट**, इनें राज्यकारभार आपले हातीं घेऊन स्वतंत्रतेनें वागूं लागली. ती मोठी निर्दय व क्रूर असे. तिचा चुलत सासरा ह्मंफ्रेयाचीं मात्र ती थोडी बहुत भीति बाळगी. परंतु संधि साधून तिनें त्यास **बोफर्ट** याजकडून विश्वास घातकी असा आरोप ठेवून कैद करविलें आणि अति निर्दयपणानें त्याचा प्राण घेतला. राणीचें कौर्य व अधिकार वाढत जाऊन ती लोकांत अतिशय अप्रिय झाली. **बोफर्ट** मेल्यावर **सफकचा** ड्यूक हा राणीचा मुख्य मंत्री व दोस्त झाला. तेव्हां कित्येकांनीं असा विचार केला कीं राजा तर असा निरुपयोगी, राणी फ्रेंच असून अति दुष्ट व स्वेच्छाचारी, आणि तिचा स्नेही, **सफक**, हा फ्रांसांतील राज्य बुडविणारा, तेव्हां **यार्क**चा ड्यूक **रिचर्ड** यास राज्य चालविण्यास नेमावें, हें बरें; कारण तो पोक्त, तसाच विचारी, व शहाणा होता. परंतु ही नेमणून पार्लमेंटानें न पतकरल्यामुळें फार नुकसान झालें. **सफक** हा कोणास न आवडल्यामुळें त्यास पांच वर्षें हद्दपार करण्याची शिक्षा मिळाली. तो फ्रान्सास जात असतां त्याच्या शत्रूंनीं त्यास गांठून वाटेंतच सन १४५० त त्याचा प्राण घेतला. पुढें त्याचें काम **समरसेट**चे ड्यूकास मिळालें. त्याच सुमारास **जाक केड** यानें बंड करून राजपक्षीय लोकांचा पराभव केला. परंतु तो लवकरच धरला जाऊन त्यास

शिरच्छेदाची शिक्षा मिळाली. त्याचें डोकें कांहीं दिवस लंडन-पुलावर ठांगून ठेविलें होतें. **यार्कचा** डयूक रिचर्ड व **समरसेट** यांच्यामध्यें स्पर्धा होऊन लोकांत मोठा गवगवा झाला. **यार्क**चा डयूक हा तिसरे **एड्वर्डा**चा दुसरा व पांचवा मुलगा यांजकडून राज्यावर हक्कदार होता, व **समरसेट** हा तिसरे मुलाकडून हक्कदार होता. **सालिस्बेरी** व **वारिक** यांचा **रिचर्डा**स व राजाचा व राणीचा **समरसेटा**स आश्रय होता. त्यामुळें राजपक्ष व **यार्क**पक्ष यांमध्यें मोठें तंटे सुरू झाले.

एके दिवशीं एके ठिकाणीं सर्वांस मोठी मेजवानी झाली व तीस मोठ मोठे नामांकित, वतनदार, कारस्थानी सरदार व इतर गृहस्थ आले होते. जेवण झाल्यावर ते लोक बागेंत शतपावली करीत असतां, एका वजनदार गृहस्थ नें सहज गोष्ट काढिली कीं, सध्यांचा राजा जरी वाईट व निर्बळ आहे तरी त्याला झालेला मुलगा **एडवर्ड** हा कदाचित् उत्तम निपजेल; तर कांहीं दिवस असाच राज्यकारभार चालूं द्यावा असें ज्यांचें मत असेल त्यनीं या तांबडे गुलाबाचे ताटव्यांतील एक एक फूल तोडावें, व ज्याचें मत तसें नसेल त्यांनीं त्या पांढऱ्या ताटव्यांतील फूल तोडावें. तेव्हां जमलेल्या लोकांनीं भराभर आपले इच्छेप्रमाणें फुलें तोडून आपआपले पक्ष उघड दाखविले. त्या दोन पक्षांच्या ज्या लढाया पुढें झाल्या, त्यांना या कारणावरून गुलाबाच्या लढाया ह्मणतात त्या लढाया सुमारें ३० वर्षें राहून राहून चालल्या होत्या.

यार्कचा डयूक, **रिचर्ड** राज्य चालविण्यास नेमिल्यावर राणीनें त्यास राज्यांतून हांकून लावण्य करितां सैन्य जमवून त्यास व त्याच्या पक्षाचे मंडळीस **सेन्ट आलबन्स, ब्लोअरहीथ** व **नार्थांप्टन** एथें इ. स. १४५५-५९-६० त अनुक्रमें लढाया दिल्या.

परंतु प्रत्येकीत **यार्किस्ट** (**रिचर्डा**चे पक्षाचे) लोकांचा जय होऊन त्यांनीं अखेरीस राजास कैद केलें. राणी आपल्या मुलासह निराश होऊन **स्काट्लंड**ास पळून गेली, व **क्लिफर्ड** हा जॅखमी होऊन पडला. नंतर **रिचर्डा**नें **पार्लमेंट** सभेपुढें आपला हक्क शाबीत करून घेतला, परंतु **पार्लमेंट**नें असें ठरविलें कीं **हेन्री**नें तहा हयात राज्य करावें व त्याचे मागून **रिचर्डा**नें गादीवर बसावें. तो ठराव **मार्गरेट** राणीस न आवडून तिनें आपले मुलाकरितां **यार्क**चे **ड्यूकाशीं वेकफील्ड** एथें स. १४६० लढाई केली. तींत **यार्क**चा **ड्यूक** मारला गेला. परंतु ती लढाई त्याच्या मुलानें पुढें चालवून **मार्टिमर्स क्रास** एथें स. १४६१ त **लांकास्ट्रियन** लोकांचा पराभव केला. पुढें राणीनें थोडेंच दिवसांत **यार्किस्ट** लोकांचा साथी **वारिक**चा **अर्ल** यास **सेन्ट आल्बन्स** एथें ठार मारिलें, परंतु तिचा त्यापासून फायदा न होतां **यार्क**चा **ड्यूक** यानें राज पक्षीयांचा **टौटन** एथें पराभव करून सन १४६१ त राजपद हक्कानें मिळविलें. त्यास राज्यभिषेक होऊन त्याचें नांव चवथा **एड्वर्ड** असें ठेविलें.

सहावा **हेन्री** राज्यसत्ता चालविण्यास निर्बळ, व **वाइल** बुद्धीचा होता. त्यानें सुमारें ४० वर्षें राज्य केलें. त्याला फक्त एकच **एड्वर्ड** नावाचा मुलगा होता. तोही पुढें सन १४७१ त **टयूगजबेरी** एथील लढाईत मारला गेला. **हेन्री** धार्मिक, निरुपद्रविक व कनवाळू होता. त्यानें **ईटन** एथील नामांकित शाळा व **कॅम्ब्रिज** एथील **किंग्स** कालेज (राजाची पाठशाळा) हीं स्थापिली. त्याजवर त्याचे बायकोचा अंमल फार असल्यामुळें त्याचें सर्वस्वी नुकसान झालें. राणीलाही तिच्या कर्मानुसार चार वर्षें कैद भोगावी लागली (१४७१–५). तिच्या बापानें तिची खंडणी देऊन तिला सोडाविलें होतें. परंतु ती पुढें लवकरच सन १४८१ त निराश व दुर्भाग्य स्थितींत मरण पावली.

लांक्यास्टर कारकीर्दीतील मुख्य गोष्टी.

१३९९ चवथा हेन्री राजा झाला.
१४०१ पाखंडी लोकांविषयीं कायदा केला.
१४०२ डुग्लास याचा इंग्लंडावर हल्ला, व नेस्बिटमूर व हामिल्डन एथील लढाया.
१४०३ श्रूजबेरी एथील हाट्स्फर व राजायांमधील लढाई.
१४१३ चवथे हेन्रीचें मरण व पांचवा हेन्री राजा झाला.
१४१८ सर जान ओल्ड कासल वगैरे लोलर्डांचा मृत्यु.
१४१५ फ्रान्सांतील हारफ्लुयुअर शहर इंग्रिशांनीं घेतलें व एजिंकोर्ट एथील लढाई जिंकिली.
१४१८ रुएन शहर घेतलें.
१४२० ट्रायेज एथील तह झाला.
१४२१ काथराइन राणीस राज्याभिषेक झाला.
१४२२ पांचवें हेन्रीचा मृत्यु व सहावा हेन्री राजा झाला.
१४२४ व्हर्न्यूइल एथील लढाई.
१४२९ ओर्लिएनची जोआन वेढा उठविने.
१४३० जोअन इजला कांपेन एथे जिंकून घेऊन रुएन एथें जाळिलें.
१४५० जाक केडचा दंगा व मृत्यु.
१४५१ फ्रेंचांनीं कालेशिवाय सर्व इंग्रिशप्रांत परत घेतले.
१४५५ सेन्ट आल्बन्स एथील लढाई.
१४५९ ब्लोअरहीथ एथील लढाई.
१४६० नार्थ्याप्टन एथील लढाई. व वेकफील्ड एथील लढाई.
१४६१ चवथे एड्वर्डास गादी मिळाली.

यार्क कारकीर्द.

चवथा एड्वर्ड.

(इ. स. १४६१-१४८५).

एड्वर्ड हा **रुएन** एथें सन १४४१ त जन्मला होता व त्याचें लग्न **इलिझाबेत** उडाव्हिली इच्याशीं झालें होतें. तिसऱ्या **एड्वर्डाचा** तिसरा मुलगा, **क्लारेन्स**चा ड्यूक, **लॉयोनेल**, याच्या **फिलिपा** मुलीचा चौथा **एड्वर्ड** हा पणतू होता; आणि तिसऱ्या **एडवर्डाचा** पांचवा मुलगा, **यार्क**चा ड्यूक, **एडमंड**, याचा पणतू होता. (वंशवेळ पाहवा). त्याला **वेस्ट मिन्स्टर** एथें सन १४६१ त राज्याभिषेक झाल्यावर त्यानें राजांची उलाढाल करणारा **वारिक** याच्या साहाय्यानें **मार्गरेट** राणीवर स्वारी करून तिचा **टौटन** एथें पराजय केला. तेव्हां ती, नवरा **हेनरी** आणि मुलगा यांसह **स्काट्लन्ड** एथें पळून जाऊन तेथें वेषांतरानें होती. **हेन्रीस** कधीं गुहेंत, कधीं उघड्या रानांत, कधीं झाडावर व कधीं उपाशीं दिवसांचे दिवस काढावे लागले. अशा स्थितींत **मार्गरेट** राणीनें **फान्साचा** राजा अकरावा **लुई** यास **कयालेबंदर** देण्याचे कबूल करून व त्याज पासून कांहीं सैन्य मिळवून **इंग्लंडावर** स्वारी केली. **लॉंकयास्ट्रियन** लोक तिला मिळाले, परंतु **एड्वर्डाच्या** सैन्यानें तिच्या सैन्याची इ. स. १४६४ त **हेज्लीमूर** आणि **हेगझम** एथें दाणादाण केल्यावर राणी आपल्या मुलासुद्धां रानांत निसटून पळून गेली. **हेन्री** त्यांच्या तावडींत सांपडून त्यांनीं त्यास धरून कैद केलें, आणि लंडनास नेऊन **टावर** एथें इ. स. १४६६ त ठेवून दिलें.

वारिक आणि **क्लारेन्स** यांच्या मदतीनें पुष्कळ लोकांनीं दंगे केले होते, परंतु ते राजद्रोही ठरून त्यांस **इंग्लंडां**तून

हांकून दिल्यावर त्यांस फ्रान्सांत जावें लागलें. मार्गरेट राणीही त्यांचाच आश्रय करून तिकडे गेली. स. १४७० त त्यांनीं तिच्याशीं कट करून व फ्रेंच सैन्य मिळवून लंडनावर स्वारी केली, आणि साहवे हेन्रीस मुक्त करून त्यास पुन्हा गादीवर बसाविलें. तेव्हां चौथा एडवर्ड फ्लांडर्स एथें पळून गेला. पुढें एडवर्डानें, आपला मेहुणा बर्गंडीचा ड्यूक, याचे साह्यानें यार्क एथें येऊन तेथें आपल्या भावाच्या मदतीनें लांकयास्टियन लोकांचा बार्नेट एथें इ. स. १४७१ त पराजय केला. तींत वारिक हा पडला. त्याच दिवशीं मार्गारेट राणी ही थोड्याशा फ्रेंच सैन्यानिशीं मुलासह वेमौथ एथें येऊन उतरली होती. ती पश्चिमेकडे सैन्य जमवीत आहे, असें पाहून एडवर्डानें त्वरा करून तिला टयूग्जबेरी एथें लढाई दिली. तींत लांकयास्टियन लोकांचा पाडाव होऊन मार्गरेट राणी त्यांचे हातीं सांपडली. तिला त्यांनीं कैद करून टावर एथें नवऱ्यापाशीं ठेवून दिली. पुढें थोड्याच दिवसांत तिचा मुलगा व सहावा हेन्री हे मोठ्या निर्दयपणानें मारले गेले. कोणी म्हणतात कीं एडवर्डाचा भाऊ रिचर्ड यानें तें अघोर कृत्य इ. स. १४७३ त केलें. इ. स. १४७५ त एडवर्डानें फ्रान्सावर स्वारी करून त्यापासून ठरलेली खंडणी घेतली. इ. स. १४७८ त क्लारेन्सचा ड्यूक व राजाचा भाऊ हा राजद्रोही ठरून मारला गेला. एडवर्डानें लोकांपासून जुलमानें पुष्कळ पैसे काढिले. डाकेची व छापण्याची योजना त्याच्याच कारकीर्दीत सुरू होऊन इ स. १४७४ त कॉक्स्टन यानें पहिलें छापिलेलें पुस्तक काढिलें. मार्गरेट राणी स. १४८२ त फ्रान्सांत मेली. चौथा एडवर्ड हा इ. स. १४८३ त वयाचे ४१ वे वर्षी मरण पावला. तो जरी जुलमी, विषयी, आपलपोट्या व घातकी होता तरी मनावा मोकळा असल्यामुळें लोकप्रिय होता व मोठ्या

ऊमेचीचा पुरुष होता. त्याला **एडवर्ड**, **रिचर्ड** (यार्कचा ड्यूक) आणि सातवे **हेन्री**ची बायको, **एलिझाबेथ** अशी तीन मुलें होतीं. चौथे **एडवर्डा**चे मागून त्याचा मुलगा **एडवर्ड** यास पांचवा **एडवर्ड** या नांवानें गादिवर बसविलें.

पांचवा एडवर्ड.

(इ. स. १४८३-भरीव महिने.)

पांचव्या **एडवर्डा**चें जन्म **वेस्टमिन्स्टर** एथें इ. स. १४७० त झालें होतें, व तो चौथे **एडवर्डा**चा वडील मुलगा होता. बाप मेला ते वेळेस तो फार अल्पवयी म्हणजे बारा वर्षांचा असून **लडलो** एथें आपला चुलता **रिव्हर्स**चा **अर्ल** याचे पाशीं होता व त्याचा धाकटा भाऊ, **यार्क**चा **ड्यूक**, हा भाईपाशीं **लंडन** एथें होता. त्याचा सख्खा चुलता ग्लुस्टरचा **ड्यूक, रिचर्ड**, हा **यार्क** एथें होता. त्याला भावाचे मरणाची बातमी कळतांच तो राजाचें प्रतिनिधित्व राजाचे आईस न मिळतां आपल्यास मिळावें म्हणून तो **लंडनास** येत असतां त्याची व पांचवा **एडवर्ड** किल्येक नाते वाहिकांसह **लंडनास** राज्याभिषेकाकरितां जात आहे अशा स्थितींत **स्टोनब्रिज** एथें गांठ पडली. परस्परांची विचारपूस वगैरे होऊन दोघांचें भांडण जुंपलें. **रिचर्डा**नें त्यांचा पराभव केला आणि पांचवे **एडवर्डा**स घरून **लंडनास टावर** एथें नेऊन ठेविलें, आणि त्याच्या बरोबरच्या लोकांसही कैद करून तुरुंगांत टाकिलें. नंतर राजाचे धाकटे भावासही कांहीं निमित्तानें आईपासून आपल्या ताब्यांत घेतल्यावर त्यासही **टावर** एथें नेऊन ठेविलें. राजाच्या

पक्षाचे सरदार रिव्हर्स ग्रे आणि हेस्टिंग्स यांवर राजद्रोहाचा आरोप ठेवून चौकशी न करितां त्यांस फांशीं दिलें. पुढें संधि साधून रिचर्डानें राजा व त्याचा भाऊ यार्कचा ड्यूक हे एके दिवशीं मध्यरात्रीं एकमेकांस मिठी मारून एका हांतरुणावर निजलेले असतां टायटन व फ्रेस्ट या मारेकऱ्यांकडून त्यांचा उशांखालीं श्वास कोंडून प्राण घेतला, आणि त्यांची प्रेतें तेथेंच एका मागील जिन्याखालीं पुरून टाकिलीं. तीं पुढें त्या जिन्याची इ. स. १६७४ त दुरुस्ती चालली असतां सांपडून वेस्टमिन्स्टर एथें नेऊन पुरलीं. कोणी सांगतात कीं, तें सर्व अघोर कृत्य रिचर्डानेंच आपले हातीं केलें. रिचर्डानें कांहीं सरदार आपलेसे करून घेऊन तें राज्य इ. स. १४८३ त बळकाविलें. पांचवे एडवर्डानें अगदीं थोडें म्हणजे एप्रिलच्या नवव्या तारिखेपासून जूनच्या २२ तारिखेपर्यंत सुमारें अडीच महिने राज्य केलें. त्याला राज्याभिषेक झाला होता किंवा नव्हता याविषयीं शंकाच आहे.

तिसरा रिचर्ड (वक्र पृष्ठ).

(१४८३-१४८५).

तिसरा रिचर्ड हा फादरिंगे किल्लयांत इ. स. १४५० त जन्मला होता. तो यार्काचा ड्यूक, रिचर्ड, याचा धाकटा मुलगा, चौथ्या एडवर्डाचा भाऊ आणि वारिकहया अर्लाचा जांवई होता. त्याच्या बायकोचें नांव ॲन होतें. त्याचा एक हात जन्मतःच वाळका असून त्याचा खांदा पुढील माग दुसऱ्या होता. यामुळें अंमळ वर होता, म्हणून त्याला कुकड्याक (वक्र पृष्ठ)

हें नांव पडलें होतें. तो जसा शरीरांत वक्र होता तसाच तो मनानें व आत्म्यानें वक्र होता. तो राज्यावर बसल्यावर त्यानें राज्याची सुधारणा करण्याकरितां व व्यापारास उत्तेजन येण्याकरितां इ. स. १४८४ मध्यें पुष्कळ उत्तम कायदे केले. परंतु शिलक राहिलेल्या **लांक्यांस्ट्रियन** पक्षाच्या लोकांनीं **रिच्मंड**चा अर्ल हेन्री यास आपला पुढारी करून **रिचर्ड**ची सर्व उमेद खचवून टाकिली. **रिच्मंड**ला **रिचर्ड**ची भावजय **इलिजाबेथ** इच्या पक्षाचें पाठबळ होतें. कारण तिच्या मनांत तिचीं मुलें मारल्याबद्दल **रिचर्ड**चा सूड उगवावा असें होतें. दोन्ही घराण्यांतील भांडण मिटावें याकरितां **ईलाय** एथील धर्माधिकारी **मार्टन** यानें **हेन्री रिच्मंड** याशीं चौथे **एड्वर्ड**ची मुलगी **इलिजाबेथ** इचें लग्न करण्याचें योजून **रिचर्ड**ला गादीवर बसविण्याण्या कामांत मुख्यत्वें करून मदत करणारा **बकिंगह्यामचा** ड्यूक यानेंही मन त्या कामाकडे वळवून घेतलें होतें. विधवाराणी गांवांतपैसे जमवून **रिच्मंड**स पाठवीत असे. **बकिंगह्याम** यानें **वेल्स**मध्यें बंड केलें होतें, परंतु **सेव्हर्न** नदीच्या पुरानें त्याची पुढील गति कुंठित होऊन तो धरला गेला आणि **सालिनयेरी** एथें फार्शी गेला. **रिच्मंड** त्यास मदतीस येत होता, परंतु वादळानें त्यास **डार्सेट** एथून मागें हटावें लागलें. इ. स १४८४ मध्यें **आन**राणी मेली आणि **रिचर्ड**च्या मनांत **इलिजाबेथ** राजकन्येशी **मार्गरेट**राणीचे मतानें लग्न करावें असें आलें. तो बेत **रिच्मंड**चा ड्यूक, हेन्री यास कळतांच त्यानें **हारफ्लयूअर** एथून **मिलफर्ड हेवन** एथें समुद्र मार्गानें येऊन **वेल्श** लोकांच्या साह्यानें **स्टाफर्ड** प्रांतांतून **इंग्लंड**वर स्वारी केली. **रिचर्ड**ही त्याशीं सामना करण्याकरितां गेला. दोन्ही सैन्यांची **बास्वर्थ** एथें इ. स. १४८५ त

गांठ पडून लढाई झाली. तींत रिचर्डाचा पराभव होऊन तो मारला गेला. रणांगणांत त्याचा पडलेला मुकुट, सर उइलियम स्टानले यानें उचलून रिच्मंडाचे डोक्यास घातल्यावरोबर सैन्यानें मोठ्या उच्च स्वरानें "सातवा हेन्री चिरायु होवो" म्हणून मोठी गर्जना केली. याप्रमाणें यार्क घराण्याची समाप्ति होऊन गुलाबाच्या लढायाही संपल्या. त्या स. १४६५ पर्यंत एकसारख्या चालू होत्या.

या कारकीर्दीत पार्लमेन्टाचे कायदे इंग्रजी भाषेंत झाले न छापिले, रिचर्ड मोठा धीट व महत्वाकांक्षी होता, परंतु त्याचे नांवास पुतण्याच्या हत्तेचा मोठा कलंक लागला आहे. तो चैनीही होता. त्याचा मुलगा त्याचे जिवंतपणींच सन १४८४ त च मेला होता. त्याला कधींही स्वस्थ झोंप लागत नसे. त्याची निर्दयतेचीं कृत्यें त्याचे मनांत सर्वकाळ जागृत असत. त्याचे मागून रिच्मंडचा अर्ल हेन्री यास सातवा हेन्री असें नांव देऊन गादीवर बसविलें. पांचवे हेन्रीची विधवा कॉथरीन हिनें ओएन ट्यूडर नामें एका वेल्श गृहस्थाशीं लग्न लाविलें होतें, हें मागें सांगितलेंच आहे. रिच्मंडचा अर्ल, हेन्री, हा त्याचा नातू होता व तिसरे एडवर्डाचा चौथा मुलगा, लयांकास्टरचा ड्यूक, जान, याचा नातू, जान बोफर्ट, याच्या मुलीचा मुलगा होता, म्हणून त्यास ट्यूडर घराण्यांतील मूळपुरुष म्हणतात.

गुलाबांच्या लढायांपासून प्रांताचे प्रांत ओसाड झाले, व घराण्याचीं घराणीं निर्वंश झालीं. शांततेचीं कामें, विद्येला व कलांना उत्तेजन देणें वगैरे बंद पडलें. पिकें तुडावेलीं गेल्यामुळें किंवा पेरलीं न गेल्यामुळें ओशीक राहिलीं. वारिकच्या आसपास

सुमारें साठ खेडीं उठलीं. नातेवाईकांनीं किंवहुना बापलेकांनीं एकमेकांवर शस्त्र धरल्यामुळें पाषाणस्तंभ, शिरच्छेदस्तंभ आणि घरांतील एकांत जागा रक्ताच्या पुरांनीं माखून गेल्या होत्या. **फ्यूडल सिस्टिम** (कुळवारीची चाल) आजपर्यंत चालत होती ती आगदीं बंद पडली. राजकुळांतील दोन्ही कट नाहींसे होऊन राजाचा धाक कमी झाला. राजा स्वेच्छाचारी झाला. लोकांचा अधिकार वाढत जाऊन त्यांच्या परवानगीशिवाय लोकांवर कर बसविणें किंवा पैसा मिळविणें बंद झालें. तथापि राजाच्या हातीं अनेक उपाय असल्यामुळें राजा पैसा जमवी. या काळीं भोजन करण्याची चाल चारदां असे. सकाळीं सात वाजतां न्याहारी, दहा वाजतां जेवण, सायंकाळीं सात वाजतां उपहार आणि अगदीं निजतांना सुमारें दहा वाजतां लिव्हरी (विशेष पेयपदार्थ) घेत. घरें बांधण्याची गाथिक चाल त्याच-काळीं पूर्णतेस गेली. ह्या तऱ्हेच्या इमारती आज पुष्कळ शिल्लक आहेत. त्यांत **उइंजर** एथील **सेन्ट जार्जा**चें देउळ हें प्रसिद्ध आहे. तें चौथे **एडवर्डा**नें सुरू केलें होतें. नावेल लोकांचे जुने किल्ले जाऊन त्या ठिकाणीं मोठमोठे वाडे झाले व त्यांना शोभे करितां लढाऊ रूप मात्र कायम ठेविलें होतें. भाषा बरीच स्थिर होऊन गाथर, चासर वगैरे कवींचे ग्रंथ प्रसिद्धीस आले.

डॉकयार्डर व यार्क वंश विस्तार.

तिसरा एड्वर्ड

एड्वर्ड (कृष्णकवच)
तिसरा रिचर्ड
स. १३७७-९९

लायोनेल
क्लारेन्सचा ड्यूक

फिलिपि
लग्न-मार्चांचा अर्ल
मार्टिमर यार्ली

राजर

गांटचा जान
बायका तीन

१ लांकेस्टरची
ब्लनश्
चवथा हेन्री १३९९-१४१३

पांचवा हेन्री
१४११-१४२२

सहावा हेन्री
यार्चे लग्न भान्जूची
मार्गेरट इयीं
१४२२-१४६१

एडवर्ड

२ कास्टनोशेवा
कास्टाइलची

थामस
क्लारेन्सचा ड्यूक

३ कायराइन
स्विनफर्ड
† (पुढील पानावर पहा)

जान
बेडफर्डाचा ड्यूक

एड्मन्ड ह्याग्ली
यार्कचा ड्यूक

एड्वर्ड
रिचर्ड
(कॉनिजला अर्ल)
ल. आर मार्टिमरची

कुडस्टाकचा थामस
ग्लुस्टरचा ड्यूक.

हंफ्रे
ग्लुस्टरचा ड्यूक.

एड्मंड
मार्चांचा अर्ल

भानमार्टिमर
ल० कॉनिजचा
अर्ल, रिचर्ड यांशीं

रिचर्ड, यार्कचा ड्यूक

* (पुढील पानावर पहा)

एडवर्ड

* रिचर्ड (यार्कचा ड्यूक)

चवथा एडवर्ड १४६१-१४८३ | जार्ज, क्लारेन्सचा ड्यूक | तिसरा रिचर्ड १४८३

पांचवा एडवर्ड १४८३ | रिचर्ड, यार्कचा ड्यूक | इलिजाबेथ इचें लग्न सातवे हेन्री बरोबर

एडवर्ड, वारिकचा अर्ल | मार्गरेट, लिस्बरीची कौन्टेस

† गांटचा जान याचे तिसरे बायकोप सून

जान बोफर्ट (समरसेटचा अर्ल)

जान बोफर्ट (समरसेचा अर्ल)

मार्गरेट, इचें लग्न एडमंड ट्यूडर यार्शी

सातवा हेन्री १४८६-१५०९

यार्क कारकीर्दीत घडलेल्या मुख्य गोष्टी.

१४६१ चवथा **एड्वर्ड** राज्यारूढ झाला.
१४६४ **हेज्लीमूर** आणि **हेरजम** एथील लढाया.
१४६६ सहावे **हेन्रीस टावर** एथें कैदेंत ठेविलें.
१४७० सहावे **हेन्रीस** पुनः गादीवर बसविलें.
१४७१ **लांक्यास्ट्रियन** पक्षाचा **बार्नेट**व **टेव्यूरजबेरी** एथें पूर्ण पराभव.
१४७३ **एड्वर्डा**नें **फ्रान्सा**पासून खंडणी घेतली.
१४७८ **क्लारेन्स**चा डयूक मारला गेला.
१४७४ पहिलें छापिलेलें पुस्तक **कॉक्स्टन** यानें काढिलें.
१४८२ **मार्गरेट** राणी **फ्रान्सां**त मेली.
१४८३ चवथे **एड्वर्डा**चा मृत्यु, पांचवा **एड्वर्ड** राजा व त्याचा मृत्यु.
१४८५ **बॉस्वर्थ** एथील लढाई व तिसरे **एड्वर्डा**चा मृत्यु.
१४८५ सातवा **हेन्री** राज्यावर बसला.

पांचवा भाग.

ट्यूडर कारकीर्द.

(इ. स. १४८५-१६०३).

सातवा हेन्री १४८५
आठवा हेन्री १५०९
सहावा एड्वर्ड १५४७
पहिली मेरी १५५३
एलिजाबेथ १५५८

सातवा हेन्री.

(सन १४८५-१५०९).

सातवा हेन्री १४५६ मध्यें 'पेंब्रोक' शहरांत जन्मला होता. त्याचा बाप 'रिचमंडचा अर्ल, रिचमंड ट्यूडर आणि आई मार्गरेट, समरसेटचा जॉन बोफर्ट, याची मुलगी व तिसऱ्या एड्वर्डाचा तिसरा मुलगा जॉन ऑफ गॉंट याची पणती होती. सातवे हेन्रीचें लग्न चवथ्या एड्वर्डाची मुलगी, एलिजाबेथ हिच्याशीं झालें होतें. हेन्रीस राज्याभिषेक झाल्यावर त्यानें फारच उत्तम रीतीनें व निःपक्षपातानें प्रजेस वागविलें. परंतु किती एक लोक सदा असंतुष्ट असून मूर्ख व अविचारी लोकांस चिडवून फंद फितुराच्या खटपटी करीत होते. तो बायकोकडून लांकेस्ट्रियन होता म्हणून त्याचें एलिजाबेथ राजकन्येशीं लग्न झालें तेव्हां, यार्क घराण्याचा मी पक्षपात करणार नाहीं असें त्याजकडून कबूल करून घेतलें होतें. परंतु तो अंतःकरणानें व आचरणानें पहिल्या प्रतीचा कर लांकेस्ट्रियन असल्यामुळें त्याच्या सर्व कारकीर्दीत यॉर्किस्टलो-

कांना फार दुःखें भोगावीं लागलीं. त्यानें प्रथम यार्क घराण्यांतील खरा वारस, क्लारेन्सचा ड्यूक, जार्ज, याचा १५ वर्षांचा मुलगा एडवर्ड प्लांटाजिनेट यास पकडून टावर एथें पाठवून दिलें व पुढें यार्कीस्ट लोकांची बरीच मालमत्ता जप्त केली, त्यामुळें पुष्कळ बंडें उत्पन्न झालीं. त्यांतील पहिलें बंड लॉर्ड लोव्हेल यानें उत्तेजन केलें होतें. त्याचा मोड लवकरच इ० स० १४८६ मध्यें झाला.

यार्क घराण्यांतील राजपुत्रा बद्दल किती एक तोतये निर्माण झाले. त्यांतलि पहिला **ल्यांबर्ट सिम्नेल** हा एका मठाध्याचा मुलगा होता. तो आपल्यास **एडवर्ड** (वारिकचा अर्ल म्हणवीत असे, आणि **वारिकचा** अर्ल तर त्यावेळेस टावर एथें होता. **सिमनेल** यास **पेरिश** लोकांनीं साथ देऊन मोठी फौज जमविली, आणि त्यास ६ वा **एडवर्ड** असें नांव ठेवून मोठें बंड केलें पुढें त्यानें **इंग्लंडावर** स्वारी करून **नार्टिंगहाम** प्रांतांत तळ दिला. **वारिकच्या** अर्लास तुरुंगांतून आणून सर्वां समक्ष त्यास दाखविलें असतांही बंडगल्यांनीं आपला उद्योग सोडिला नाहीं. तेव्हां हेन्रीनें त्यांचा पाठलाग करून ट्रेन्ट नदीच्या कांठीं **स्टोक** एथें इ. स. १४८७ त त्यांस गांठून त्यांचा पराजय केला व सिमनेल यास कैद करून त्याचा स्वतांचा अपराध नव्हता म्हणून त्यास न मारितां सरकारी वाड्यांतील आचाऱ्याच्या हातां खालीं खटपट्या म्हणून ठेवून दिलें. तें बंड यार्किस्ट लोकांची मालमत्ता हिरावून घेतली म्हणून उत्पन्न झालें होतें.

इ. स. १४८५ त फ्रान्साच्या राजानें **ब्रिटिनी** प्रांतावर हल्ला केला होता म्हणून त्या संस्थानाचे संरक्षणार्थ हेन्री राजानें सन १४८९ त कांहीं स्वार पाठविले होते, परंतु त्यांच्या पासून म्हणण्यासारखा कांहीं उपयोग झाला नाहीं. इ. स. १४९२ त

दुसरा एक तोतया **परकिन्वारबेक** नामें उत्पन्न झाला होता. तो आपल्यास चौथ्या **एड्वर्डा**च्या दोन मुलां पैकीं धाकटा मुलगा, **यार्कचा ड्यूक, रिचर्ड**, असें म्हणवीत असे. तो अगदीं त्यासारखा होता, म्हणून लोकांस तें खरें वाटून दोघांच्या बऱ्याच निरर्थक अशा भेटापडी झाल्या. **स्काट्लंड**च्या राजासही तो खरा वाटून त्यानें आपल्या घराण्यांतील एक मुलगी, **कयाथराईन** ही त्यास दिली होती. त्यानें पुढें **पेरिश** लोकांच्या साह्यानें इ. स. १४९७ त **कार्नवाल्** एथें तळ देवून आपल्यास चवथा **रिचर्ड** हें नांव घेतलें, व **एक्झेटर** शहरास वेढा दिला. परंतु राजसैन्याची गांठ पडतांच त्यांची पांचावर धारण बसून त्याचा कट फुटला तेव्हां, त्यास व त्याच्या सैन्यास राजाच्या स्वाधीन व्हावें लागलें. त्या कटांत ज्या मोठमोठ्या सरदारांचीं आंगें होतीं, त्यांची जिंदगी **हेन्री**नें जप्त करून त्यांचीं वतनें खालसा केलीं आणि **वारबेक** यास **टॉवर** एथें कैदेंत ठेविलें. **वॉरबेक** तेथें असतां त्यानें **वारिक**चा अर्ल **एड्वर्ड** यासीं कट करून दोघांची सुटका होण्याविषयीं खटपट चालविली. परंतु ती खटपट उघडकीस येऊन त्यांना राजद्रोहाबद्दल मरण्याची शिक्षा भोगावी लागली. **पार्किन्** यास **टायबर्न** एथें इ. स. १४९९ त फांशीं दिलें, यामुळें त्याचे बायकोशिवाय कोणासही वाईट वाटलें नाहीं. **कयाथराईन** इचें दुःख मनांत आणून राजानें तिला आपले राणीचे स्वाधीन केलें होतें. राणी तिच्याशीं फार प्रेमानें वागे. **वारिक**च्या अर्लाचा इ. स. १४९६ त शिरच्छेद झाला. तो तेथें सुमारें १५ वर्षें कैदेंत होता.

पर्किन वारबेक यानें बंड चालूं असतां, असलीं बंडें उत्पन्न होऊं नयेत म्हणून **हेन्री**नें बऱ्याच पैशाची जमवाजमव केली होती. परंतु तिजपासून इष्ट हेतु सिद्धीस न जातां **कॉर्नवाल**

एथें एक नवीन बंड होऊन बरेच हत्यारबंद लोक लंडनावर चाल करून आले होते. त्यांवर नेहरीनें सैन्य पाठवून त्यांचा ब्लॅकहीथ एथें इ. स. १४९७ त मोड करून त्यांस तेथून हांकून लाविलें. कार्डिनल मार्टिन आणि सर रेजिनॉल्ड ब्रे हे मंत्री होते तोंपर्यंत लोकांवर बलात्कार होत नव्हता. परंतु त्यांचे जागीं सर रिचर्ड एंप्सन आणि एडमंड डड्ले हे झाल्यावर प्रजेवर अमर्याद जुलूम होऊं लागला.

वेल्स देश पहिले एडवर्डानें जिंकून घेतल्या पासून इंग्लंडच्या राजांनीं त्या देशास फार दुःख दिलें, परंतु हेन्रीनें त्या लोकांकरितां उत्तम कायदे करून त्यांस इंग्लंडाबरोबर वागवून सुखी केलें. ती शांतता हेन्रीचे हयाती पर्यंत उत्तम रीतीनें चालून लोकांस विद्या व कळा सुधारण्यास बरीच संधि मिळाली.

सातवा हेन्री क्षयरोगानें इ. स. १५०९ मध्यें मरण पावला. तो मरण पावला तेव्हां त्याचे जवळ १,२०,००,००० पौंड रोकड होती. तो मोठा नामांकित द्रव्यलोभी होता. त्यानें लोकांच्या हितासाठीं जीं जीं कामें केलीं, त्यांतील प्रत्येकाच्या मुळापाशीं त्याचें स्वहित असून होतेंच. इ स. १४९२ त क्रिस्टॉफर कोलंबसानें स्पेन एथून जाऊन, सिबॉस्टियन कॅबॉट यानें सन १४९७ त इंग्लंड एथून जाऊन, आणि अमेरिकस व्हेस्पूशिस यानें इटली एथून जाऊन अमेरिकेचा शोध लाविला, व टर्की नांवाचे पक्षी आणि बटाटे हे तेथून आणिले. याच प्रसंगीं कॅबॉट यानें न्यूफाउंडलंडचा शोध लाविला. हॅरी नांवाचे पहिले लढाऊ जहाज याचेच कारकीर्दीत बांधिलें.

इ. स. १४९७ त वास्कोडिगामा यानें पोर्चुगाल एथून निघून आफ्रिकेचे दक्षिण टोंक, ज्याला ते वेळेस केप ऑफ स्टार्मस् (वादळाचें भूशिर) असत, तें ओलांडून हिंदुस्तानास

घेण्याचा मार्ग शोधून काढिला. त्या भूशिरास तेव्हां पासून केप आफ गुडहोप (चांगल्या आशेचें भूशिर) हें नांव पडलें.

इतिहासांत स्टारचेंबर म्हणून जें अनन्वित कायद्यांचें सभास्थान होतें, तें याचेच कारकीर्दीत झालें. त्याला तें नांव पड-ण्याचें कारण असें होतें कीं यहुदी लोकांबरोबर केलेले स्टारा (करारनामे) ठेवण्याची एक पेटी त्या ठिकाणीं असे. हेन्री मेला त्यावेळेस त्यास एक मुलगा हेन्री आणि दोन मुली मरी व मार्गे-रेट अशी तीन मुलें होतीं.त्यांतील हेन्री हा सातवे हेन्रीच्या मागून आठवा हेन्री या नांवानें इंग्लंडचा राजा झाला. मार्गरेट ही स्कार्टलंडचा राजा चौथा जेम्स यास इ. स. १४०२ दिली होती. तिच्या पासूनच स्टयुअर्ट आणि ब्रन्सउइक हीं घराणीं उत्पन्न झालीं. मेरी ही फ्रेंच राजा १२ वा लुई याची राणी झाली होती.

सातवा हेन्री मोठा शहाणा व कडक असा राजा होता. त्याचा मोठा दुर्गुण म्हटला म्हणजे द्रव्य लोभ हा होता. त्यानें इट-लीहून कुशल व विद्वान असे पुरुष आणून आपली प्रजा शहाणी केली व व्यापारासही उत्तेजन दिलें. त्याचा मंत्री, कार्डिनल व-ल्सी हा होता. तो यजमानाच्या इच्छेप्रमाणें बहुशः अनुमोदन देत असे. तो, इप्स्विच एथील एका सामान्य गृहस्थाचा मुलगा असून मोठ्या हुशारीनें वाढत गेला होता. तो दरबारांत आपला अ-धिकार व योग्यता एकीकडे ठेवून निर्लज्जपणानें खुषमस्कऱ्यांत असे, त्यायोगानें तो कोणासही न आवडतां सर्व लोक त्याचा तिटकारा करीत असत.

आठवा हेन्री.

(सन १५०९-१५४७).

आठवा हेन्री हा ग्रेनिच एथें इ. स. १४९१ त जन्मला. तो सातव्या हेन्रीचा दुसरा मुलगा होता. त्याचा वडील भाऊ आर्थर हा नेहमीं आजारी असून बाप असतांच इ. स. १५०२ मध्यें मेला होता. हेन्री, राज्यावर बसला तेव्हां त्याचें वय १८ वर्षांचें होतें. बाप मेला तेव्हां तो फ्रेंचांबरोबर ५०,००० सैन्यानिशीं लढत होता. ती लढाई शेवटीं तह होऊन बंद झाली. तींत त्यानें, बापानें मिळविलेले पैसे बरेच उधळून टाकिले होते. त्याची पहिली बायको, कॅथराइन आफे आरेगान ही स्पेनच्या राजाची मुलगी होती व ती हेन्रीचा वडील भाऊ आर्थर यास दिली होती. ती विधवा झाल्यावर आठवे हेन्रीनें पोपाचे संमतीनें तिशीं लग्न लाविलें. हेन्री प्रथम लोकांस फार आवडत असे. कारण तो तसाच सुंदर, परोपकारी, शहाणा व विद्वान होता; परंतु तो जसजसा मोठा होत गेला, तसतसा मोठा निर्दय, केवळ पाषाण हृदय बनला. त्याला ६ बायका झाल्या. पहिली, कॅथराइन ही त्याची फार आवडती होती; परंतु तिच्या एका सुंदर दासीवर त्याचें मन लुब्ध झाल्यापासून तो राणीशीं अति निष्ठुरतेनें वागूं लागला. अखेरीस क्षुल्लक कारणावरून हेन्रीनें पोपाच्या संमतीनें त्या राणीस सन १५३३ त काढी मोडून दिली. ती पुढें सन १५३६ त मेली. तिला मेरी ह्मणून एक मुलगी होती. इ. स. १५३३ त हेन्रीनें आन बोलन (कॅथराइनची दासी व सर टामस बोलिन याची मुलगी) इशीं गांधर्व विवाह करून, ती गरोदर झाल्यावर तिशीं लग्न लाविलें आहे, असें उघड करून करून तिची मोठ्या थाटानें मिरवणूक काढिली. आन बोलनला

धर्मसुधारणेची मोठी भक्ति होती. ही गोष्ट कित्येक जुन्या लोकांस न आवडून त्यांनीं तिचे नाहींत ते दोष राजास कळवि-ल्यावरून राजाचें मन मजविषयीं शुद्ध नाहीं, असे तिनें काढिलेले उद्गार राजाचे कानीं गेले तेव्हां ती पतिव्रता नाहीं असा तिज-वर दोष ठेवून त्यानें तिला इ. स. १५३६ त शिरच्छेदाची शिक्षा दिली. तिला **इलिजाबेथ** नांवाची एक मुलगी होती. **आन बोलन** दोषी ठरविण्याचे अगोदरपासूनच राजाचें मन, राणीची एक दासी **जेन सिमूर** म्हणून होती, तिनें मोहित केलें होतें. **आन** मेल्यावर तेच दिवशीं **जेन** ही त्याची तिसरी बायको झाली. ती बाळंत होऊन स. १५३७ त मेली. तिला **एडवर्ड** म्हणून एक मुलगा होता. त्याच सुमारास, म्हणजे सन १५३९ त **स्मिथफील्ड** एथें मोठा अग्नीचा भडका चालला होता. जे लोक **लूथरा**चे व नुन्या पंथाचे भक्त होते त्यांस तेथें जिवंत जाळण्याचा मोठा सपाटा चालू होता.

चवथी बायको **क्लीव्हज्**ची **आन** ही झाली. **जर्मनी** एथील राजाचा स्नेह व्हावा म्हणून हें लग्न झालें होतें. परंतु तिचें रूप त्याला न आवडून तिला त्यानें टाकिल्यावर इ० स० १५४० त पांचवी बायको **कयाथराईन हावर्ड** ही झाली. थोडक्याच दिवसांनीं तिची बर्तणूक वाईट आहे असें कळल्यावरून तिची चौकशी केली. तिनें तो अपराध लग्नापूर्वी केला होता, लग्न झाल्यावर मी निष्कलंक आहें, असें जरी सांगितलें तरी तें नाकबूल होऊन तिला व तिच्या साथीदार मंडळीस सन १५४२ त शिरच्छेदाची शिक्षा मिळाली इ स १५४६ त **कयाथराईन पार** (**लॉर्ड मार्टिमर** याची विधवा) ही त्याची सहावी बायको झाली, व ती त्याचें मागें राहिली हें तिचें नशीबच समजलें पाहिजे.

त्याचे बापाचे वेळचे मोठे दुष्ट असें एंप्सन आणि डड्ले हे दोघे गृहस्थ दरबारांत होते. ते लोकांना फार नावडते झाले होत, म्हणून त्यानें त्यांस राज्यावर बसतांच परलोक दाखविला. तो मोठा चतुर होता, त्या योगानें त्याच्या बापानें संग्रह केलेल्या अपरिमित पैशांतून लढाया करून शिलक राहिलेला अंशही पार उडवून टाकिला. त्याची कारकीर्द सुधारणुकीचे कामांत फार प्रसिद्ध आहे. त्यानें ठिकठिकाणचे मठ काढून टाकिले. धर्म संस्थांत आपलें वर्चस्व स्थापन करून ते पोपापासून स्वतंत्र केलें. सातवे हेन्रीनें जिकडे तिकडे शांतता करून ठेविली होती. परंतु आठवे हेन्रीस ती न आवडून त्यानें इ स. १५१३ त फ्रान्साचे राजाबरोबर गिनिगेट एथें लढाई करून जय मिळविला. त्या लढाईंत फ्रेंचांनीं तरवारीचे उपयोगापक्षां घेड्यास टांचेचे कांटे मारून पळविण्याचा उपयोग केला होता म्हणून त्या लढाईस 'बयाटल आफ दि स्पर्स,' (टांचांच्या कांट्यांची लढाई) म्हणतात.

हेन्री फ्रान्सांत असतां स्काट्लंडचा राजा, चौथा जेम्स यानें इंग्लंडावर चाल केली. तेव्हां शूर, धोरणी, व शहाण्या अशा सरेच्या अर्लानें त्यावर स्वारी करून त्याचा "फ्लाडन फील्ड" एथें पराजय केला. त्या लढाईंत स्काच लोकांचा राजा, मोठमोठे मुत्सदी व सरदार पडल्यामुळें स्काच लोकांचें मोठें नुकसान झालें. फ्रान्साचा राजा पहिला फ्रान्सिस आणि स्पेनचा राजा पहिला चार्ल्स हे या वेळेस हेन्रीचे मोठे स्नेही होते. त्यांनीं हेन्रीला फ्रान्सांत बोलावून त्याजकरितां जो दरबार व ज्या मेजवानीचा थाट केला होता, त्यांत भरजरीचें कापड व जवाहीर इतकें होतें कीं, त्या जागेस 'फील्ड ऑफ दि क्लॉथ ऑफ गोल्ड, (भरजरीचें दरबार) हें नांव

पडलें आहे. तो समारंभ बरेच दिवस चालू होता, व त्यास दोन्हीं देशांतील मोठमोठे श्रीमान गृहस्थ, सरदार व धर्माधिकारी आपल्या बायका व मुली घेऊन आले होते. गमतीखातर ते तेथें कुस्त्या वगैरे जे खेळ खेळत त्यांतील जयापजयाचे पंच बायका असत (१५२०).

हेन्रीचें मनांत आन बोलिन बरोबर लग्न करावयाचें आलें तेव्हां पहिले बायकोशीं झालेलें लग्न गैर कायदा झालें आहे, म्हणून तिला काढी मोडून देण्यास यार्क एथील धर्माधिकारी जॉन उलसी याजपाशीं हेन्रीनें परवानगी मागितली. उलसी यास राजानें वाढविलें होतें व त्याजवर त्याचेंच फार प्रेम असे. राजाचा संतोष ठेवावा तर पोपास राग येणार, असें मनांत येऊन उलसीनें त्या गोष्टीस नकार देण्याचें काम अमळ लांबणीवर टाकिलें. उलसी हा मोठा शहाणा व विद्वान् गृहस्थ होता. थामस लिनाकर हा आक्सफोर्ड एथें धर्म गुरु असतां तो त्याजजवळ शिकला होता. तो हर्प्स्वच एथील एका खाटकाचा मुलगा होता असें सांगतात. त्यानें राजाची प्रीति संपादून धन व योग्यता हीं संपादिलीं होतीं. त्यानें क्राइस्ट-चर्च ही आक्सफर्ड एथें एक व दुसरी हर्प्स्वच एथें (आपले गांवीं) अशा दोन पाठशाळा घातल्या. तसेंच 'ह्याम्प्टन कोर्ट' नांवाचा एक मोठा वाडा बांधून तो राजास नजर केला. या भरभराटींत तो असतां पोपानें त्याच्या योग्यतेप्रमाणें त्याला कारडिनल (धर्माध्यक्ष) ही पदवी दिली. पुढें त्यास धनाचा व अधिकाराचा गर्व होऊन तो गोरगरिबांस सुद्धा फार पीडा देऊं लागला.

उलसी हा आपण मागितलेल्या परवानगीची हेटाळणी करीत आहे व आपल्याविषयीं पोटांत अपूज्य बुद्धि बाळगीत आहे, असें राजाचे कानीं गेल्यावर राजानें त्याला एकदम कैद करविलें

आणि लंडनास आणून राजद्रोही ठरवून त्याचा शिरच्छेद करावा असा बेत केला होता. परंतु तो वाटेतच लेस्टरआवी एथें आजारी पडून इ. स. १५३० त मृत्यु पावला.

लूथर हा जर्मनीमध्यें प्राटेस्टंट (निर्गुण) धर्माची स्थापना करीत होता. हेन्रीनें त्याच्याविरुद्ध एक पुस्तक लिहून प्रसिद्ध केलें, त्यावरून पोपानें संतुष्ट होऊन हेन्री राजास "धर्म संरक्षक" हें नांव दिलें. तें नांव अद्याप इंग्लंडांतील राजांस चालू आहे. पुढें त्यानें पोपाचा पक्ष सोडून प्राटेस्टंट पक्ष धरिला आणि ईश्वराच्या आराधनेंत बदल केला. पूर्वीचे रोमन कथोलिक पंथाचे मठ, पाठशाळा, वगैरे उठवून तेथील जोग्यांस त्यानें हांकून दिलें. आणि त्यांचे उत्पन्नाची योजना दुसऱ्या चांगल्या कामाकडे केली. त्या योगानें "पिल्ग्रिमेज आफ ग्रेस" (दयेची जत्रा) नांवाचें एक बंड झालें होतें. तें बंड लवकरच मोडिल्यावर त्याने ६ कलमांचा एक नवीन कायदा केला. त्यांत मुख्य कलम हें होतें कीं, जो कोणी धर्माध्यक्षाच्या मताचा नसेल त्याचा प्राण घेण्यांत येईल. त्यायोगानें शेंकडों कथाथलिक ख्रिस्ती लोक बळी पडले, म्हणून त्या कायद्यास "ब्लडीस्टाटयूट" (घातकी कायदा) हें नांव पडलें होतें.

इंग्लंड व स्काटलंड यांमध्यें सन १५४२ त लढाई चालूच होती. प्रथम इंग्लिशांचा "हालिडन हिल" एथें पराभव झाला. परंतु त्यांनीं धैर्य धरून स्काच लोकांस 'सालवेमास' एथें गांठून त्यांचा पराजय केला. इ. स. १५४४ त हेन्रीनें फ्रान्साविरुद्ध स्पेनच्या बादशहाशीं सेह करून बुलोन शहर घेतलें. परंतु बादशहानें फ्रान्साशीं तह करून इंग्लंडचे राजास एकटें टाकिलें, आणि सन १५४५ त मोठें सैन्य जमवून

इंग्लंडावर स्वारी केली; परंतु तिजपासून त्याचा कांहीं एक उपयोग न होतां सन १५४६ त त्याला तह करावा लागला.

हेन्रीचे कारकीर्दित धर्मसंबंधानें व सरकारी कारस्थानाच्या निमित्तानें पुष्कळ लोक प्राणास मुकले. ट्रिनिटि पाठशाळा 'कॅंब्रिज' व 'आक्सफर्ड' एथील पाठशाळा आणि क्राईस्ट चर्च ह्या स्थापन झाल्या. दि लार्ड हाय ॲडमिरल (लढाऊ जहाजावरील मुख्य अधिकारी) हा पहिला हुद्दा सर जेस्स हार्वे यांस स. १५१२ त मिळाला, सेक्रेटरी आफ स्टेट (संस्थानचा चिटणीस) याची कचेरी १५३०त सुरू झाली, इ. स. १५३५त ग्रीनवेची तोफ ओतली, व्हाइट हॉल आणि सेंट जेम्स पॅलेस ह्या इमारती बांधिल्या, लांकडी नळ काढून शिशाचे नळ घातले, कापसाचें सुत काढूं लागले, पौंड नाण्यास सावरिन म्हणूं लागले, वेल्श लोकांस पार्लमेंटमध्यें घेतलें, टोचण्या स्पेनांतून आणिल्या व गुलामांस मुक्त केलें. आठवा हेन्री वेस्टमिन्स्टर एथें इ. स. १५४७ त मेला ते वेळेस त्याचें वय ५६ वर्षांचें होतें. त्याचें चित्त धर्माविषयीं व स्त्रीविषयीं फारच चंचल असे जो कोणी त्याचे वाटेस जाई, त्याचें पारिपत्य झाल्याशिवाय राहत नसे. त्यास त्याच्या क्रूरतेबद्दल रक्तप असें नांव पडलें होतें. त्यास तीन मुलें होतीं. पैकीं दोन मुली होत्या व एक मुलगा होता. मुलाचें नांव एडवर्ड होतें. हेन्रीचे मागून एडवर्ड हा गादीवर बसला. एकंदरींत आठवे हेन्रीचे कारकीर्दीसारखी वाईट कारकीर्द इंग्लंडच्या सर्व इतिहासांत कोठेंही आढळणार नाहीं.

सहावा एड्वर्ड
(इ. स. १५४७–१५५३).

सहावा **एड्वर्ड** राज्यारूढ झाला त्यावेळीं तो नऊ वर्षांचा होता म्हणून त्याचा मामा **समरसेट**चा ड्यूक यास त्याचा पालक नेमिला होता. पालकाचा भाऊ व **इंग्लंड**चा आडमिरल लार्ड **सिमर** यानें विधवा **काथरार्इन पार**, या राणीशीं लग्न लाविलें. ती मेल्यावर त्याचे मनांत **इलिजाबेथ** राजकन्येशीं लग्न करून राजास आपले ताब्यांत घ्यावें, असें आलें होतें; परंतु त्याजवर राजद्रोहाचा गुन्हा शाबीत होऊन त्यास **पार्लमेन्ट**नें सन १५४९ तें फाशीं दिलें. फांशीं देण्याचे हुकुमवर सही करण्यास त्याचा भाऊ, कारभारी व राजाचा पालक यानें पुष्कळ आढेवेढे घेतले. परंतु त्यांचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. ही कारकीर्द धर्म सुधारण्याविषयीं बरीच प्रसिद्ध आहे. **बायबल** (धर्म पुस्तक,) वाचण्यास सदर परवानगी मिळाली, प्रार्थनेचें एक सामान्य पुस्तक तयार झालें, **इंग्रजी**त प्रार्थना होऊं लागल्या व सर्व ठिकाणच्या मूर्ति काढून फेंकून दिल्या. या सर्व कृत्यांत **लाटिमर, क्रानमर** आणि **रिडले** हे धर्माधिकारी प्रमुख होते. **समरसेट** गर्वानें फुगून जाऊन पूर्व गरिबी व लीनता विसरल्यामुळें त्यास **डडलेप्रभृति** शत्रूच्या कोपाग्नीस बळी पडावें लागलें. आठवे **हेन्री**चे मनांत **स्काटलंड**चे राजाची मुलगी **मेरी** ही आपली सून करावयाची होती; परंतु ती गोष्ट त्या राजास मान्य न झाल्यामुळें **समरसेट**च्या ड्यूकानें ती गोष्ट करण्यास त्या राजास भाग पाडावें म्हणून **स्काटलंड**ावर स्वारी केली, व **एडिंबरो** नजीक **पिंकी** एथें इ. स. १५४७ त त्यास लढाई देऊन **स्काच** लोकांचा पराजय केला. परंतु लढाई नंतर दिसून आलेल्या **इंग्लिश** लोकांच्या निर्दयपणामुळें व गर्वामुळें ती गोष्ट करण्याचें त्या राजास न आव-

ून त्यानें ती कन्या फ्रेंच राजपुत्रास देण्याचें योजिलें. याप्रमाणें केलेली सर्व खटपट फुकट गेली व विनाकारण राजास चीत घातलें इत्यादि गोष्टींचा समरसेटावर दोष ठेवून नार्थंबर्लंडचा ड्यूक डड्ले, यानें त्याचा 'टावरहिल' एथें सन १५५२ त शिरच्छेद करविला. समरसेट मेल्यावर त्याचे जागीं नार्थंबर्लंडचा ड्यूक, डड्ले हा राजाचा पालक झाला. त्यानें, राजाची प्रकृति बिघडत चालली आहे, असें पाहून त्याचे मनांत राजपद मिळविण्याची इच्छा उत्पन्न झाली. त्यानें एडवर्डाच्या बहिणी अनौरस ठरवून, त्यांना राजपद मिळण्याचा हक्क नाहीं, व तो हक्क त्याची आतेबहिण डार्सेटची मार्शिओनेस हिला व हिच्या वारसांना आहे असें ठरवून ठाकिलें. नंतर आपला हेतु साधण्याकरितां आठवे हेन्रीची बहीण मेरी हिची नात, जेन ग्रे, हिचें, आपला मुलगा लार्ड गिल्फर्ड डड्ले, याशीं सन १५५२ त लग्न लाविलें. एडवर्ड हा स्वभावानें फार सौम्य व विद्येचा फार शोकी होता. त्याला लाटिन, फ्रेंच ग्रीक, इतालियन आणि स्पानिश या भाषांचें ज्ञान होतें. त्यानें धर्मार्थ शाळा व दवाखाने पुरेच घातले होते. चौथ्या व पांचव्या हेन्रीनीं उद्धट्लिफ्चे अनुयायी (लोलर्ड) लोकांकरितां केलेले कायदे आणि बापानें केलेला ६ कलमांचा घातकी कायदा व इतर निर्दयतेचे कायदे पार्लमेंटाकडून रद्द करविले, धर्म खात्यांतील अधिकारी लोकांस लग्न करण्याची परवानगी दिली, आणि ४२ कलमांचा एक नवीन कायदा करून सणावारांचे दिवस ठरवून टाकिले (१५५२)-सर्वांनीं एकत्र जमून प्रार्थना करण्याचा संप्रदाय त्यानेंच काढिला. या सर्व फेरफारांनीं पश्चिमेकडे रोमन कथालिक धर्म पुनः स्थापण्याच्या संबंधानें एक बंड

झालें होतें; परंतु तें तेव्हांच लार्ड 'रसेल' यानें मोडून टाकिलें. एड्वर्डानें ग्रामर-स्कूल (व्याकणाची शाळा), क्राइस्ट चर्च, सेंट थामस हीं गृहें बांधिलीं. एड्वर्ड राजा इ. स. १५५३ त ग्रेनिज एथें मरण पावला. त्याचे मागून त्याची बहीण मेरी ही गादीवर बसली.

पहिली मेरी.

(इ. स. १५५३-१५५८).

मेरी राज्यारूढ होण्याचे अगोदर नार्थंबर्लंडचा ड्यूक, डड्ले, यानें आपल्या सुनेस (लेडी जेन ग्रे) राज्याभिषेक करविण्याचें ठरवून तिला टावर एथें आणून ठेविलें होतें. कारण ज्यांना राज्याभिषेक व्हावयाचा असतो त्यांना तेथ कांहीं दिवस राहावें लागे. दुसरे दिवशीं मेरीचे वारसाबद्दल पत्र येऊन सुधारकांत मोठी चळवळ सुरू झाली. कारण ती रोमन कथालिक होती. तिच्या मित्रांनीं व अनुयायांनीं तत्काळ जमून तिच्या नांवाची द्वाही फिरविली, आणि ४०,००० लोकांनिशीं लंडनावर स्वारी केली. जेन ग्रे हिनें तत्काळ राजिनामा दिला; कारण तें बनावीचें कृत्य तिला आवडलें नाहीं. फक्त सासऱ्याचे आग्रहास्तवच ती टावर एथें आली होती. मेरीनें लागलीच, जेन ग्रे, तिचा सासरा, नार्थंबर्लंडचा ड्यूक, आणि तिचा भवरा यांस टावर एथें कैद करून पाठविलें, आणि पोपाचे मताचे म्हणून पूर्वी कैदेत टाकिलेले नार्फकचा ड्यूक, बिशप गार्डिनर, इत्यादिकांस मुक्त करून नार्थंबर्लंडचे ड्यूकावर राजद्रोही पणाचा दोष ठेवून त्याचा शिरच्छेद करविला. जेन ग्रे ही नऊ दिवस राज्यावर होती. तिनें राजिनामा दिल्यावर ती मोठ्या

खुषीनें आपल्या घरीं जाऊन राहिली. मेरी मोठी करमठ कयाथलिक होती म्हणून तिचें बापानें व भावानें केलेले धर्मासंबंधीं कायदे व नियम तिनें रद्द करून देवळांतील उपासना लयाटिन भाषेंत सुरू केली, गार्डिनर यास मुख्य खजिनदार केलें आणि जर्मनीचे बादशहाकडील मंत्री रेनाल्ड यास तिनें आपला मंत्री केलें. त्याचे मनांत मेरीचें लग्न स्पेनचा राजा फिलिप याजबरोबर करावें असें होतें. वधुवरांची वयें ३८ व २७ अनुक्रमें होतीं. तें लग्न इ.स. १५५४ त झालें. परंतु तें कोणासही पसंत पडलें नाहीं. त्या योगानें उघड बंडाळी माजली व तींत सर थामस व्याट हा मुख्य होता. नार्फकच्या अर्लानें ती बंडाची मोडिली नसती तर मेरीला देशांतून हांकून लावण्याची खटपट झाली होती. कारण मेरीचा नवरा मेरीशीं कधींही प्रेमानें वागला नाहीं. तो हट्टी, खुनशी, निष्काळजी, प्राटेस्टंट मताचा द्वेषी, विसराळू व बेपरवा असा होता, आणि मेरी कोणत्याही रीतीनें मोहक नसून चतुरही नव्हती.

त्या बंडाचे पुढारी म्हणून लेडी जन ग्रे, व्याट आणि समर सेट यांचा व दुसऱ्या साथ्यांचा एके दिवशीं शिरच्छेद करून तीं शिरें कांट्यांना अडकवून रस्त्यांत जागजागीं ठेवलीं होतीं. ज्या दिवशीं सोमवार होता म्हणून त्यास ब्लाकमंडे (कृष्ण सोमवार) हें नांव पडलें आहे. त्या बंडांत इलिझाबेथचें आंग आहे अस कळून तिला ही तिच्या घरून पकडून आणून शिरच्छेद करण्याविषयीं हुकूम सुटला होता; परंतु ती अजारी पाहून तिला नेण्याचें कोणासही धैर्य झालें नाहीं, म्हणून ती वांचली. सन १५५५ त तिनें प्राटेस्टंट लोकांचा पाटलाग आणखी सुरू केला. त्यांत पुरुष, बायका व मुलें मिळून सुमारें ३० आसामी जिवंत जाळिले. त्यांत रिडले, लयाटिमर, क्रान्मर हूपर आणि जॉन राजर्स हे प्रमुख होते. निर्दयपणाचे कृत्यावरून तिला लोकीं मेरी

(घातुक मेरी) हें नांव पडलें आहे. तिनें कार्डिनल कोल यास कयांटरबरीचा मुख्य अधिकारी केलें होतें व त्याचा तिला मुख्य आंश्रय होता. सन १५५७ त स्पेनचा राजा फिलिप हा फ्रान्साशीं युद्ध करावयाच्या कामांत साह्य होण्याकरितां मेरीस विचारावयास इंग्लंड एथें आला होता. तिनें साहाय्य केलें, व सेंटकेंटिन एथें त्यास जयही मिळाला, परंतु कयाले बंदर इंग्लिशांकडे सुमारें २०० वर्षें होतें तें फ्रेंचांनीं स० १५५८ त मेरी पासून हिसकावून घेतलें. ह्या नुकसानीबद्दल सर्व राष्ट्रास फारच वाईट वाटलें व त्याच खेदानें मेरीचाही शेवट त्याच वर्षीं झाला. तिच्या मागून तिच्या बापाच्या वारसपत्त्राप्रमाणें तिची सावत्र बहीण इलिजाबेथ ही गादीची मालक झाली. मेरीची कारकीर्द इंग्लंडाचे बखरींत इंग्लिशांस काळिमा लावणारी झाली. तिच्यायोगानें राष्ट्राचें व देशाचें कांहीइतकें हित न होतां अतिशय नुकसान मात्र झालें.

इलिजाबेथ.

(इ. स. १५५८-१६०३).

ही राणी ग्रेनिज एथें जन्मली होती. ती २५ वे वर्षी राज्यारूढ झाली. ती मोठी शहाणी व प्राटेस्टंट मताची असल्यामुळें ती राणी झाल्याबद्दल लोकांना मोठा आनंद झाला. तिनें आपल्या बहिणीचेच मंत्री कायम करून त्यांस धर्मसंबंधी मतांचें समतोलन होण्याकरितां सर निकोलस बेकन व सर उइलियम सेसिल हे प्राटेस्टंट मताचे आणखी दोन नवीन मंत्री नेमिले. आपल्या बहिणीनें ज्यांस हांकून दिलें होतें त्यांस तिनें परत बोलाविलें, व ज्यांस धर्म संबंधानें कैदेत टाकिलें होतें त्यांस मुक्त केलें. तिच्या विरुद्ध जो कोणी वागे त्याला ती क्षमा करीत असे.

स्काटलंडची राणी मेरी हिचें लग्न फ्रेंच राजपुत्राशीं झालें होतें. तो अल्प वयांतच मेल्यामुळें त्या विधवेला कोणाचा आधार नाहींसा होऊन ती माहेरींच येऊन राहिली होती. ती कथालिक धर्माची असल्यामुळें ती राणी स्कॉच प्रजेस भावली नाहीं. तिनें तशींच सात वर्षें मोठ्या हालांत काढिलीं. शेवटीं ती पदच्युत होऊन इलिजाबेथ राणीस शरण आली. इलिजाबेथ अनौरस ठरविली आहे म्हणून इंग्लंडावर माझा हक्क आहे, असें म्हणणाऱ्या त्या मेरीला इलिजाबेथ राणीनें टावर एथें १८ वर्षें कैदेंत ठेविलें होतें. त्या मुदतींत तिला सोडविण्याविषयीं तिचा पुत्र व मित्र यांनीं पुष्कळ धाकदपटशा देऊन जे यत्न केले त्यांत आंटनी बाबिंग्टन यानें इलिजाबेथ राणीला मारून त्या मेरीला इंग्लंडचें राज्यावर बसवावें, अशा उद्देशानें एक कट केला होता. तो उघडकीस येऊन त्यांत मेरीचें अनुमत होतें असें तिच्यावर शाबीत झाल्यावर तिचा फादरिंगे किल्यांत सन १५९७ सालीं शिरच्छेद केला. तिच्या बरोबर आणखी १४ जणांचे राजद्रोहाबद्दल प्राण गेले. पुढें त्या कृत्याबद्दल इलिजाबेथ राणीला फार वाईट वाटलें, परंतु उपयोग काय? तो कलंक तिच्या नांवास लागला तो लागलाच.

मेरी राणी मेल्यावर स्पेनचा राजा दुसरा फिलिप यानें इलिजाबेथ राणीस लग्न करण्याविषयीं विचारिलें; परंतु तो कथालिक असल्यामुळें तिनें तें पतकरिलें नाहीं. त्याचा सूड उगविण्याकरितां व इंग्लंडांत कथालिक धर्माचा प्रसार करण्याकरितां फिलिप राजानें २०,००० सैन्य जमवून १३० लढाऊ जहाजांनिशीं इंग्लंडावर स्वारी केली. फ्लांडर्स एथें ४०,००० सैन्य असें तयार ठेविलें होतें कीं, थोडकी सूचना पोंचताच तें इंग्लंडावर रवाना करितां येईल. त्या मोहिमेंत

फिलिप राजास जय खास येतो असें वाटून त्यानें ल्या आरमारास **अजिंक्य आरमार** हें नांव ठेविलें होतें. **इंग्लिशांकडे** ३० लहान जहाजांचें आरमार व त्यावर **ड्रेक, हावर्ड, हाकिन्स,** आणि **फ्राबिशर** हे नामांकित खलाशी होते. १४० जहाजें किनाऱ्याचे संरक्षणार्थ पाठविलीं होतीं. **कालेे** बंदरापाशीं लढाई जुंपून शत्रूचें अतिशय नुकसान झालें (१५८८). त्यांचीं बहुतेक जहानें फुटलीं, जळालीं व बुडालीं. तात्पर्य, अजिंक्य आरमाराची हकीकत सांगण्यास कचित् माणसें स्वदेशास परत गेलीं असावीं. **इंग्लिश** जहाजें त्यांच्या मागें लागलींच होतीं. पुढें **इंग्लिशांनीं केडीज** हें शहर हस्तगत करून घेतलें, परंतु **फिलिप** सन १५९८ त मेल्यामुळें पुढील जास्त प्रयत्न बंद झाले.

इलिजाबेथ राणीचे जरी लग्न झालें नव्हतें तरी दरबारांत तिची प्रीतिपात्रें पुष्कळ होतीं. तिच्या झातारपणीं **एसेक्स**चा **अर्ल** हा तिचा शेवटचा दोस्त होता. त्याला **आयर्लंडांत** झालेलें बंड मोडण्याकरितां सन १५९९ त पाठविलें असतां तो परवानगीशिवाय कसा तरी तह करून परत आला म्हणून त्यास कायदा मोडल्याबद्दल शिक्षा देऊन कामावरून दूर केलें; परंतु **इलिजाबेथ** राणीनें त्याचा अपराध माफ करून त्यास पुन्हां कामावर नेमिलें. इ. स. १६०१त त्यानें राणीशीं बंड केलें होतें म्हणून त्यास शिरच्छेदाची शिक्षा ठरविली होती. त्याला राणीनें खूण म्हणून एक आंगठी दिली होती, व सांगून ठेविलें होतें कीं, कधीं कांहीं अवघड प्रसंग आल्यास ती आंगठी मजकडे पाठवावी म्हणजे सुटका होईल. जेव्हां त्यास देहान्त शिक्षा झाली तेव्हां ती आंगठी त्यानें राणीकडे एका वाईसरोबर पाठविली. त्या वाईचा नवरा **एसेक्स**चे अर्लाचा शत्रु होता, यामुळें त्यानें ती आंगठी राणीकडे पोचवूं दिली नाहीं. ती पोंचती

तर तो खचित वांचता. कारण, पुढें आंगठी न पोंचविणारी बाई अजारी पडून मरणोन्मुख झाली तेव्हां ती आंगठी न पोंचविल्याचा गुन्हा तिनें राणीशीं कबूल करून त्याबद्दल तिची माफी मागितली. तेव्हां राणीनें उत्तर दिलें कीं या अपराधाबद्दल देव दया करील तर करो, परंतु मी तुला क्षमा करणार नाहीं. राणी ह्या एसेक्सच्या मरणाबद्दल शोक करीत अजारी पडून १० स० १६०३ त मरण पावली.

कानूमर यानें लिहून ठेविलेली ३१ कलमें इलिजाबेथच्या कारकीर्दीत प्रार्थनेच्या पुस्तकांत घातलीं व धर्माचें सध्यांचें स्वरूप तें बेअेस सुद झालें. **आक्ट** आफ **सुप्रिमसि** (वर्चस्वाचा कायदा) व **आक्ट** आफ **कन्फार्मिटि** (सारूप्याचा कायदा) हे दोन मंजूर झाले. पहिल्या कायद्यान्वयें राजा हा धर्माध्यक्ष आहे आणि इंग्लंडांत परदेशीय धर्माध्यक्षाचा किंवा राजाचा अधिकार नाहीं अशी प्रत्येक सरकारी नोकरास शपथपूर्वक प्रतिज्ञा करावी लागे; आणि दुसऱ्या कायद्याअन्वयें सर्व लोकांनीं धर्म खात्यानें घालून दिलेल्या नमुन्याप्रमाणेंच ईश्वराराधना केली पाहिजे, असें ठरविलें होतें. ह्या दोन कायद्यांनीं मोठा प्रळय करून सोडिला. क्याथलिकपंथाचे शेंकडो लोक मारिले गेले, आणि प्युरिटन (संस्कार, तंत्रें, उत्साह हे व्यर्थ आहेत असें म्हणणारे) लोकांस दंड किंवा कैद मिळाली.

इलिजाबेथच्या कारकीर्दीत **फ्रान्सिस ड्रेक** यानें इ. स. १५८० पासून ८३ पर्यंत तीन वर्षांत पृथ्वीप्रदक्षिणा केली. **डच** (हालंडच्या) लोकांनीं **चिनाहून** चहा आणि **सर वाल्टर राले** यानें **टोबागो** बेटांतून तंबाखू आणिली. **स्पेनशांतील** घड्याळें **जर्मनींतून** व दुर्बिणी **हालंडांतून** आणिल्या. देव मासा व कासमासा यांची शिकार सुरू झाली. **बर्मिंगहाम** आणि **शेफील्ड**

ह्यां ठिकाणें धातूंच्या व शिकलगिरीच्या कामांत प्रसिद्धीस आलीं. **मांचेस्टर** एथील सुती कारखाने प्रसिद्धीस आले. तागाच्या चित्र-ध्यांचे कागद निघाले. **मर्क्युरि** नांवाचें वर्तमानपत्र पहिलें निघालें. **बोमंट, हुकर, फ्लेचर, फोई,** हे ग्रंथकार, **शेक्सपियर** आणि **स्पेन्सर** हे पद्य कवि, **लार्ड बेकन** हा मोठा तत्वज्ञानी व विद्वान् गृहस्थ आणि **जान नाक्स** हा **स्काट्लंडां**तील सुधारक इत्यादि इत्याच कारकीर्दीत उदयास आले. इतर देशांत **प्राटेस्टंट** लोकांचा पाठलग झाल्यामुळें त्यांस **इंग्लंड** एथें आधार मिळून **इंग्लंड**चें मोठें कल्याण झालें. कारण, नाना कला जाणणारे कारागीर **इंग्लंड**ांत येऊन राहिले, व त्यांनीं **इंग्लिश**ांस पुष्कळ कामें शिकविलीं. रेशमी पायमोचे राणीनें प्रथम वापरले. ह्या वरील सर्व गोष्टींवरून ह्या कालीं **इंग्लंड** देश विद्येचें व कलांचें माहेर घर झालें होतें, असें झटलें तरी चालेल. तिनें नाण्याची व आरमाराची दुरुस्ती केली. **ईस्टइंडिया** कंपनीस १ ली सनद इच्या-पासूनच मिळाली.

इलिजाबेथ राणी **ट्यूडर** या जुलमी घराण्यांतील शेवटली होती. सातवा **हेन्री** कावेबाज व जुलमी होता, आठवा **हेन्री** कडवा व लहरी होता, साहवा **एडवर्ड** हा आपलें खरें स्वरूप दाखविण्यापूर्वीच मरण पावला, **मेरी** राणी द्वेष्य, निर्दय व धर्मवेडी होती आणि **इलिजाबेथ** कपटी आणि स्वतंत्र होती. तिचे मागून **स्काट्लंड**चे **मेरी**चा मुलगा ६ वा **जेम्स** हा पहिला **जेम्स** या नांवानें इंग्लंडचे गादीवर बसला.

ट्यूडरांचे कारकीर्दीत **इंग्लंड**ास मोठेपणा व सामर्थ्य बहुत आलें. विद्येचा प्रसार पुष्कळ झाला. व्यापारास उत्तेजन मिळालें. **ग्रहजीनिया** वगैरे वसाहती व कित्येक ठिकाणांचा नवीन शोध याच कारकीर्दीत लागला.

ट्यूडर वंश विस्तार.

सातवा हेन्री १४८५—१५०९.

मार्गरेट स्काट्लंडचा राजा ४ था जेम्स याशी विवाह दिली.

अरथर (१५०२ मेला)

आठवा हेन्री १५०९–१५४७

मेरी प्रथम, फ्रान्साचा राजा १२ लुई याशी दिली.

मेरी १५५३–८

इलिजाबेथ १५५८–१६०३

सहावा एडवर्ड १५४७–५३

पांचवा जेम्स

स्काट लोकांची राणी मेरी

स्काट्लंडचा राजा सहावा जेम्स, तोच इंग्लंडचा राजा पहिला जेम्स १६०३ मध्ये झाला.

सुसन्यांकॉ ग्रीन्डनचा अर्ल व डयूक याशी दिली.

डार्सेटची कौन्टेस फ्रान्सिस

लेडी जेन ग्रे. १५५३

ट्यूडरकारकीर्दीतील मुख्य गोष्टी.

१४८५ सातवा हेन्री राज्यारूढ झाला.

१४८७ स्टोक एथील लढाई, सिम्नेल याचा पराजय.

१४९६ वारिकच्या अर्लांचा शिरच्छेद.

१४९७ ब्लाकहीथ एथील लढाई.

१४९७ वास्को डि गामानें हिंदुस्थानचा मार्ग शोधून काढिला.

१४९९ परकिन वारबेक यास फांशी दिलें.

१५०९ सातवे हेन्रीचा मृत्यु.

१५१३ फ्रेंचांबरोबर गिनिगेट एथें टांचांच्या कांठ्यांची लढाई, हेन्रीस जय.

१५१३ स्काचांबरोबर फ्लाडन फील्ड एथें लढाई.
१५२० फ्रान्स एथें आठवे हेन्रीस व फ्रांथ आफ गोल्ड (भरजरीचा दरबार).
१५३० कार्डिनल उलसीचा मृत्यु.
१५३३ कांथराईनला काडीमोडून देऊन आनबोलिन बायको केली.
१५३६ आन बोलिनचा शिरच्छेद व जेन सिमूरशी लग्न.
१५३७ जेन सिमूरचा मृत्यु व क्लीव्हच्या आनेशीं लग्न.
१५४० कांथराइन हावर्ड इशीं लग्न व आनेला कैद.
१५४२ हाल्डिडनहिल एथें इंग्लिशांचा अपजय.
१५४६ कांथराइन हावर्डचा शिरच्छेद व कांथराइन पार-इशीं लग्न.
१५४७ आठवे हेन्रीचा मृत्यु व सहावा एडवर्ड राजा झाला.
१५४७ पिंकी एथील स्काच लोकांबरोबर लढाई.
१५५२ नार्थंबर्लंड याचा शिरच्छेद.
१५५३ सहावे एडवर्डाचा मृत्यु.
१५५४ मेरीचें लग्न स्पेनच्या राजाशीं झालें.
१५५७ सेंटक्वेंटिन एथील फ्रेंच व स्पानियार्ड यांची लढाई.
१५५८ कयाले बंदर फ्रेंचांनीं परत हिसकावून घेतलें.
१५५८ मेरीचा मृत्यु व एलिजाबेथ राणी झाली.
१५८८ अर्मिक्य आरमाराचा पराभव व इंग्लिश विजयी.
१५८०-१ फ्रांसिस ड्रेक यानें पृथ्वी प्रदक्षिणा केली.
१६०० ईस्ट इंडिया कंपनीस व्यापाराची सनद मिळाली.
१६०१ एसेक्सच्या अर्लाचा शिरच्छेद.
१६०३ एलिजाबेथचा मृत्यु व पहिला जेम्स राजा झाला.

सहावा भाग.

पहिली स्टयुअर्ट कारकीर्द, लोकसत्ता व दुसरी स्टयुअर्ट कारकीर्द.

१६०३—१७१४.

प्रकरण पहिलें.

पहिली स्टयुअर्ट कारकीर्द व लोकसत्ता.

(सन १६०३—१६६०).

पहिला जेम्स १६०३-२५. पहिला चार्ल्स १६२५-४९.

लोकसत्ता १६४९-६०.

पहिला जेम्स.

(१६०३-१६२५).

जेम्स हा मूळ स्काट्लंडचा राजा होता. त्याची आई स्काट्लंडची राणी मेरी स्टयुअर्ट ही होती व बाप लार्ड डार्न्ले हा होता. आईचा बाप स्काट्लंडचा राजा ५ वा जेम्स हा होता. पांचवे जेम्साची आई सातव्या हेन्रीची मुलगी, मार्गरेट ही होती. म्हणजे, जेम्स हा सातव्या हेन्री-च्या मार्गरेट मुलीचा पणतू होता. एलिजाबेथ मेल्यावर तिचा जवळचा दुसरा कोणी वारस नाहीं असें पाहून पार्लमेंट सभेनें स्काट्लंडच्या राजाला पहिला जेम्स या नांवानें इंग्लंडचे गादीवर बसविलें. त्या वेळेस त्याचे वय ३७ वर्षांचें होतें. तो एडिंबरो एथें सन १५९६ त जन्मला होता.

अरावेला स्टयुअर्ट ही एक सातवे हेन्रीची निपणती होती. तिला इंग्लंडचे गादीवर बसवावें म्हणून सर वाल्टर राले व लार्ड कोब हाम इत्यादि मंडळीनें कट केला होता. तो

फट सघडकीस येऊन बंड वाल्यांना मरण्याची शिक्षा मिळाली; परंतु सर राले याची देहांत शिक्षा कांहीं महत्त्वाच्या कारणानें महकूब होऊन त्यास १३ वर्षें कैदेंत ठेविलें होतें. त्या मुदतींत त्यानें जो जगाचा इतिहास लिहिला, तो अद्याप लोकांच्या वाचण्यांत येत आहे. लेडी अरावेला, ही हियरफर्डाचे अर्लाचे नातवास दिली होती म्हणून तिला टाघर एथें कैदेंत ठेविलें होतें. लेडी अरावेला ही १६१५ त मेल्यावर सर राले यास अमेरिकेंत सोन्याची खाण शोधून देण्याचे कबुलायतीवर मुक्त केलें होतें; परंतु स्पॅन्यार्डस लोकांवरोबर भांडतां कामा नये असें त्यापासून कबूल करून घेतलें होतें. तें काम त्यास न साधल्यामुळें तो इंग्लंडास परत आला. स्पेन देशची राजकन्या जेम्स राजाचा मुलगा चार्लस यास मिळावी म्हणून स्पेनचे राजास खुष करण्याकरितां रालीनें स्पॅन्यार्डांना गवाक्षमार्ग एथें विनाकारण उपद्रव दिला असा त्यावर आरोप ठेवून त्याला पुन्हां कैद केलें व पूर्वीची रद्द केलेली देहांत शिक्षा त्यास इ. स. १६१९ त दिली. ती लग्नाची खटपट स. १६२३ पर्यंत चालू होती. शेवटीं जेम्स हा काथलिकांविषयींचे कायदे रद्द करीत नाहीं असें पाहून स्पेनच्या राजानें ती मुलगी या राजपुत्रास देण्याचे नाकारिलें. नंतर चार्लसाचें लग्न फ्रेंच राजकन्या हेन्रिएटा इशीं झालें.

जेम्स राजा प्रथम रोमन कॅथलिक होता म्हणून त्या पंथाच्या लोकांस तो राजा झाल्याबद्दल फार आनंद झाला, परंतु तो इंग्लंडाचा राजा होतांच त्यानें आपला पूर्वपंथ सोडून देऊन तो प्राटेस्टंट झाला तेव्हां, कॅथलिकी, डिग्बी, ट्रेशम आणि फाक्स यांची निराशा होऊन ते, राजा व पार्लमेन्टांतील सभासद एकत्र जमले असतां त्यांचा नाश करण्याविषयीं १६०५ त उद्योग करूं लागले. पार्लमेंटाच्या गृहा-

खालील तळघरें भाड्यानें घेऊन त्यांत त्यांनीं उडवावयाच्या दारू-चीं पिपें आणून ठेविलीं. तीं प्रसंगवशात् दिसतील म्हणून त्यांवर कोळसे व जळाऊ लाकडें झांकण घालून ते सभा भरण्याची वाट पहात होते. दारूच्या पिपांस आग लावून सभेची इमारत एक-दम उडवावी असा त्यांचा उद्देश होता, व तें काम करण्याकरितां गायफाक्स खास नेमिलें होतें. त्या कटांतील ट्रेशामची बहीण म्हा सभासदांतील लार्ड मांटीगल खास दिली होती. मांटीगल याचा जीव वांचविण्याकरितां त्याच्या मेहुण्यानें त्यास सभा भर-ण्याच्या दिवशीं आपण जाऊं नये सभासदांवर मोठा अनर्थ अवचित गुदरणार आहे अशा अर्थाचे पत्र हिहिलें होतें. त्या पत्राचा अर्थ मांटीगल यास न कळून त्यानें तें पत्र राजास दाखविलें. राजाचा बाप असाच दारूच्या योगानें अवचित मेला होता. ती गोष्ट त्यांचे लक्षांत येऊन त्यानें सभास्थाना खालील कोठे, तळघरें वगैरे बार-काईनें तपासण्याविषयीं हुकूम दिला व त्या दिवशीं सभेस कोणी येऊं नये म्हणून गुप्तहेर सर्वांच्या घरीं पाठविले होते. बहुतेक तळघरें व कोठारें तपासलीं, परंतु त्यांत कांहीं आढळलें नाहीं. एका तळ घरास मात्र कुलूप होतें म्हणून सभा भरण्याचे वेळेस (रात्रीं २ वाजतां) तें कुलूप काढण्यास कोणी येतो कीं काय तें पाहण्याक-रितां कांहीं हत्यारबंद शिपाई लपून राहिले होते. गायफाक्स, दोन वाजण्याच्या सुमारास संकेताप्रमाणें एक अंधक कंदील हातांत घेऊन आला, व कुलपांत किल्ली घालतो तों शिपायांनीं त्यास पकडून त्या तळघराचें कुलूप काढून पाहिलें तों, दारू वगैरे सर्व शीघ्रज्वालाग्राही पदार्थांची व त्यांस एकदम पेठ-विण्याची पूर्ण तयारी करून ठेविली आहे, व बत्ती देण्याचा मात्र अवकाश राहिला आहे असें कळलें. याप्रमाणें १६०५ त राजा आणि सभासद यांचे भयंकर मृत्यूपासून प्राण वाचले. त्या

कट १: बंदुकीच्या दारूचा कट असें ह्मणतात. गायफाक्सचे हाल हाल केले, परंतु त्यानें त्या कटांतील मंडळीचीं नांवें कळंविलीं नाहींत. तथापि तो पकडल्याची बातमी पसरल्यावर त्यांतील पुढारी लोकांनीं **बारिक** आणि **डार्सेट** प्रांतांतील लोकांस बंड करण्याविषयीं उत्तेजन दिलें. त्या उद्योगाची परिस्फुटता झाल्यामुळें ते पकडले जाऊन त्यांस देहांत शिक्षा मिळाली. त्यांतील बहुतेक लोक **रोमन क्याथलिक** धर्माचे होते. ह्मणून **जेम्स** राजानें त्यांविषयीं फारच कडक कायदे केले होते. त्या लोकांना वैद्य किंवा वकील किंवा **लंडनांतील** रहिवासी होण्यास परवानगी नव्हती. कोणी त्यांचें घर फोडिलें किंवा लुटलें तर त्याकडे सरकारानें बरेंच दुर्लक्ष्य असे.

जेम्स राजाची मुलगी **इलिजाबेथ** ही **जर्मन** देशांतील **फ्रेडारिक** या संस्थानिकास दिली होती. त्या संस्थानिकास तेथील रयतेनें **बोहेमिया** संस्थानचा राजा केलें होतें. परंतु तो **जर्मनीचे** बादशाहाचें ऐकेना ह्मणून बादशाहानें त्यास **प्रेग** एथें सन १६१९ त जिंकून त्याचें नवीन राज्य व पूर्वीचे संस्थान त्यापासून हिरावून घेऊन त्यास **हालंड** एथें हांकून लाविलें. **जेम्स** राजानें त्यास मदत पाठविली, परंतु तिचा त्यास कांहीं उपयोग झाला नाहीं. **जेम्स** राजाचा मुख्य मंत्री प्रथम **राबर्ट सेसिल** हा होता. तो मेल्यावर **जेम्स** राजा व पार्लमेन्ट यांचें भांडण लागलें. **सेसिलचे** जागेवर **समरसेट**चा **अर्ल, कार,** हा सन १६१२ त मुख्य मंत्री झाला. तो सुज्ञ व विचारी असून राज घराण्यांतील एक पुरुष होता. **सर थामस ओव्हरबरी** यास विष घातल्याचा आरोप त्यावर शाबीत होऊन त्यास कामावरून दूर केलें. त्यावर त्याचे जागीं **जार्ज व्हिलियर्स** यास नेमून त्यास **बाकिंगह्यामचा** ड्यूक केलें होतें. तो अगदीं नीच कुळांतला

होता. याप्रमाणें नीच कुळांतील लोकांची संगति राजास लागून त्यामुळें त्याविषयीं प्रजेंत अप्रेम व द्वेष वाढूं लागला. लार्ड बेकन यावर लांचाचा आरोप येऊन त्यास ४०,००० पौंड दंड व कैदेची शिक्षा झाली होती. परंतु त्याच्या त्या दोन्ही शिक्षा त्याच्या गुणांकरितां कांहीं दिवसांनीं त्यास माफ होऊन त्यास वर्षाचे १,००० पौंड पेनशन करून दिलें होतें.

जेम्स राजाचे कारकीर्दीत सन १६११ त सध्यांचे इंग्रजी बायबल तयार झालें. तें सन १६०५ पासून ३ वर्षें तयार होत होतें. तें तयार करण्यास ४७ धर्माधिकारी ठेविले होते. आयर्लंडांत अलस्टर एथें एक इंग्लिश वसाहत केली, व त्या वसाहतीच्या संरक्षणार्थ पैसा उभारण्या करितां बारोनेट ही एक नवीन पदवी उत्पन्न केली. ती पदवी मिळविण्याला सरकारांत १,००० पौंड भरावे लागत. सन १६०७ त व्हर्जिनिया एथें वसाहत झाली. तांब्याची नाणीं त्याच्याच कारकीर्दीत वहिवाटींत आलीं. सन १६०९ सालीं हार्वे या विद्वानानें रक्ताभिसरणाचा शोध लाविला. ईस्ट इंडिया कंपनिस ईलीजाबेथ राणीनें सन १६,०० मध्यें दिलेले सनदेची दुरुस्ती सन १६०९ त झाली. सन १६१० मध्यें न्यू फौन्डलंड एथें वसाहत करण्याची सनद मिळाली. सुरत एथें व जावा आणि सुमात्रा या बेटांत व्यापाराकरितां १६११ त स्त्रा-च्या केल्या. त्याच सालीं इराणचे बादशाहाकडे सर थामस बेर्ली हा वकील पाठविला. सन १६१४ त लागर्थम्स नांवाची गणितपद्धति नेपियर यानें शोधून काढिली. सन १६१५ त मोगल बादशाहाकडे आग्रा एथें सर टामस रो झणून वकील पाठविला. हक्क मागण्याचा किंवा कबूल करण्याचा कामन लोकांचा व्यवहार प्रत्यक्ष राजाशीं जोरानें सुरू झाला. न्यूयार्क एथें घोड्यांच्या शर्यतींची सुरुवात झाली. सन १६१८ मध्यें तीस वर्षांच्या

युद्धाची सुरुवात झाली. सन १६२३ त चार्ल्स हा राजपुत्र बकिंगहामच्या ड्यूकाबरोबर वेषांतरानें महाद्वीपांत गेला होता. तेथें पारीस शहरांत चवथ्या हेन्रीची मुलगी हेन्रीएटा इची गांठ पडून तिशीं त्यानें पुढें लग्न लावलें.

जेम्स राजा सन १६२५ त हिंवतापानें मरण पावला. तो चांगला शिकलेला होता, परंतु फार अभिमानी असे. त्याचा स्वभाव अगदी हलकट व मित्रा असा होता. त्याचें आचरण फारच चमत्कारिक व कंटाळवाणी होतें. तो मेला ते वेळेस त्यास एक मुलगा चार्ल्स व फ्रेडरिक यास दिलेली एक मुलगी होती. त्याचे माणून त्याचा मुलगा चार्ल्स हा गादीवर बसला.

पहिला चार्ल्स.

(सन १६२५-१६४९).

चार्ल्स राजा गादीवर बसला तेव्हां त्याचे वय २५ वर्षांचें होतें. तो डंफर्म्लाईन एथें जन्मला होता. त्याचें लग्न फ्रान्साचा राजा चवथा हेनरी याची मुलगी हेन्रिएटा मेरी इशीं झालें होतें. राज्यांतील मुख्य अधिकार मिळण्याचें बाबतींत राजा व पार्लमेन्ट यांचे तंटे सर्व कारकीर्दीभर चालले होते. त्याच्या सदाचरणानें तो लोकांस मोठा आवडता झाला होता, परंतु त्यास मिळालेल्या विद्येपासून त्यास फारच महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली होती, त्या मुळें त्यास भलताच परिणाम भोगावा लागला. सांगूं त्या प्रमाणें राज्यकारभार चालवावा, नाहींतर हवी ती दिशा धरावी, अशा पेचानें त्यास पार्लमेन्टनें जखडून टाकिलें होतें. राजाला एकदा लढाईचा प्रसंग आला होता तेव्हां त्यानें

पार्लमेन्टापाशीं कांहीं रकम मागितली. पार्लमेन्टानें त्यांतील दशांश देण्याचें कबूल केलें. तेव्हां राजानें ती सभा बंद करून लोकांकडून बेनिव्होलेन्स (परोपकार) नांवाचें कर्ज सन १६२५ त जुलमानें काढिलें. नंतर नवी पार्लमेन्ट भरून मन:पूत वागण्याच्या कचेऱ्या स्थापन केल्या. नंतर द्रव्याची गोष्ट सोडून देऊन राजानें बकिंगह्याम या मंत्र्यास दोषी ठरविण्याकरितां तीहि सभा बंद करून बेकायदा कर बसविण्याचें योजिलें. सन १६२७ त फ्रान्साचे किनारीं लारा बेटी या बंदरीं राहणाऱ्या प्युरिटन लोकांस फ्रेंचांनीं दिलेला वेढा उठविण्याकरितां बकिंगह्यामा कडून स्वारी करविली. पहिला प्रयत्न फुकट जाऊन दुसऱ्यांदां लढत असतां फेल्टन यानकडून तो मारला गेला नंतर राजानें फ्रान्साशीं तह केला. पुढें तिसरी सभा भरविली. तिनें पिटिशन आफ राईट्स (पाहिजे त्याला फिर्याद करण्याच्या हक्काचा कायदा) कबूल केल्याशिवाय मागितलेली रकम मिळणार नाहीं म्हणून सांगितलें. तेव्हां त्यानें मोठ्या थाटानें व गंभीरपणानें परंतु नाखुषीनें, तो हक्काचा कायदा सन १६२९ त मंजूर केला. तो कायदा ब्रिटिश राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा दुसरा कायदा होता. त्या कायद्यानें पार्लमेंटाच्या सल्ल्याशिवाय प्रजेपासून कोणत्याही रीतीनें पैसा वसूल करणें, शिपायांस भलत्याच्या घरांत शिरूं देणें, कोणास बेकायदा कैद करणें, किंवा सैन्याचा कायदा एकाएकीं कोणास लागू करणें, इत्यादि गोष्टींचा राजास प्रतिबंध झाला. तो प्रतिबंध जेमतेम एक महिना चालला न चालला तों राजानें तो कायदा मोडण्याबद्दल मोठा तंटा उत्पन्न झाला. तो होतांच राजानें ती सभा बंद केली, आणि त्यांतील नामांकित अशा नऊ सभासदांस कैद करून तुरुंगांत पाठविलें. त्यांत सर जान ईलियट हा होता.

सन १६२९ ते १६४० पर्यंत पार्लमेंट सभा बिलकूल भरली

नव्हती. या मुदतींत सरकारी वसुलाचीं कामें बेकायदा चाललीं होतीं आणि तुरुंगांत टाकलेल्या लोकांची दाद कोणी घेत नव्हतें. राजा पूर्ण मुखत्यारीनें वागत असे. त्याचे मुख्य मंत्री स्ट्राफर्डाचा अर्ल आणि कयांटरबरीचा बिशप लॉर्ड हे होते. लॉर्ड यानें धर्माच्या सुधारणेंत बदल करून पूर्वीच्या रोमन कॅथलिक धर्माकडे लोकांना वळण दिलें. त्यामुळें प्युरिटन्स (अति सुधारक) यांचा छळ होऊन त्यांचें चित्त अगदीं डवळून गेल्यामुळें त्यांना अखेरीस इंग्लंड सोडून अमेरिकेंत जाऊन नवीन वसाहती कराव्या लागल्या. त्यांना ते नवीन इंग्लंड असें म्हणत. न्यायाधीश मुलकी किंवा धर्मसंबंधी कायद्याविरुद्ध वागण्याकडे किंचित्ही कानाडोळा करीत नसत; परंतु स्टारचेंबर आणि हायकमिशन या कोर्टांत प्युरिटन लोकांविषयीं अनन्वित कायदे चालून त्यांचा पाठलाग होत असे. त्यांतील पहिलें कोर्ट राजकीय व दुसरें धर्मसंबंधी होतें. राजा तर जुलमी, स्वतंत्र आणि अन्यायी असून हवा त्यास दंड, शिरच्छेद आणि जाळणें या शिक्षा देत असे. त्या सर्व गोष्टींत न्यूनता म्हणून सैन्याची प्रतिकूलता होती. ती नसती तर इंग्लंडांत कहरच गुदरला असता.

जिकडेतिकडे शांतता असून विनाकारण आरमाराची व्यवस्था व वाढती करण्याकरितां शिपमनी (जाहाजाकरितां द्रव्य) म्हणून एक कर वेन्टवर्थ याच्या सल्लयानें बसविला (सन १६३४). हा कर पूर्वी लढाईच्या प्रसंगीं समुद्र किनाऱ्याच्या गांवांवर डेन्स लोक बसवीत असत. हा कर बसविला तेव्हां सर्व लोक चवताळून जाऊन सरकारची बंदी होई तो पर्यंत बहुतेक प्युरिटन लोक अमेरिकेस निघून गेले. कांहीं लोकांस जाहाजांवरून परत आणिलें. त्यांत जान हाम्पडन आणि आलिव्हर

क्रामवेल हे नामांकित गृहस्थ होते. ह्यांपडन हा तो कर बसविण्याचे बाबतींत मुख्य प्रतिबंधक होता. याच प्रसंगीं स्काट्लंडमध्येंही धर्म प्रकरणांत घोटाळा करून तिकडील प्रजाही चार्ल्स राजानें प्रतिकूळ करून घेतली होती. ह्या खटपटींत होते नव्हते तेव्हढें पैसे खर्च झाल्वावर त्यास पैशाकरितां सन १६४० त नवीन पार्लमेन्ट भरावी लागली. हिला लांग पार्लमेंट ह्मणतात. कारण ती २० वर्षे चालू होती. सभेनें पैसे मंजुर न करितां स्टाफर्डचा अर्ल वेन्टवर्थ यास राजद्रोही ठरवून सन १६४१ त त्यास शिरच्छेदाची शिक्षा देवविली. सन १६४५ त आयर्लंड एथें प्राटेस्टंट लोकांची कत्तल होऊन चाळीस हजार लोकांची प्राणहानि झाली. कामन सभेंतील सभासद पिम, होलिस, हॅम्पडन प्रभृतिमंडळासि राजद्रोही ठरविण्या करितां राजा स्वतः हत्यारबंद लोक घेऊन या सभेंत गेला होता. परंतु ते लोक अगोदरच निसटून परागंदा झाले होते. राजा जर तेथें अमळ त्रास देतां व दुसरे दिवशीं खवळलेल्या लंडनांत राहता तर त्यास कामन लोकांनीं कैदच केलें असतें. धर्माधिकारी, बडे लोक व गांवांतील बरेच गृहस्थ यांचें राजास साह्य होऊन त्याजजवळ १०,००० सैन्य जमा झालें. मोठमोठ्या शहरांतील लोकांचें साह्य पार्लमेंटास होऊन त्यांचेही बरेंच सैन्य जमलें. त्यावर एसेक्सचा अर्ल हा मुख्य होता याप्रमाणें जे दोन पक्ष झाले त्यांतलि राजपक्षाचे लोकांस क्याव्हेलियर्स आणि पार्लमेन्टच्या पक्षाच्या लोकांस राँड्हेड्ज ह्मणतात. त्याचलोकांस अनुक्रमें टोरीज आणि हुईग्ज हीं नांवें पुढें पडलीं.

दोन पक्षांची लढाई प्रथम सन १६४२ त एज्जहेल एथें झाली. त्याच वेळेस राजाचा भाचा इलेक्टर प्यालटाईनचा

मुलगा **रूपर्ट** हा राजसैन्याधिपति होता. त्यानें प्रथम नरीच तरवार गाजविली, परंतु सैन्याची फुटाफूट झाल्यामुळें त्यास खालीं पहावें लागलें. पुढें आणखीं एक वेळ त्याचा जय झाला, परंतु **मार्स्टन मूर** एथें सन १६४४ त त्याचा बराच मोड होऊन राजसैन्याचें फार नुकसान झालें. त्या लढाईंत शत्रूकडे क्रामवेल याची बहादरी झाली. पुढें दोघांची नेस्बी एथें सन १६४५ मध्यें चकमक झडून राजसैन्याचा पूर्ण पराभव झाला. त्या वेळेस पार्लमेन्टकडे **फेअर फाक्स** हा जरी सेनापति होता, तरी त्यावर क्रामवेलचें आधिपत्य होतेंच. राजा तोंड चुकवून **आक्स्फर्ड** एथें पळून जाऊन तेथें हिवाळाभर राहिला होता. हिवाळा सरतांच तो **न्यूयार्क** एथें गेला. स्कॉच लोकांकडून **इंडहेड** लोकांना मदत येत होती. ती राजनिष्ठ आहे असें जाणून राजानें त्यांचें साह्य मागितलें. तेव्हां त्यांनीं तुंबलेल पगार द्या, नाहींतर तुम्हांस पार्लमेन्टाचे स्वाधीन करूं असें उत्तर दिलें. राजाजवळ पैसा नव्हता झणून त्यास सन १६४६ त **स्कॉच** लोकांच्या स्वाधीन व्हावें लागलें. त्यांनीं राजास त्याच्या शत्रूच्या स्वाधीन केल्यावर त्यांनीं त्यास **होल्डनबी** किल्लयांत कैदेंत ठेविलें. तेथून त्यानें सुटून जाण्याची मसलत केली होती; परंतु तो सांपडला जाऊन त्यास **वाईट** नेटांतील **क्यारिसब्रूक** किल्लयांत सक्त नजरेखालीं कैदेंत राहवें लागलें.

जुन्या **पार्लमेन्टा**च्या मनांत भलतीच दांडगाई न करितां राजाच्या नांवानें राज्य चालवावें असें होतें; परंतु क्रामवेलच्या पक्षाच्या मनांत तसें नव्हतें. त्यानें आपणास मुख्य अधिकार मिळण्याकरितां हुशार, इमानी असे हत्यारबंद लोक **प्राईड** बरोबर देऊन त्यास सभेच्या दरवाजाप शीं उभें राहण्यास

सांगितलें, आणि हुकूम फरमाविला होता कीं, ज्यांना स्वतंत्रता पाहिजे असेल त्यांनीं आज सभेस जावें. चाळीस शिवाय करून सर्व सभासद परत गेले. या स्थितीस **प्राईडस् पर्ज** (प्राईड साहेबांचा बंदोबस्त) असें झणतात, व त्या शिलक राहिलेल्या ४० सभासदांस **रेप पार्लमेन्ट** झणतात. **क्रामवेल** यानें त्या चाळिसां मार्फत राजास देहांत शासन द्यावयाचें असा बेत करून एक न्यायाधीश नेमिला आणि त्या पुढें राजाची सात दिवस चौकशी करून तो राजा जुलमी, खुनी, व रयतेचा घातक, असें त्याजवर शाबीत करवून त्यास शिरच्छेदाची शिक्षा देवविली. त्याचा सन १६४९ त व्हा इट हाल वाज्यापुढें शिरच्छेद झाला. परंतु त्या शिरच्छेदानें **पार्लमेन्ट**पक्षाच्या लोकांची फार दुष्कीर्ति झाली. **चार्ल्स** राजाचे मरणानंतर **लोकसत्तात्मक** राज्य झालें व त्याचा मुख्य **क्रामवेल** हा झाला. राजास **चार्ल्स, जेम्स**, आणि **हेन्री** ह ३ मुलगे आणि एक मुलगी, **मेरी**, अशी चार मुलें होतीं. **मेरी** ही **ऑरेंज**चे राजास दिली होती. पुढें झालेला राजा तिसरा **उइलियम** हा तिचाच मुलागा होता.

पहिले **चार्ल्स**चे अंगीं राज्य चालविण्याचे बरेच गुण होते. तो बापापेक्षां हट्टी, धोरणी, मजबूतदार व कारस्थानी असा होता. त्याचा स्वभाव सभ्य होता व नीतिमान् होता. त्याच्या अविश्वासुकपणानें, महत्वाकांक्षेनें व हट्टीपणानें हीं संकटें त्यावर गुदरलीं, असें झणतात. **चार्ल्स** राजाचे कारकीर्दीत आठवड्यानें डाक जाण्याची सुरूवात झाली. **हालंडां**तून पुष्कळ रंगारी लोक इंग्लंडांत येऊन राहिले. कारण **चार्ल्स** राजास त्या कलेची फार आवड असे. **आयर्लंड**ांत तागानें कापड निघूं लागलें. लंडनांत महामारी उठून अतिशय प्राणहानि झाली. ती इतकी कीं प्रेतांचे ढिगांचेढीग पडून तीं पुरण्यास कोणास फुरसत नव्हती.

लोकसत्ता.

(सन १६४९-१६६०).

चार्ल्स राजास शिरच्छेदाची शिक्षा दिल्यावर राजपद व बडे लोकांची सभा यांस हरताळ लागला. कामन लोकांनीं राज्यकारभार आपले हातीं घेऊन तो चालविण्याकरितां ३८ सभासदांची एक सभा बनविली. तींत क्रामवेल व फेअरफाक्स हे सैन्याधिकारी, सर हेन्री व्हेन हा आरमाराचा अधिकारी, आणि ब्राड्शा हा मुख्य पंच, असे मुख्यकारभारी होते. आयर्लंडांत आरमंडचे अर्लानें चार्ल्स राजाचे थोरले मुलास दुसरा चार्ल्स असें नांव ठेवून तेथें त्यास राज्याभिषेक केला आणि अशी बंडम व्यवस्था केली कीं, तिच्यापुढें लोकसत्ताक मंडळींचें कांहींच चालेना. तेव्हां क्रामवेल यास आयर्लंडचा लार्डगव्हरनर हा अधिकार देऊन सभेने आयर्लंडांतील बंड मोडण्याकरितां सन १६४९ त तिकडे पाठविलें. त्यानें मोठ्या सैन्यानिशीं तिकडे जाऊन ड्रोघेडा, वेक्सफर्ड, रास, क्लान्मेल, कार्क आणि किन्सेल हीं गांवें सन १६५० त सर करून घेतलीं, आणि त्यांत सांपडेल त्या प्रत्येक मनुष्यास निर्दयतेने ठार मारिलें. याप्रमाणें क्रामवेल, त्या बेटांतील बंड मोडल्यावर आयर्टन यास तेथील जिंकण्याचें काम शेवटास नेण्याकरितां नेमून आपण स्काट्लंडास गेला. त्याच वर्षी चार्ल्स राजाचा एक शूर व उतावीळ नौकर, मान्ट्रो यानें स्काट्लंडांत येऊन केथनेस एथें राजपक्षीय लोकांचा बावटा उभारिला. पुढें चार्ल्साच्या पुत्रास स्काच लोकांनीं हालंडांतून बोलावून आणून त्यास स्कोन एथें दुसरा चार्ल्स या नांवानें राज्यभिषेक केल्यावर थोड्याच दिवसांत चार्ल्स यानें राजपक्षीय लोकांची बरीच जमवाजमव केली. क्रामवेल यास ती गोष्ट कळतांच त्यानें

ट्वीड नदी ओलांडून त्या सैन्याचा अधिपति लेस्ली इं-
बार एथें पराभव केला, आणि स्काट्लंडचे दक्षिण प्रांत
स्वाधीन करून घेतला. नंतर आपण इंग्लंडास ग पडतां
आपल्यास पुष्कळ साथी मिळतील आशा आशेनें चा जपु-
त्रानें कांहीं स्काच सैन्यानिशीं दक्षिणेकडे स्वारी परंतु
क्रामवेल यानें त्याचे मागोमाग जाऊन त्याचा उरफा मोड
करून टाकिला. पुढें तो राजपुत्र कांहीं दिवस वेषांत कांहीं
दिवस दडून राहून फान्स एथें निसटून जाण्याच्या होता.
परंतु क्रामवेलानें त्यास धरण्या करितां इतका केला
होता कीं, त्यांतून निसटून जाणें चार्ल्सराजास फार होतें.

क्रामवेल मोठा महत्त्वाकांक्षी होता. तो राजा-
त्कारें राजाच्या दास्या पासून लोकांस मुक्त करण्या पासून
झटत आहे, असें दाखवित होता तरी मनांतून पा काढून
सर्व अधिकार आपलेकडे काढून घेण्याविषयीं खटपट होता.
पार्लमेंट तें जाणून राजाचा सर्व अधिकार आपल्या ण्या-
विषयीं उपाय योजीत असे. त्यामुळें दोन्ही पक्षा सुरू
झाले. एकवेळ क्रामवेल हा ३०० हत्यारबंद निशीं
पार्लमेन्टसभागृहास गेला तेथें शिपायांस बाहेर उभें त्यांस
सांगून ठेविलें होतें कीं, पाय हापटलेला ऐकिल्या तुम्ही
एकदम आंत यावें. सभेंत वादाविवाद होतांहोतां चलनें
पाय हापटला, त्या बरोबर सज्ज शिपायी आंत शिर-
तांच क्रामवेल यानें सभासदांची पाहिजे तशी निर्भ केली
आणि मोठ्यानें ओरडून सांगितलें कीं, चला, निघा विशेष
प्रामाणिकांना जागा रिकामी करा. तुम्ही या उपर द्वे-
ष्यास उपयोगी नाहीं. चला, उठा लौकर, तुम्हां अगदीं
योग्य नाहीं. नंतर सर्व सभासद बाहेर गेल्यावर गृहास

कुलूप लावून व किल्ली आपले खिशांत ठेवून तो व्हाइट हाल एथें निघून गेला. याप्रमाणें लांग पार्लमेंट (फार दिवस चाललेली पार्लमेंट) स० १६५३ त बंद झाली. सभेशिवाय आपलें कांहीं चालणार नाहीं आणि सर्व अधिकार तर आपल्यास पाहिजे आहे, असें मनांत येऊन दोन्ही मतलब साधण्याकरितां क्रामवेलानें कांहीं अविद्वान्, गैरमाहीत, सांगावें तसें ऐकणारे, असे सामान्य लोक बोलावून एक सभा सन. १६५४ त भरविली. तींत बेअरबोन या नांवाचा एक कांतडेविक्या गृहस्थ होता. त्या नांववरून त्या सभेस बेअरबोनाची किंवा धाकटी पार्लमेन्ट असें म्हणतात. ती पार्लमेन्ट पुढें लवकरच बंद करून क्रामवेल यानें आपल्यास राज्यरक्षक असें नांव घेतलें. याप्रमाणें क्रामवेलानें सर्व अधिकार आपले हातीं घेतल्यावर तो मन मानेल तसें वागूं लागला. पुढें कांहीं दिवसांनीं कराचा वसूल करण्याकरितां त्यानें दुसरी एक पार्लमेन्ट सन १६५६ त भरविली. ती त्यास राजाधिकारही देत होती, परंतु तें त्यानें कबूल केलें नाहीं.

पहिला चार्ल्स याचा जावई व आरेंज एथील राजपुत्र यानें डच लोकांकडून दुसरे चार्ल्स याचा पक्ष स्वीकारून एक बंड करविलें होतें. तें बंड मोडून क्रामवेलच्या मनांत त्याजबरोबर तह करावयाचा होता. परंतु ते राजपक्षाचे आहेत असें आढळतांच दोघांमध्यें मोठें भांडण जुंपून क्रामवेल यानें नौकागमनसंबंधी एक कायदा केला व लोकांस फार दुःख दिलें. पुढें डच लोकांबरोबर त्याच्या समुद्रावर बऱ्याच झटापटी झाल्या. यांत इंग्रजांचा जय होऊन सन १६५४ त तह झाला. तथापि क्रामवेल हा जुलूम करीत होताच. त्या योगानें त्याचे बरेच जुने मित्र त्याचे शत्रु झाले व कित्येक तर कट करून त्यांचा प्राण

घेण्याकरितां संधि पाहूं लागले, व एक पुस्तक प्रसिद्ध करून त्यांत त्यांनीं हत्या करणें हा गुन्हा होत नाहीं, असें प्रतिपादन केलें होतें. तें ऋाम्वेलानें वाचतांच त्याचे जीवाची त्यास धास्ती उत्पन्न होऊन तो आंगरख्याचे आंत चिलखत घालूं लागला, व खिशांत पिस्तुलें बाळगून सर्वांशीं सर्वकाळ साशंक वागूं लागला. तो बरेच लोक बरोबर घेतल्याशिवाय कोठें जात नसे. तो गाडींतून गेल्यास ती तो फार जलदीनें हांकी. ज्या रस्त्यानें एकदा गेला, त्या रस्त्यानें तो परत येत नसे. त्याचें निजावयाचें ठिकाण निराळें वेगळें असे. तो आशा स्थितींत असतां हिंवताप लागून सन १६५८ त वयाचे ५९ वें वर्षीं मरण पावला. त्यानें मरतांना आपला मुलगा **रिचर्ड ऋाम्वेल** यास राज्यरक्षक करावें म्हणून दर्शविलें होतें. त्याप्रमाणें **रिचर्ड** यास त्याचे मागून राज्यरक्षक केलें. तें काम त्यास न झेंपल्यामुळें त्यानें त्या कामाचा पांच महिन्यांचे आंतच राजीनामा दिला. नंतर **लांग पार्लमेन्ट**च्यापैकीं शेष लोकांची (**रंप पार्लमेन्ट**ची) सभा भरून आगींतून निघून फुपाट्यांत पडणें बरें नाहीं असें ठरवून **जनरल मंक** यानें **स्काट्लंड**ांतून ७,००० स्वारांनिशीं **लंडन**ांत येऊन एक सभा भरविली, आणि तिच्या सल्लयानें **हालंड** एथें जाऊन तेथें असलेल्या **चार्ल्स** राजपुत्रास बोलावून आणून त्यास तारीख २१ मे सन १६६० रोजीं दुसरा **चार्ल्स** या नांवानें **इंग्लंड**चे गादीवर बसविलें. याप्रमाणें राजसत्ता पुनः स्थापन झाली म्हणून त्या तारखेचे दिवशीं **इंग्रज** लोक अद्याप एक सण पाळीत असतात. योग असा चमत्कारिक कीं, त्याच दिवशीं त्याचा जन्म व त्याच दिवशीं त्याची अज्ञातवासांतून मुक्तता झाली. अज्ञातवासांतून जे दिवशीं तो मुक्त झाला त्या दिवसाच्या पूर्व

दिवशीं त्यास रात्रभर ओकक्षाडावर दडून राहावें लागलें होतें. म्हणून त्याच्या आठवणीं कारितां इंग्रज लोक त्या तारखेस ओकच्या डाहळ्या हातांतून घेत असतात.

आलिव्हर क्रामवेल राज्यपालक असतां जमेका बेट स्पेनापासून घेतलें आणि त्या देशाशीं युद्ध करून त्यांचा **डंकर्क** एथें सन १६५८ त पराजय केला. **स्काट्लंडां**तील राजसत्तेचा लय होऊन दोन्ही राज्यें एकत्र झालीं. **क्वेकर्स** म्हणून एक मित्र मंडळी स्थापन झाली. जे लोक **प्युरिटनपंथा**चे (शुद्ध निर्गुणपंथी) होते त्यांचा पुढारी **जार्ज फाक्स** हा याच कारकीर्दीत होता. नामांकित **मिल्टन** कवि हा **क्रामवेल**चा परकीय राष्ट्रसंबंधी चिटणीस असे.

प्रकरण दुसरें.

दुसरी स्युअर्ट कारकीर्द.

(१६६०—१७१४)

दुसरा चार्लस १६६०-१६८५.
दुसरा जेम्स १६८५-१६८८.
तिसरा उइलियम व दुसरी मेरी १६८९-१७०२
आनराणी १७०२-१७१४.

दुसरा चार्लस.

१६६०—१६८५

दुसरा चार्लस सेंट जेम्स एथें सन १६३० त त जन्मला होता. तो ज्या दिवशीं **लंडनांत** आला त्या दिवशीं रस्ते उत्तम शृंगारिले होते, व राजाच्या पुनः स्थापनेबद्दल जिकडे

तिकडे आनंदाच्या घांट वाजत होत्या. लोक प्युरिटन पंथास कंटाळले होते ह्यामुळें राजा चैनी, खर्चीक व हौसी आहे, असें ऐकून त्यांस फारच आनंद झाला. **चार्ल्स** राजा राज्यारूढ झाल्याबरोबर त्यानें **जनरल मंकास आल्वे मारल** एथील ड्यूक करून **क्लारेंडन**च्या बापाचा साक्षात् खून करणाऱ्यांखेरीज, इतरांस सर्व साधारण क्षमा, किंवा कोणत्याही तऱ्हेचें नुकसान होणार नाहीं असें अभिवचन, आणि केलेल्या गुन्ह्यांबद्दल विस्मृति इत्यादि गोष्टी करण्याविषयीं एक कायदा केला. परंतु त्यांतील अटी न जुमानितां सन १८६१ त **सर हेन्री व्हेन** याचे आंगीं कोणताहि दोष नसतां राजानें त्यास शिरच्छेदाची शिक्षा दिली. नंतर राजहत्या करणाऱ्यांपैकीं दहा जणांस शिरच्छेदाची शिक्षा देऊन, **क्रामवेल, ब्राड्शॉ,** आणि **आयर्टन** यांचीं पुरलेलीं प्रेतें उकरून काढून **टायबर्न** एथें टांगून ठेविलीं.

युनिफार्मिटीचा (सारूप्याचा) कायदा करून सर्वांनी रविवारीं व सणाचे दिवशीं उपासनेच्या वेळेस देवळांत आलें पाहिजे, ठरल्याप्रमाणें उपासना केली पाहिजे, जो कोणी करणार नाहीं त्याची जिनगी जप्त करून त्यास तुरंगाची शिक्षा मिळेल व जो कोणी आळसानें करणार नाहीं त्याला एक शिलिंग दंड पडेल असें ठरविलें. या कायद्यानें राजास धर्माधिकाऱ्याचा अधिकार सुरू होऊन **क्रामवेल**च्या २,००० धर्मगुरूंस राज्यांतून बाहेर जावें लागलें. सन १६६५ त **कान्व्हेंटिकल आक्ट** म्हणजे कोणतेहि ठिकाणीं चोहोंपेक्षां जास्त लोक जमून एकादे धर्मविधीचा विचार करावयाचा असेल, तर तो सरकारानें ठरविलेल्या नियमाप्रमाणें केला पाहिजे, न केला तर त्यास पहिले प्रसंगीं दंड, दुसरे प्रसंगीं कैद व तिसरे प्रसंगीं काळेपाण्यावर पाठविण्याची शिक्षा मिळेल, असा कायदा, आणि **फाइव्हमैल आक्ट** म्हणजे ज्या धर्म-

गुरूंनीं, राजानें चालू केलेल्या धर्मपंथाप्रमाणें वागण्यास शपथ घेतली नाहीं, त्यांनीं ठरविलेल्या शहरापासून पांच मैलांचे आंत येऊं नये, किंवा शाळा घालूं नये किंवा शिकवूं नये, असा कायदा हे मंजूर केले. या सर्व कायद्यांना क्लयारेन्डन कोड असें म्हणतात.

राजाचा उघळेपणा शिखरास जाऊन त्यानें केवळ ३,००,००० लक्षपौंड रोख मिळतात, व मुंबई बेट आणि टांजीर किल्ला हीं आंदण मिळतात म्हणून स्पेनची राजकन्या कयाथराईन हिशीं लग्न लाविलें. पुढें डंकर्क शहर एक लक्ष लिव्हर्स घेऊन फ्रांसाचा राजा १४ वा लुई यास विकून टाकिलें. हे सर्व व्यवहार कोणासही आवडले नाहींत. त्याच वर्षी लंडन एथें मोठी भयंकर महामारी उत्पन्न होऊन तिला एक लक्षावर बळी पडले. सन १६६४ त चार्ल्स राजाचें मनांत डच (हालंड एर्थील) लोकांबरोबर लढाई सुरू केली असतां तिच्या खर्चाकरितां जो पैसा मिळेल तो आपल्या उपयोगीं पडेल, असें येऊन त्यानें लढाई देण्याचे प्रगट केलें. लढाई होऊन डचांचा लोस्टाफट वगैरे ठिकाणीं स. १६६५ त पराजय झाला. परंतु लढाईपासून विशेष उपयोग न होता, उलट डचलोकांनीं रागावून मिडवे नदींतून वर येऊन लंडनांत त्रास दिला व तीन लढाऊ जहाजें जाळिलीं. पुढील सालीं लंडन शहरांत मोठी आग लागली, ती तीन दिवस चालू होती. तिनें बहुतेक पूर्वीचे अरुंद रस्ते, व गैरसोयीची कोंदट घरें जळून गेली. त्या योगानें दुष्ट सांतीचा बीमोड होऊन रस्ते नवे व मोठे झाले आणि घरें प्रशस्त व हवाशीर झालीं. परंतु शेंकडों लोकांचें वित्त जाऊन त्यांची अन्नान्नगत झाली. ज्या ठिकाणीं आग लागली तेथें आगीचें स्मारक म्हणून एक उंच दगडी

स्तंभ केला आहे. पुढें सन १६६७ त राज्यांतील मुख्य प्रधान **क्लपारेंडन** हा आपणास हवी तशी चैन करूं देत नाहीं ह्मणून राजानें त्यास हद्दपार केलें, व **क्लिफर्ड, आश्ली, बकिंगह्याम आर्लिंग्टन** आणि **लार्ड डेल** यांचे जागीं आपल्या मर्जीतले पांच गृहस्थ नेमिले. त्यांच्यामध्यें एकही सुगुणी नव्हता. त्यांच्या कारकीर्दीस **कावाल** कारकीर्द ह्मणतात. कारण **कावाल** या शब्दांतील पांच वर्ण त्या गृहस्थाच्या नांवाचे आद्यवर्ण होते.

राजाचा **कथालिक** पक्षाकडे कल आहे, व त्याचा वारस **यार्काचा डयूक** हा उघड त्या पक्षाचा आहे असें कळतांच प्रार्टेस्टंट पंथाचे लोक फार फिकिरींत पडले व त्यांना लबाड लोकांनीं वारंवार चिडविल्याच्या योगानें ते फारच त्रासले होते. पोप मताची स्थापना करण्या करितां एक कट होत आहे असें सन १६७७ त **टायटस ओएटीज** या लबाड व दुष्ट गृहस्थानें राजास कळवून बऱ्याच **कथालिकांचे** प्राण घेतले कित्येकांस तुरुंगांत टाकिलें, व ३०,००० लोकांस **लंडनांतून** हांकून देऊन त्यांनीं २० मैलांचे आंत येऊं नये ह्मणून सक्त ताकीद दिली. या महत्कृत्याबद्दल **ओएटीज** यांस १२०० पौंड वर्षासन मिळाले. तें पाहून दुसऱ्याही कित्येक लोकांनीं राजाजवळ खोट्या गप्पा मारून कित्येकांचे प्राण घेऊन, व कित्येकांस तुरुंगांत टाकून बक्षिसें मिळविलीं. सन १६७९ त सतरा वर्षे चाललेली **पार्लमेंट** बंद करून दुसरी भरविली. तेव्हां **कथालिक** पंथास उत्तेजन मिळावें, व आपला अधिकार वाढावा हा राजाचा उद्देश आहे असें कळून येतांच यांतील पहिली गोष्ट बंद करण्याकरितां **यार्कचा** डयूक **पेपिष्ट** आहे ह्मणून त्यास वारसा नसावा असा **कामन्स** लोकांनीं कायदा केला. दुसऱ्या गोष्टींकरितां ही वरेच कायदे केले, नंतर **हाबियस कार्पस**

आक्ट हा अमलांत आणिला. त्या योगानें चौकशी झाल्या-शिवाय कोणास तुरूंगांत टाकण्याची मनाई झाली. तें राजास न आवडून त्यानें एक दोन वेळ आणखी सभा भरविली. परंतु उपयोग होत नाहीं असें पाहून पुढें सभा भरवावयाची नाहीं असा ठराव केला. सन १६८३ सालीं कांहीं थोर व कांहीं हलक्या लोकांनीं राजास मारून राजाचा दासीपुत्र **मनमथ** यास राज्या-वर बसवावें याकरितां एक कट केला होता. तो अमलांत आणण्याकरितां अशी मसलत केली होती कीं राना न्यूमार्केट एथून शर्यती पाहून परत येत असतां त्याची गाडी वाटेंत **राय हौसा** (विशेषगृह) पाशीं आडवून राजास गोळी घालावी. परंतु ती सर्व मसलत चुकून बंडखोरांस शिरच्छेदाची शिक्षा मिळाली. ते वेळेस त्या कटांतील प्रमुख **मनमथ** वगैरे कांहीं लोक हालंडांत पळून गेले. **लार्ड रसेल, आलसीजर्न, सिडनी** हे **राय-हौस** कटाचे पुढारी झाणून त्यांस धरून राजद्रोही ठरवून फांशीं दिलें. त्याच सालीं राजा मरण पावला. ते वेळेस तो **कयाथलिक** होता हें ठरलें. कारण ते वेळेस त्यानें त्या **धर्मपंथाचा** उपदे-शक आणिला होता. त्यास संतान नव्हतें, झणून त्याचे गादी-वर त्याचा धाकटा भाऊ **यार्कचा** डयूक **जेम्स** हा बसला.

दुसरे **चार्ल्स** राजानें उत्तम उत्तम कायदे केले परंतु ते चांगल्या रीतीनें आमलांत आणिले नाहींत. कारण राजा स्वतः दुराचरणांत गुंग असून प्रजेचे हित त्याच्या स्वप्नींही नव्हतें, त्याचे कारकीर्दीचे अखेरीस राजपक्षीय लोकांस (**टोरी**) व लोकपक्षीय लो-कांस **हुइग** हीं नांवें पडलीं. सन १६६० त **रायल सोसायटी** नांवाची सभा स्थापन झाली. सन १६६६ त इमारतीचा विमा उतरण्याची मंडळी स्थापन झाली. **उइलियम पेन** हा अमेरिकेंत **पेनसिलव्हेनिया** एथे वसाहत करण्यास गेला. **जान ड्राय**

डन हा महाकवि याच सुमारास प्रसिद्धीस आला. स्टयार्फर्ड प्रांतांत १६७० सालीं मिठाच्या खाणींचा शोध लागला. सन १६८२ मध्यें प्रत्येक पत्रास एकपेनी हांसिल टरवून तें लंडन व त्याचे आसपास सुरु झालें. **क्लयारेंडन** हा फ्रान्सांत असतां त्यानें चालू कारकीर्दीत झालेल्या अपसांतील लढाई विषयीं एक इतिहास लिहिला आहे. **बनियन** हा प्युरिटन, तुरुंगांत असतां त्यानें **पिलग्रिम्स** प्रोग्रेस (यात्रेकराचा प्रवास) नामक एक ग्रंथ रचिला. दुसरा **चार्ल्स** राजा अगदीं अविश्वासूक, आपलपोट्या आणि अविचाराचा होता. व कामामध्यें अगदीं आळशी असून सर्वकाळ विषयांत असे. त्याला दया व शौर्य हीं अंघळ्याला तेज व काळोख यांप्रमाणें होतीं. त्याला लहान पणापासून मरेपर्यंत जीं संकटें आलीं व अनुभव आले, असे, क्वचित् मनुष्याला येत असतील. त्याला विद्या चांगली मिळाली होती, परंतु तिचा त्यानें योग्य उपयोग केला नाहीं.

दुसरा जेम्स.

(१६८५-१६८९).

दुसरा **जेम्स** राजा **सेंट जेम्स** एथें १६१३ त जन्मला होता. याची पहिली बायको **आन हैड** व दुसरी **मोडेनाची मेरी** किंवा **मेरी डी इस्टेट** ही होती. भाऊ मेला तेव्हां त्यानें मी ठरविलेला धर्म पाळीन व राज्य संभाळीन म्हणून सभेपुढें कबूल केलें होतें ; परंतु राजपद मिळतांच त्यानें **कथालिक** पंथ धरून सुधारकांचा पाठलाग चालविला. तें किती लोकांस न आवडून त्यांनीं एक बंड केलें. त्याचा पुढारी त्याचा पुतण्या **मनमथचा** ड्यूक हा होता. तो आपल्यास माजी

राजाचा औरस पुत्र मानून राज्यावर माझा हक्क आहे असें सांगत असे. त्यानें हालंड एथून थोडें सैन्य मिळविलें, व जेन्स राजास कंटाळलेले लोक आपल्यास आणखी मिळतील अशा आशेनें त्यानें पुष्कळ प्रयत्न केले. परंतु तें सैन्य राज-सैन्याशीं टिकाव धरण्या जोगें नसल्यामुळें त्याची सेजमूर एथें फाजिती होऊन मनमथास जंगलांत, क्वचित् वेषांतर करून, कधीं उपाशीं, कधीं अनवाणीं व क्वचित् अज्ञातवासांतहि भटकत फिरावें लागलें. शेवटीं पारधी कुत्र्यांकडून त्याचा माग, एका खड्यांत अव्यवस्थित पडलेला अशा स्थितींत लागल्यावर त्यास धरून कैद केलें, व चौकशी अंतीं राजद्रोही ठरल्यावर त्याचा शिरच्छेद केला. स्कॉटलंडांत मनमथ यास साह्य करण्याकरितां आरगार्ईलच्या ड्यूकानें बंड केलें होतें. परंतु तें बंड लवकरच राजाच्या स्वारांनीं मोडून आरगार्ईल याचा एडिंबरो एथें शिरच्छेद करविला. त्या लढाईत सैन्याधिकारी यानें जे लोक पाडाव करून कैद केले, त्यांची चौकशी करण्याकरितां जेफ्रीज, या न्यायाधिशास पाठविलें होतें. त्या चौकशीचे अंती ३०० लोक फांशीं गेले व १४ पश्चिम हिंदिबेटांत गुलाम म्हणून विकिले. तो न्यायाधीश पाहिल्या प्रतीचा खाष्ट, दुष्ट व निर्दयी जरी होता, तरी ना राजाचा मोठा आवडता होता; म्हणून त्यास राजानें आपला मुख्य खजी-नदार केलें होते.

पुढें ज्यास जो धर्मपंथ योग्य वाटेल तो स्वीकारण्यास त्यास मुखत्यारी आहे अशा अर्थाचा एक कायदा मंजूर केला. नो कायदा लोकांना प्रथम मोठा परोपकार बुद्धीचा वाटला, परंतु तो तसा नव्हता. तो करितांना जेम्स राजाचे पोटांत असें कपट होतें कीं तशी मुखत्यारी दिली असतां पक्षपात न वाटतां

कयाथलिक लोकांस मोठ्या जागा देतां येतील. प्राटेस्टंट लोकांस तो कायदा अयोग्य वाटून त्यांतील सात धर्माधिकाऱ्यांनीं राजाकडे एक अर्ज पाठविला आणि आमचा पंथ खोटा किंवा निराधार झटल्या खेरीज तो धर्मसंबंधीं मोकळिकेचा कायदा आह्मांस आमचे देवळांत वाचून दाखवितां येत नाहीं. त्याचा राजास राग येऊन त्या सातांस कैद केलें, आणि **टावर** एथें पाठवून दिलें. त्यांची चौकशी झाल्यावर तींत ते निर्दोषी ठरले तेव्हां लंडनांत जिकडे तिकडे आनंदाचा गजर झाला. तो राजास कळतांच राजा मनांतल्या मनांत संतापला. पुढें प्राटेस्टंट लोकांनीं आपल्या पंथास उत्तेजन यावें झणून राजाचा जांवई **आरेंज**चा राजा **उइलियम** यास बोलावून त्यास **इंग्लंड**ची गादी द्यावी असें योजिलें, व त्यास बोलावणेंही पाठविलें. तो **हालंड**ांतून येतांच त्यास हजारों लोकांचें साह्य झालें. राजाच्या मित्रांनीं व मुलगी, **आन** व जावई **डेन्मार्क**चा राजा यांनीं राजपक्ष सोडून **उइलियम** याचा पक्ष स्वीकारिला. हें पाहून राजानें दुःखाचा मोठा सुस्कारा टाकिला, आणि झणाला कीं, मला पोटच्या पोरांनींसुद्धां सोडिलें काय? तेव्हां कित्येक सत्पुरुषांनीं राजास उपदेश करून आपण राज्य सोडून निघून जावें यांत बरी गत आहे असें सांगितलें. तेव्हां तो इतर मुलांबाळांसह **फ्रान्स** एथें निघून गेला. परंतु **जेम्स** यास तेंथून पकडून आणून **रोचेस्टर** एथें कैदेंत ठेविलें होतें. तेथें कांहीं दिवस राहिल्यावर तो संधि सांधून **फ्रान्स**ांत पळून गेला. याप्रमाणें **इंग्लंड**चें राज्य दुसऱ्या **जेम्स** राजानें सोडिल्यावर **पार्लमेन्ट** सभेनें तें **उइलियम** आणि **मेरी** यांस द्यावें असें ठरविलें. या स्थितीस किंवा राजांतरास **राजक्रांति** झणतात. ती राजक्रांति सन

१६८८ मध्यें झाली. **जेम्स** राजास पहिली बायको **आन हैड** इजपासून दोन मुली झाल्या होत्या. **मेरी** आणि **आन मेरी आरेंजचा** ड्यूक **उइलियमास** व **आनही डेनमार्काचा** राजपुत्र **जार्ज** यास दिली होती. दुसरी बायको **मोडेना**ची **मेरी**, इजपासून **जेम्स** नांवाचा मुलगा होता. त्याला पुढें ढोंगी **जेम्स** असें नांव पडलें होतें.

तिसरा उइलियम आणि दुसरी मेरी.

(सन १६८९-१७०२).

दोघांनीं मिळून १६८९-९४ पर्यंत राज्य केलें व एकटे **उइलियमानें** १६९४-१७०२ पर्यंत राज्य केलें. **उइलियम** हा **हेग** एथें सन १६५० त जन्मला होता. **मेरी** ही सन १६६२ त जन्मली होती **उइलियम** यास तिसरा **उइलियम** व **मेरी**ला दुसरी **मेरी** हीं नांवें देऊन त्यांस राज्याभिषेक करण्याच्या अगोदर त्यांचे पासून राजाच्या व प्रजेच्या हक्कांच्या कायद्यावर सही करून घेतली. प्रस्तुत राज्याधिकारी **उइलियम** एकीकडून माजी राजाचा भाचा व दुसरी कडून जांवई होता. तीं दोघें राज्यारूढ झालीं तेव्हां त्यांचीं वयें अनुक्रमें ४९ व २७ वर्षांचीं होतीं. गादीवर बसण्याचे पूर्वी ज्या कायद्यावर त्यांची सही घेतली होती त्यांतील कलमें प्रजेस पूर्वी प्रमाणें स्वतंत्रता द्यावी, पार्लमेंटच्या विचारा शिवाय जमा केलेला पैसा बेकायदा ठरेल. सभासद निवडून नेमावे, पार्लमेंट सभा वारंवार भरवावी, अवयवछेदाची शिक्षा कोणास देऊं नये, ज्याला जो धर्मपंथ बरा वाटेल त्यास तो पत्करण्याविषयीं मनाई नसावी, सभासद नेमण्याविषयीं गोष्टी प्रसिद्धपणें बोलण्यास प्रतिबंध नसावा व मतें घेण्यास व देण्यास मोकळीक असावी, सभासद नेमण्याविषयीं मत घेण्यास व देण्यास मोकळीक.

असावी, इत्यादि मुख्य होतीं. सन १६८९ त टालरेशन आक्ट (नवीन स्थापिलेल्या धर्मा प्रमाणें न चालणाऱ्यांस मुक्तता देणारा कायदा व म्युटिनी आक्ट (सैन्य शिक्षणाचा कायदा) हें मंजूर झाले. दुसरा जेम्स, फ्रान्सांत असतां, फ्रेंच राजाचे साह्यानें कांहीं सैन्य मिळवून आयर्लंडांतील लोक अद्याप आपलाच अधिकार मानीत आहेत व जे कथालिक आहेत तेव्हां ते आपल्यास बरेंच साह्य देतील अशा आशेनें आयर्लंडांत चेऊन उतरला. तेथें त्यास बऱ्याच लोकांचें साह्य मिळून त्यानें तेथील लंडनडेरी शहरास सन १६८९ त वेढा दिला तो वेढा १०५ दिवसांनीं जनरल कर्के यानें उठविला व एनिस्किलिमर्स यांनीं आयारिश मदतनिसां बरोबर न्यूटन बटलर एथें येऊन त्यांचा पराजय केल्यावर उइलीयम राजानें मार्शल स्कोंबर्ग यास तेथें पाठवून व स्वतां ही जाऊन जेम्स राजास बायने नदीचे कांठीं १६९० त जिंकून त्यास फ्रान्सांत पळवून लाविले. तेथें तो १२ वर्षें पेनशनदारा-प्रमाण एका खेडेगांवांत फ्रेंच राजाच्या आश्रयानें राहत असे. तो १७०२ त मरण पावला. स्काटलंडास राजक्रांति न आवडून व्हायकाऊंट डंडी यानें बरेंच सैन्य जमवून जनरल मॅकके याचा किलिक्रत्यांकी या स्थलीं पराजय केला परंतु तो स्वतां अनिवार्य जखम होऊन मेल्यावर त्याचे सैन्याची दाणादाण झाली. आयरिश लोक आद्यापि शांत झाले नव्हते, म्हणून, त्यांवर सन १६९१ त जनरल गिंकेल यास पाठवून आघ्रिम एथें त्यांचा पराजय केला आणि लिमरिक शहर आपले हस्तगत करून घेतलें. स्काटलंड एथील ग्लेंकोच्या ३८ मॅग्डोनल्ड लोकांची, ते वश न झाल्याबद्दल सन १६९२ त कत्तल उडविली. त्याचवर्षी दुसऱ्या जेम्स राजाचा अल्पवयी मुलगा जेम्स यास इंग्लंडचे गादीवर बसविण्याच्या उद्देशानें

फ्रेंचांनीं इंग्लंडावर हल्ला करण्याकरितां मोठें आरमार जमविलें होतें परंतु आडमिरल रसेल यानें त्यांस लाहोग भूशिराजवळ गांठून त्यांचा पराजय केला. बेलजम देशांत कांहीं लढाईचा प्रसंग आला होता, परंतु स्टीनकर्क एथें स. १६९२ व लान्डेन एथें स. १६९३ त उइलियमाचे सैन्याचा पराजय झाला.

सन १६९४ त ट्रायानियल आक्ट (त्रैवार्षिक कायदा) मंजूर झाला. त्यानें पार्लमेन्टचे सभासद ३ वर्षांनीं निवडावे असें ठरविलें. फ्रान्सांत, हालंडांत, व बेल्जमांत उइलियमच्या रिकाम्या लढाया चालूच होत्या, त्या योगानें राजाचा अतिशय खर्च वाढून तो सारा व कर यांच्या वसुलानें भागेनासा झाला. तेव्हां पार्लमेन्टानें लोकांचे कर्जाऊ पैसे काढण्याविषयीं परवानगी दिली. तेव्हांपासून इंग्लंडचे राज्याचें कर्ज वाढतां वाढतां उइलियमाचे मरणाचे वेळेस ११ लक्ष पौंड झालें होतें. त्या कर्जाला न्याशनल डेट (राष्ट्रीय कर्ज) म्हणतात. हालंडांत रिस्विक एथें सन १६९७ त तह झाल्यावर जिकडे तिकडे शांतता झाली. स. १७०१ त सेट्लमेंट आक्ट मंजूर झाला. त्यानें इंग्लंडचे गादीवर प्राटेस्टंटाशिवाय बसवूं नये आणि उइलियम किंवा आन राजकन्या निसंतान मेल्यास त्यांचे पश्चात् पहिले जेम्साची नात, राजकन्या सोफया व तिचीं मुलें प्राटेस्टंट होतीं. म्हणून त्यांना इंग्लंडचे राज्य द्यावें असें ठरलें. सन १७०० मध्यें स्पेनचा राजा चार्ल्स हा निपुत्रिक मेला. त्यानें मरतांना आपलें राज्य अंजूचे ड्यूकास द्यावें असें मृत्यु पत्रांत लिहून ठेविलें होतें. तें उइलियमास कळतांच त्यास फार राग आला. कारण, स्पेनच्या राजानें स्वतः निपुत्रिक मेल्यास त्यानें राज्य फ्रांसाचा राजा चवदावा लुई आणि इंग्लंडचा राजा तिसरा उइलि-

यम या दोघानीं वांटून घेण्याविषयीं सन १६९८ त व सन १७०० तील तहांत ठरलें होतें. ह्मणून स्पेनच्या राजाचा सूड उगविण्याकरितां जर्मनी, प्रशिया, रशिया, हालंड, फ्रान्स आणि इंग्लंड यांनीं एक मतानें सैन्य जमवून स्पेनावर हल्ला करावा असें ठरविलें. परंतु तें लाविलेलें झाड फळ धरीपर्यंत पाहण्यास उइलियम हा वांचला नाहीं. उइलियम हा हामस्ट्न एथें राहत असतां घोड्यावरून पडल्यामुळें त्याचें मानेचें हाड दुखावलें, व त्या अजारानें तो सन १७०२ त मरण पावला. तो स्वभावानें शांत व आतंल्या गांठीचा होता. त्याला रिकामा डौल आवडत नसे. तो कधीं रिकामें बोलत नसे, त्यानें इंग्लंडांतून जुलूम नाहींसा करून त्या देशास युरोप खंडातील नामांकित संस्थानांप्रमाणें अग्रेसर केलें. तो मोठा शूर होता. त्याचे कारकीर्दीत रशियाचा राजा पीटर धी ग्रेट, डेडफर्ड एथें टेम्स नदीच्या कांठीं गोदीमध्यें जहाजें बांधण्याचें काम शिकण्याकरितां येऊन राहिला होता. इंग्लंडची न्यांक (पेढी) स. १६९४ त सुरू केली. जमिनीचा सारा वाढविला. याच कारकीर्दीत इ. स. १६९८ त जनरल सोसायटी (सार्वजनिक मंडळी) या नांवाची ईस्ट इंडीज (पूर्वेकडील हिंदुस्थान वगैरे ठिकाणीं व्यापार करणारी मंडळी स्थापन झाली. सर ऐझाक न्यूटन हा ज्योतिषी, सर राबर्ट वायल, आणि राबिन्सन क्रूसो या कादंबरीचा कर्ता डयानिअल डिफो हे याच काळीं इंग्लंडांत प्रसिद्धीस आले. दुसरी मेरी देवी येऊन सन १६९४ त मरण पावली. तिचें मागें तो एकटाच राज्यावर होता.

आन राणी.

(१७०२—१७१४.)

आन राणी ही **सेंट जेम्स** एथें १६६५ त जन्मली होती. तिचें लग्न **डेन्मार्का**चा राजा **जार्ज** याजबरोबर झालें होतें. **आनराणी** गादीवर बसतांच तिनें **स्पेन** व **फ्रान्स** यांशीं युद्ध करण्याचें ठरवून त्या लढाईंत आपले सैन्यावर **मार्लबरो**चे ड्यूकास नेमिलें होतें. त्यानें त्या **स्पानिश** वारसाच्या लढाईंत **ब्लेनहिम** (१७०४), **रामिलीज** (१७०६), **औडेनार्ड** (१७०८) आणि **मालप्लाकेट** एथें (१७०९) त **फ्रेंचां**शी जय मिळविले. त्यांत **ब्लेनहिम** एथील विजय मोठ्या पराक्रमानें मिळविला म्हणून त्या कामगिरी-बद्दल **मार्लबरो** यास **आक्सफोर्ड** प्रांतांत एक मोठा भव्य व सुशोभित असा वाडा आणि बराच जमिनजुमला सन १७०४ मध्यें देऊन त्या जिनगीस **ब्लेनहिम** हें नांव देविलें. त्याच वर्षीं भूमध्य समुद्राचें द्वाररूपी ठिकाण, **जिब्राल्टर**, हें व मिनोर्का बेट, हीं स्पेनदेशापासून अडमिरल (आरमानावरील अधिकारी) **रूक** यानें सर करून घेतली.

सन १७०७ त **इंग्लंड स्काटलंड** एथील राजे एकत्र होऊन **इंग्लंड**तील **पार्लमेंट** सभेस १६ बडे लोक आणि ४५ कामन लोक **स्काटलंडा**नें पाठवावे असें ठरवून त्यांचे कायदे, कोडतं, धर्म हीं कायम ठेवावीं असें ठरले. त्यापुढें राणीचा उत्तरोत्तर उत्कर्षच होत गेला. **मार्लबरो**चें ड्यूकाचे बायकोचें राणीवर वजन फार होतें तें नष्ट होऊन **माशम**बाईचें वाढत गेलें. तिनें **टोरी** लोकांचा पक्ष धरून त्यांजकडून ती पुष्कळ वर्षें चाललेली लढाई बंद करण्याचा उपाय योजिला. त्यांनीं **मार्लबरो**वर सैन्यास भाकरी पुरविणाऱ्या एका यहुद्यापासून लांच

चेतला व सरकारी पैसा चोरला असा आरोप आणून त्याची बेअब्रू केली, व त्याचें सेनाधिपत्य काढून घेऊन त्याचे जागेवर आर-मंन्डचे ड्यूकास सेनापति नेमिलें, व त्यास सांगून ठेविलें होतें कीं लढाईंत आपलें आंग चेतानेंच दाखवावें. शेवटीं १७१३ त यूट्रेच एथें जर्मनी शिवाय इतरांचा तह ठरून चाललेली लढाई बंद झाली. त्या तहानें इंग्लंडास हड्सनचा उपसागर, न्यूफाउंडलन्ड व नोवास्कोशिया हे देश मिळून जिब्राल्टर हे शहरहीं त्यांजकडे कायम राहिलें. सर राबर्ट वालपोल यास मार्ल्बरोप्रमाणेंच लांच घेतल्याबद्दल शिक्षा मिळाली. आनराणी स्तुन वहिरी रोगानें इ. स. १७१४ त मरण पावली. ती स्टयुअर्ट घराण्यांतील शेवटली राणी होती. ती निपुत्रिक मेल्यामुळें तिचे मागून हानोवरच्या सोफायेचा मुलगा जार्ज हा गादीवर बसला. ती फारच लोकप्रिय होती. तिचे कारकीर्दीत इंग्लंडांतील विद्येचें आगष्टन एज (युग) असें म्हणतात. ती बहुत करून चांगलेंच काम आरंभी, परंतु तिचें मन स्थिर नसल्यामुळें ज्याशीं तिचा स्नेह होई त्याचा आनुषंगिक गुण तिला लागे, ती मनाची हलकी असे, व तिला कोणी जोरानें कांहीं सांगितलें म्हणजे तें तिला लागलेंच मान्य होत असे.

स्टयुअर्ट कारकीर्दीत जेम्स हा इंग्लंड व स्काट्लंड यांचा राजा झाल्यापासून त्या दोन्ही देशांत ज्या अनर्थकारक लढाया चालल्या होत्या त्या बंद झाल्या. पहिले जेम्साचे कारकीर्दीत पश्चिम गोलार्धांत वसाहती सुरू झाल्या. त्या अमेरिकेच्या उत्तरभागीं संयुक्त संस्थानांत संपत्तीनें व ऐश्वर्यानें वाढत जाऊन त्यांच्या शाखा कानडा, न्यूइंग्लंड, न्यूब्रन्स्विक एथें पसरल्या. त्याचप्रमाणें त्या राज्याच्या साह्यानें हिंदुस्थान देशांत व्यापार करण्याकरितां

जी मंडळी स्थापन झाली, तिनें सुरत, आमदाबाद, खंबायत, आणि घोघो एथें वखारी स्थापन केल्या. तसेंच जेम्सानें कित्येक जुन्या जुन्या कला सुधारून कांहीं नवीनही सुरू केल्या. त्यांत लोंकरीचें कापड रंगाविणें, बुरुणुसाच्या टोप्या करणें, कापसाचें सूत कढणें, रेशीम विणणें, आणि कांचेचा रस करून त्याचे पदार्थ तयार करणें या कला उदयास आणिल्या. **लाके** यानें अध्यात्मविद्या, **न्यूटन** यानें **ज्योतिषविद्येचे** शोध, **हार्वे** यानें रक्ताभिसरणाची माहिती, **हाले** यानें दक्षिण गोलार्धांतिल नक्षत्र पुंजांची माहिती, आणि **बेकन** यानें मुलतत्वशोधनपद्धति यांचा प्रसार, हीं केलीं. **पार्लमेन्ट** सभेनें जे या कारकीर्दीत कायदे केले ते अद्याप **इंग्लिशां**च्या उपयोगीं पडत आहेत. **क्रामवेला**नें नौका गमनाचे कायदे केले. त्यांचे महत्व आद्याप लोक मानीत आहेत. दुसरे **चार्ल्स**चे कारकीर्दीत हक्काचा कायदा व **हेबियस कार्पस** आक्ट (स्वातंत्र्याचा कायदा), मंजूर झाले. त्याच कारकीर्दीत **यूरोपियन** राष्ट्रांत इंग्लंडचें, महत्त्व मनांत येऊं लागलें. **मिल्टन, शेक्स्पियर, ड्राइडन टेम्पल, बट्लर, पोप, स्टील, स्विफ्ट** व **आडिसन**, या ग्रंथकारांनीं **ग्रेटब्रिटन** देश गाजवून दिला. आज मित्तीस ती त्यांची कीर्ति व विद्या ह्या इतर देशांतही पसरत चालल्या आहेत. व्यापार संबंधी कामें व्यवस्थित चालाविण्या करितां **बोर्ड आफ ट्रेड** (व्यापार संबंधीं व्यवस्था ठेवणारी मंडळी), विद्या व कला यांची वृद्धि व प्रसार करण्या करितां **रायल सोसायटी**, आणि सैन्य व आरमार यांच्या सुधारणेचा पाया, हीं याच कालीं स्थापन झालीं. रस्ते, वाटमाऱ्यांच्या उपद्रवापासून प्रवासी लोकांस सुखावह नव्हते, ते सुखावह झाले. या वेळेस **लंडना**पासून **यार्कार्पर्यंत** गाड्या चालत व तेथपर्यंत जाण्याला सहा

दिवस लागत. याच कारकीर्दीत बढाटे प्रथम बागेंत लाविले. परंतु पुढें त्यांची लागवड शेतांतही होऊं लागून तें मुख्यत्वें करून डुकरांकरितां पिकवीत असत. कां कीं, ते प्रथम आणिले तेव्हां तो विषारी पदार्थ आहे, असें समजून कित्येक दुकानदारांवर फिर्यादी सुद्धां झाल्या होत्या. तमाखू, पाद्री लोक सुद्धां बोलून बोलून थकले म्हणजे मध्यें ओढीत. डांक पोंचविण्याची सोय दहा दहा, पंधरा पंधरा कोसांवर घोडे बदलून केली होती. सन १७०७ त कलकत्ताही हिंदुस्थानांतील कंपनीच्या राज्याची राजधानी झाली. सन १७०९ त जनरल सोसायटी नामक मंडळी पूर्वीच्या ईस्ट इंडिया कंपनीशीं स्पर्धा करूं लागल्यामुळें तंटे उत्पन्न झाले. पुढें लार्ड गोडोलफिन याच्या मध्यस्तीनें त्यांचे तंटे मिटून त्या दोन्हीं मिळून सन १७०९ त एक नवीन कंपनी झाली. तिला युनाइटेड ईस्ट इंडिया कंपनी (दोन्ही मंडळ्या एकत्र होऊन स्थापन झालेली मंडळी) हें नांव पडलें. राणीचा नवरा, डेन्मार्काचा राजपुत्र, जार्ज, हा सन १७०८ त मरण पावला. आन राणीची कारकीर्द, राणीविरुद्ध कट किंवा प्रजेपैकीं कोणाचा रक्तपात झाला नाहीं अशाविषयीं प्रसिद्ध आहे.

स्टयुअर्ट वंशविस्तार.

पहिला **जेम्स** याचें लग्न **डेन्मार्क**च्या **आन** बरोबर झालें.
(१६०३—१६२५).

- **हेन्री**
- पहिला **चार्ल्स**, याचें लग्न **फ्रान्सा**च्या **हेन्रीएटाशीं** (१६२५-१६४९).
  - **दुसरा चार्ल्स** (१६६०-१६८५).
  - **मेरी** इचें लग्न **आरेंजा**च्या **उइलियमाशीं**.
    - तिसरा **उइलियम** याचें लग्न (१६८९-१७०२)
  - **दुसरा जेम्स** १ **आन हाइड** बायका दोघी (१६८५-८८).
    - **मेरी** (दुसरी) इशीं झालें. (१६८९-१६९४).
    - **आन** (१७०२-१७१४).
      - **चार्ल्स एडवर्ड** (तरुण ढोंगी).
      - **हेन्री** (यार्काचा कार्डिनल).
    - २ **मोडेना**ची **मेरी**.
      - **जेम्स** (वृद्ध ढोंगी).
- **इलिजाबेथ**, इचें लग्न **इलेक्टर प्यालेटाईन** बरोबर.
  - **रुपर्ट** राजपुत्र.
  - **सोफाया** इचें लग्न **हानोवर**चे इलेक्टरा बरोबर.
    - पहिला **जार्ज** (१७१४-१७२७).

स्टयुअर्ट कारकीर्दीतील मुख्य गोष्टी.

१६०३ पहिला जेम्स इंग्लंडचे गादीवर बसला.
१६०५ बंदुकीच्या दारूचा कट.
१६०९ ईस्टइंडियाकंपनीच्या सनदेची दुरुस्ती.
१६१० न्यूफाउन्डलन्ड एथें वसाहत करण्याची सनद मिळाली.
१६११ सुरत, जावा व सुमात्रा एथें वसाहती केल्या.
१६१४ लागर्थमाची पद्धति नेपियर यानें काढिली.
१६१५ इराण व आग्रा एथें वकील पाठविले.
१६१८ राले यास फांसीं दिलें.
१६१९ रुधिराभिसरणाचा शोध हार्वे यानें लाविला.
१६२३ चार्लस राजपुत्राचें महाद्वीपांत वेषांतर व फ्रेंच राजपुत्रीबरोबर लग्न.
१६२५ पहिले जेम्साचा मृत्यु व पहिला चार्लस राज्याधिपति.
१६२५ वेनिव्हीलेन्स नामक कर्ज काढिलें.
१६२९ पिटिशन आफ राइट्स् नामक कायदा.
१६४२ टोरी आणि हुइग यांच्यांतील पहिली लढाई.
१६४४ मार्स्टनमूर एथील लढाई व राजसैन्याचा पराजय.
१६४५ नेस्बी एथील लढाई राजपक्षाचा पूर्ण पराजय.
१६४६ पहिला चार्लस राजा स्काच लोकांच्या स्वाधीन झाला.
१६४९ पहिले चार्लसाचा शिरच्छेद, लोकसत्ता व क्राम्वेल राज्यपालक झाला.
१६५० क्राम्वेल आयर्लंडांत विजयी होतो.
१६५३ लांग पार्लमेंट बंद केली.
१६५४ बेअरबोनची पार्लमेंट व डच लोकांबरोबर तह.
१६५८ क्राम्वेलचा मृत्यु व त्याचा मुलगा रिचर्ड राज्यपालक झाला.

१६५८ रंप पार्लमेंट, जमेका बेट जिंकून घेतलें.

१६६० दुसरा चार्ल्स गादीवर बसला. रायल सोसायटीची स्थापना.

१६६५ कान्व्हेन्टिकल आक्ट, डच्चांचा पराजय

१६६६ इमारतींचा विमा उतरणारी मंडळी स्थापन झाली.

१६६७ लंडनांतील मोठी आग व महामारी.

१६७० मिठाच्या खाणींचा शोध.

१६८२ पन्नास एक पेनि हांसिल झालें व डाक सुरू झाली.

१६८३ मन्मथ यास राज्यावर बसाविण्याचा रायहौस एथिल कट.

१६८५ दुसरे चार्ल्साचा मृत्यु व दुसरा जेम्स राजा झाला.

१६८८ दुसरा जेम्स राज्य सोडितो. तिसरा उइलिय व मेरी हीं राज्यावर बसतात.

१६८९ दुसऱ्रा जेम्स फ्रान्साचे साह्यानें आयर्लंडांत उतरतो.

१६९० दुसऱ्या जेम्सास कैद.

१६९२ लाहाग एथील फ्रेंचांवरोबर लढाई.

१६९२ अडतीस मागडोनल्ड लोकांची कत्तल.

१६९४ त्रैवार्षिक कायदा, दुसरे मेरीचा मृत्यु.

१६९७ रिस्विक एथील तह.

१६९८ पूर्वेकडील इंडीज एथें व्यापाराकरितां जनरल सोसायटी स्थापिली.

१७०० स्पेनचा राजा चार्लस मरण पावला.

१७०१ सेटलमेन्ट अक्ट.

१७०२ दुसरे जेम्साचा मृत्यु.

१७०२ तिसरे उइलियमाचा मृत्यु व आन ही राणी गादीवर बसली.

१७०४ ब्लेन्हिम या नांवानें मार्लबरो यास जमीन मिळाली.

१७०७ इंग्लंड व स्काट्लंड यांचे ऐक्य व एक पार्लमेन्ट झाली. हिंदुस्थानची कलकत्ता राजधानी झाली.

१७०९ युनाइटेड (संयुक्त) ईस्ट इंडिया कंपनी.

१७१३ युट्रेच एथील तह.

१७१४ आन राणीचा मृत्यु, व जार्ज हा गादिवर बसला.

सातवा भाग.

ब्रन्स्विक किंवा हानोवर कारकीर्द.

(१७१४—१८८५)

पहिलें प्रकरण.

पहिला जार्ज १७१४-२७.
दुसरा जार्ज १७२७-६०.
तिसरा जार्ज १७६०-१८११.

दुसरें प्रकरण.

युवराजसत्ता १८११-१८२०.
चवथा जार्ज १८२०-१८३०.
चवथा उइलियम १८३०-३७.
व्हिक्टोरिया १८३७.

पहिलें प्रकरण.

(१७१४—१८११)

पहिला जार्ज

इ. स. १७१४-इ. स. १७२७ पर्यंत.

जार्ज हा **हानोवरचा इलेक्टर, अर्नेस्ट आगष्टस,** याचा मुलगा होता. त्याची आई **सोफाया** ही पहिले **जेम्स** राजाच्या **इलिजाबेथ** या मुलीची मुलगी होती. त्याचें जन्म सन १६६० त झालें होतें. **आन** राणी मरतांच **हानोवर** एथील **इलेक्टर जार्ज** ह्यास राज्याभिषेक करविण्याचें ठरवून त्यास बोलावणें पाठविलें. तो इंग्लंडांत येऊन उतरल्यावर त्यास पुष्कळ मोठ मोठे लोक सामोरे गेले होते. त्यांत **मार्लबरोचा** डयूक हाही एक होता. **जार्ज** गादीवर बसला ते वेळेस त्याचें वय

५५ वर्षांचें होतें. तो उत्तम बांध्याचा मनुष्य असून त्याची चाल फार सभ्य होती, आणि पोषाक साधा असून मोठा चतुर कारस्थानी होता. त्यास इंग्रजी चांगलें बोलतां येत नव्हतें. त्याच्या सर्व रीतिभाती जर्मन होत्या. त्याचें लग्न झेल एथील तरुण राजकन्या सोफाया डोरोथिया हिशीं झालें होतें; तिची वर्तणूक शुद्ध नाहीं असें वाटून त्यानें तिला हानोवराजवळ आलहेडन किल्यांत ठेविलें होतें, व ती तेथेंच जन्मपर्यंत म्हणजे ४० वर्षें होती. तिला एक मुलगा व एक मुलगी होती. मुलाचें लग्न आन्स्प्याक एथील राजाची मुलगी क्यारोलाईन इच्याबरोबर झालें होतें व त्याला, त्याच्या बापास इंग्लंडचें राज्य मिळालें तेव्हां तीन मुली झाल्या होत्या. जार्जाची मुलगी सोफाया ही प्रशियाचा राजा फ्रेडरिक ह्यास दिली होती. जार्ज इंग्लंडास आला ते वेळेस त्याचे बरोबर त्याचा मुलगा, सून, नातवंडें, आणि एक भाऊ इतकी मंडळी आली होती. जार्ज यास गादी मिळतांच त्यानें आपले मुलास प्रिन्स ऑफ वेल्स आणि भावास ड्यूक ऑफ यार्क ह्या पदव्या व अधिकार दिले.

जार्ज राजाचा कल हुइग पक्ष्याकडे होता म्हणून टोरी लोक त्याच्या नांवानें जळफळत होते. आन राणीचा मुख्य मंत्री बोलिंब्रोक होता. त्यानें स्टयुअर्ट घराण्याचें पुनरुज्जीवन व्हावें म्हणून दुसरे जेम्साचा मुलगा, जेम्स याचा पक्ष धरून बंड केलें होतें. परंतु लार्ड टाऊन्स्हेंड प्रभृति हुइग पक्षीय लोकांनीं तें तेव्हांच मोडून टाकिलें. लार्ड टाऊन्स्हेंड हा त्या वेळेस मुख्य मंत्री होता. तो हुइग पक्षीय असल्यामुळें त्यानें बोलिंब्रोक व त्याचे साथीदार यांस राजद्रोही ठरविल्यावर ते सर्व फ्रान्सास पळून गेले; परंतु लार्ड आक्स्फर्ड यास डोवर एथें पाठवून दिलें. ती शिक्षा पार्लमेंट सभेस न आवडून तिनें

त्याची चौकशी केली पाहिजे असें ठरविलें. तथापि तो तसाच दोन वर्षेपर्यंत तुरुंगांत विनचौकशीनें राहिला होता. आर्ग्मंड-च्या ड्यूकास टाचर एथें पाठविलें. बोलिंब्रोक वगैरे मंडळी फ्रान्सांत पळून गेल्यावर त्यांची जिंदगी जप्त करून सरकारांत जमा केली, आणि त्यांचीं नांवें सरदारांच्या यादींतून काढून त्यांचा मानमरतबाहि कमी केला. बोलिंब्रोक यास सन १७२३ त माफी मिळाल्यावर तो इंग्लंडास परत आला.

याप्रमाणें टोरी पक्षाच्या लोकांवर कडक नजर होती, त्या-मुळें जाकोबाईट (जेम्साच्या पक्षाचे लोक) लोकांनीं सन १७१५ त स्काट्लंडांत बंड केलें. त्यांचा पुढारी मारचा अर्ल हा होता. त्यानें राजपुत्रास सन १७१६ मध्यें स्कोन एथें राज्याभिषेक करून त्याच्या नांवाचें तेथें निशाण उभारिलें. जेम्स हा ते वेळेस तें राज्य पतकरून लौकिकास येण्याजोगा मोठा नव्हता; तथापि फ्रान्साचा राजा, चवदावा लुई, हा त्यास थोडाबहुत दारूगोळा व सैन्य देऊन त्याची रवानगी करणार होता, तों तोच स्वतः मरण पावला. त्याचा पणतू फारच लहान अस-ल्यामुळें त्याचें राज्य चालविण्यास ओर्लियन्सच्या ड्यूकाची नेमणूक झाली होती. ओर्लियन्सच्या ड्यूकाचें व जेम्साचें सख्य नव्हतें; तथापि मारचा अर्ल यानें जेम्साकरितां मोठी खटपट करून सुमारें दहा हजार सैन्य मिळविलें होतें. त्यास जाकोबाईट लोक मिळाल्यावर तें सैन्य फारच वाढलें. स्का-ट्लंड एथें इंग्लंडच्या राजाच्या तर्फे आर्गाइलचा ड्यूक हा सेनापति होता. त्यानें आयर्लंडाच्या स्वारांच्या मदतीनें मार-च्या ड्यूकाचा शेरीफमूर एथें पराजय केला. इंग्लंडच्या उत्तर भागीं डरवेंट्वाटरचा अर्ल आणि फास्टर यांनीं स्काट्लं-डच्या हद्दीवरील जे कांहीं लोक त्यांस मिळाले त्यांच्या साह्यानें एक बंड करून न्यूकासल शहरावर हल्ला केला. पुढें कंबर्लंड

मधून लयांक्शायर एथें स्वारी केली. त्यांची व राज सैन्या-ची जेव्हां जेव्हां दृष्टादृष्ट होई, तेव्हां तेव्हां ते चोंहोंकडे फांकून पळून जात. असें करितां करितां ते बंडखोर कोणत्याहि रीतीची अडचण मध्यें न अनुभवितां प्रेस्टन एथें दाखल झाले. तेथें उइल्स आणि कार्पेंटर यांनीं त्यांस वेढा देऊन असें सांगितलें कीं तुम्ही निमूटपणें हत्यारें ठेवून द्या, आणि आमच्या स्वाधीन व्हा, नाहीं तर एथल्या एथेंच तुमच्या चिंध्या उडवितों. तेव्हां ते मिऊन जाऊन त्यांच्या स्वाधीन झाले. त्यांतील पुढा-ऱ्यांस लंडन एथें पाठवून दिलें आणि इतरांस चेस्टर आणि लिव्हर्पूल एथें कैद करून ठेविलें. लंडनास आल्यावर त्यांची चौकशी होऊन डरवेंट्वाटर, केनमूर आणि नित्सडेल यांस शिरच्छेदाची शिक्षा ठरविली. निस्सडेल हा स्त्री वेषानें पळून गेला. जे लोक चेस्टर व लिवरपूल एथें कैद करून ठेविले होते त्यांतील चार जणांचा टायबर्न एथें व सुमारें २१ जणांचा लयांक्शायर एथें शिरच्छेद केला. कांहीं लोक मसलत करून पळून गेले; परंतु सुमारें १,००० लोक उत्तरअमेरिकेंत काळयापा-ण्यावर पाठवून त्यांची जिंदगी जप्त केली व सरकारांत जमा केली. तेव्हां जेम्साची निराशा होऊन तो फ्रान्सास पळून गेला; परंतु स्पेनबरोबर लढाई सुरू होतांच त्याला पुनः थोडीशी आशा आली. आरमंडच्या ड्यूकानें टावर एथून सुटल्यावर जेम्सा-करितां स्पेन देशाहून कांहीं आरमार आणून इंग्लंडावर चाल केली. परंतु फिनिस्टर भूशिरापाशीं वादळानें त्याच्या आर-माराची दाणादण झाल्यावर त्यास तहाशिवाय दुसरा उपाय उरला नाहीं. जेम्स राजपुत्रास फ्रान्साकडून साह्य मिळूं नये झणून फ्रान्साच्या राजाशीं खटपट सुरू होऊन सन १७१७ त इंग्लंड, फ्रान्स आणि हालंड यांचें त्रैक्य (तिघांचे ऐक्य)

झाल्यावर त्या लढाया बंद झाल्या. पुढील वर्षी त्या त्रैक्यांत जर्मनी मिळाल्यावर चातुरक्य झालें. तें चातुरैक्य (चौघांचें ऐक्य) स्पेनचा मुख्य मंत्री कार्डिनल अल्बरोनी याचें लवाडीचें कारस्थान चालूं नये झणून झालें होतें. तें कारस्थान बंद करण्याकरितां सर जार्जबिंग यास आरमार देऊन स्पेनावर पाठवून दिलें. त्यानें स्प्यानिभार्ड लोकांचा पासरो भूशिराजवळ स. १७१८ तें पराजय केल्यावर जेम्स राजपुत्राचा पूर्ण आशाभंग होऊन त्यास स्वस्थ बसावें लागलें. सन १७०८ त अल्बरोनी यास कामावरून काढून टाकिलें व १७२० त तह ठरला.

साऊथ सीस्कीम (दक्षिण समुद्रांत व्यापार करणाऱ्या मंडळीची (खटपट) स. १७१० सुरू होऊन तिकडे सर्व राष्ट्राचें लक्ष लागलें होतें. त्या खटपटीचा उत्पादक सर जानब्लंट हा उद्योगी गृहस्थ होता. त्याचा मुख्य उद्देश असा होता कीं, तिसरा उइलियम, आन, वे प्रस्तुत सरकार यांचें ५,००,००,००० पौंड कर्ज फेडून आपण सरकारचा एक सावकार व्हावें, आणि व्याजाचा दर कमी करून ७०,००,००० पौंड सरकारास खर्चाकरितां आगाऊ द्यावे व सरकारापासून दक्षिण समुद्रांत व्यापार करण्यास, त्यांच्याशिवाय दुसरे कोणास परवानगी मिळूं नये झणून हमी द्यावी. याप्रमाणें सर्व विचार ठरून सरकारानेंही हमी देण्याचें कबूल केलें. त्या कामास भागीदार पाहिजे होते झणून त्या मंडळीच्या पुरस्कर्त्यांनीं असें प्रसिद्ध केलें कीं जो कोणी व्यापारांत भागीदार होईल त्याचें फारच कल्याण होईल. द्रव्येच्छेनें कोणास सोडिलें आहे? ती इच्छा सर्व राष्ट्राच्या मनांत येऊन जो तो त्याचा भागीदार होण्याविषयीं उत्सुक झाला. कित्येकांनीं तर मोठ्या व्याजाच्या आशेनें मोठमोठ्या रकमा अगाऊ दिल्या; त्या योगानें त्यांच्या भागांची किंमत फार वाढून तसाही भाग मिळणें दुर्मिळ झालें.

त्या मंडळीचा उद्योग माजी पाडावा झणून दुसऱ्या नव्या मंडळ्या उत्पन्न झाल्या व थोडक्या रकमेस पुष्कळ फायदा होईल असें प्रसिद्ध केलें. एक मंडळी शिशापासून रुपें काढणारी निघाली. दुसरी खाऱ्यापाण्याचें गोडें पाणी करणारी निघाली, तिसरी स्पेन देशांतून व्यापाराकरितां गाढवें आणणारी निघाली. याप्रमाणें अनेक धंदे काढून अनेक कंपन्या निघाल्या, तेव्हां चुरस उत्पन्न होऊन **सौथसी** कंपनीनें त्या सर्वांची फजिती उडाविण्याकरितां आपले दिवाळें निघाल्याची आवई उठविली. परंतु ती आवई थोडके दिवसांत खरीच होऊन त्या कंपनीचें वाढलेलें मोठें बेंड सन १७२० फुटलें आणि ती सर्व खटपट मूर्ख व लबाड लोकांनीं साळसूदें व भोळ्या लोकांस नागविण्याकरितां केली होती असें उघडकीस आलें. तेव्हां पार्लमेंट सभेनें त्यांतील मुख्य मुख्य कामगारांस धरून शिक्षा दिल्या आणि फसलेल्या गरीब लोकांस कांहीं मदत करण्याविषयीं उपाय योजिले; तथापि लोकांचे अतिशय नुकसास होऊन कित्येक कुटुंबें तर अगदीं रसातळास गेलीं. **सर रावर्ट वालपोल** हा जर यावेळेस मुख्य मंत्री नसता, व त्यानें ही लुच्चेगिरी उघड करण्यास सक्त मेहनत घेतली नसती तर राष्ट्राचें राष्ट्र धुळीस मिळालें असतें. याचप्रमाणें **मिसिसिपीबबल** या कंपनीनें फ्रेंचांचें फार नुकसान केलें.

सन १७२७ त राजाच्या मनांत **हानोवर** एथें एकदां जावें असें येऊन तो जर्मनीच्या हद्दीवर **डेल्डेन** एथें येऊन उतरला. तेथें तो अजारी पडला, तेव्हां त्याचे मनांत **ओस्न्यांबुर्ग** एथील आपल्या भावाच्या घरीं जाऊन पोंचावें अमें आलें. परंतु तो इतका थकला होता कीं त्यास तेथवर जाण्यासु बिलकूल शक्ति नव्हती. त्यानें वाटेनें **ओस्न्यांबुर्ग! ओस्न्यांबुर्ग!** असा एकसारखा घोष लाविला होता. त्या वाक्याचे

दरवाज्यांत जातात आणि पाहतात तों राजाचा श्वास बंद होऊन तो मरण पावला होता असें दिसून आलें. जार्ज राजा स. १७२७ त आपले वयाचे ६८ वे वर्षीं आणि कारकीर्दीचे तेरावे वर्षीं मरण पावला. त्याचे मागून त्याचा मुलगा, दुसरा जार्ज या नांवानें त्याचे गादीवर बसला.

या कारकीर्दीत तीन वर्षांनीं तरी पार्लमेंटांतिल सभासद निवडावे अशाबद्दल ट्रायानिअल आक्ट (त्रैवार्षिक कायदा) होता तो रद्द होऊन सेप्टेनियल आक्ट (सप्तवार्षिक कायदा) मंजूर झाला. पहिल्या जार्जाच्या नेभळेपणा सारिखा नेभळेपणा क्वचित् राजाच्या अंगीं आढळला असेल; तथापि त्याची कारकीर्द देशास फारच कल्याणकारक झाली. त्याचे कारकीर्दींत लसीच्या देवो अपराधी लोकांस काढूं लागले. तो राज्यावर बसला तेव्हां तो वयातीत असून त्याच्या चालीभाती जर्मन असल्यामुळें तो फार विलक्षण दिसे. तो स्वभावानें शांत व सद्गुणी होता म्हणून त्याच्या दुर्गुणाची फूट बाहेर पडली. नाहीं. या कारकीर्दीत साऊथ सीस्कीम किंवा बबल यांचा विचार न केला तर इंग्लंडांत व्यापार व संपत्ति बरीच वाढली. जार्जाला विद्या म्हणून कोणतीच नव्हती, पण गाणें मात्र फार आवडत असे. राजाच्या पुनःस्थापने पासून नीति आणि धर्म हीं विघडत चाललीं होतीं तीं सुधारलीं. दुसरे चार्ल्स याचे दरबारांत सुरू झालेल्या दुराचरणांनीं व ऐषआरामांनीं लहानापासून मोठ्यापर्यंत अतिशय उपद्रव झाला होता. कारण सुशिक्षित व विद्वान् असे बरेच लोक व धर्माधिकारी देशांतून बाहेर हांकून लाविले होते, व त्यांच्या जागा नीच व दुर्गुणी लोकांनीं भरल्या होत्या. याच कारकीर्दीत पीटर धिग्रेट (रशियाचा झार) सन १७२५ त मरण पावला.

दुसरा जार्ज.

(१७२७–१७६०).

दुसरा **जार्ज** गादीवर बसला तेव्हां त्याचें वय ४५ वर्षांचें होतें. तो सन १६८३ त जन्मला होता. तो बापाहूनही कमी विद्वान् होता. खाण्यापिण्यांत व रीतीभातींत तो फार साधा होता. त्याला **इंग्लंडा**पेक्षां **हानोवर** फार आवडे. त्याची राणी **आन्स्प्याक** एथील **कारोलाईन** ही होती. ती फार सुस्वरूप असून अंतःकरणानें निर्मळ असे. राज्यकारभारांत तिची बरीच खटपट चाले. तो राज्यारूढ झाला तेव्हां त्यास दोन मुलगे–**फ्रेडरिक** आणि **उइलियम** व चार मुली, **आन, आमिला, कारोलाईन** आणि **मेरी** ह्या होत्या. **लुइसा** ही त्यास मागून झाली. त्याचे बापाचे वेळचा जो मुख्य मंत्री **वालपोल** तो सन १७२१ पासून तसाच याचे कारकीर्दीतही होता.

दुसरा **जार्ज** गादीवर बसला तेव्हां देशांत शांतता होती व ती बरीच वर्षे चालू होती. स. १७२९ त **स्पेन** देशाशीं **सिव्हिलीचा** तह ठरून नवें **चातुरैक्य** (**इंग्लंड, फ्रान्स, स्पेन** आणि **हालंड** यांचें) झालें. सन १७३३ त **वालपोल** यानें कराचा एक नवीन कायदा मंजूर होण्या करितां सभेपुढें आणिला होता, परंतु त्याला तो माघारा घ्यावा लागला. **वालपोल** याच्या विरुद्ध **उइलियम पिट्ट** (थोरला) यानें एक मोठा कट केला होता व त्याला नव्या निवडणुकीमध्यें बराच जयही मिळाला, तेव्हां **बोलिंब्रोक** हा सन १७३५ त **फ्रान्स** एथें निघून गेला. पुढील वर्षी **स्काट्लंडांत** एक लहानसा दंगा झाला होता. कांहीं लोकांनी न्याय करण्याचें काम आपले हातीं घेऊन **टोलबूथ** हें कारागृह फोडिलें व तेथें बरेंच दिवस कैद करून ठेविलेला पोर्टि-

अस या गृहस्थास फाशीं दिलें. पोर्टिअस यानें कांहीं लोकांस जकात चुकविल्याबद्दल गोळी घातली होती.

सन १७३६ त प्रिन्स ऑफ वेल्स याचें लग्न साक्स-गोथा एथील राजकन्येशीं झालें. सन १७३७ त राणीचे मरणानें राजास फार दुःख झालेलें दिसलें. परंतु राजा तर तिच्या हयातींत तिच्या गुणांप्रमाणें तिजवर प्रेम करीत होता असें कधींही दिसलें नव्हतें. त्याच सालीं राजा व युवराज यांमध्यें तंटा लागून युवराजानें टोरी पक्ष स्विकारला व स्पेन देशावरोबर १७३९ त लढाई सुरू केली. स्पयानिश लोकां-च्या अमेरिकेच्या किनारीं इंग्रज लोक जकात चुकवितात असा संशय येऊन स्पयानिश लोक त्यांच्या टपणीस लागले होते. दोघां-ची गाठ पडून आडमिरल व्हर्नन यानें डेरिअन संयोग भूमीवरील स्पयानिश वसाहतींतील पोर्टोबेलो हें शहर घेतलें. आन्सन यानें चिली देशाचे किनाऱ्यावरील पेटा शहर घेऊन ३० लक्ष रुपये किमतीचें सोनें भरलेलें एक जहाज हल्ला करून घेतलें. परंतु पुढील सालीं दक्षिण अमेरिकेच्या उत्तर किनारीं कार्थेजिना शहरावर व्हर्नन यानें हल्ला केला; परंतु त्यांत इंग्रजांस यश आलें नाहीं. त्या लढाईच्या वाईट परिणामामुळें सन १७४१ सालीं सभासदांच्या निवडणुकीमध्यें वाल्पोल यास कोणाचें मत न मिळाल्यामुळें त्यास कामाचा राजीनामा देऊन फ्रान्सास जावें लागलें.

सन १७४० च्या हिंवाळ्यांत नाताळापासून फेब्रुवारीपर्यंत इंग्लंडांत इतकी थंडी पडली होती कीं, तिनें तेथील जमीन बर्फानें अगदीं आच्छादिली होती. टेम्स नदी इतकी थिजून गेली होती कीं, तिजवर तंबू व घालें ठोकून नानाप्रकारचे मनोरं-जक खेळ खेळण्याजोगी ती झाली होती. परंतु गरीब शेतकरी व

मजूर लोक यांचे व विशेषेंकरून धीवर लोकांचे धंदे बंद पडून श्रीमंतांनीं दातृत्व दाखविलें नसतें तर त्यांची उपासमार अतिशय झाली असती.

त्याच सुमारास आस्ट्रूयाचा बादशहा सहावा चार्ल्स हा मरून त्याचे वारशाबद्दल सन १७४० त मोठें युद्ध सुरू झालें. त्याची वारस झणून एक मुलगी मेरिथिरेसा ही होती. ती लोरेन व हंगारीयांचा राजा फ्रान्सिस यास दिली होती. फ्रान्साच्या राजानें पूर्वी झालेला तह एकीकडे ठेवून बव्हेरियाचा इलेक्टर ह्यास ती गादी द्यावी असें ठरविलें. प्रशिआच्या राजानें मेरिया थिरेसा इजपासून शिलेथिया प्रांत बलात्कारानें घेऊन तिच्या साक्सनी आणि बव्हेरिआ या प्रांतांवर हल्ला केला. दुसरे जार्जनें हानोवरचें रक्षण होण्याकरितां त्या दुर्दैवी राजाचा पक्ष उचलल्याबरोबर नामाधिकारी बादशहा पळून गेला, आणि त्याच्या साथ्यांनींही त्यास सोडिलें. जार्ज राजा व त्याचा धाकटा राजपुत्र, कंबर्लंडचा डयूक, उइलियम, हे आपल्याबरोबर २२,००० सैन्य घेऊन मेन नदीचे कांठीं उतरले. फ्रेंचांचें सैन्य दुसऱ्या थडीला होतें. आपले सैन्याचा तळ योग्य ठिकाणीं नसून सैन्यही अडचणींत आहे असें जार्ज राजास वाटून तो तें तेथून उठवून चांगल्या ठिकाणीं न्यावें झणून तें अमळ मागें घेतो आहे तों फ्रेंच सैन्याची एक टोळी नदी उतरून त्यांच्या आघाडीस आली. तेव्हां तें इंग्रजी सैन्य, एकीकडे डोंगर व जंगल आणि दुसरीकडे मेन नदी व तिच्या पलीकडे फ्रेंचांचा तोफखाना अशा अडचणींत सांपडलें. तेथून पुढें जाणें किंवा मागें सरणें सारख्याच धोक्याचें होतें. समोरून आलेलें फ्रेंच सैन्य व इंग्रजी सैन्य यांच्या दरम्यान एक रस्ता दलदलींतून होता. त्यांतून फ्रेंचांनीं उतावीळपणानें इंग्लिशांच्या अंगावर येण्याची मसलत केली. परंतु ती

त्यांची मसलत फसून त्यांना जेव्हां मागें वळावें लागलें, तेव्हां इंग्लिशांनीं, ती अयतीच संधी साधून लढाई दिली. तींत इंग्लिशांचा जय झाला. त्या लढाईंत फ्रेंचांचे ५ हजार व इंग्लिशांचे २ हजार लोक मेले आणि इंग्लिश राजपुत्राचे पायास बरीच जखम झाली. लढाई चालली होती तोंपर्यंत राजा घोड्यावर नागवी तरवार हातांत घेऊन तोफांच्या धुरामध्यें व आगी जवळून देखरेख करीत होता, व सैन्यास उत्तेजन देत होता. त्या लढाईंत इंग्रजांस जय मिळाल्यामुळें मेरिया इझा जर्मनीचें राज्य मिळालें. इंग्लंडचा राजा स्वतः लढाईंत गेला असा हाच पहिला प्रसंग होय.

सन १७४५ चे एप्रिल माहिन्यांत कंबर्लंडच्या ड्यूकानें फोन्टेनोई खेड्यापाशीं फ्रेंचांस गांठून एकसारखा १२ तास तोफखाना चालविला होता. परंतु शेवटपर्यंत टिकाव लागणार नाहीं असें वांटून ड्यूकानें आपलें सैन्य मागें घेतलें. याप्रमाणें कमजास्त महत्वाच्या बऱ्याच लढाया होऊन सन १७४८ त एलाचापेल एथें तह झाला व लढाई बंद झाली.

जेम्स स्टयुअर्ट याचा मुलगा चार्ल्स एडवर्ड यानें फ्रेंच राजापासून १५,००० सैन्य व २० गलबतें घेऊन व स्काट्लंडांत येऊन कांहीं पहाडी लोकांच्या साह्यानें एडिंबरो शहर हस्तगत करून घेतलें. पुढें त्यास बरेच डोंगरी संस्थानी व त्यांचे अनुयायी लोक मिळाल्यावर, त्यानें सन १७४५ त प्रेस्टन प्यान्स एथें सर जान स्कोप याचा आणि सन १७४६ त फालकर्क एथें राजसैन्याचा मोड केला. परंतु कंबर्लंडाचे ड्यूकानें कलोडेनमूर एथवर त्याचा पाठलाग करून त्याचा अगदीं पराजय केल्यावर चार्ल्सास वेषांतरानें व मोठ्या फिकिरींत फ्रान्सास पळून जावें लागलें. पुढें जार्जानें त्यास धरून देणारास ३०,००० पौन्ड

बक्षीस मिळेल म्हणून प्रसिद्ध केलें होतें. परंतु त्याचा कोणी विश्वासघात केला नाहीं. तो रोममध्यें असतां निराश्रित स्थितींत सन १७८८ त मरण पावला. त्याला तरुण आणि त्याचे बापास वृद्ध तोतया असें म्हणतात. वृद्ध तोतया सन १७६६ त मरण पावला. सन १७५६ त अडमिरल बाइंग यानें मिनोर्का बेट गमाविल्याबद्दल त्यास कोर्ट मार्शल (सैन्यांतील न्याय) करून गोळी घालून मारिलें, व सन १७५७ त कंबरलंडाचे ड्यूकापासून करारनाम्यावर सही करून घेतली.

या सर्व अडचणी येण्याच्या पूर्वी चाथमच्या अर्लाचा मुलगा उइलियम पिट्ट हा मुख्य मंत्री झाला होता. व त्याचे कारकीर्दीत इंग्लंडास अमेरिकेंत, आफ्रिकेंत आणि हिंदुस्तानांत बरीच जयप्राप्ति झाली. सन १७६० त सर एडवर्ड हाक, ब्रन्सविकचा फर्डिन्यांड आणि जनरल उल्फ यांनीं अमेरिकेंत पुष्कळ ठिकाणीं जय मिळविल्यामुळें सर्व कानडा देश इंग्लिशांच्या हातीं लागला. हिंदुस्तानांत लार्ड क्लैव यानें सन १७५७ सालीं फ्रेंचांचीं सर्व ठाणीं घेऊन बंगालचा नवाब सुराजउद्दौला यासीं १४६ इंग्रजांस एका अंधार कोठडींत कैद केल्याबद्दल प्लासी एथें लढून त्यास जिंकिलें व त्या इंग्रजांस बंदमुक्त करून हिंदुस्थानांत इंग्रजी राज्याची स्थपना केली, व बंगाल्यांतील चोवीस परगण्यांची जहागिरी मिळविली. सन १७५८ त ईस्ट इंडिया कंपनीच्या कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांनीं लार्ड क्लैव साहेबास बंगाल्यांतील सर्व ठाण्यांचा पहिला गव्हर्नर नेमून पाठविलें. सन १७५९ त कारोमांडल (कुरुमंडल) किनाऱ्यावर मच्छलिपट्टण वगैरे प्रांत कंपनीस मिळाले. त्याच सुमारास अडमिरल हाक यानें हानोवरजवळ मिन्डे एथील लढाईंत फ्रेंचांचे पुष्कळ सैन्याचा व आरमाराचा नाश केला.

सन १७३९ त कमोडर आन्सन यास पृथ्वी प्रदक्षणा-करण्याकरितां पाठविलें. तो पृथ्वीप्रदक्षिणा करणारांतील तिसरा पुरुष होता. तो सन १७४१ त परत आला. व तो आ कामगिरीवर असतां त्यानें ३,१३,०९२ पौंड किंमतीचें एक स्पॅनिश जहाज पकडलें होतें. सन १७६६ त ब्रिटिश म्यूजिअम (पदार्थ संग्रहालय) स्थापन झालें. व्हाइटफील्ड आणि दोन वेस्ली यांच्या उपदेशानें इंग्लंडांत एक धर्म-संबंधी नवीन पंथ सुरू झाला. त्यांना वेस्लियन मेथाडिस्ट म्हणतात. सन १७५२ त पंचांगांत जार्जियन पद्धतीनें पराच फेरफार होऊन तो स्वीडन व रशिया शिवाय इतर देशांत मान्य झाला. त्या पूर्वी वर्षाचा काल ३६५ दिवस ६ तास मोजीत असत व वर्षाचा आरंभ मार्चाच्या २५वे तारिखेस करीत. तें बदलून जानेवारीच्या पहिले तारखेस वर्षाचा आरंभ करून प्रत्येक चार वर्षांनीं एक दिवस जास्त धरण्याचें ठरलें. ही दुरुस्ती इलिजाबेथच्या कारकीर्दीत रोम एथील पोप, १३ वा ग्रेगरी, यानें केली होती. परंतु ती १७५२ त कायदा होऊन इंग्लंडांत अमलांत आली. दीप-स्तंभ व सौरदुर्भीणी याच कारकीर्दीत प्रचारांत आल्या.

दुसरा जार्ज ह्द्रोगानें सन १७६० त त्र्याहत्तरावे वर्षी मरण पावला. त्याचा वडील मुलगा चेंडूफळी खेळत असतां चेंडू लागून सन १७५१ त मेला होता. जार्जाच्या मरणसमयीं त्याचा दुसरा मुलगा उइलियम आगष्टस (कंबर्लंडाचा ड्यूक) आणि दुसरीं सहा मुलें शिल्लक होतीं. त्यांतील वडील मुला-चा मुलगा जार्ज हा तिसरा जार्ज या नांवानें आपले आजाचे गादीवर बसला.

तिसरा जार्ज.

(सन १७६०–१८२०)

तिसरा **जार्ज** सन १७३८ त जन्मला होता. तो **फ्रेड-रिक, प्रिन्स ऑफ वेल्स** याचा मुलगा होता. **फ्रेडरिक** हा सन १६५१ त मरण पावला. राजपुत्राचें आईशीं व आजाशीं सख्य नसल्यामुळें तो अगदीं साध्या मंडळींत सामान्य मनुष्याप्रमाणें असे. त्याला विद्या बरीच असून अंगीं वक्तृत्व उत्तम होतें. तो **इंग्लंडां**त जन्मलेला असल्यामुळें त्याच्या सर्व रीतीभातीं इंग्रजी होत्या. तो दिसण्यांत खुबसुरत असून बांध्यानेंही सुदृढ होता. त्याला प्रपंचाच्या शांततेची आवड होतीं, व त्यासारखा बाप, नवरा, मुलगा आणि भाऊ क्वचितच सांपडला असता. तो मोठा दाता व दयाळू असे. त्याचे हातून एकादें वाईट कृत्य झाल्याची गोष्ट त्याच्या सर्व आयुष्यांत आढळणार नाहीं. त्याचे हातून राज्य-कारभारांत कांहीं चुका घडल्या असतील; परंतु त्या केवळ त्याच्या स्थितीला अवश्य अशा अभिमानाच्या व मतभेदाच्या असतील. तो प्रत्यक काम विचारपूर्तक करीत असे. उता-विळपणा त्याला अगदींच ठाऊक नव्हता. त्याचे लग्न सन १७६१ त **मेक्लेन्बुर्ग स्ट्रॅलिट्झ**च्या ड्यूकाची बहीण **चार्लट** इशीं झालें.

सासवार्षिक लढाई सन १७५५ पासून ह्या वेळेपर्यंत मोठ्या जोरानें चालली होती, व **जर्मनी**मध्यें जो अनिवार्य खर्च चालला होता, त्यामुळें प्रजा फार कंटाळून जाऊन तह व्हावा म्हणून खटपट करीत होती. परंतु **फ्रेंचां**च्या मनांत **स्पेन** देशास उत्तेजन देऊन **इंग्लंडा**बरोबर लढाई करण्यास लावा-वयाचें होतें, म्हणून तहाच्या गोष्टीस बहुतेक लोक कबूल होईनात व लढाई बंद करीनात. तेव्हां त्यांची खुमखुम जिराविण्याकरितां मुख्यमंत्री **पिट** यानें **स्पेन**बरोबर लढाई करण्यास सभेला सुच-

विलें. परंतु ती गोष्ट पसंत न पडल्यामुळें त्यानें सन १७६२ त मुख्य मंत्रीपणाचा राजिनामा दिला पिटाचे जागेवर मुख्य मंत्री बुटी झाला. स्पेनास लढाई देण्याचा विचार लवकरच ठरून तयारी झाली. पोर्च्युगल इंग्लंडचा पक्ष सोडीना ह्मणून फ्रेंचांनीं पोर्च्युगालावर हल्ला केला. इंग्रजांनीं त्या देशास मदत पाठवून फ्रेंचांस मागें हटविलें.

ब्रिटिश सैन्याचे सहीचे दिवस असल्यामुळें इंग्लिशांनीं फ्रेंचांपासून पांडेचरी, बेलीबेट व डोमिनिका आण स्पेनापासून क्यूबा बेटांतील श्रीमान् शहर हवाना व फिलीपाईन, बेटें जिंकून घेतली. बुटीस शांततेची फार आवड असे. लढाई चालतां चालतां फ्रान्स आणि स्पेन ह्यानीं लढाईला कंटाळून जाऊन बूटी याचे सल्ल्यानें पारीस एथें सन १७६३ त तह केला. त्या योगानें इंग्लंडास कानडा, मिनोर्का, केप्रिटन ग्रेनाडा, ग्रिनेइन्स बेटें, सेंटविन्सेट, डोमिनिका, टोबागो, सेनिगाल नदीच्या कांठचीं ठाणीं आणि फ्लारिडा हीं संस्थानें इंग्लिशांस मिळालीं. फ्रान्साचे किनाऱ्यावरील बेलिबेट न्यूफाउंडलंडाजवळील सेन्टपायर व मिक्केल हीं बेटें, पश्चिम हिंदी बेटांतील मार्टिनिक, ग्वाडालूप, मारिगालान्ट, डेसिरेल व सेंट लुशी हीं ठिकाणें आफ्रिकेतील गोरी बेटें आणि पूर्व हिंदी बेटांतील घेतलेल्या वखारी व किल्ले हे फ्रेंचांस परत मिळून स्पेन देशास हवाना व मानिला हीं शहरें परत मिळालीं; व त्यांच्या बदला फ्लारिडा हें इंग्लंडास मिळालें, व पोर्च्युगीज लोकांशीं तह करावा लागला. हा तह पिटास व इंग्लिश लोकांस न आवडल्यामुळें बूटी हा उत्तरोत्तर फार अप्रिय होत चालला. बुटीनें सन १७६३ त राजीनामा दिल्यावर त्याचे जागीं ग्रेनव्हिल हा मुख्य मंत्री झाला. ग्रेनव्हिल-

लानें पार्लमेंटांतील सभासदांच्या व मंत्र्यांच्या दुर्गुणांविषयीं नार्थ-ब्रिटन पत्रांत मजकूर छापणाऱ्या उइल्कीज यास धरून त्यावर मोकदमा चालविला व त्याचा उतारा घेणाऱ्या इतर पत्रकारांसहि धरण्याविषयीं एकसा वारंट पाठविलें. परंतु तें बेकायदा ठरून सर्व लोक दोष मुक्त झाले.

सन १७६५ त पार्लमेंट सभेनें स्वदेशांत जास्त कर बसवितां येत नाहीं व पैशाची तर फार जरूर असें पाहून अविचारानें अमेरिकेंतील वसाहतींत छापील कागद सुरू करण्याचें ठरविलें. त्यावरून अमेरिकेंत जिकडे तिकडे एक दंगा होऊन आमचे लोक पार्लमेंटमध्यें असल्याशिवाय आह्मी तो कायदा मानीत नाहीं, असें तेथील सभेनें कळविलें. ग्रेन्व्हिलाचे जागीं त्यावेळेस रार्किंगहामचा अर्ल हा मंत्री होता. त्यानें तो छापील कागदांचा कायदा रद्द करून सन १७६६ त तह केला. रार्किंगहामचे जागीं एक वर्षाचे आंतच पूर्वीचा पिट्ट हा दुसऱ्यांदां मंत्री झाला. त्याचे कारकीर्दींत (सन १७६६-८) कानडाप्रांत हा पूर्णपणें जनरल वुल्फ याचे विशेष शौर्यानें इंग्लिशांच्या हस्तगत झाला. पिट्ट पुढें अजारी पडल्यामुळें त्याला मंत्र्याचें काम झेपेना, तेव्हां त्याचे जागीं ग्राफ्टनचा ड्यूक हा मुख्य मंत्री झाला. त्याचे कारकीर्दींत पैशाच्या टंचाईकरितां स्वदेशीं कर बसाविण्यास पार्लमेंट परवानगी देईना, तेव्हां वसाहतींत कर बसवावा असें ठरून अमेरिकेंत चहा व दुसरे कांहीं पदार्थयांवर सन १७६७ त उत्पन्न वाढण्याकरितां नवीन कायदा करून नवीन कर बसविला. या व दुसऱ्या कायद्यांनीं अमेरिकन लोकांनीं त्रासून जाऊन पुष्कळ तक्रारी केल्या. तेव्हां मुख्य मंत्री लार्ड नार्थ यानें कांहीं पदार्थांवरील जकात उठवली. परंतु वसाहतवाल्यांनीं आमचे पंच पार्लमेन्टमध्यें असल्याशिवाय आह्मी कोणतीही जकात देणार नाहीं असें

निक्षून सांगितलें. पुढें स्वतंत्रतेकरितां त्यांनीं सन १७७६-८१ पर्यंत लढाई केली. चहाचीं कांहीं जहाजें **बोस्टन** बंदरास गेलीं होतीं, तीं तेथील लोकांनीं एका अंधाऱ्या रात्रीं समुद्रांत रिचवून टाकिलीं. त्याबद्दल **पार्लमेंटानें** वसाहतीच्या लोकांच्या हक्कांबद्दल कायदा करून तो अमलांत आणण्याकरितां त्यांवर कांहीं सैन्य पाठविलें. **अमेरिकन** लोकांनीं आपल्या सभेच्या मार्फत आपले हक्क संभाळावे म्हणून निश्चय केला. दोघांची लढाई जुंपून **बोस्टन** शहरापाशीं **लेक्सिंग्टन** एथें पहिला रक्तपात झाला. **इंग्लिश** सैन्याधिपति **गेज** यानें **कंकार्ड** एथें कांहीं शिपाई पाठवून कांहीं **अमेरिकन** तोफा हल्ला करून घेण्याची खटपट केली; परंतु तें न जुळतां त्यास मागें हटावें लागलें. **अमेरिकन** लोकांच्या मनांत **बोस्टना** नजीक **बंकर्स** टेकडीवरून **इंग्लिशांवर** तोफांचा भडिमार करावा असें येऊन तेथें त्यांनीं कांहीं बांध काम चालविलें होतें. परंतु **इंग्लिशांनीं** त्यावर हल्ला करून त्यांस तेथून हाकून दिलें. पुढें सुमारें पंधरा दिवसांनीं म्हणजे तारिख ४ जुलई सन १७७७ त **वाशिंग्टन** यानें **अमेरिकन** सैन्याचें आधिपत्य पतकरून व त्या राष्ट्रास उत्तेजन देऊन, **युनायटेड स्टेटस** (संयुक्त संस्थानें) हीं स्वतंत्र आहेत असें प्रसिद्ध करण्यास तेथील सभेचे मनांत भरविलें. नंतर त्यांनीं आम्ही स्वतंत्र आहों, आम्ही **जार्ज** राजाचे बिलकूल ऐकणार नाहीं असें उघड बोलून दाखविलें. तें म्हाल्यावर **फ्रान्स, स्पेन** व **हालंड** यांनीं त्यांशीं मैत्रिकीचा तह केला. नंतर **साराटोगा** एथें **अमेरिकन** लोकांनीं **कानाड्या**चा **इंग्रज** सरदार **बुर्गोयनी** याचे मोठे सैन्यास वेढिल्यामुळें त्याचा नाइलाज होऊन त्यास शत्रूचे स्वाधीन व्हावें लागलें (स. १७७७). त्या जयानें **इंग्लिशांच्या** शत्रूंस

व विशेषेंकरून फ्रेंच लोकांस हुरूप येऊन त्यांनीं सन १७७८ त युनाइटेड स्टेटस बरोबर तह करून त्यांस मदतीकरितां कांहीं आरमार पाठविलें.

पुढें दोन्ही पक्षांच्या पुष्कळ ठिकाणीं लढाया झाल्या व त्यांत इंग्लिशांसच जय मिळत गेला; परंतु सन १७८१ त लार्ड कॉर्नवालिस याचा व्हर्जिनियामध्यें यार्क टौन या गांवीं जो पराजय झाला त्यानें इंग्लिशांची अगदीं निराशा झाली. लढाई चालूच होती, लहान मोठे जय मिळतच होते परंतु त्यांत सांगण्या-सारखी एकही गोष्ट पुढें घडली नाहीं. सन १७८१त मिनोर्का बेट इंग्लिशांच्या हातून गेलें. सन १७८३ सालीं याकटापिट्ट हा मुख्य मंत्री झाला. त्याच सालीं जिब्राल्टर परत घेण्याकरितां स्प्यानिश लोकांनीं पुष्कळ खटपट केली व ३,००० लोकांचे प्राणही खर्ची पाडले; परंतु त्यांस तें परत मिळालें नाहीं. त्याच सालीं अमेरिकेतील संयुक्त संस्थानें हीं स्वतंत्र आहेत असें प्यारिस व व्हर्सेलिस एथें सन १७८२।३ त झालेल्या तहांत इंग्लिशांस कबूल करणें भाग पडलें, आणि मिनोर्का व फ्लारिडा हीं स्पेनास द्यावीं लागलीं. पुढें लार्ड नार्थच्या जागीं लार्ड राकिंगहाम हा मंत्री झाला. कारण राकिंगहाम यास अमेरिकेंत यश आलें नाहीं.

अमेरिकेंतील राजक्रांतीचें सुख पाहून तिकडील कित्येक फ्रेंच स्वदेशीं आले तेव्हां त्यांनीं ती गोष्ट लोकांच्या मनांत भरवून मोठा दंगा माजविला, व लाखो सरदार, स्त्रिया, राजा व राणी यांचा सन १७९३ त शिरच्छेद केला. तें पाहून युरोपांतील इतर राष्ट्रांस मोठें भय सुटलें व बहुतेक युरोपियन राष्ट्रांचा कट होऊन फ्रान्सावरोबर युद्ध करण्याचें ठरलें. ब्रन्सविकच्या ड्यूकानें केलेला पहिला हल्ला व्यर्थ गेला, परंतु फ्रेंचयांनीं सन १७९२ त

बेलज्यम, हालंड, जर्मनीचा कांहीं भाग व स्विट्सर्लंड हे देश जिंकून घेतले. सन १७९६ त नेपोलियन बोनापार्ट हा त्यांचा सेनाधिपति झाला. त्याचा विजय ईजिप्त (मिसर) देशांत चालू असतां सन १७९८ त इंग्लिश आडमिरल नेल्सन यानें फ्रेंच आरमाराचा नाईल नदीच्या मुखाजवळ अबुकीर आखातांत पराजय केला. सन १८०२ मध्यें नेपोलियन यानें पर्मिएन्स एथें इंग्लिशांबरोबर जरी तह केला तरी इंग्लंडावर हल्ला करण्याविषयीं त्याची आंतून तयारी चालूच होती. परंतु नेलसन यानें ट्राफलगार एथें फ्रान्स आणि स्पेन यांच्या संयुक्त आरमाराचा पराजय केल्यावर ती त्याची तयारी बंद पडली. नेल्सन हा त्याच लढाईंत मेला. मरते वेळेस त्यानें आपले सैन्यास हा पुढील उपदेश केला:—प्रत्येकानें आपापलें काम बजवावें अशी इंग्लंडाची इच्छा आहे.

सन १८०५ त फ्रान्सा विरुद्ध इंग्लंड, आस्ट्रिया, रशिया, आणि स्विट्सर्लंड यांनीं कट केला होता. त्याच्या पुढील वर्षी रशिया प्रशिया, आस्ट्रिया, स्वीडन आणि इंग्लंड यांनीं कट केला; परंतु दोहोंचाही कांहीं उपयोग झाला नाहीं. नेपोलियन यानें स्पेनदेशचे राजास पदच्युत करून व कैद करून त्याचे जागेवर आपला भाऊ जोजेफ यास बसविलें. तेव्हां स्पानिश लोकांना राग येऊन त्यांनीं इंग्लंडाचें साह्य मागितलें. इंग्लिशांनीं १०,००० सैन्यानिशीं सरदार सर आर्थर वेलस्ली (लार्ड वेलिंगटन) यास पाठविलें. त्यानें फ्रेंचांचा स्पेनांतून प्यारिस शहरापर्यंत हळूहळू पाठलाग करून त्यांवर विक्टोरिया एथें जय मिळाल्यावर त्यानें पुनः त्यांचा पाठलाग सुरू केला

सन १७९८ त आयर्लंड स्वतंत्र करून घेण्याकरितां

तेथील लोकांनीं बंड केलें होतें व त्यांस फ्रेंचांचें साह्यहि आलें होतें. परंतु तें बंड लवकरच मोडून ग्रेटब्रिटन व आयर्लंड यांच्याकरितां एक कायदे करणारी मंडळी असावी व आयर्लंडांतून ३२ लार्ड आणि १०० कामन लोक पार्लमेन्टमध्यें सभासद निवडून पाठवावे असें सन १८०१ मध्यें ठरलें.

सन १७८० मध्यें पार्लमेन्ट सभेनें काथलिक लोकांवर कांहीं दया केली म्हणून जनरल गॉर्डन यानें कांहीं लोकांस चिथवून बंड केलें होतें. बंडखोरांनीं लंडन शहरांतील व आसपासचीं क्याथलिक देवळें पाडून न्यूगेट, फ्लीट, किंग्सबेंच व कित्येक खाजगी घरें जाळिलीं. ते त्यांकडूनहि जाळणार होते, परंतु लवकरच सैन्याची मदत येऊन दोनशें बंडखोर मारले गेले.

तिसरा जार्ज १७८८ मध्यें अजारी पडल्यामुळें त्याचे जागीं त्याच्या मुलास प्रतिनिधी नेमिलें होतें; परंतु तो थोडक्याच दिवसांत वेडा होऊन राज्यकारभार पाहूं लागला. पुढें सन १८११ च्या सुमारास पुनः अजारी पडला, डोळे गेले, वारंवार बेशुद्ध होई, असें पाहून पार्लमेंटानें त्याचें राज्य पहाण्यास त्याचे वडील मुलासच पुनः सांगितलें.

तिसरे जार्जाचे कारकीर्दीत सन १७६८ त रायल अकॅडमी (कलाकुसरीची पाठशाळा) स्थापन झाली. क्याप्टन कुक यानें त्याच वर्षी पृथ्वी प्रदक्षिणा करण्यास आरंभ करून सन १७७५ पर्यंत तीन प्रदक्षिणा केल्या; परंतु तो तिसरे वेळीं पासिफिक महासागरांत ओहीही किंवा हावई बेटांत गेला असतां, तेथील रानटी लोकांनीं त्यास मारून खाल्लें. सन १७८२ त आडमिरल रोडने यानें फ्रेंचांवरोवर तरवार गाजविली म्हणून त्यास नोबल (वडालोक) केलें. सन १७८४ त सन्डेस्कूल्स (आदितवारच्या शाळा) स्थापन झाल्या. सन १७८६ त मार्ग-

रेट निकलसन नांवाच्या एका वेडे बाईनें राजा गादींतून उतरत असतां सुरीने भोंसकून त्यास मारण्याचा प्रयत्न केला होता. त्याच सुमारास वॉरन हेस्टिंग्स यानें हिंदुस्थानांत गव्हर्नर असतां फार दुर्वर्तन केलें ह्मणून त्याची नऊ वर्षें चौकशी चालून तो दोष मुक्त झाला. लार्ड हौ यानें सन १७९४ त, सर जान जर्व्हिस यानें १७९७ त, लार्ड डंकन यानें १७९७ त, लढाया जिंकून मोठा लौकिक मिळविला. सन १७८३ त पिट्चा मुलगा मुख्य मंत्री झाला. सन १८०१ त तो मेल्यावर त्याचे जागीं फाक्स हा मंत्री झाला. सन १७९७ त आरमारांत जास्त पगारा-करितां बंड झालें होतें, परंतु त्यावरील पुढाऱ्यांस धरून फांशी दिल्यावर तें तेव्हांच नाहींसें झालें.

सन १८०७ धुराचे दिवे लढंनांत लाविले. वाफेच्या यंत्राचा उत्पादक वाट, तुणण्याच्या वाफेच्या यंत्राचा उत्पादक हार्ग्रेव्हज, क्रामटन व कार्ट राइट हे याच कारकीर्दीत प्रसिद्धीस आले. ह्यूम, गिबन, स्मालेट, हेन्री, रसेल आणि राबर्टसन हे इतिहासकार झाले. हर्षेल ज्योतिषी, यानें युरेनस या ग्रहाचा शोध लाविला व त्यास जार्जियन हें नांव देविलें. डाक्टर सामयुएल जान्सन हा इंग्लिश कोश-कार व रास्सलर ग्रंथाचा कर्ता, ओलिव्हर गोल्डस्मिथ हे आणि ह्यलियम कौपर हा नामांकित रसिककाव्याचा कर्ता याच कारकीर्दीत होता. मंगोपार्क या प्रसिद्ध प्रवाशाचेंहि नांव याच यादींत घातलें पाहिजे.

सन १७६१ त क्लैव ह्यानें मुर्शिदाबादचा नबाब मिर-जाफर यास पदच्युत करून त्याचे गादीवर त्याचा जांवई मिरकासिम यास बसविलें, तेव्हां बरद्धान, मिदनापूर आणि चित्तागांग या परगण्यांची सनद मिळविली. सन १७६५ त क्ला-

इव्हसाहेब यास पुन्हां गव्हरनर करून पाठविलें. त्याला **वारन हेा-**
इव्ह आफ **ग्लासी** (ग्लासी एथील सरदार क्लिव) असें नांव देऊन
तें अयरिश वडे लोकांच्या यादींत नांव पडलें. **बक्सार** एथील ल-
ढाईत जय मिळून इंग्लिशांस **बंगाल, बहार** व **ओलया** हे प्रांत
मिळाले; परंतु त्यांबद्दल कांहीं खंडणी द्यावी लागत असे. त्याच साली
अर्काटच्या नबाबापासून **चिंगलपटा**ची सनद मिळाली. सन
१७६६ त **उत्तर सरकार** या प्रांताची सनद निजामापासून
मिळाली. सन १७६७ त **वारनहेस्टिंग्स** यास गव्हरनर केलें व
१७७२ त पहिला गव्हरनर जनरल केलें. सन १७७५ त **बनारस-**
ची जमीनदारी अयोध्येच्या नबाबापासून मिळविली. सन १७७६ त
साष्टी बेट पेशव्यापासून मिळविलें. सन १७७८ त **नागोर**
हा प्रांत **तंजावर**च्या राजापासून आणि **गुंतुर** वगैरे प्रांत नि-
जामापासून मिळविले. सन १७८५ त **पिनांग** बेट मिळालें. सन
१७८६ त **मार्किस** आफ **कार्नवालिस** यास गव्हरनर जनरल
करून पाठविलें. सन १७९२ त **मलबार, दिंडिगल, सालेम**
आणि **बारामहाल** व सन १७९९ त **कोइमतूर** व **कानडा** वगैरे
प्रांत **म्हैसूर**च्या **टिपूपासून** मिळविला. त्याच साली **तंजावर**
प्रांत **तंजावर**च्या राजापासून मिळाला. सन १७९८ त लार्ड
मार्निंगटन यास गव्हरनर जनरल नेमून पाठविलें. स. १८०० त
वल्लारी कडपा इत्यादि प्रांत टिपूपासून १७९९ त **निजामास**
मिळाले होते ते **निजामानें इंग्लिशांस** दिले. स. १८०१ त
कर्नाटक प्रांत तेथच्या नबाबा पासून मिळविला आणि गोर-
खपूर, दुआबाचाखालील भाग व बरेली हे प्रांत अयो
ध्येच्या वजिरापासून मिळविले. १८०२ त **बुंदेलखंड** पेशव्या
पासून आणि १८०३ मध्यें **दुआबाचा** वरील भाग व **दिल्ली**
खालील मुलुख शिंद्याकडून मिळविला. १८७५ त **गुजराथ**

प्रांत गायकवाडापासून मिळाला. त्याच खालीं मार्क्विस आफ वेलस्ली (लार्ड मार्निंगटन) यास पुन्हा गव्हरनर जनरल ह्मणून पाठविलें. त्याचे मागून १८०५ तच सर जार्ज बार्लो यास व सन १८०६ त अर्ल मिन्टो यास हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल केलें.

सातवा भाग.

दुसरें प्रकरण.

(सन १८११-१८१९.)

यूवराजसत्ता.

(सन १८११-१८२०).

तिसरा जार्ज अतिशय अजारी व राज्य करण्यास निरुप योगी ह्मणून होता, ह्मणून त्याचा वडील मुलगा जार्ज प्रिन्स आफ वेल्स यास पार्लमेंट सभेनें सन १८११ मध्यें राज्य पाह-ण्यास नेमिलें होतें. फ्रान्सांत मोठा धुमाकुळ चालला हो ता. नेपोलि-यन बोनापार्ट याची जिकडे तिकडे भरभर चालली होती. सन १८१२ त फाक्स याचे जागीं झालेला मुख्य मंत्री परसीव्हल हा गोळी लागून मेला. त्याच वर्षी अमेरिकेतील संयुक्त संस्थानांती-ल लोकांनीं इंग्लंडाबरोबर लढाई करण्याचे ठरविलें. परंतु त्या लढाईत नावांजण्यासारखा एकही प्रसंग न येतां कानड्याच्या किनाऱ्यावर जहाजांच्या किरकोळ झटापटी मात्र झाल्या. सर्व राष्ट्रें बोनापार्टाचे वाढत चाललेलें ऐश्वर्य कमी करण्याकरितां प्रयत्न करीत होतीं. इंग्लिशांचा सरदार ड्यूक आफ वेलिंग्टन यानें सन १८१३ मध्यें पारिस एथें प्रवेशकरून सर्व राष्ट्रांच्या सल्लयानें व फ्रेंचांच्या सेनेट समेच्या कबुलायतीवरून बोनापा-

ट्ट यास पदच्युत केलें आणि १८ वा लुई यास पुन्हा गादीवर वसवून बोनापार्टाने इटलीचे किनाऱ्याजवळील एलवा बेटांत रहावें असें ठरविलें. सर्व राष्ट्रें व्हियेना एथें तह करण्यांत गुंतलीं आहेत असें पाहून सन १८१५ त बोनापार्ट हा एलवा एथून निघून फ्रासांत येतांच त्याच्या प्रीतींतले लोक व शिपाई आनंदानें त्याला येऊन मिळाले हा बोनापार्ट पारिस ऐथें येतो आहे असें कळतांच १८ वा लुई हा प्यारिस एथून पळून गेला. बोनापार्टानें पूर्वीप्रणाणें तेथील सर्व राज्य-कारभार आपले हातीं घेऊन जबरदस्ती चालू केली. पुढें १८ व्या लुईबरोबर केलेल्या ठरावाप्रमाणें सर्व राष्ट्रांशीं मैत्री करण्याची खटपट चालू केली. परंतु सर्वांच्या मनांतून त्या दुष्टाची पीडा नाहींशीं करावयाची होती, म्हणून त्यांनीं ती त्याची इच्छा अमान्य करून एकोप्यानें युद्ध देण्याची तजवीज चालविली. नंतर इंग्लिश आणि प्रशियन यांनीं प्रथम सुरुवात करावी असें ठरलें. तेव्हां त्यांचे शूर व नांवाजलेले सरदार ड्यूक आफ वेलिंगटन आणि प्रशियन राजपुत्र ब्लुचर यांनीं १,५०,००० सैन्यानिशीं हालंडांत येऊन वाटर्लू या गांवा-जवळ बोनापार्ट यास गांठिलें. फ्रेंचांचें सैन्य त्या संयुक्त सैन्या-पेक्षां फारच पुष्कळ होतें. तथापि इंग्लिशांनीं एक बाजूनें व दुसरे बाजूनें प्रशियन यांनीं मोठ्या शौर्यानें व नेटानें मारा चा-लवून बोनापार्टास जेरीस आणिलें. बोनापार्ट पळूं लागला. त्यास प्यारिस एथें एका रशियनानें पकडून इंग्रजांच्या स्वाधीन केल्यावर "मी राज्य सोडितों, मला जीवदान द्या" असें विनविल्यावर बोनापार्टास इंग्लंडास नेलें. आणि तेथून राजकीय वंदिवानाप्रमाणें दक्षिण अटलांटिक समुद्रांत अगदी एकीकडे सेंट हेलिना बेटांत नेऊन ठेविलें. याप्रमाणें सर्व राष्ट्रा-

स पीडा देणारा व आपल्या कर्माप्रमाणें शिक्षा भोगणारा **नेपोलियन** त्या बेटांत मोठ्या आनंदांत परंतु निराशेंत दिवस कादित असतां सन १८२१ त मरण पावला.

वेलिंगटन यानें **फ्रेंच** लोकांस जिंकिलें असें वाटावें म्हणून सर्व राष्ट्रांचे लुवाड्न घेतलेले प्रांत ज्याचे त्यास दिले. **फ्रान्सां**तील मुख्य शहरें, लढाऊ जागा, व किले, परकीय सैन्यांच्या ताब्यांत ठेवून १८ वा **लुई** यास गादीवर बसाविलें व ती व्यवस्था १८ वा **लुई** चांगला वागूं लागेपर्यंत ठेविली होती. सन १८१६ त **आलजियर्स** या ठिकाणीं एक बंड होऊन तेथील **ब्रिटिश** प्रतिनिधि व कित्येक स्त्रीपुरुषें यांस तेथील अधिकारी **डे** यानें कैद केलें होतें म्हणून कांहीं आरमार, आडमिरल लार्ड **एक्स्मौथ** याजबरोबर पाठवून त्यास जिंकून कैद्यांस मुक्त केलें. **फ्रेंचां**बरोबर चाललेली लढाई संपली म्हणून आपल्या वरचें खराचें ओझें कमी होईल असें लोकांस वाटत होतें तें सर्व व्यर्थ होऊन लढाईस झालेला खर्च भागविण्याकरितां काढिलेलें कर्ज फेडिलें पाहिजे म्हणून नवीन कर बसविण्याची तजवीज चालू झाली. ती लोकांस न आवडून कित्येक लोकांनीं त्या विरुद्ध व्याख्यानें देऊन जिकडेतिकडे लोकांचीं मनें विघडविलीं, व बंडे केलीं. **टावर, ब्यांक**, आणि **चराकी** यांजवर हल्ले होऊन **लंडनास** आग लावण्याची भीति उत्पन्न झाली. एकवेळ युवराज (**प्रिन्स** आफ **वेल्स**) बडे लोकांच्या सभेंतून बाहेर येत असतां कित्येक मूर्खांनीं त्यावर शिव्यांचा व दगडांचा वर्षाव केला. तेव्हां **हेबिअस कार्पस आक्ट** एकीकडे ठेवून ठिकाठिकाणच्या बंडांतील पुढारी लोकांस धरून फांशीं दिलें त्याचसालीं युवराजाची मुलगी **चार्लट** इचें लग्न **साक्स कोबर्ग** एथील राजपुत्र **लिओपोल्ड** याशीं झालें. ती कम-

नशीबानें लवकरच मूलपणींच सन १८१७ त मरण पावलीं. सन १८१८ त **चार्लटराणी** मरण पावून राष्ट्रास फार दुःख झालें. सन १८२० मध्यें युवराजाचा भाऊ, **केंटचा डयूक, एडवर्ड,** हा मरण पावला. त्यास आपली सध्यांची राणी **व्हिक्टोरिया** ही तान्ही मुलगी होती. तिसरा **जार्ज** हा थकत थकत त्याच सालीं ८२ वर्षांच्या वयांत मरण पावला. त्याचे गादीवर **युवराज** हाच पुढें **जार्ज** या नांवानें गादीवर बसला. तिसरे **जार्जा**च्या कारकीर्दीतील युवराज सत्तेंत सोन्यारुप्यांचीं नाणीं, हीन धातु घालून नवीन पाडिलीं, व **आट्लांटिक** महासागरांत आगबोट सुरू केली. सन १८१५ त **कुमाऊन** व **तिरै**चा कांहीं भाग नेपाळ सरकाराकडून मिळविला, व त्याच सालीं **अर्ल आफ मोइरा** यांची गव्हर्नर जनरलाचे जागीं नेमणूक झाली. त्याच वर्षीं **सीलोन**बेट जिंकून घेतलें. सन १८१७ त **सागर** प्रांत आणि **धारवाड** प्रांत **पेशव्यां**पासून आणि **अमदावाद, गाईकवाडा**पासून काबीज केले. सन १८१८ मध्यें होळकरापासून **खान्देश,** पेशव्यापासून **पुणें, कोंकण** व **दक्षिणमहाराष्ट्र** आणि **वऱ्हाड**चे राजापासून **नर्मदे**च्या कांठचा मुलूख आणि **संमळपुर** व **पाठणा** प्रांत हे मिळाले. सन १८२० त **वाडी** प्रांताच्या दक्षिणेकडील कांहीं प्रांत वाडीच्या **सांवता**पासून मिळाला.

सन १८१० मध्यें **मारिशान** बेट फ्रेंचांपासून घेतलें. सन १८१९ त **सिंगापूर** (सिंहपुर) हें **मलाका** द्विपकल्पा जवळील एका बेटांतील शहर हस्तगत झालें. सन १८०० त मलाया द्वीपकलपांतील एक पूर्वेकडील अरुंद पट्टी **डच** लोकांपासून मिळाली. तिला **वेलस्ली प्राव्हिन्स** म्हणतात. सन १८१२ त **झाइड** नदींत आगबोटी सुरू झाल्या. राकेश

(दगडी तेल) तेलाचे दिवे लावूं लागले, मिनै सामुद्रधुनिवरील पूल बांधला.

चवथा जार्ज.

(१८२०-१८३०).

चवथा जार्ज गादीवर बसला तेव्हां त्याचें वय ५१ वर्षांचें होतें. तो स्वभावानें फार उधळ्या होता. त्यास विद्या फार नव्हती खरी, परंतु होती तेव्हढीचे त्याच्या मनावर उत्तम संस्कार झाले होते. त्यानें बरेच दिवस लग्न केलें नव्हतें व मुर्ख लोकांच्या संगतीनें ७,००,००० पौंड कर्ज केलें होतें. सन १७९५ त, लग्न करशील तर तुझें सर्व कर्ज फेडीन, असें त्याच्या बापानें सांगितलें तेव्हां त्यानें मोठ्या नाखुषीनें आपली नाते वाईख मुलगी **ब्रन्सविकची कारोलाईन** इशीं लग्न केलें. परंतु तो दुसऱ्या एका वृद्ध पण सुरूप स्त्रीवर फिदा असल्यामुळें तो **कारोलाईन** बरोबर कधींही आनंदानें राहिला नाहीं. ती ब्लाकहीथ एथें एकटी राहात असे. तिला एक मुलगी मात्र झाली होती व तीच काय ती त्याची वारस होती. ती मेल्याचें वर्तमान मागील भागांतील कहरांत सांगितलेंच आहे. तिसरा **जार्ज** मेला तेव्हां **कारोलाईन इटाली** मध्यें राहात होती. तिनें इंग्लंडांत येऊन राणी होण्या विषयीं पुष्कळ खटपट केली; परंतु तें सर्व फुकट जाऊन राज्याभिषेक एकट्यालाच झाला. तें दुःख तिला न सोसून ती ह्याच वर्षी मोठ्या विपत्तींत मेली. **केटोस्ट्रीट कान्स्पिरसी** (केटो रस्त्यांत झालेलें बंड) कांहीं मंत्र्यांचा घात करण्याकरितां सन १८२० त झालें होतें. परंतु तें उघडकीस येऊन त्यांतील मुख्य पुढारी **थिसलवुड** व दुसरे पांच यांस फाशींची

शिक्षा झाल्यावर तें वंड अगदीं नाहींसें झालें. सन १८२१ त ग्रीक लोकांनीं जुलमी टर्की राजास कंटाळून टर्कीवर हल्ला केला आणि इंग्लंड, फ्रान्स आणि रशिया यांच्या साह्यानें नाव्हेरिनो एथें टर्की आरमाराचा सन १८२७ त धुवा उडविला, आणि आपलें राज्य स्वतंत्र करून घेतलें तेव्हां, ग्रीस एथील गादी बव्हेरिया एथील राजपुत्र ओथो यास मिळाली. तत्पूर्वी जार्ज गादीवर बसल्यावर त्यानें स्काट्लंड, आयर्लंड व हानोवर एथें जाऊन ज्याच्या त्याच्या चाली प्रमाणें व आवडी प्रमाणें पोषाख करून त्यांजपासून मान संपादन करून घेतला, आणि त्यांच्या त्यांच्या भाषेंत भाषण करून प्रत्येक मनुष्याला खुष केलें. आयर्लंडांत भेटीअंतीं बंडें होतील असें वाटलें होतें; परंतु तो जातांक्षणींच सन १८२२ त हेबियस कार्पस आक्ट तहकूब करून इन्सरेक्शन आक्ट (दंग्याचा कायदा) मंजूर केला. त्याच वर्षी दुष्काळ पडून मन्स्टर व कान्नाट हे प्रांत, श्रीमानांचा उदार आश्रय मिळाला नसता तर, ओस पडले असते. सन १८२५ चें साल कंपन्या (मंडळ्या) विषयीं प्रसिद्ध आहे. समाईक भांडवलानें कांहीं मंडळ्या मेक्सिको, चिली, पेरू, आणि ब्राझील एथें धातूच्या खाणी खणण्यास तयार झाल्या. एक कंपनी कोलंबियाचे किनारीं मोतीं काढण्यास निघाली. एक लंडनास दूध व मासे पुरविण्याकरितां, व एक राजधानींतील वस्त्रें धुण्यास उत्पन्न झाली. एक मंडळी डेरियन संयोगिभूमि खणून काढण्यास निघाली. एक टेम्स नदीखालीं बोगदा खणण्यास प्रवृत्त झाली. याप्रमाणें नाना प्रकारचे धंदे काढून १७६ कंपन्या उत्पन्न झाल्या. परंतु त्यांतील थोड्याच शेवटपर्यंत टिकून यशस्वी झाल्या. त्या सालाचे अखेरीस बहुतेक कंपन्यांनीं दिवाळीं काढिलीं. इतकेंच नव्हे तर इंग्लंडच्या

ब्यांकेनें सुद्धां हात टेकिलें, त्यामुळें सन १८२५ चे सालीं रोकड कमी होऊन देशांत पत नाहींशी झाली. व्यापार थकला. त्यांत दुष्काळ पडून लोकांचे अतिशय हाल झाले. अशा अवस्थेंत हिंदुस्थान सरकारास ब्रह्मदेशांत **लार्ड आम्ह-र्स्ट**चे कारकीर्दीत सन १८२५ त जय मिळून **यांदान** एथें तह केल्याची बातमी पोंचतांच त्यांस अमळ हुशारी आली. ब्रह्मी लोकांनीं ब्रिटिशांवर जुलूम करून त्यांचीं जहाजें लुटलीं होतीं म्हणून त्यांशीं हें भांडण जूंपलें होतें, व त्याचा परिणाम सन १८२७ त **आराकान, टेनासरीम** प्रांत व **रंगून** हें शहर हीं त्यां पासून जिंकून घेतलीं, व आसाम प्रांतावरील त्यांचा हक्क उडवून तो प्रांत आपले ताब्यांत घेतला. सन १८२७ सालीं **जार्ज** राजाचा भाऊ **यार्क**चा **ड्यूक** हा मरण पावला, तेव्हां त्याचे **ड्यूक्यांडर इन् चीफ**चे जागेवर **वेलिंगटन** हा झाला, व प्राईम मिनिस्टरचे जागेवर लार्ड **कयानिंग** याची नेमणूक झाली. **कॅनिंग** मेल्यावर त्याचे जागीं सन १८२८ त लार्ड **वेलिंगटन** हा मुख्य मंत्री झाला. **टेस्ट आक्ट** आणि **कारपोरेशन** आक्ट हे रद्द झाले. सन १८२९ त **काथलिक इम्यान्सिपेशन आक्ट** (प्राटेस्टंट लो-कांबरोबर क्याथलिक लोकांस राज्यकारभारांत अधिकार देण्याचा कायदा) मंजूर झाला. **डानियल ओकानेल** या आयरिश व क्याथलिक हुषार बारिस्टरास पार्लमेंट सभेंत सभासद नेमिलें.

सन १८३० त चवथा **जार्ज** ६८ वर्षांचे वयांत मरण पावला. तो विद्येचा मोठा भोक्ता होता. तो सर्व कामांत इतका निपुण होता कीं, त्यास " युरोपांतील आद्यपुरुष " हें नांव मि-ळालें होतें. तो मोठा चैनी होता. त्यास तरूणपणीं पोषाकाची जितकी हौस होती तितकी म्हातारपणींही कायम राहिली होती.

त्याला संतान नव्हतें म्हणून त्याचे पश्चात् त्याचा धाकटा भाऊ **उइलियम, क्लयारेन्सचा ड्यूक,** हा गादीचा वारस झाला.

सन १८२३ त **आह्मर्स्ट** यांची हिंदुस्थानांत गव्हरनर जनरलचे जागीं नेमणूक झाली. सन १८२२ त विजापूर आणि अहमदनगर हे प्रांत **निजामापासून** मिळाले. सन १८२५ त **मलाका** बेट **डच** लोकांकडून कंपनीस मिळालें. सन १८२८ त **बेंठिक** साहेब यांची गव्हरनर जनरलचे जागीं नेमणूक झाली. **लंडन** एथील रस्त्यांची दुरुस्ती झाली. मिनै सामुद्रधुनी वर लोंबता पूल झाला. सन १८२३ त **झुओलाजिकल गार्डन** (प्राण्यांचें संग्रहस्थान) पुरें झालें व नाण्यामधें अतिशय फेरफार झाला.

चवथा उइलियम.

(सन १८३०-३७)

चवथे **जार्जाचे** मागून त्याचा भाऊ **उइलियम हेन्री** हा चवथा **उइलियम** या नांवानें इंग्लंडचे गादीवर बसला. त्याचें जन्म **बकिंग हयाम हौस** एथें झालें होतें. तो गादीवर बसला तेव्हां त्याचें वय ६५ वर्षांचें होतें. त्याचें लग्न **मेनिन्जेन** एथील राजकन्या **एडिलेड** इजवरोवर झालें होतें. तिच्यापासून त्याला दोन मुली झाल्या होत्या, परंतु त्या अल्पवयींच मेल्या. **उइलियम** हा तेरावें वर्षीं नावाडी झाला होता. म्हणून त्यास विद्येचा लाभ अगदींच झाला नव्हता. त्या योगानें त्यापासून कोणाला कधीं कारस्थानांत किंवा लौकिकांत उपद्रव झाला नाहीं. तो कधीं लोकमतानें व कधीं सन्निध असणाऱ्या मंत्री मंडळीच्या तंत्रानें वागे. त्याच्या मनमोकळेपणानें

व साध्या वर्तणुकीनें तो फार लोकप्रीय झाला होता. त्यथा उइ-लियम गादीवर बसला तो काठ मोड्या बखेड्यांचा होता. फ्रान्साचा राजा दहावा चार्ल्स व त्याची प्रजा यांचा मतभेद होऊन दोघांची सन १८३० च्या जुलईत तीन दिवस लढाई चालली होती. शेवटीं राजास व तत्पक्षीय लोकांस फ्रान्स सोडून इंग्लंडास पळून जावें लागलें. नंतर लोकांनीं आपला सैन्याधिपती लुई फिलिप यास राज्याधिकारी करून तें राज्य चालूं केलें, व त्यास इंग्रज सरकारची मंजुरीही मिळविली. त्या तंट्याचा अंमल फ्रान्सांतून आजूबाजूच्या देशांतही बराच पस-रला. सन १८१५ तील तहानें लो कंट्रीज (ह्मणजे सखल प्रदेश) हा प्रांत हालंडास जोडला होता. त्यांतील लोकांनीं बंडे करून सन १८३२ सांत आपल्यास स्वतंत्र करून घेतलें, व प्रांतास बेलजम् हें नांव ठेवून त्यावर आरेंजचा विधुर राज-पुत्र लिओपोल्ड यास राजा केलें, व त्याचें लग्न पुढें फ्रान्साच्या नवीन राजाची मुलगी लुइसा इच्याशीं इ. स. १८३२ त करून दिलें. साक्सनी, ब्रन्सविक, हेसी, क्या-सेल ह्या जर्मनींतील संस्थानांतिल लोकांनीं दंगा करून आपले राजास हांकून दिलें. इताली आणि पोलांड एथेही थोडा दंगा झाला होता. इंग्लंड देशांतही त्या वृत्तीची छाया बहूत पडली होती. त्या वेळेस ड्यूक आफ वेलिंग्टन हा मुख्य मंत्री होता, व राबर्ट पील हा एक मंत्री होता. त्यांच्या मनांत कथालिक धर्माची प्रवृत्ति करावयाची होती; परंतु त्यांस कोठेंच पाठबळ न मिळाल्यामुळें व सभासदांच्या नवीन निवडणुकीमध्यें त्यांस हवी तितकी मदत न मिळाल्यामुळें त्यांस कामांचे राजीनामे द्यावे लागले. नंतर अर्ल ग्रे हा १८३० मध्यें मुख्य मंत्री झाला आणि हुईग पक्ष सबळ झाला. लार्ड जान रसेल

यानें **रिफार्मबिल** (राज कारभारांत दुरुस्ती व्हावी म्हणून एक कायद्याचा खर्डा) सभेपुढें आणिलें. तेव्हां दोन्ही पक्षांचा जबरदस्त वाद होऊन नवीन निवड खेड्यापाड्यांत सुद्धां सुरू झाली. तो खर्डा **कामन** लोकांनीं मान्य केला; परंतु वडे लोकांनीं मान्य न केल्यामुळें मोठा अनर्थ गुदरला. लंडनांत बंड होऊन वड्या लोकांस बराच खाऊ मिळाला. त्यांच्या खिडक्या व दारें सुद्धां फोडिलीं. राजपक्षीयांचे मनांत आपला अंमल खेड्यांतून सुद्धां चालावा असें होतें, व प्रजापक्षीय लोकांच्या मनांत सध्यां असलेली राजसत्ता बदलून लोकसत्ता सुरू व्हावी, असें होतें. असें होतां होतां सन १८३२ सांत रिफार्म बिलांत कमजास्त दुरुस्ती करून **लार्ड ग्रे** यानें तें मंजूर करण्याकरितां पुन्हां सभेंपुढें आणून व आलेल्या अडचणींचा विचार होऊन त्यावर राजमत अनुकूळ करून घेतलें. त्या कायद्यानें जें गांव वस्तीनें वाढत चालले होते त्यांस **पार्लमेंट** सभेंत **सभासद** निवडून पाठविण्याचा अधिकार मिळून जे गांव उद्ध्वस्त झाले होते त्यांचा तो अधिकार कमी केला होता. खेड्यांतील विशेष किंमतीच्या घरांच्या मालकांस व ज्यांना वर्षाचें भाडें १० पौंड मिळतें त्यांनाही तो अधिकार व गांवचे अधिकारी निवडण्याचा अधिकार मिळाला. धर्मखात्यांत सुद्धां थोडीबहुत सुधारणा होऊन **आयर्लंडां**तील सुमारें दहा धर्माधिकाऱ्यांच्या जागा कमी केल्या व शाळाखात्याची दुरुस्ती झाली, व त्यांतून इतर शिक्षणावरोबर धर्मसंबंधी शिक्षण देण्याचे ठरलें (सन १८३३). पुढें कांहीं दिवसांनीं शाळागृह बांधण्यास व ट्रेनिंगस्कूलस् (सुशिक्षित शिक्षक तयार करण्याच्या शाळा) घालण्यास सरकारची मदत देण्याचें ठरलें. त्याचसालीं **म्युनिसिपालिट्या** (गांवचा बंदोबस्त करणारीं खातीं.) स्थापन झालीं. गरीबांचें

व अनाथांचे रक्षण करण्याविषयीं इलिजाबेथ राणीचे वेळचा एक कायदा होता तो रद्द करून सन १८३४ त नवीन व उत्तम व्यवस्थेचा कायदा झाला. याप्रमाणें रिफार्म बिलांतील सुधारणा इंग्लंडांत चालू असतां आयर्लंड व लोअर कानडा एथील लोकांमध्यें स्वातंत्र्याकरितां बंडें झालीं होतीं, पण तीं लवकरच मिटलीं. सन १८३६ त लग्नाचा एक नवीन कायदा व जनन मरणाच्या नोंदीचा एक कायदा मंजूर झाला. लग्नाच्या जुन्या कायद्यांत लग्न हा विधि देवळांत व ठरलेल्या नियमांप्रमाणें व्हावा लागे. तो रद्द करून लग्नविधि कोठेंही झाला तरी चालेल व कसाही झाला तरी चालेल असें ठरलें. सन १८१७ मध्यें जी महामारीची सात बंगाल्यांत उत्पन्न झाली होती ती पसरत पसरत पश्चिमेकडे आस्ट्राखान एथें १८२३ पासून १८३० पर्यंत, वार्सा एथें १८३१ त व ग्रेटब्रिटनमध्यें १८३२ त येऊन पोंचली. युरोपांतील सर्व देशांपेक्षां हंगारीमध्यें फार प्राणहानि झाली. सन १८३१ च्या जूनपासून सप्टेंबरपर्यंत २,५६,००० लागून १०,२,००० बळी पडले. त्या सांतीचा पराक्रम आफ्रिकेंत सुद्धां अनुभवास आला होता. पश्चिम हिंदी बेटांत गुलाम करून विकण्याचा सांप्रदाय जारी असे तो बंद करण्याचा कायदा करून गुलामांच्या मालकांस नुकसानीबद्दल २,००,००,००० पौंड दिले. टोरी आणि हुईग पक्षांची स्पर्धा चाललीच होती, त्या योगानें एक वेळ एकाचें व दुसऱ्या वेळेस दुसऱ्याचें वर्चस्व होत असे. परंतु हुईग पक्ष अंमळ ज्यास्त बळावत होता. त्या पक्षाच्या लोकांना १८३५ त स्पेन देशांत सैन्यामध्यें नौकरीचें काम करण्याकरितां परवानगी देण्यास कायदा झाला. स्पेनची राणी तरूण डाना मेरिया इजशीं तिचे चुलत्याने वंड केलें होतें तें मोडण्याकरितां

तिनें इंग्लंडचें साह्य मागितलें होतें. इंग्लंडाहून पुष्कळ लोक खुषीनें गेले व त्यांत ईव्हन्स हा मुख्य होता. सरकारानें ही कांहीं सैन्य व आरमार त्यांचे मदतीस पाठविलें होतें; परंतु त्यांचा म्हणण्यासारखा उपयोग न होतां ते सर्व मोठ्या विपत्तींत इंग्लंडास परत आले.

चवथा **उइलियम** उरांत आजार होऊन सन १८३७ त मरण पावला. ते वेळेस त्याचें वय ७५ वर्षांचें होतें. त्यास संतति नव्हती म्हणून त्याचे जागेवर त्याची पुतणी **आलेक्झांड्रिया विक्टोरिया** ही गादीची अधिकारीण ठरली. चवथे **उइलियमा**चे कारकीर्दीत **पयारी** आणि **रोस** यांनीं उत्तर महासागरांतून पूर्वेकडे आशियांत येण्याचा मार्ग शोधून काढिला. सन १८३० त **लिव्हरपूल** आणि **मांचेस्टर** यांमध्ये आगगाडी सुरू झाली. सन १८३१ सालीं **लंडन**चा नवीन पूल जाण्या-येण्यास सुरू झाला. सन १८३४ त **पार्लमेंटा**चे वाडे आग लावून जळाले. **लीड्स** व **सेलबी** यांमध्यें आगगाडी सुरू झाली. हिंदुस्थानाच्या दक्षिणेस असणारा **कुर्ग** प्रांत त्याचे राजापासून सन १८३४ त खालसा करून घेतला. **लार्ड मेटकाफ** हे गव्हर्नर जनरल असतां त्यानीं वर्तमानपत्रकर्त्यांस आपले विचार प्रगट करण्याबद्दल मोकळीक दिली. सन १८३६ त **आकलंड** साहेब हे हिंदुस्थानांत गव्हर्नर जनरल झाले.

व्हिक्टोरिया.

सन १८३७.

व्हिक्टोरिया ही चवथे **उइलियमा**चे धाकटे भावाची मुलगी होय. हिचें जन्म सन १८१९ सालीं **केन्सिंग्टन** एथें मे महिन्याच्या २४ वे तारखेस झालें. तिची आई, **केन्टची**

डचेस इनें आपल्या मुलीस पुढें मोठें पद प्राप्त होणार असें वाटून तिची जपणूक उत्तम करून तिला उत्तम शिक्षण दिलें आहे. ती स्वरूपानें व बांध्यानें चांगली असून स्वभावानेंही फार ममताळू आहे. तिला सन १८३८ त रज्याभिषेक झाला. तो समारंभ साजरा करण्याकरितां सुधारलेल्या देशांतून प्रतिनिधि आले होते. राणीचें लग्न तिचा नातेवाईक **साक्सकोबर्ग** आणि **गोथा** एथील राजपुत्र व **सेक्स**चा ड्यूक **अर्नेस्ट** याचा धाकटा मुलगा **फ्रान्सिस आल्बर्ट आगष्टस चार्ल्स इमान्युएल** याशीं सन १८४० त झालें. त्याचें वय राणीपेक्षां दोन महिन्यांनीं कमी होतें. **आल्बर्ट** ही उत्तम सुशिक्षित होता. त्यामुळें संभावितपणा, प्रौढ विचार, उद्योगीपणा, नीतिमत्ता आणि विद्येची आभिरुचि या कामांत हें दंपत्य कित्ता वळविण्याजोगें होतें. राणी साहेबांची सद्दी इतकी विलक्षण कीं, ती गादीवर बसल्यापासून सर्व युरोपांत सुमारें १० वर्षें म्हणण्यासारखें भांडण किंवा लढाई झाली नाहीं, किंवा ऐकूं आली नाहीं. **इंग्लंडांत** तर सुमारें १७ वर्षें शांतता होती. मुख्य मंत्र्याच्या कामावर मात्र वऱ्याच बदल्या झाल्या. **हिंदुस्तान, आफ्रिका** व **अमेरिका** एथें लढाया चालू होत्या, व त्यांपासून **इंग्रजांस** बराच फायदा झाला. **इंग्लंड**चे गादीवर राणी बसल्यामुळें **हानोवर**चें राज्यावर तिसरे **जार्जाचा** पांचवा मुलगा **अर्नेष्ट** हा बसला व तें राज्य स्वतंत्र झालें.

सन १८३८ त **अमेरिकेंत** कानडा एथें बंड झालें होतें. तें मोडल्यावर त्या देशावर **डर्ह्यामचा अर्ल** याची गव्हर्नर जनरलचे जागीं नेमणूक झाली. पुढें दोन्ही कानड्यांच्या दोन राजधान्या होत्या त्या मोडून **मान्ट्रील** ही मुख्य राजधानी केली. सन १८३९ त **अफगाणिस्तान**चा राजा **रशियास**

मिळेल या भीतीनें त्यास आपला मित्र करण्याकरितां त्यावर स्वारी केली होती. परंतु त्या मोहिमेंत त्यांस फायदा न होतां अतिशय नुकसान झालें. गेलेल्या फौजेंतील शिपाई म्हणून एकच परत आला. पुढें इंग्लिशांनीं पुनः स्वारी करून थोडासा जय मिळवून तेथील राजा दोस्त महंमद याशीं सन १८४२ त तह केला. सन १८४०-४२ पर्यंत चिनाशीं लढाई करून त्यांपासून हांगकांग व दुसरीं कांहीं समुद्र कांठचीं ठिकाणें व्यापाराकरितां मोकळीं करून घेतलीं, व लढाईच्या खर्चाबद्दल बराच पैसा घेतला. कारण चिनी लोक परकीय लोकांस आपल्या बंदरीं अफूच्या वगैरे व्यापारास येऊं देत नसत. चिनावरोवर लढाई चालू असतां युरोपांत तुर्कस्तानचा सुलतान व मिसर देशचा पाशा यांमध्यें भांडण जुंपून युरोपांतील बहुतेक राष्ट्रें सुलतानाच्या तर्फे भांडत होतीं. शेवटीं सिरिया प्रांत तुर्कांस मिळून, इजिप्त (मिसर) देश स्वतंत्र झाला. सन १८४१ त मेलबोर्न यानें आपल्यास सभासद करण्याविषयीं जास्त मत लोक देत नाहींत असें पाहून त्यानें सन १८४२ त राजीनामा दिला. त्याचे जागेवर राबर्ट पील हा मुख्य मंत्री झाला. परदेशांतून त्यानें येणाऱ्या धान्यावर मोठा कर होता तो रद्द करून व सर्व मापेंसारखीं करून देशांत धान्याची समृद्धि करून टाकिली. सन १८४३ मध्यें राणी आपल्या भ्रतारासह व वडील पुत्रासह इंग्लिश खाडी ओलांडून फ्रेंच राजास भेटण्यास गेली होती. इंग्लिश राज्याधिकारी तीनशें वर्षांत झगजे आठवे हेन्रीपासून सन १८४३ पर्यंत फ्रान्सांत स्वतः कधीं आला नव्हता. इ० स० १८४४ त फ्रेंच राजाही राणीस परत भेट देण्याकरितां इंग्लंडांत गेला होता. आयर्लंड, इंग्लंडास जोडण्याबद्दल केलेला कायदा

रद्द करून तो देश स्वतंत्र करावा असें मत देण्याकरितां आयर्लंडांत ओकानेलप्रभृतिमंडळीची व्याख्यानें देण्यावर झोड चालली होती. परंतु सन १८४८ त त्यांतील कित्येकांस राजद्रोहाबद्दल फाशींची व कांहीं जणांस कैदेची किंवा काळेपाण्यावर पाठाविण्याची शिक्षा दिल्याबरोबर जिकडे तिकडे बंदोबस्त झाला.

साताऱ्याचा राजा शाहाजी हा मेल्यामुळें, तो प्रांत खालसा करून मुंबई इलाख्यांत सामिल केला (सन १८४८). तसेंच अफगाण लढाई चालू असतां हिंदुस्थानांत मियानी आणि हैद्राबाद एथें जय मिळवून अमीर लोकांचा मुलूख, सिंध प्रांत, हा इंग्लिशांच्या हस्तगत झाला. पुढें पंजाबचा राजा रणजितसिंग मेल्यावर तेथें तंटे उत्पन्न होऊन तोही प्रांत १८४९ त इंग्रजी राज्यास जोडिला. इंग्लंडांत व विशेषें करून आयर्लंडांत १८४५।४६ सालीं बटाट्यांचें पीक अगदीं बुडाल्यामुळें व त्याच्या मागोमाग दुष्काळ व महामारी यांचीं तेथें ठाणीं बसल्यामुळें प्राणहानि फार झाली. परंतु त्या प्रसंगीं पार्लमेंट सभेनें व श्रीमान लोकांनीं उदार आश्रय दिल्यामुळें पुढील वर्ष सुवत्तेचें गेलें, व आयर्लंड देश बराच सांवरला; नाहींतर तो उजाड झाला असता. त्या दुर्धर प्रसंगीं कित्येक लोक भिऊन जाऊन अमेरिकेंत पळून गेले, कारण त्यांचें बहुतेक जीवित्व बटाट्यांवर असे.

राबर्ट पील यानें सन १८४५ त राजीनामा दिला. त्याचें जागीं लार्ड जान रसेल हा मुख्य प्रधान झाला; परंतु त्याचें काम बरोबर न चालून राबर्ट पील हाच पुनः मुख्य मंत्री झाला. त्यानें सन १८४६ मध्यें नवीन मापें सुरू करून धान्याचा कायदा रद्द केला. व व्यापारास पूर्ण मोकळीक दिली. ती

गोष्ट पील साहेबांच्या कित्येक मित्र मुत्सद्यास न आवडून त्यांनीं त्याचा पाडाव केला. तेव्हां लार्ड जान रसेल हा पुनः मुख्य मंत्री झाला. पील साहेब सन १८५० त मरे तोंपर्यंत तो व्हिग पक्षाच्या लोकांस व्यापार निष्प्रतिबंध चालविण्याच्या कामांत साह्य करीत होता.

१८४८ त फ्रान्स देशांत राज्यक्रांति होऊन तेथील राजा लुई फिलिप यास राणीसहवर्तमान इंग्लंडाचे आश्रयास येऊन राहावें लागलें. त्या फ्रेंच मतभेदाच्या ठिणग्या तेथेंच न विझतां सर्व युरोपभर पसरल्या. त्यांतिल ज्या कांहीं इंग्लंडांत उडाल्या, त्यांच्या योगानें चार्टिस्ट लोकांनीं बंड करून राजवाडा आणि पार्लिमेंट गृह यांवर एकाएकीं हल्ला करण्याची मसलत केली होती. त्या मसलतींत २३,००० पासून २५,००० पर्यंत लोक होते, व टोळ्या करून लंडनावर हल्ला करावा असा त्यांनीं बेत केला होता. परंतु तें वर्तमान बाहेर फुटून लार्ड वेलिंग्टन यानें मोठ्या शौर्यानें व युक्तीनें त्यांचा लंडनांत शिरकाव न होऊं देतां त्यांची दाणादाण करून टाकिली. त्याचसालीं हिंदुस्थानांत दुसरी शीक लढाई झाली. तींत चिलियनवाला एथें इंग्रजांस जय मिळाला; परंतु नुकसान फार जहालें. सन १८४९ त पंजाब हा प्रांत इंग्लिश राज्यास जोडिला. त्याचसालीं राणी साहेब आयर्लंडांत गेल्या होत्या व तेथें त्यांचा मान मरातब उत्तम रीतीनें झाला.

सन १८५१ त स्वदेशांतील व्यापारास उत्तेजन देण्याकरितां व परदेशांतील कला कुशलतेचें आपले देशास ज्ञान करून देण्याकरितां प्रिन्स आफ वेल्स यानें हाइडपार्क एथें मोठें प्रदर्शन केले होतें. त्यांत सुधारलेल्या देशांतून नामांकित कारागिरांनीं केलेल्या उत्तम उत्तम अशा जिनसा आणिल्या

होत्या. त्या प्रदर्शनाचें ठिकाण मोडून सध्यां तेथें नवीन गृह बांधिलें आहे, व त्यास "क्रिस्टलप्यालेस" (बिलोरी महाल) असें ह्मणतात. तें प्रदर्शन तारीख १ मे पासून तारीख १४ आक्टोंबर पर्यंत चालू होतें. त्याचवर्षी **आस्ट्रेलिया** एथें सोनें सांपडून मागल्या चुरशीच्या खटपटी सुरू झाल्या. त्या वेटांत **मेलबोर्न** हें सन १८३५ त एक भिकारी खेडें होतें तें थोडक्या दिवसांत इतकें वाढलें कीं, तेथें ४,४०,००० वस्ती होऊन राजधानीचें शहर झालें व तेथें युनिव्हर्सिटी (विश्वविद्यालय) ही स्थापन झाली. तें शहर पुढें नामांकित बंदर होऊन तेथें मोठा व्यापार सुरू झाला. पुढें त्या वेटांत १८५६ त व १८५९ त **व्हिक्टोरिया** व **क्वीन्सलांड** ह्याच्या वसाहती झाल्या.

सन १८५२ त लार्ड **जान रसेल** याचा कांहीं कारस्थानाच्या कामांत पाडाव होऊन **डर्बीचा** अर्ल हा मुख्य मंत्री झाला, व **बेंजामिन डिझायली** हा कामन लोकांचा पुढारी व मुख्य खजिनदार झाला. त्याचसालीं **ब्रह्मदेशांत** दुसरी लढाई सुरू होऊन **पेगूप्रांत** इंग्लिशांस मिळाला. त्याचवर्षी इंग्लंडांतील मोठा प्रसिद्ध योद्धा लार्ड **वेलिंग्टन** हा स्वर्गवासी झाला. त्याच्या मरणानें इंग्लिश राष्ट्रास महादुःख झालें. राज्यकारभारांत **पील** साहेबांचे अनुयायी लार्ड **पालमर्स्टन**, मिस्तर **ग्लाडस्टन** आणि **जान रसेल** यांचें प्राधान्य होऊन त्यांनीं **पील** साहेबांचे उद्देश सिद्धीस नेले.

सन १८५३ त **जरुसिलेम** एथील पवित्रस्थानाच्या रक्षणाबद्दल **टर्कि** व **रशिया** यांच्यामध्यें धुमसत असलेल्या तंट्यानें पेट घेतला. **टर्कीचा** पक्ष **फ्रान्स** व **इंग्लंड** यांनीं घेऊन सन १८५४ सालीं लढाई देण्याचा ठराव केला. कारण **रशियन** सैन्यानें **दान्यूब** नदीच्या उत्तरेकलील तुर्की प्रांतावर

हल्ला करून त्यास पळिा दिली होती. तुर्कीनीं त्यास सिनोपी एथें गांठून त्यास मोठ्या शौर्यानें भागें हटविलें. त्या कामांत त्याचें फार नुकसान झाल्यामुळें त्यांचा टिकाव लागेल असा त्यांस भरंवसा वाटला नाहीं; तेव्हां इंग्रिशांनीं व फ्रेंचांनीं नीस्टर नदीचे मुखाच्या ईशान्येकडील **काळया समूद्राचे** कांठचें शहर **ओडिसा** तोफांच्या भडिमारानें उडवून देऊन लढाईच्या सामानानें भरलेलीं १३ **रशियन** जहाजें लुटून पस्त केलीं. तेव्हां **रशियनां**नीं क्रिमियांतील **सलिस्ट्रियावर** हल्ला केला; परंतु तेथें त्यास जय न मिळतां ३०,००० लोकांचे प्राण मात्र गमाविले. नंतर इंग्रिलश व फ्रेंच यांनीं **सिव्यास्टपुलावर** हल्ला केला, व तेथें फ्रेंचांनीं मागें घेतलें नसतें तर लागलाच त्यास जय मिळता. पुढें त्यांनीं एक दोन ठिकाणीं जय मिळविल्यावर **रशियाच्या सिव्यास्टपूल** नामक मोठ्या बलाढ्य शहरास वेढा दिला. तो वेढा चालू असतां **रशियन** लोक **बलक्लावा** एथील खिंडींत शत्रूवर निकरानें तुटून पडले. परंतु त्यांत त्यांना यश किंवा फायदा झाला नाहीं. थोडक्याच दिवसांनीं **इन्कर्मान** एथें मोठा रक्तपात होऊन **रशियाचे** २५,००० व **इंग्रज** आणि **फ्रेंच** यांचे १८,००० लोक प्राणास मुकले. त्यांत लार्ड **रागलन** मारला गेल्यामुळें त्याचें सेनाधिपतीचें काम जनरल **सिंप्सन** हा पाहूं लागला. पुढें त्या कामावर **सर कार्डिगटन** आल्यावर **चर्नाया** एथें १८५५ त एक लढाई झाली. **सार्डिनियन** लोक **इंग्रजांस** मिळाले होते म्हणून रशियानें त्यांवर चाल केली. परंतु त्यांची कत्तल उडवून त्यांस मागें हटविलें. तेव्हां, **रशियाचे** ३,००० लोक जाया झाले. **सेबास्टपूल** एथील वेढा अद्याप उठला नव्हता, तोफांचे गोळे चालूच होते, इमारती जाळण्याचें व पाडण्याचें काम चालू होतें. तों रात्रीं आंधेरांतून **रशियाचे** लोकांनीं बाहेर निघून तें जळकें शहर **इंग्लिशांच्या** स्वाधीन केलें. त्या

लढाईत सर्वांची मिळून १,००,००० मनुष्यहानि झाली, असा अजमास आहे. उत्तरेकडे स्वीबोर्गवर बाल्टिक समुद्रा कडूनही हले व तोफांचा भडिमार सुरू होताच. त्यामुळें रशियन लोक जेरीस आले आणि पारिस एथें सन १८५६ त तह केला. त्या तहानें रशियाची हद्द काळे समुद्राची उत्तर बाजू ठरली. सन १८४८ त लार्ड डलहौसी हा गव्हनर जनरल होऊन आल्यावर सन १८५३ त वऱ्हाड, १८५४ त नागपूर आणि १८५५ त अयोध्या एथील राज्यें इंलिश राज्यास जोडिलीं. १८५६ त क्यानिंम साहेब गव्हर्नर जनरल झाले.

सन १८५७ सालीं बंगाल प्रांतांत मीरत एथें नानासाहेबाचें बंड होऊन ब्रिटिश प्रजेचें बरेंच नुकसान झालें. त्यांनीं दिल्ली, कानपूर, लखनौ व बरेली हीं शहरें घेऊन तेथें फार निर्दयपणाचीं कृत्यें केलीं. परंतु कांबेल, औटराम व हावलाक या शूर सरदारांनीं त्यांचा तेव्हांच मोड करून टाकिला. तो बखेडा चालू असतां चिनांत कान्टन एथील इंग्लिश, गव्हर्नर व चीन सरकार यांमध्यें तंटा लागून चीन सरकारचें फार नुकसान झालें. इंग्रजांनीं पेकीन शहरांत प्रवेश केला होता; तथापि चीन सरकार ऐकेना तेव्हां इंग्रज सरदार लार्ड एल्जिन यानें पेकीन एथील चीन सरकारचें उन्हाळ्याकरितां बांधलेलें मोठें अद्भुत व श्रीमंत गृह जाळून टाकिलें व पेकीन शहर उडविण्याचा बेत केला होता. परंतु चीन सरकार शरण आल्यामुळें तह झाला व कौलन प्रांत सन १८६० त इंग्रजांस मिळाला.

सन १८५८ सालीं लार्ड डर्बी हे पुनः मुख्य प्रधान झाले व त्यांनीं ईस्ट इंडिया कंपनीपासून राज्य घेण्याबद्दल कायदा पार्लमेंट पुढें आणून मंजूर करून घेतला. त्या योगानें हिंदुस्थानचे राज्य राणीसाहेबांच्या खास अमलांत गेलें, व

तेथील व्यवस्था पाहण्याकरितां एक स्वतंत्र स्टेट सेक्रेटरी (चिटणीस) नेमून त्यास मदत करण्याकरितां १५ जणांची कौन्सिळ (सभा) नेमून दिली.

सन १८५९ त डर्बी साहेबाचें जुळेना, म्हणून त्यानें राजीनामा दिल्यावर त्याचें काम **पालमर्स्टन** पुनः चालवूं लागला. **फ्रेंच** लोक **इंग्लंडावर** हल्ला करणार अशी गप्प उठून **व्हालन्टियर** (खुषीनें चाकरी करणारे) सैन्य स्थापन झालें. सन १८६० त **फ्रान्स** व **इंग्लंड** यांमध्यें व्यापार संबंधीं तह ठरून उभय देशांत परस्परांचा माल सुरळीत खपूं लागला. सन १८६१ त कागदावरील जकात माफ झाली. त्याच सालीं राणी साहेबांचे प्रिय भ्रतार **प्रिन्स आलबर्ट** यांस देवाज्ञा होऊन सर्व राष्ट्रावर दुःखाचा पर्वत कोसळला.

अमेरिकेंत लढाई चालू होती, त्या योगानें तेथील माल परदेशास जाणें बंद पडलें होतें, म्हणून १८६२ त **लांकशायर** प्रांतांतील गिरण्यांस हवा तेवढा कापूस न मिळाल्यामुळें त्या बंद पडून हजारों कामगार बेकार झाले, व मोठ्या विवंचनेंत पडले. एकाच वस्तूचे व्यापारावर निर्वाह करणाऱ्या लोकांची स्थिति प्रसंगवशात् अशीच विघडत असते. पुढें हिंदुस्तान, इटली, **आस्त्रेलिया** व **मिसर** या देशांतून कापूस पाठविण्याची तजवीज होऊन व श्रीमंत लोकांनीं उदार आश्रय देऊन बरीच रक्कम उभारिली. तेव्हां त्या लोकांचे हाल उत्तरोत्तर कमी होत गेले. सन १८६३ त डेन्मार्क एथील राजकन्या आलेक्झांड्राइशीं **प्रिन्स ऑफ वेल्स** याचें लग्न झालें.

सन १८६५ त **पालमर्स्टन** मरण पावल्यामुळें तें काम लार्ड **रसेल** यास मिळालें. इंग्लंड व स्काट्लंड एथें साथी-

चा रोग उत्पन्न होऊन फडशा उडाला. आयर्लेंड स्वतंत्र करून तेथें प्रजासत्ताक राज्य स्थापन करावें असा उद्देश बाळग. णाऱ्या लोकांचा समाज अमेरिकेतील संयुक्त संस्थानांतून भालेल्या लोकांनीं बराच वाढविल्यावर आयर्लेंडांत हेबिअस कार्पस आक्ट हा कांहीं दिवस बंद करावा लागला. रसेल साहेबांस रिफार्मबिल कबूल नव्हतें म्हणून त्यांचे जागीं पूर्वीचे डर्बीसाहेब तिसऱ्यानदां मुख्य कारभारी झाले. आट्लांटिक केबल (अट्लांटिक समुद्रांत टाकलेली तारायंत्राची तार) आयर्लेंडांत व्हालेन्शिया एथून न्यूफाऊंडलंडपर्यंत निर्धास्तपणें टाकिली. सन १८६७ त दुसरा रिफार्म आक्ट (संभासद निवडण्याचे सुधारणुकेचा कायदा) मंजूर झाला. पुढें डर्बी साहेबांनीं पेनशन घेतलें तेव्हां तें काम डिस्रायली यांस मिळालें. अमेरिकेंत कानडाचें राज्य स्थापन झालें, व त्यास केबेक (खालील कानडा), ऑन्टेरियो (वरील कानडा), नोवास्कोशिया व न्यू ब्रन्स्विक हे प्रांत जोडिले. सन १८७० त ह्ड्सन प्रांत त्या राज्यांत सामील केला. सन १८७१ त व्हयान्कुवर्स बेटासहित ब्रिटिशकोलंबिया प्रांत कानडा राज्यास जोडिला व प्रिन्स एड्वर्ड हें बेट सन १८७३ त त्यांत सामील केलें.

सन १८६८ त सर रावर्ट नेपीयर यांनीं अबिसीनी. यावर स्वारी करून तेथील राजा थिओडोर यानें कैद केलेल्या यूरोपियन लोकांस सोडविलें. व त्यांचा मागडल्ला किल्ला घेतला. तेव्हां राजानें आपणास गोळी मारून घेऊन आत्महत्या केली. नेपियर यास लार्ड नेपियर आफ मागडल्ला हा किताब देऊन लढाईचा ८३,००,००० रुपये खर्च त्या देशापासून घेतला. डिस्रायलि साहेबांचें वजन कमी होऊन त्यांनीं राजी-

नामा दिल्यावर **ग्लाड्स्टन** साहेब मुख्य मंत्री झाले. **टेलिग्राफिक** आक्ट (तारायंत्राचा कायदा) मंजूर होऊन २० शब्दास १ शिलिंग याप्रमाणें संयुक्त राज्यांत कोठेंही बातमी पाठविण्याबद्दल बातमी घेण्याचा नियम केला. अर्ध्यापेनीच्या डाकेच्या कार्डा सन १८७० त सुरू झाल्या. सन १८७४ त तारायंत्राचें उत्पन्न फक्त संयुक्त राज्यांत १० लक्षावर झालें.

आयर्लंडांतील देवळांस जें सरकारांतून उत्पन्न होतें तें रद्द करावें असें सन १८६९ त **पार्लमेंट** सभेंत ठरून त्यांतील नेमणुका सन १८७१ त कमी केल्या व **आयर्लंड**ांतील जमीनी संबंधी कायदा १८७० त मंजूर होऊन प्राथमिक शिक्षणाचा कायदा **इंग्लंड** आणि **वेल्स** प्रांतांकरितां अमलांत आला. **राणी** साहेबांचे दुसरे चिरंजीव **एडिंबरो**चे **ड्यूक आल्फ्रेड**, हे हिंदुस्तानांत आले होते. १८७१ त युनिव्हर्सिट्यांतून (विश्वविद्यालयांतून) धर्म संबंधींपरीक्षा घेण्याची चाल होती ती बंद झाली.

सन १८७२ त **टिकिटां**च्या (चिट्यांच्या) योगानें मतें देण्याची चाल सुरू झाली व ती कशी चालते हें पाहण्याकरितां वर्षाची मुदत मिळाली; त्या योगानें नुसतें नांव सांगून मत देण्याची चाल होती ती बंद झाली. **स्काट्लंडांत** प्राथमिक विद्येचा कायदा ठरून प्रत्येक खेड्यापाड्यावर त्याबद्दल कर बसविणें वगैरे गोष्टी बंद झाल्या. **अर्ल डफरीन कानडाचे गव्हर्नर जनरल** झाले. **आफ्रिके**च्या पश्चिमकिनारीं असलेलीं **डच** लोकांचीं ठाणीं **इंग्लिश** लोकांस देण्याबद्दल तह ठरला. त्या योगानें दोन्ही सरकारांचीं तिकडे मिळविलेल्या प्रांतांबद्दलचीं भांडणें बंद झालीं. हिंदुस्तानचे प्रतिनिधि व **गव्हर्नर जनरल लार्ड मेयो** यांस एका माथेफिऱ्या **अफगाण**

कैद्यानें अंदमान बेटांतील ब्लेयर बंदरीं बर्चीनें भोसकून मारिलें. त्यांचे जागेवर नार्थब्रूक हे गव्हरनर जनरल झाले.

सन १८७३ त मध्य आफ्रिकेचे प्रसिद्ध शोध लावणारे डेव्हिड लिव्हिंग्स्टन मरण पावले व इराणचे बादशाहाची स्वारी पूर्वेकडील चालीविरुद्ध युरोपांत फिरत लंडनांत व इतर राजधान्यांत गेली होती. सर वार्ईल फ्रियर यांनीं गुलामांचा व्यापार बंद करण्याविषयीं झांझिबार एथील सुलतानाचें अनुमोदन मिळविलें. सन १८७३ त राणी साहेबाचे दुसरे चिरंजीव अल्फ्रेड यांचें लग्न रशियाचे झाराची मुलगी मेरी हिच्याशीं झालें. आफ्रिकेच्या पश्चिम किनारीं आशांटी लोक इंग्लिश लोकांस व्यापार करूं देईनात, तेव्हां गार्नेट-उल्स्ली यास त्यांवर पाठवून त्यास जिंकिलें व त्यांशीं तह केला. बंगालयांत व बहार प्रांतांत तांदुळांचें पीक बुडाल्यामुळे मोठा दुष्काळ पडला. पॅसिफिक महासागरांतील फिजी बेटांतील लोकांच्या विनंती वरून तीं बेटें इंग्लिश राज्यास जोडिलीं. कान्सरव्हेटिव्ह (राजपक्षीय) लोकांच्या मतांचा भरणा विशेष झाल्यामुळें ग्लाड्स्टन वगैरे लिबरल (प्रजापक्षीय) लोकांचा पाडाव होऊन डिस्रायली यास पुनः मुख्य प्रधानकीचीं वस्त्रें मिळालीं. सन १८७५ त इंग्लिश सरकारानें मिसर सरकारापासून स्वेज् कालव्याचे सुमारें $\frac{1}{2}$ भाग ४,०८,००,००० रुपये देऊन विकत घेतले. सन १८७५ त प्रिन्स आफ वेलस, आलबर्ट, एडवर्ड हे हिंदुस्तानांत आले होते. सन १८७६ त डिस्रायली यांस लार्ड बीकन्स फील्ड हा किताब मिळाला व लार्ड नार्थब्रूकचे जागीं लार्ड लिटन हे हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल झाले. १८७७ त राणी साहेबांस हिंदुस्थानची बादशाहीण हें पद मिळालें.

सन १८७८ त तुर्कस्तान व इंग्लंड यांमध्यें परस्पर संरक्षणा-बद्दल तह ठरून सैप्रस बेटाचें राज्य चालविण्याचें काम इंग्रजांकडे आलें. आफगाणिस्तानांत शेरआल्ली अमीराशीं लढाई जुंपून अबदुल रहीमान यास गादीवर बसाविलें. आफ्रिकेंत झुलू लोकांबरोबर लढाई होऊन त्याचा राजा सेटेवायो यास धरून कैद केलें व तें राज्य मांडलिक केलें. सन १८८० त राजपक्षीय लोकांच्या जनरल इलेक्शनचा (साधारण निवडणूकींत) पाडाव झाला, व ग्लाडस्टन यास प्रधानकी मिळाली व लार्ड रिपन साहेब हे हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल झाले. सन १८८१ त आयर्लंडामध्यें बखेडा माजला होता तो जबर उपायांनीं मिटविला. लार्ड बिकन्सफील्ड हे वारले. सन १८८२ मध्यें आफ्रिकेचे उत्तरेस मिसर देशांत बंडाळी माजली होती, ती गार्नेट उल्सी व सीमूर यांनीं मोडिली झणून त्यांस लार्ड केलें. सन १८८३ सालीं आफ्रिकेंत सौडन एथें माधीनें बंड केलें होतें, व त्यावर पाठविलेल्या मिसरी सैन्याचा फडशा उडाला. सन १८८४ त जनरल गार्डन यास आफ्रिकेंत खार्टूम शहराचा बंदोबस्त करण्यास पाठविलें असतां त्याचें त्यालाच रक्षण करावें लागलें. तिसरा रिफॉर्म अक्ट मंजूर होऊन प्रांतांतून प्रत्येक कुटुंबास पंच निवडण्याचा अधिकार मिळाला. राणीचे चौथे पुत्र लिओपोल्ड हे एकाएकीं मरण पावले. लार्ड डफरीन साहेब रिपनचे मागून गव्हरनर जनरल झाले. सन १८८५ त रावलपिंडी एथें अमिराकरितां मोठा दरबार झाला. जनरल गार्डन साहेबांची सुटका करण्याकरितां हिंदुस्तानांतून फौज पाठविली होती. परंतु ती खार्टूम शहराजवळ पोंहचण्या पूर्वीच माधी यानें खार्टूम शहर घेऊन गार्डन साहे-

वास मारिलें होतें. आफगाण हद्द कायम करण्याकरितां कामिशन (पंच) नेमून रशियावरोबर चाललेला तंटा मिटविला. ग्लाडस्टन साहेबांचा पक्ष निर्बल होऊन राजपक्ष प्रबळ झाला, आणि सालिसबेरीचे मार्क्विस त्यांस प्रधानकीचीं वस्त्रें मिळालीं. पार्लमेंट मधील सभासदांच्या संख्येची पुनः वांटणी होऊन इंग्लंड आणि वेल्स त्यांकरितां ४९५, स्काट्लंडा-करितां ७२ आणि आयर्लंडाकरितां १०३ सभासद नेमण्याचें ठरलें. ब्रह्मदेश सन १८८६ मध्यें लढाई होऊन खालसा झाला. सन १८८७ त राणीसाहेबांस गादीवर बसून ५० वर्षें झालीं म्हणून तन्निमित्त जुबिली (उत्सव) झाली. सन १८८८ मध्यें लार्ड डफरीन जाऊन लान्सडौन हे गव्हरनर जनरल झाले. सन १८९० त हेलिगोल्यांड जर्मनीस देऊन झांजि-बार इंग्लिशांस मिळालें. सन १८९२ सालीं महाराणी साहेबांचे नातू, प्रिन्स आफ वेल्स त्यांचे जेष्ठ पुत्र, प्रिन्स आल्बर्ट व्हिक्टर हे हिंदुस्तान देश पाह-ण्याकरितां येऊन राजेरजवाडे यांजपासून उत्तम मान घेऊन परत गेले; पुढें ते तेच वर्षीं मरण पावले. लार्ड एलजिन हिंदुस्तानांत गव्हर जनरल झाले. त्यांचे कार-किर्दीत अफगाणिस्थानचे सरहद्दीवरील लोकांबरोबर लढाई झाली ; परंतु तींत म्हणण्यासारखें यश आलें नाहीं. त्यांचेच कारकीर्दीत हिंदुस्थानांत सन १८९७ सालीं ग्रंथिक सन्निपात (प्लेग) उत्पन्न होऊन बरीच प्राणहानि झाली व ती साथ अद्याप चालूच आहे. त्याच सालीं राणी साहेबांचें ६० वर्षें राज्य चाललें म्हणून दुसरा उत्साह झाला. सन १८९८ त ग्लाड्स्टन साहेबांस देवआज्ञा झाली. सन १८९९ चे जानेवारींत लार्ड कर्जन साहेब हे हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल झाले.

हानोवर किंवा ब्रन्स्विक घराण्याचा वंशविस्तार.

पहिला जार्ज.
१७२७–६०.

दुसरा जार्ज.
१७२७–६०.

सोफाया, हिचे लग्न प्रशियाचा राजा फ्रेडरिक उइलियम याशीं झालें.

फ्रेडरिक.

उइलियम, कंबर्लंडचा डयूक.

तिसरा जार्ज.
१७६०–१८२०.

चवथा जार्ज.
१८२१–३०.


चार्लटराजपुत्री.

चवथा उइलियम.
१८३१–३७.

एड्वर्ड, केन्टचा डयूक.

व्हिक्टोरिया, हिचें लग्न साक्सगोथा एथील राजपुत्र अल्बर्ट याजबरोबर झालें. (सन १८३७).

पुढील पानावर पहा


व्हिक्टोरिया
व्हिक्टोरिया, जर्मनीची बादशाहीण.
आल्बर्ट एडवर्ड, प्रिन्स आफ वेल्स, याचें लग्न डेन्मार्कच्या अलेक्झांड्रू बरोबर.
आलीस, हेसीची मांड डचेस, मेली. १८७८.
आल्फ्रेड, एडिंबरोचा डयूक, याचे लग्न रशियाच्या मेरी बरोबर
हेलेना, स्लेस्विग व होल्सेटेन एथील राणी.
लुइज, लोर्नची मार्शिओनेस.
अर्थर, कानाटचा डयूक
लिओपोल्ड, आल्बनीचा डयूक. मेला. स. १८८१.
विआट्रीज, बाटेन्बुर्गची राणी

ब्रांस्विक कारकीर्दीतील मुख्य गोष्टी.

१७१४-२७ पहिला जार्ज गादीवर बसला.
१७१५ स्काट्लंडांत वंड, प्रेस्टन एथील लढाई.
१७१६ जेम्स यास स्कोन एथे राज्याभिषेक झाला.
१७१७ इंग्लंड, फ्रान्स व हालंड यांचें ऐक्य झालें.
१७१८ चातुरैक्य झालें.
१७१० सौथ सी कंपनीचे बेंड फुटलें.
१७२०-४२ वालपोलची कारकीर्द.
१७२७ जार्ज, हानोवरास जात असतां मरण पावला. दुसरा जार्ज गादीवर बसला.
१७२९ स्पेनाबरोबर सिव्हिलीचा तह झाला.
१७३९ स्पेनाबरोबर लढाई सुरू झाली.
१७४० आस्ट्रियाचे गादीबद्दल तंटा.
१७४४ कमोडर आन्सन पृथ्वी प्रदक्षिणा करून परत आला.
१७४५ प्रेस्टनप्यान्स एथें सर जानकोप याचा पराजय.
१७४६ राजपक्षाचा फालकर्क एथे पराजय.
१७४८ एलाचापेल एथील तह.
१७५२ इंग्लिश पंचांगांत जार्जियन पद्धती सुरू झाली.
१७५३ ब्रिटिश म्यूजियम (सर्व संग्रहालय) स्थापिलें.
१७५७ प्लासी एथील लढाई.
१७५८ क्लैव्ह साहेब हिंदुस्तानचा गव्हर्नर झाला.
१७५९ मच्छलिपट्टन इंग्रजास मिळालें.
१७६० अमेरिकेंतील कानडादेश जिंकून घेतला.
१७६० दुसरे जार्जाचा मृत्यु व तिसरा जार्ज गादीवर बसला.
" अमेरिकन कानडा जिंकून घेतला.
१७५५ ६२ सप्तवार्षिक लढाई.

१७६१ मीर कासिम यास मीर जाफराचे जागीं बसविलें.
१७६५ अमेरिकेंत छापिल कागदांची सुरुवात.
१७६७ अमेरिकेंत चहा वगैरे पदार्थांवर कर बसविला.
१७६८ रायल अकेडमी स्थापन झाली.
१७७५ अमेरिकेबरोबर लढाई.
१७७२ हेस्टिंग्स यास हिंदुस्थानचा पहिला गव्हर्नर जनरल केलें.
१७७५ बनारसची जमीनदारी मिळविली.
१७७६ वाशिंगटन अमेरिकन सैन्याचा अधिपति झाला.
१७८० तिसरा जार्ज अजारी पडला; युवराजास काम पाहण्यास नेमिलें.
१७८३ युनाइटेड स्टेटस स्वतंत्र झालीं.
१७९६ बोनापार्ट फ्रेंचांचा सेनाधिपति झाला.
१७९८ इंग्लिशांनीं अबुकिर्बे एथें फ्रेंचांचा पराजय केला.
१८०१ आयर्लंडचें सभासद पार्लमेन्टमध्यें घेण्याचें ठरलें.
१८०२ एमिएन्स एथें बोनापार्टाबरोबर केलेला तह.
१८०७ धुराचे दिवे लंडनांत लागले.
१८११ तिसरा जार्ज पुनः अजारी पडला व युवराजास काम पाहण्यास नेमिलें.
१७७६ साष्टीबेट पेशव्यांपासून मिळविलें.
१८२० तिसरे जार्जाचा मृत्यु व चवथा जार्ज गादीवर बसला.
१८२६ आसाम व आराकान खालसा झाले.
१८३० चवथे जार्जाचा मृत्यु व चवथा उइलियम गादीवर बसला. म्यान्चेस्टर लिव्हरपूल रेलवे सुरू झाली.
१८३२ रिफार्मबिल.
१८३३ गुलामांचा व्यापार बंद केला.

१८३५ म्युनिसिपालिटीचा कायदा झाला.
१८३७ चवथे उइलियमाचा मृत्यु व व्हिक्टोरिया गादीवर बसली.
१८३९ राणी साहेबांचे लग्न झालें.
१८४९ पंजाब खालसा झाला.
१८५१ हैडपार्क एथील प्रदर्शन.
१८५२ बर्मी लोकांबरोबर लढाई.
१८५५ सिव्यास्टपूल शहर व किल्ला घेतला.
१८५७ हिंदुस्थानांतील बंड.
१८५८ व्हिक्टोरिया इनें हिंदुस्तानचें राज्य आपले ताब्यांत घेतलें.
१८६७ अबिसीनियांतील लढाई.
१८७७ व्हिक्टोरिया हिंदुस्तानची बादशाहीण झाली.
१८७९ झुलू लोकांबरोबर लढाई. आफगानिस्तानांत लढाई.
१८८५ रावलपिंडी एथील मोठें दरबार.
१८८६ ब्रह्मदेशाचा कांहीं भाग खालसा झाला.
१८८७ जुबीलीचा उत्साह.
१८९० झांझिबार इंग्लिशांस मिळाला.
१८९७ राणी साहेबांचे राज्यास ६० वर्षें झालीं म्हणून दुसरा एक उत्साह झाला.
१८९७ हिंदुस्तानांत ग्रंथिक सन्निपात (प्लेग) सुरू झाला.

आठवा भाग.

राज्यपद्धति, जमिनीची स्थिति, उत्पन्न, वंदोवस्ताचें साहित्य, सामाजिक स्थिति व सुधारणा.

ब्रिटिश बेटांतील राज्य पद्धतीचा माग आंग्लो साक्सन लोकांपर्यंत मागें लावीत गेल्यास त्यांची **विटी न्याजी मोट** (विद्वत्सभा) ह्मणून जी एक सभा असे, तिच्या अनुमताशिवाय कायदे किंवा राज्यांतलि दुसरीं महत्वाचीं कामें होत नसत. राजा हा सेनाधिपति असून तो त्या सभेच्या अनुमतानें वागत असे. मुख्य मंत्री, बिशप (मोठे धर्माधिकारी), व आवट (धाकटे धर्माधिकारी) हे त्या सभेमध्यें सभासद असत.

जान राजानें सन १२१५ त **माग्ना चार्टा** ह्मणून जी लोकांस मोठी सनद करून दिली, तींत कर बसविण्याच्या प्रसंगीं मुख्य धर्माधिकारी, **ब्यारन**, (सरदार), जमीनदार यांचें मत घेत जाऊं असें वचन दिलें होतें. सन १२६५ त तिसऱ्या **हेन्रीनें पार्लमेंट** सभा स्थापन करून तींत **कामन** (गांव पंच), लोकांचा समावेश केला. पहिले **एड्वर्डाचे** कारकीर्दीत **पार्लमेंटाच्या** सल्याशिवाय राजास कोणतीही मदत मिळणार नाहीं असें ठरवून, बडे लोक व **कामन** लोक (गांव पंच) ह्यांनीं कबूल केल्याशिवाय कोणताही कर बसवितां येणार नाहीं, असा एक कायदा केला. इंग्रजी राजदरबारांत कायदे करणें व कायदे अमलांत आणणें हीं मुख्य दोन कामें असतात, व त्यांतील दुसरें काम मुख्यत्वें करून राजाकडे असतें. कायदे करण्याचें काम **पार्लमेंट**कडे असतें. त्या सभेंत राजा किंवा राणी (प्रसंगी असेल त्याप्रमाणें), **लार्ड** (वडे लोक) **कामन** (गांवांचे पंच) अशा तीन शाखा असतात. वडे लोकांत सरदार आणि आर्चबिशप (मुख्य धर्माधिकारी) असतात, **कामन**

लोक ६७० असून त्यांत ४९५ इंग्लंडचे, ७२ स्काटलंडचे, आणि १०३ आयर्लंडचे पंच असतात. प्रांतांचे पंच जमीनदार निवडतात, आणि ज्यास २० पौंडांपेक्षां जास्त भाडें सालीना उत्पन्न असेल असे घरवाले निवडण्यांत येतात. **पार्लमेन्टा**च्या प्रत्येक शाखेचा मुख्य वक्ता किंवा पुढारी वेगवेगळाला असतो. **लार्डचान्सेलर** (ज्याचे जवळ राजाचा शिक्का किंवा राजमुद्रा आणि मोर्तब असतो तो) हा बडे लोकांच्या तर्फे वक्ता असतो, आणि **कामन** लोकांचा वक्ता त्यांनींच निवडलेला व राजास मान्य असा असतो.

कायद्यांचे मसुदे प्रत्येक शाखेंत तीनदां वांचतात आणि ते दोन शाखेस पसंत पडून त्यांस राजाची मान्यता मिळाली म्हणजे तो मसुदा कायदा बनतो. दोन्ही शाखांस एखादा मसुदा पसंत पडून त्यास राजमत मिळालें नाहीं तर तो व्यर्थ होतो. द्रव्याच्या बाबतीचे मसुदे प्रथम **कामन्स** सभेंत उत्पन्न होतात, व त्यांस बडे लोकांचा जरी सल्ला मिळाला नाहीं तरी ते बदलत नाहींत. **पार्लमेंट** भरविणें, लांबणीवर टाकणें किंवा विसर्जन करणें हीं कामें राजाचीं असतात.

कायदे अमलांत आणण्याचें काम राजाचें आहे. तो न्यायाधीश नेमून लोकांस न्याय देतो, पदव्या व मान देतो, आणि दरबारच्या कामाची वांटणी करून देतो. लढाई किंवा तह करणें हा केवळ राजाचाच अधिकार आहे. परंतु ह्या सर्व महत्वाच्या कामांत त्याला **पार्लमेंट**चें साह्य घ्यावें लागतें; कारण द्रव्य संबंधीं सर्व व्यवस्था तिच्या स्वाधीन असते, आणि द्रव्याशिवाय सैन्य किंवा आरमार वाढवितां येत नाहीं, किंवा त्यांचा पगारही देतां येत नाहीं.

न्यायाच्या कामा करितां राजापर्यंत दाद लागणें जरी दुरापास्त आहे तरी राज्याची सर्व जबाबदारी प्रधानांवर

असल्यामुळें राजाच्या दुर्वर्तनाबद्दल किंवा कसुरीबद्दल त्यास दोषी ठरविण्यास हरकत येत नाहीं. तथापि ब्रिटिश प्रजेला आपला न्याय मिळविण्यास **हिबिअस कार्पस आक्त, ट्रायल बायजुरी** (पंचा मार्फत चौकशी) आणि आपलीं मतें प्रसिद्ध करण्याच्या मोकळिकेचा कायदा हे आधार असतात. **हिबिअस कार्पस आक्त** आहे म्हणून आरोपावरून मनुष्य पकडल्याबरोबर त्यास न्यायाधिशापुढें आणून त्याची चौकशी करावी लागते. तो नसता तर आरोपावरून कैद केलेला मनुष्य कितीही दिवस तुरुंगांत ठेविला असता तरी त्याची कोणी चौकशी केली नसती, किंवा त्याची कोणी वास्त पुस्तही घेतली नसती. प्रत्येक गुन्ह्याची चौकशी पंचा मार्फत होते, व त्यांनीं दोषी ठरविल्याशिवाय कैद्यास शिक्षा होत नाहीं. ते पंच बारा असतात, व त्यांचें काम इतकेंच असतें कीं, न्यायाधिशानें केलेली चौकशी न्यायाला अनुसरून आहे किंवा नाहीं हें पहावें. त्यामुळें कोणीही निर्दोषी मनुष्य शिक्षेस पात्र होत नाहीं. कोणाही मनुष्याला कोणाचेही दुर्गुण छापून प्रसिद्ध करण्यास हरकत नाहीं; कारण छापण्याचे पूर्वी त्यांच्या लेखाची तपासणी होत नाहीं. उदाहरणार्थ, कोणाही मनुष्याला सरकाराविषयीं किंवा सरकारी कामदाराविषयीं आपलें मत प्रसिद्ध करावयाचें असल्यास त्यानें बेलाशक करावें. परंतु कोणी दुष्ट बुद्धीनें कोणाचें कांहीं नुकसान विनाकारण करील तर त्याची चौकशी होऊन तो छापणारा किंवा छापविणारा शिक्षेस पात्र होतो. कोणीही गुलाम ब्रिटिश प्रदेशांत पाऊल ठेवील तर तो त्याच क्षणीं बंदमुक्त होतो. गरीबापासून श्रीमंतापर्यंत एक सारखा व निःपक्षपाताचा न्याय मिळतो. कोणाही गरिबाची चंद्रमौळी झोंपडी असो किंवा श्रीमंताचा मोठा वैभवाचा वाडा असो, त्यांत परवानगीशिवाय जाण्यास राजास सुद्धां हरकत आहे.

ब्रिटिश राज्याएवढें राज्य आजकाल कोणाचेंही नाहीं. त्यांतील वस्तीची तुलना चिनाशीं करून पाहिली असतां तिची २ री प्रत लागते. त्याचें क्षेत्रफळ सुमारें ८,५०,००० चौरस मैल आहे. आणि लोकसंख्या २१४० लक्ष आहे म्हणजे पृथ्वीच्या $\frac{1}{6}$ इतकी वस्ती आहे इतकें ठरतें. तात्पर्य, राणीसाहेबांच्या राज्यांत सूर्य कधीं मावळत नाहीं असें ठरतें. त्यांच्या राज्यांत भिन्न भिन्न अशा ५० भाषा बोलणारे लोक आहेत, असा अजमास केला आहे. ब्रिटन देशांतील जमिनीच्या सुधारणेच्या संबंधानें विचार केला असतां असें आढळतें कीं ज्या ठिकाणीं **प्लांटाजिनेट** किंवा **ट्यूडर** कारकीर्दीत ओसाड मैदान किंवा किर्र झाडी असून पांखराच्या किंवा पशूंच्या किंवा ओहोळांच्या शब्दांशिवाय दुसरा कोणताही शब्द ऐकूं येत नव्हता, किंवा ज्या ठिकाणीं पारधी अथवा विरक्त पुरुष किंवा लपून छपून रहाणाऱ्या अपराधी मनुष्याशिवाय इतर मनुष्याचें पाऊल पडलेलें आढळणार नाहीं अशीं ठिकाणें सध्याच्या काळीं मनुष्यांनीं गजबजलेलीं किंवा लागवड केलेल्या जमिनीनीं व्याप्त असून तेथें नानाप्रकारचें उत्पन्न होत आहे असें दिसून येईल. जेथें मनुष्याला जाववणार नाहीं असें त्यावेळचे पहाड व भडचणीची ठिकाणें साफ करून प्रवाशांस जाण्यास तीं फार सुलभ झालीं आहेत. दलदलींतून पाणी काढून दिल्यामुळें त्या जागा सुक्या झाल्या आहेत. उथळ प्रवाह, बंधारे घालून जाण्या जोगे केले आहेत. झाड्या तोडून तेथें कापसाच्या गिरण्या किंवा ऑतीव कामांचे कारखाने झाले आहेत. त्या योगानें जंगली प्राणी त्या प्रांतांतून निघून जाऊन तें प्रांत लोक वस्तीला फार सुखावह झाले आहेत.

ब्रिटिश बेटांतील शेतीचें वार्षिक उत्पन्न २२० कोटि रुपये आहे. कापसाच्या कारखान्यांपासून ३५ कोटि रुपये,

लोंकरीचे २५ कोटि रुपये, लोखंडाचे १७ कोटि रुपये, कापड्याचे १६ कोटि रुपये, ताग आणि रेशीम ह्यांचें प्रत्येकीं १० कोटि रुपये उत्पन्न आहे. ब्रिटिश लोकांच्या व्यापारा एवढा व्यापार आज काल कोणत्याही राष्ट्राचा नाहीं, किंवा पूर्वी कधा झाला नव्हता. ह्यांचीं व्यापाराचीं ३६००० जहाजें असून त्यांवर काम करणारी मंडळी २,६०,००० मनुष्यें आहेत. तयार सैन्य १,५०,००० असून ब्रिटिश आरमाराचीबरोबरी करील असें कोणत्याही देशांत बलाढ्य आरमार नाहीं; लढाऊ जहाजें ७०० आहेत व त्यांवर जरूर पडल्यास १८०० तोफांची तजवीज करितां येते. लढाईचा प्रसंग आल्यास ब्रिटन बेटांत रायफळ बंदुका वापरतां येतील असे १० लक्ष लोक तयार आहेत. २०० वर्षां पूर्वी खेड्यांतील मनुष्यांस आपला माल पेठेला नेण्यास जेथें एक दिवस लागे त्या ठिकाणीं आतां एक तास लागतो. ज्या रस्त्यानें ठेंचा खात व धडपडत व चोराचिलटांची भीति बाळगून जावें लागत असे, किंवा जेथें कोणी डोळ्यांत वोट घातलें तरी दिसत नसे, त्यांत सध्यां मोठे व स्वच्छ असे कंदील लाविल्यामुळें व त्यांची नेहमीं दुरुस्ती ठेविल्यामुळें व ठिकठिकाणीं पोलिसांचा बदोबस्त असल्यामुळें ते रस्ते रात्रभर फिरण्यास फार सुरक्षित झाले आहेत, परांच्यावरून पडलेल्या सुताराच्या किंवा गंवड्याच्या वगैरे हातास, पायांस अथवा दुसऱ्या एकादे अवयवास जखम झाल्यास किंवा त्यांचा सांधा निखळल्यास २०० वर्षां पूर्वी जो खर्च येत असे त्याच्या लक्षांश सुद्धां सध्यां येत नाहीं, व दुरुस्तीचें काम अप्रतिम कुशलतेनें बेमालूम होत आहे. त्या किंवा तसल्या दुसऱ्या दुखापतीच्या योगानें त्यावेळेस जेथें १०० मनुष्यांत ५ मनुष्यें मरत त्या ठिकाणीं सध्यां एक मनुष्य सुद्धां मरत नाहीं. पूर्वीची निर्दयता व अविचार जाऊन सदसद्वि-

चार व दया यांचा जिकडे तिकडे अंमल झाला आहे. दुर्व्यसनें बंद करण्याकरितां मंडळ्या स्थापन होत आहेत. यांत्रिक कलेनें व नवीन शोधानें सुखोत्पत्ति वाढत चालली आहे. बाह्य प्रदेशीं उद्योग वाढल्यामुळें प्रजा श्रीमंत होत चालली आहे. लोक वस्ती वाढून नवीन देशांत वसाहती व राज्यस्थापना होत आहेत. गांवोगांव शाळा स्थापन होऊन युनिव्हर्सिट्या, कालेजें, पुस्तकालयें, व वर्तमानपत्रें यांची वृद्धि होत चालली आहे. तारायंत्रें व टेलिफोन यांचा फैलाव होऊन क्षणांत हजारों कोसांवरील सुखदुःखाचें वर्तमान कळत आहे. आगगाड्या व आगबोटी यांची समृद्धि होऊन हवा तो जिन्नस हव्या त्या ठिकाणीं पाठविता व आणिता येतो, व प्रवाशास दिवसाबद्दल तास लागून बिनधोक हवें तिकडे जातां येतें.

इंग्लंडच्या इतिहासांतील मोठमोठ्या गोष्टींची काल गणना.

ख्रि. पू. ५५ जूलिअस सीजर याची ब्रिटनवर पहिली स्वारी.
„ ५४ जूलिअस सीजर याची ब्रिटनवर दुसरी स्वारी.
ख्रि. नं, सन ४३ रोमचा बादशहा क्लाडियस याची ब्रिटनवर स्वारी.
४८–८४ ब्रिटनवर रोमन लोकांचा गव्हर्नर (अधिकारी).
६१ बोआडिशियेचा पराभव.
४१० रोमन लोकांनीं ब्रिटनांतील सैन्य परत नेलें.
४५० जूट आणि आंग्ली लोक ब्रिटनमध्यें येऊन हेन्जिस्ट यानें कँन्टचें राज्य स्थापिलें.
४७७ एली ससेक्सचे राज्याची स्थापना करितो.
४९५ सर्डिक वेसेक्सचे राज्याची स्थापनाकरितो.
५९७ आगस्टाइन ब्रिटन लोकांस ख्रिस्ती करण्यास येतो.
७८७ डेन लोक ब्रिटनावर स्वारी करितात.
८०२ एड्वर्ड वेसेक्सचा राजा झाला.
८३६ एड्वर्डचा मृत्यु.
८७१–९०१ आल्फ्रेडची कारकीर्द.
८७३ आल्फ्रेडचा पराजय व अज्ञातवास.
८७८ वेडमूर येथील तह.
१०१३ डेन्मार्कचा राजा स्वेन यानें इंग्लंड जिंकिलें.
१०१६–३५ कान्यूट सर्व इंग्लंडवर राज्य करितो.
१०३५–३९ इंग्लंडचा राजा पहिला हारल्ड.
१०३१–४२ हार्डीकयान्यूट.
१०४२–६६ साक्सन कारकीर्दीची पुनःस्थापना. एडवर्ड दिकान्फेसर इंग्लंडचा राजा झाला.
१०६६ सेनलाक (हेस्टिंग) एथील लढाई. दुसरा हरल्डचा मृत्यु, विजयी उइलियमचा जय. कान्फेसराचा मृत्यु.

१०६६-८७ उइलियमाची कारकीर्द.
१०७९ जॉंविरायचा वेढा.
१०८५ फ्यूडल्सिस्टिमची सुरुवात.
१०८६ डूम्सडेबुक नामककीर्दीची पूर्णता.
१०८७ पहिल्या उइलियमानें फ्रान्सांतील म्यांटिजशहर जिंकून घेतलें, क फर्यूवेल, पहिले उइलियमाचा मृत्यु.
१०८७-११०० दुसरे उइलियमाची कारकीर्द.
१०९१ कंबर्लेंड प्रांत इंग्लंडांत सामील केला.
१०९६ पहिले धर्मयुद्धास रावर्ट जातांना नार्मंडी व मेन प्रांत उइलियमाकडे गहाण ठेवितो.
११००-३५ पहिले हेन्रीची कारकीर्द.
११०६ टेन्चीब्राइ एथें रावर्टास कैद केलें.
११२० हेन्रीचा मुलगा उइलियम समुद्रांत बुडाला.
११३५-११५४ स्टीफनची कारकीर्द, रावर्टचा मृत्यु.
११३९ माटिल्डा व स्टीफन यांमधील स्टांडर्ड एथील लढाई.
११४१ लिंकन एथें स्टीफनचा पराजय.
११५३ वालिंगफर्ड किंवा उइन्चेस्टर एथील तह.
११५४-८९ दुसरे हेन्रीची कारकीर्द.
११६४ क्लारेन्डन एथील कानू किंवा ठराव.
११६५ दुसरे हेन्रीची आयर्लंडावर दुसरी स्वारी.
११७० टामस आबेकेटचा मृत्यु.
११७२ आयर्लंड जिंकून घेतलें.
११७४ स्काटलंडचा राजा उइलियम यास अलनउइक एथें जिंकून कैद केलें.
११७६ नार्थ्यांप्टन एथील कानू.
११८७ सालाडिन यानें जरुशिलेम शहर घेतलें.

११८९ लंडन शहरास सनद मिळाली. तेणे करून तेथील नागरिकांवर कोतवालाचा अधिकार बसला, यहुद्यांची कत्तल.

११८९–११९१ पहिले रिचर्डाची कारकीर्द.

११९१ एकरचा वेढा, तिसरें धर्मयुद्ध, सैप्रस जिंकून घेतलें.

११९२ आस्ट्रियाच्या ड्यूकानें रिचर्डास कैद केलें.

११९९–१२१६ जानची कारकीर्द.

१२०९ इंग्लंडावर व जानवर बहिष्कार् पडला.

१२१२ जानास पदच्युत होण्याची भीति.

१२१३ जान राजा पोपाचे स्वाधीन झाला.

१२१५ माग्नाचार्टा कायम करून घेतला.

१२१६–७२ तिसरे हेन्रीची कारकीर्द.

१२१७ लिंकन एथील लढाई.

१२५८ म्याडपार्लमेन्ट व आक्सफर्ड एथील कानू.

१२५९ तिसरे हेन्रीनें नार्मंडी प्रांत फ्रान्साचे स्वाधीन केला,

१२६५ कामन (गांवचे पंच) लोकांच्या सभेची स्थापना-ईव्हशाम एथील लढाई.

१२७२–१३०७ पहिले एडवर्डाची कारकीर्द.

१२७८ ग्लुस्टर एथील कायदा.

१२८३ वेलस प्रांत जिंकून घेतला. ल्यूवेलिनचा भाऊ डेव्हिड याचा शिरच्छेद केला.

१२८४ पहिले एडवर्डानें आपले पुत्रास (एडवर्डास) प्रिन्स आफ वेलस केलें.

१२९० यहुदी लोकांस इंग्लंडांतून हांकून दिलें.

१२९५ पहिली पूर्ण पार्लमेन्ट भरली.

१२९८ फाल्कर्क एथील लढाई.

१३०४ स्काट्लंड जिंकून घेतलें.

१३०५ वालेस याचा शिरच्छेद.

१३०६ रायर्ट ब्रूस यास स्कॉच लोकांनीं राज्याभिषेक केला.
१३०७-२७ दुसरे एडवर्डाची कारकीर्द.
१३१२ पिअर्स ग्याव्हेस्टन याचा शिरच्छेद.
१३१४ बानाक्बर्न एथील लढाई व स्काट्लंड स्वतंत्र झालें.
१३२२ लांक्यास्टरच्या अर्लाचा पराजय व शिरच्छेद.
१३२७ दुसरे एडवर्डास त्याची राणी पदच्युत करिते.
१३२७-७७ तिसरे एडवर्डाची कारकीर्द.
१३२८ नाथ्यॉंप्टन एथील तहानें स्काटलंड स्वतंत्र झालें.
१३३० मार्टिमर याचा शिरच्छेद.
१३३३ हालिडन एथील लढाई.
१३३९ शत वर्षात्मक काळाची लढाई.
१३४० स्लुइ एथील लढाई.
१३४६ क्रेसी एथील लढाई, नेव्हिलक्रास एथील लढाई.
१३४७ कालेचा वेढा.
१३५६ पाइटियर्स एथील लढाई.
१३६० ब्रिटेनी एथील तह.
१३७६ कृष्णकवच राज पुत्राचा मृत्यु, सद्गुणी पार्लमेंट.
१३७७-९९ दुसरे रिचर्डाची कारकीर्द.
१३७९ प्रत्येक मनुष्यावर कर बसविण्याचा कायदा.
१३८१ वाट टायरलचा दंगा.
१३८४ जान उइक्लिफचा मृत्यु.
१३८६ दुसऱ्या रिचर्डास राज्य कारभार सोडावा लागला.
१३८९ रिचर्डास पुनः अधिकार मिळतो.
१३८९ चमत्कारिक किंवा निर्दय पार्लमेन्ट.
१३९७ ग्लुस्टर यास कैद केलें व मारलें.
१३९९ दुसरे रिचर्डास पदच्युत केलें.

१३९९–१४१३ चवथे हेन्रीची कारकीर्द.
१४०१ पाखंडी लोकांविषयीं कायदा.
१४०२ हामिलडन व नेस्विटमूर एथील लढाया.
१४०३ श्रूज्बेरी एथील लढाई.
१४०५ स्काट्लंडचा राजपुत्र, जेम्स यास कैद.
१४१३–२२ पांचवे हेन्रीची कारकीर्द.
१४१४ लोलर्ड लोकांचा पाठलाग.
१४१५ एजिन्कोर्ट एथील लढाई.
१४१७ लार्ड काबहाम यास फांशीं दिलें.
१४१८ रुएन शहर वेढा देऊन घेतलें.
१४२० ट्रोइज एथील तह. पांचव्या हेन्रीचें फ्रान्सच्या कयाथराइनबरोबर लग्न.
१४२२–६१ सहावे हेन्रीची कारकीर्द.
१४२४ व्हर्न्युइल एथील लढाई.
१४२९ ओर्लिएन्स शहरास वेढा, आर्कची जोआन वेढा उठविते. व सातवे चार्लसास ऱ्हीम एथें राज्याभिषेक केला.
१४३१ आर्कची जोआन हिला धरून जिवंत जाळिली.
१४४५ आन्जूचे मार्गरेटबरोबर सहावे हेन्रीचें लग्न.
१४५० जाककेडचा दंगा
१४५१ गिएन्स प्रांत फ्रेंचांनीं जिंकून घेतला.
१४५३ शत वर्षात्मक कालिक युद्धाची समाप्ति.
१४५५–१४८५ गुलाबांच्या लढाया, सेन्ट आलश्न्स एथील पहिली लढाई.
१४५९ ब्लोअरहीथ एथील लढाई.
१४६० नार्थ्थॉएटन व वेकफील्डग्रीन एथील लढाया .

१४६१ **मार्टिमर्सकाश, सेन्टअल्बन्स,** आणि **टौटन** एथील लढाया.

१४६१-८३ चवथे **एडवर्ड**ची कारकीर्द.

१४६६ सहावे **हेन्रीस टावर** एथें कैदेंत ठेविलें.

१४७१ **बार्नेट** आणि **ठयूग्जबेरी** एथील लढाया, छापण्याची युक्ति **कयाक्स्टन** यानें शोधून काढिली.

१४७५ चवथें **एडवर्डा**ची **फ्रान्सावर** स्वारी.

१४७८ **क्लथारेन्स**च्या **ड्यूकास** फांशीं दिलें.

१४८३ पांचवे **एडवर्डा**ची कारकीर्द सुमारें तीन महिने.

१४८३-१४८५ तिसरे **रिचर्डा**ची कारकीर्द.

१४८५ **बास्वर्थ** एथील लढाई.

१४८५-१५०९ सातवे **हेन्री**चा कारकीर्द.

१४८६ सातवे **हेन्री**चें लग्न **यार्क**च्या **इलिजाबेथशीं** झाल्या मुळें **यार्क** व **लांक्यास्टर** हीं घराणीं एकत्र जोडिलीं.

१४८७ **स्ट्रोक** एथील लढाई.

१४९२ **कोलंबसानें अमेरिके**चा शोध लाविला.

१४९७ **सेब्यास्टियन कयाबट** यानें **न्यूफाउन्डलांड**चा शोध लाविला. **वास्कोडिगामा** यानें **आफ्रिके**चे दक्षिण टोंक वलांडून **हिंदुस्तान**चा रस्ता शोधून काढिला.

१४९९ **पर्किनवार्बेक** व **लयाम्बर्टसिम्नेल** यांस फांशीं दिलें.

१५०९-४७ आठवे **हेन्री**ची कारकीर्द.

१५०९ **एम्पसन** आणि **डडले** यांस फांशीं दिलें.

१५१२ पहिला **लार्ड हाय आडमिरल** नेमिला. **स्काट्लंड**-च्या चवथ्या **जेम्सबरोबर** युद्ध.

१५१३ **गिनिगेट** व **फ्लोडनफील्ड** एथील लढाया.

१५१५ उलसीस कार्डिनल आणि च्यान्सेलर केलें.
१५१७ लूथरची जर्मनीमध्यें धर्मसुधारणा.
१५२० भरजरीचें दरबार.
१५२१ आठवा लुइपोप यानें आठवे हेन्रीस धर्म संरक्षक ही पदवी दिली.
१५२९ इंग्लंडांत धर्म सुधारणा. अरेगानच्या काथराइनची चौकशी.
१५३० उलसीची पदच्युति व मरण, स्टेटसेक्रेटरीच्या कचेरीची स्थापना.
१५३३ अरेगानच्या क्याथेराइनचा घटस्फोट व हेन्रीचे आनबोलीनबरोबर लग्न. इलिजाबेथचा जन्म.
१५३४ सुप्रिमसीचा कायदा.
१५३६ वेल्स प्रांत इंग्लंडांत सामील केला, आनबोलन इचा शिरच्छेद.
१५३९ सहाकलमांचा कायदा.
१५४२ साल्वेमास एथील लढाई.
१५४६ लूथरचा मृत्यू.
१५४७-५३ सहावे एडवर्डाची कारकीर्द.
१५४७ पिंकीची लढाई, सहाकलमांचा कायदा रद्द केला.
१५४८ क्वान्मरची धर्मसंबंधी ४२ कलमें.
१५५३-८ मेरीची कारकीर्द.
१५५३ जेनग्रेला राज्याभिषेक झाला.
१५५४ जेनग्रेचा शिरच्छेद.
१५५६ क्वान्मरास जिवंत जाळिलें.
१५५८ कयाले वंदर इंग्लिशाकडून गेलें.
१५५८-१६०३ इंलिजाबेथची कारकीर्द.

१५८७ स्कॉट कोकांच्या मेरीचा शिरच्छेद.
१५८८ अर्जिकय आरमाराचा नाश.
१६०० ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली.
१६०१ एसेक्सचा शिरच्छेद.
१६०३–२५ पहिले जेम्सची कारकीर्द.
१६०३ इंग्लंडास स्कॉटलंड जोडिलें, वाल्टरराले यास कैद.
१६०४ ह्याम्प्टन कोर्ट एथील सभा.
१६१८ वाल्टर रालेचा शिरच्छेद.
१६१९ हार्वे यानें रक्ताभिसरणाचा शोध लाविला.
१६२५–४९ पहिले चार्लसची कारकीर्द.
१६२८ पिटिशन आफ राइट्स्, चार्लसाची तिसरी पार्लमेन्ट, बकिंगह्यामचा खून.
१६३४ जहाजांवर कर बसला.
१६४० चार्लसाची प्रसिद्ध फार दिवस राहिलेली पार्लमेंट व छोटी पार्लमेन्ट.
१६४१ त्रैवार्षिक कायदा. स्ट्रयाफर्डाचा शिरच्छेद
१६४२ आपसांतील तंटा व एज्जाहिल एथील लढाई.
१६४४ मार्स्टन एथील लढाई. न्यूबरी एथील दुसरी लढाई.
१६४५ नेस्बी एथील लढाई.
१६४७ स्कॉट लोकांनी चार्ल्स यास पार्लमेन्टचे स्वाधीन केलें.
१६४८ आपसांतील दुसरा तंटा. वेस्टफालियाचा तह, प्रेस्टन एथील लढाई. प्राइडचा पर्ज, (कोरडा) रम्प पार्लमेन्ट.
१६४९ चार्लसाची चौकशी व देहांत शासन.
१६४९–६० इंग्लंडांत प्रजासत्तेची कारकीर्द.
१६५० डन्बारची लढाई.

१६५१ वुर्स्टरची लढाई, नौकागमनाचा कायदा.
१६५२ डच लोकांबरोबर लढाई.
१६५३ बेअरबोन पार्लमेंट. आलिव्हर क्रामवेल राज्य रक्षक.
१६५८ डन्कर्क जिंकून घेतलें, क्रामवेलचा मृत्यु, रिचर्ड राज्य रक्षक,
१६६० राज्यक्रांति, राज्य पुनःस्थापना. दुसरा चार्लस राजा.
१६६०-८५ दुसरे चार्लसाची कारकीर्द.
१६६० रायल सोसायटी स्थापन झाली.
१६६५ पांच मैलांचा काय दा, महामारी.
१६६६ मोठी आग, डौन्स एथील लढाई. इमारतीचा विमा उतरणारी मंडळी स्थापन झाली.
१६६७ कावाल मंत्रि सभा. ब्रेडाचा तह.
१६६८ ऐक्य झालें (इंग्लंड, हालंड आणि स्वीडेन यांचें).
१६७९ हिबिअस कार्पस कायदा.
१६८२ पत्राचें हांशील पेनी ठरलें.
१६८३ रायहौसचा कट, रसेलचा शिरच्छेद.
१६८५-८८ दुसरे जेम्साची कारकीर्द.
१६८५ सेजमूर एथील लढाई, मनमौथचा शिरच्छेद.
१६८८ राज्यक्रांति.
१६८९-१६९४ तिसरा उइलियम आणि दुसरी मेरी यांची कारकीर्द.
१६८९ किलिक्रथांकी एथील लढाई, लंडनडेरीचा वेढा.
१६९० बाइनी एथील लढाई.
१६९२ ग्लेंकोचा खून, जमिनीवर कर, राष्ट्रीय कर्जाचा आरंभ. लाहाग एथील लढाई,

१६९४ त्रैवार्षिक कायदा. दुसरे मेरीचां मृत्यु. इंग्लंडची पेढी,

१६९४-१७०२ तिसरे उइलियमाची कारकीर्द.

१६९७ रिस्विकचा तह. रशियाचा राजा पीटर इंग्लंडांत शिकण्यास आला.

१६९८ पूर्वेकडे व्यापारकरणारी जनरल सोसायटी.

१७०० स्पेनचा राजा चार्लस मरण पावला.

१७०१ सेट्लमेन्ट कायदा,

१७०२-१७१४ आन राणीची कारकीर्द.

१७०२-१३ स्पयानिश वारसाबद्दल तंटा.

१७०४ ब्लेन्हिम एथील लढाई, जिब्राल्टर घेतलें.

१७०७ स्काट्लंडाशीं ऐक्याचा कायदा.

१७०८ मिनोर्का जिंकून घेतलें.

१७१३ युट्रेचचा तह.

१७१४-२७ पहिले जार्जाची कारकीर्द.

१७१५ जाकोबाइट लोकांचा पहिला दंगा.

१७१७ त्रैक्य.

१७१८ चतुरैक्य. पासरोची लढाई.

१७२० सौथंसी बबल कंपनी.

१७२२-१७४२ वालपोलचा राज्य कारभार.

१७२७-१७६० दुसरे जार्जाची कारकीर्द.

१७४०-आस्ट्रियाच्या वारसाबद्दल युद्ध.

१७४५ प्रेस्टन्प्यान्स एथील लढाई.

१७४६ फालकर्क एथील लढाई.

१७४८ एलाचापेली एथील तह.

१७५२ ब्रिटिश संग्रहालय; पंचांगांतील दुरुस्ती.

१७५६ सप्तवार्षिक युद्ध, पिटाचा कारभार.

१७५७ प्लासीची लढाई.
१७६०–१८२० तिसरे जार्जाची कारकीर्द.
१७६० अमेरिकेंतील कानडा जिंकून घेतला.
१७६१ इंग्रजांचा पांडिचेरी, डोमिनिको व बेलीबेट यांवर हल्ला.
१७६३ सासावर्षिक युद्धाची अखेर. प्यारिस एथील तह.
१७६५ थोरतोतयाचा मृत्यु, ग्रान्व्हिल्लचा छापिल कागदांचा कायदा.
१७६६ छांपील कागदाचा कायदा रद्द केला.
१७६७ चाहा वगैरे पदार्थांवर कर बसाविण्याचा टौन्सेन्डचा कायदा.
१७७३ बोस्टन एथें चहाचीं आलेलीं जहाजें समुद्रांत रिचवलीं,
१७७५ अमेरिकेशीं युद्ध सुरूं झालें. लेक्सिंग्टन व बंकर्सहिल एथील लढाया.
१७७६ संयुक्त संस्थानांनीं स्वातंत्र्य प्रसिद्ध केलें.
१७८२ जिब्राल्टरचा वेढा, युनाइटेडस्टेटचें स्वातंत्र्य मान्य केलें.
१७८३ पारिस व व्हर्सेलीज एथील तह. अमेरिकेन युद्धसमाप्ति.
१७८७ वारनहेस्टिंगची न्यायाधिशापुढें चौकशी.
१७८९ फ्रेंच राजक्रांति.
१७९६ फ्रेंच राजा १६ वा लुइ याचा शिरछेद, इंग्लिश आणि फ्रेंच यांमध्यें लढाई जुंपते. नेपोलियन बोनापार्ट इंग्लिशांचा टौलान एथील वेढा उठवून त्यांस हांकून देतो.
१७९६ जेनर साहेबांनीं लसीच्या देवींचा शोध काढिला.
१७९७ सेन्टव्हिन्सेंट एथील लढाई.
१७९८ नीलनदीच्या मुखाजवळील लढाई, आयर्लंडांत बंड.
१७९९ एकरचा वेढा, बोनापार्टाचें तेथें चालले नाहीं.

१८०० आयलड व इंग्लंड यांचें पार्लमेन्ट संबंधीं ऐक्य.
१८०२ एमिएन्स (आमीन) एथील तह.
१८०४-६ फ्रेंचाचा बादशहा नेपोलियन बोनापार्ट झाला.
१८०४ ट्राफलगार एथील लढाई, नेलसनचा मृत्यू.
१८०६ रामिलिस एथील लढाई.
१८०८-१४ महाद्विपांतील युद्ध.
१८११ तिसरा जार्ज भ्रमिष्ट झाला, राज्याधिकार युवराजाकडे दिला.
१८११-१८२० युवराज कारकीर्द.
१८१२ अमेरिकन यांनीं इंग्लंडाबरोबर लढाई करण्याचें ठरविलें.
१८१३ ड्यूक आफ वेलिंग्टन यानें फ्रेंचांस पिरिनीज एथे जिंकिलें.
१८१४ घेन्ट एथील तह, नेपोलियन यास पदच्छुत केलें.
१८१५ वाटर्लू एथील लढाई, नेपोलियनास सेन्टहेलिना एथें पाठवून दिलें. पॅरिस एथिल दुसरा तह.
१८२०-३० चवथे जार्जाची कारकीर्द.
१८२० केटो रस्त्यांतिल बंड.
१८२१ नेपोलियनाचें मरण.
१८२६ आसाम व आराकान इंग्लंडच्या राज्यास जोडिले.
१८३०-३७ चवथ्या उइलियमाची कारकीर्द.
१८३० लिव्हर्पूल म्यांचेस्टर रेलवेची सुरुवांत.
१८३१ इंग्लंडांत महामारी प्रथम उद्भवली.
१८३३ दास लोकांच्या मुक्ततेबद्दल कायदा.
१८३७ व्हिक्टोरियाची कारकीर्द सुरू झाली
१८३९ व्हिक्टोरियाचें अलबर्टबरोबर लग्न.
१८४० चिनाबरोबर लढाई.
१८४२ चिनाबरोबर तह. काबूलच्या खिंडींतील कत्तल.

१८४८ पेशव्यांचें राज्य मिळालें.
१८४९ पंजाब प्रांत खालसा केला.
१८५१ हाइडपार्क एथील प्रदर्शन.
१८५४–५६ क्रिमियन युद्ध.
१८५७ नानासाहेबांचें बंड.
१८५८ व्हिक्टोरिया हिंदुस्तानची राणी व कंपनीचा अधिकार रद्द केला.
१८६१ व्हिक्टोरियेशीं तिचे पतीचा वियोग.
१८६९ अबिसिनियन युद्ध, तेथील राजाचा मृत्यु,
१८७७ राणीसाहेब हिंदुस्थानच्या बादशाहीण झाल्या.
१८७९ झुलू लढाई, आफगान लढाई, काबूलची कत्तल. जनरल राबर्ट काबूल जिंकून घेतो.
१८८० जनरल राबर्टस मायूबखानास जिंकून कंदाहार सोडवितो.
१८८१ आबदुल रहिमान यास काबूल व कंदाहार प्रांत परत दिले. बीकन्सफील्डचा मृत्यु.
१८८५ रावलपिंडीचा दरबार.
१८८६ ब्रह्मादेशाचा राजा थीबा यास पदच्युत करून कैद केलें व उत्तर ब्रह्मा खालसा केला.
१८८७ राणीसाहेबाच्या राज्यास ५० वर्षें झालीं म्हणून मोठा. उत्साह झाला.
१८९२ राणीसाहेबांचे नातू व्हिक्टर हिंदुस्तानांत आले होते.
१८९४ व्हिक्टर मरण पावले.
१८९७ हिंदुस्तानांत चालू असलेला ग्रंथिक सन्निपात सुरू झाला;राणीसाहेबाची साठ वर्षांच्या कारकीर्दीची जुबिली.
१८९८ ग्लाडस्टनचा मृत्यू.
१८९९ लार्ड कर्झन हिंदुस्तानावर गव्हर्नर जनरल आले.

सा

ब्रिटिश बेटांचें भूवर्णन.

भाग पहिला.

उपोद्घात.

ब्रिटिशबेटें युरोपाच्या पश्चिमेस अट्लांटिक महासागर आणि उत्तर किंवा जर्मन समुद्र ह्यांच्यामध्यें आहेत. त्यांत दोन बेटें आहेत; ग्रेटब्रिटन, आणि आयर्लंड; हीं दोन मिळून एक संयुक्त राज्य आहे. प्राचीनकाळीं त्यांत पुष्कळ स्वतंत्र संस्थानें होतीं. सध्यां त्यांत इंग्लंड, वेलस, स्काट्लंड आणि आयर्लंड हे मुख्य भाग आहेत.

सन ११७२ त दुसरे हेन्रीनें आयर्लंड बेट इंग्लंडास बेलें; सन १२८२ त पाहिले एड्वर्डानें वेलस प्रांत इंग्लंडःजोडिला; आणि स्काट्लंडचा सहावा जेम्स सन १६०३ इंग्लंडचा राजा झाला तेव्हां स्काट्लंड इंग्लंडास जोडिलें. त्यांचें एकंदर क्षेत्रफळ १ लक्ष २१ हजार चौरसमैल किंवा द इलाख्यापेक्षां थोडें कमी आहे. सन १८९१ तील खानेरोवरून तेथें लोक संख्या ३८० लक्ष आहे. ब्रिटिश क्षेत्रफळ युरोपाशीं ताडिल्यास तें युरोपाच्या $\frac{१}{३०}$ आहे व लोक संख्या त्याच्या $\frac{१}{६०}$ एकदशांश आहे.

युरोपांतील बेटांत ग्रेटब्रिटन हें मोठें बेट आहे. त्यांत मेन इंग्लंड आणि वेलस व उत्तरेस स्काट्लंड असे एक ग आहेत.

स्पिटहेड्टनूची लांबी ६०० मैल व क्षेत्रफळ ९०

डोगर—पेनाईन् जगांतील मोठ्या बेटांतील ८ वें
च्या चिव्हिअट् टेंकड्यांपासून

इंग्लंड आणि वेल्स यांच्या उत्तरेस स्काट्लंड; उत्तर किंवा जर्मन समुद्र; दक्षिणेस इंग्लिश खाडी; आणि पश्चिमेस अट्लांटिक महासागर, सेंट जार्जाची खाडी आणि पेरिश समुद्र हीं आहेत.

त्याचा आकार साधारणपणें त्रिकोणी आहे. त्यांतील मोठी लांबी ४२० मैल आणि मोठी रुंदी ३२० मैल आहे. इंग्लंडचें क्षेत्रफळ ५०,९०० शें चौरस मैल आहे. आणि वेल्स आंतांचें ७,४०० चौरस मैल आहे. तीं दोनी मिळून स्काट्लंड किंवा अयर्लंड एवढीं आहेत.

इंग्लंड ह्मणजे आंग्ल लोकांचा देश. त्या लोकांनीं तो देश जिंकून घेतला ह्मणून तें नांव त्यास पडलें आहे. वेल्स ह्मणजे परकीय देश. पूर्वी इंग्लंड हें महाद्विपाचा भाग हें परंतु डोव्हरच्या सामुद्रधुर्नानें त्यास महाद्विपापासून विभ ल्यामुळें तें वेंट झालें आहे.

किनारा—पश्चिमेच्या बाजूचा किनारा विशेष फाटलेर आहे. फाटलेलीं स्थळें पुढें लिहिल्याप्रमाणें—पूर्व किनारीं हंब नदीचें मुख, वाश, आणि टेरस नदीचें मुख, केन्ट अ गुडविन स्यान्डस यांमध्यें डौन्स ह्मणून एक धोक्याचा आहे, परंतु तो माल चढविण्यास उतरण्यास चांगला उप पडतो; दक्षिण किनारीं हांप प्रांत व वाईट बेंट यां स्पिटहेडखाडी (हें वरवा करण्याचें ठिकाण) व सौ पून-वाटर, आणि केन्टच्या दक्षिणेस प्लिमौथ- आणि मौंटची खाडी; पश्चिम किनारीं ब्रि— गान आखात, डीचें मुख, मर्शी

सालव्हे खाडी आणि मिलफर्ड हेवन (हें ब्रिटनांत उत्तम बंदर आहे.) तें ब्रिस्टल खाडीचे वायव्येस आहे.

भूशिरें—पूर्व किनारीं यार्क प्रांतांत फ्लॅमबरोहेड आणि स्पर्नहेड; केन्टमध्यें उत्तर फोलयॉड आणि दक्षिण फोलयॉड; ससेक्समध्यें बीचीहेड; वाइट बेटांत नीड्ल्स, हा एक लहान बेटाचा समुदाय आहे; कार्नवालमध्यें लिझर्डपाइंट आणि लयांडस्एंड; पश्चिम किनारीं वेलस प्रांतांचे दक्षिणेस सेंटडेविड्सहेड, व उत्तरेस ग्रेटआर्म्सहेड हीं आहेत.

बेटें—हांप प्रांतांच्या दक्षिणस वाईट बेट; फ्रान्साच्या खाडींतील बेटे; कार्नवालच्या नजीक सिली बेटें; वेलसच्या उत्तरेस अंगलसी (हे सर्वांत मोठें); ऐरिश समुद्रांत मान बेट व होली बेट (हें अंगलसीच्या पश्चिमेस असून भरतचि वेळीं मात्र बेट होतें); व शेपी व थ्यानेट हीं कैंटच्या उत्तरेस आहेत. वाइट बेट फार सुंदर आहे. त्याला इंग्लंडचें उद्यान ह्मणतात. तेथें राणी साहेबांचा आस्बोर्न हा मोठा आवडता वाडा आहे. मान बेट इंग्लंड व आयर्लंड यांच्या मधोमध आहे. तेथें डुग्लास हें राजधानीचें शहर आहे, व तेथील राज्य वेगळेंच आहे. खाडींतील बेटांत जर्से, आर्डनी, सार्क आणि गर्से हीं मुख्य आहेत, तीं नार्मंडीचा ड्यूक विजयी उइलियमयाच्या वतनांतील होतीं.

सामुद्रधुन्या—वेलस आणि आंगलसी बेट यांच्यामध्यें मेनाई सामुद्रधुनी आहे, ती इतकी अरुंद आहे कीं तिच्यावर एक लॉंबता व एक नळाचा असें दोन पूल आहेत. सोलेन्ट व स्पिटहेड, ह्या इंग्लंड व वाइट बेट यांमध्यें आहेत.

डोंगर—पेनाईन् रांग-स्काट्लंडच्या सीमेवर असणाऱ्या चिव्हिअट् टेंकड्यांपासून डर्बी प्रांतांतील पीक डोंगराप-

र्यंत आहे. तिचे अति उंच शिखर क्रासफेल्स हें २८९२ फूट उंच आहे. कंब्रियन रांग ही पेनाईन् रांगेच्या पश्चिमेस कंबर्लंड प्रांतांत असून तींत स्कॉफेल हें उंच शिखर आहे; हा इंग्लंडांत अति उंच डोंगर होय. त्याची उंची ३१६१ फूट आहे. त्याच रांगेंत हेल्विलन या डोंगराची उंची ३११८ आणि स्किडा डोंगराची उंची ३०५४ फूट आहे. या रांगेच्या खिंडींत मोठीं अशीं उल्स्वरमिअर आणि डरवेंटवाटर किंवा केंब्रिकें हीं दोन सरोवरें आहेत. पेनाईन् व कांब्रियन रांग यांमध्यें इडन व लून या नद्यांचीं खोरीं आहेत. कांब्रियन रांग ही बहुतेक वेल्स प्रांतभर आहे. तींत स्नौडन हा सुमारें $\frac{3}{4}$ मैल उंच (३,५७० फूट) असून तो इंग्लंड व वेल्स यांमध्यें मोठा उंच डोंगर आहे. क्यादरइड्रिस, प्लिन्लिमान, ब्रेकनाक, आणि बीकन हीं दुसरीं त्या रांगेंत शिखरें आहेत. सेव्हर्न आणि वाय या नद्यांच्यामध्यें मलव्हर्न टेंकड्या आहेत; परंतु त्या फार सखल आहेत. डेव्होनियन रांग कार्नवाल पासून पूर्वेकडे पसरत गेली आहे. डार्टमूर ह्मणून एक डेव्हन प्रांतांत मोठें टेकाड आहे, त्याचें उंच शिखर येसटार हें आहे. त्याची उंची २,०४० फूट आहे.

नद्या—इंग्लंडांतील बहुतेक नद्या पूर्वेस वाहतात पश्चिमेस व दक्षिणेस फार थोड्या वाहतात.

पूर्वेकडील उतरणीवरच्या नद्या—टाईन, विअर, आणि टीज ह्या उत्तर समुद्रास मिळतात; ह्या नद्यांतून कोळसे भरून जहाजें जातात. ऊझ् आणि ट्रेन्ट यांचा संगम झाल्यावर तिला हंबर ह्मणतात. डोव्ह आणि डवेंट ह्या ट्रेन्टला उत्तरेकडून येऊन मिळतात; महाऊस वाश-खाडीला मिळते. टेम्स नदी सर्व इंग्लंडांत मोठी असून उत्तर समुद्रास

मिळते; **मेडवे**, ईशान्येकडे वाहत जाऊन **टेम्स** नदीच्या मुखापाशीं मिळते.

दक्षिणेकडील उतरणीवर वाहणाऱ्या नद्या—आव्हन इंग्लिश खाडीस मिळते, आणि **टामर** ही **प्लीमौथ** खाडीस मिळते.

पश्चिमेकडील उतरणीवर वाहणाऱ्या नद्या—**सेव्हर्न** ही **ब्रिस्टल** खाडीस दक्षिणेकडे वाहत येऊन मिळते, ती लांबीनें **टेम्स** नदीच्या खालोखाल आहे. **वाय** ही तशीच वाहत येऊन **सेव्हर्न** नदीच्या मुखापाशीं मिळते; **डी** ही उत्तर **वेल्स** प्रांतांत **बाला** सरोवरापासून निघून **पेरिश** समुद्रास मिळते; **इरवेल** ही दक्षिणेस वाहत येऊन **मर्शीला** मिळते; **मर्सी** नदी पश्चिमेकडे वहात जाऊन **पेरिश** समुद्रासच मिळते; **ईडन** नदी उत्तरेकडे जाऊन **सालवे** खाडीला मिळते. **टेम्स** नदीची लांबी २१५, **सेव्हर्न** १८०, **ट्रेन्ट** १६७, **महाऊस** १५९, **ऊस** १५० आणि **वाय** १४० मैल लांब आहे.

हवापाणी आणि उत्पन्न—**हवापाणी**–इंग्लंडची हवा दमट आहे, परंतु सौम्य असून निरोगी आहे. पश्चिम आणि दक्षिण किनारे पूर्व किनाऱ्यापेक्षां गरम आहेत, व तेथें पाऊस पुष्कळ पडतो.

उत्पन्न—**खनिज**,–लोखंड, कोळसे, व मीठ हे जिन्नस पश्चिम उत्तर भागांत विपुल सांपडतात. **ख्रिस्ती**शकाच्या पूर्वी पुष्कळ वर्षें **भूमध्यसमुद्रा**च्या पूर्वेकडून **फिनिशियन** लोक कथिला करितां कार्नवालमध्यें येत, हे प्रसिद्ध आहे; आतां तांवें व कथिल हीं सांपडत नाहींत, **वेल्स**प्रांतांत स्लेटीचे दगड पुष्कळ निघतात, शिसें पुष्कळ ठिकाणीं सांपडतें, इंग्लंडांतलि संपत्तीचें जें आदिकारण कोळसे व लोखंड तीं उत्तर भागांत

व वेल्सप्रांतांत विपुलतेनें मिळतात. चि प्रांतांत मीठ आणि कंबर्लंडप्रांतांत काठें शिसें सांपडतें.

उद्भिज्जें—गहूं, ओट, सातु, हीं धान्यें; आप्ल, गुजबेरी, स्ट्राबेरी, पीअर, द्राक्षें, चेरीं, हीं फळें; टार्नेप, वंबटाटे हे कंद, ओक, बीच, देवदार, इत्यादि इमारती लांकडांचीं झाडें; यांची इंग्लंड देशांत समृद्धि आहे, व एथील जमिनी सर्वकाळ हिरव्यागार असतात.

प्राणी-घोडे, बैल, मेंढ्या, कोल्हे, नानाविधमासे, व व्हायपर नांवाचीं जिवाणें (निर्विष) बहुत सांपडतात. तेथें घातुक जनावर नाहींत. गाडीला व नांगराला बैल; लावित नाहींत, घोडे लावितात.

लोक व कारागिरीचे पदार्थ इत्यादि.

लोक-इंग्लंड व वेल्स मिळून लोकवस्ती २९० लक्षांची आहे. इंग्लंडचे लोक टयुटानिकजातीचे आणि वेल्संतीलें लोक सेल्टिकजातीचे आहेत. एथील मूळचे लोक सेल्टिक जातीचे होते. सुमारें ख्रिस्तीशकाच्या आरंभीं हा देश रोमन लोकांनीं जिंकून घेऊन, सुमारें ३०० वर्षें आपल्या ताब्यांत ठेविला होता. सन ४५१ त साक्सन लोकांनीं जर्मनीच्या उत्तरेकडून येऊन व मूळच्या लोकांना पश्चिमेकडील डोंगरांत हांकून लावून सर्व देश आपले ताब्यांत घेतला. पुढें सन १०६६ त नार्मन लोकांनीं हा देश जिंकून घेतला. त्या योगानें मूळ इंग्लंडांतील भाषेंत फ्रेंच, लाटिन, ग्रीक, व दुसऱ्या कित्येक भाषा यांतील भर पडून सध्यांची इंग्रजी भाषा झाली आहे.

कारागिरीचे पदार्थ—ब्रिटन देश जगांतील सर्व देशांपेक्षां कारागिरींत फार प्रसिद्ध आहे. तेथील लोक कापूस, लोंकर, रेशीम, ताग, कांतडें, कांच, माती, साबू, लोखंड व

इतर धातु यांचें बहुविध पदार्थ तयार करितात. त्यांचा व्यापार सर्व राष्ट्रांपेक्षां मोठा दांडगा चालतो. तेथें येणारा बाहेरचा माल–धान्य, कापूस, लोकर, साखर सोनें, रुपें, इमारती लांकूड, रेशीम, चहा, लोणी, वुंद, ताग, आंबाडी, द्राक्षासव, आणि तंबाखू हा आहे. तेथून बाहेर जाणारा माल—कापसाचीं व लोंकरी वस्त्रें, धातू, यंत्रें, कोळसा, तागाचीं वस्त्रें, कांतडी जिन्नस आणि मातीचीं भांडीं हा आहे. त्यांचा व्यापार मुख्यत्वेंकरून **युनायटेडस्टेटस्** **हिंदुस्थान**, **फ्रान्स**, **जर्मनी**, **हालंड**, व **आस्ट्रिया** यांशीं चालतो.

सरकार—ब्रिटनचें सरकार मर्यादित राजसत्तेचें आहे. त्यांत राजा किंवा राणी, **लार्ड** (बारोनेट शिवाय वंशपरंपरेचे वडे लोक) आणि रयतेचे पंच यांचें त्रिकूट असतें; त्यांत बडे लोकांची संख्या ५४० असून आणखी २४ धर्माधिकारी असतात; **स्काटलंड** व **आयर्लंड** एथील वड्या लोकांचे पंच ४४ असतात. रयतेचे पंच एकंदर ६७० असतात. त्यांत **इंग्लंड** आणि **वेल्स** यांचे ४९५ **स्काटलंड**चे ७२ व **आयर्लंड**चे १०३ असतात. या त्रिकूटास **ब्रिटिश पार्लमेंट** म्हणतात. मोठमोठे सरकारी अधिकारी नेमणें व लढाई व तह करणें, हीं राजा किंवा राणी यांचीं कामें आहेत. रयतेच्या पंचांचें मत मिळाल्या खेरीज राजाला किंवा राणीला कर बसवितां येत नाहीं, व द्रव्य खर्चितां येत नाहीं.

सैन्य व आरमार—ब्रिटनचें जगांत सैन्य सुमारें २ लक्ष १० हजार असतें; त्यांतील सुमारें ७० हजार **हिंदुस्थानांत** असतें. ब्रिटनचें आरमार जगांतील आरमारापेक्षां वलाढ्य आहे. लढाईच्या प्रसंगीं सैन्य व आरमार दुप्पट वाढविता येतें.

जमाबंदी—ब्रिटिश बेटांची जमाबंदी ८८ कोटी रुपये आहे. तेथें प्रत्येक मनुष्यावर कर २४ रुपये आहे हिंदुस्थानांत दर मनुष्यावर कर सुमारें २॥ रुपये आहे.

विद्या—विद्येचा प्रसार जिकडे तिकडे झाला आहे. इंग्लंडांत मोठमोठे कवि व तत्ववेत्ते झालेले आहेत.

मोठीं व प्रसिद्ध अशीं विश्वविद्यालयें-आक्सफर्ड, केंब्रिज आणि लंडन एथें आहेत. तेथें शेक्सपिअर आणि मिल्टन् हे मोठे कवि आणि न्यूटन व बेकन हे मोठे तत्ववेत्ते झाले.

राष्ट्रांचें लक्षण—सत्यता, प्रामाणिकपणा, उद्योग, व स्वतंत्रताप्रीति, ह्या इंग्लिश लोकांच्या मोठ्या आवडत्या गोष्टी आहेत; परंतु वर्तणूकींत ते दांडगे व गर्विष्ठ आहेत.

धर्म—इंग्लिश लोक धर्मानें प्राटेस्टंट ख्रिस्ती आहेत. परंतु त्यांत कित्येक नांवाचे ख्रीस्ती असून धर्माचे नियम पाळतांना कधींहि आढळत नाहींत.

विभाग—इंग्लंडचे ४० व वेल्सचे १२ असे ५२ भाग (प्रांत) झाले आहेत. त्यांना तेथें कौंटी किंवा शायर ह्मणतात.

इंग्लंड.

उत्तरेकडील सहा कौंटी किंवा प्रांत,

नार्थंबलँड.

मोठीं शहरें व गांवें—टाईन नदीच्या कांठचीं न्यूकयासल व टाईन माउथ, उत्तरपीलडस्, ट्वीड नदीचें कांठचीं बरीक, आनिक व मार्पेथ.

व्यापाराचीं स्थळें—न्यूकयासल एथें कोळशांचा मोठा व्यापार चालतो.

इतिहास प्रसिद्ध स्थळें—न्यूकयासल एथें पहिले एडवर्डाचे कारकीर्दीत जानबेलीअल यानें स्काट्लंडच्या

राज्याचे मांडलिकतेबद्दल शपथ घेतली. डेविड् ब्रूस यानें या शहरावर सन १३३४ त हल्ला केला होता, परंतु त्यांत त्यास जय मिळाला नाहीं. सन १६४६ त इंग्लंडचा पहिला चार्लस राजा न्यूयार्क एथें स्काटलोकांच्या स्वाधीन झाल्यावर त्यास त्यांनीं एथें आणून ठेविलें होतें. २ आनिक एथें स्काटलंडचा राजा तिसरा मालकम व त्याचा पुत्र हे सन १०९३ त मारले गेले. सन ११७४ त स्काट्लंडचा राजा उइलियम (सिंह) यास कैद केलें. एथें नार्थंबर्लंडच्या डयूकाचा मोटा वाडा आहे. ३ बरिक एथें सन १२७३ त पहिले एडवर्डापाशीं स्काट लोकांनीं राजनिष्ठेबद्दल शपथ घेतली होती. सन १३२८ त हें शहर पूर्णपणें इंग्लंडच्या हस्तगत झालें. सन १६४८ त तें क्रामवेलच्या हातीं गेलें. हें हद्दिवरचें ठिकाण असल्यामुळें एथें इंग्लिश व स्काट यांच्या पुष्कळ झटापटी झाल्या. ४ फ्लोडेन एथें सन १५१३ त सरेच्या अर्लानें स्काच लोकांना लढाई देऊन त्यांवर जय मिळविला. एथें स्काटांचा चौथा जेम्स व त्याचे नांमाकित सरदार मारले गेले. त्या लढाईंत स्काट्लंडचें सैन्य १० हजार व इंग्लंडचें सैन्य १॥ हजार नाश पावलें. ५ हेक्सहाम एथें याार्कीस्ट् लोकांनीं सन १४६४ त मार्गरेट राणीचा पराभव केला.

नामांकित स्थळें–ट्वीड नदीचें कांठचें बरिक शहर हें इंगलंड व स्काट्लंड यांचे सरहद्दीचे ठिकाण आहे.

२ डर्ह्याम.

१ मोठीं शहरें व गांवें—वेअर नदीचें कांठीं संडर्लेड व डर्ह्याम; टाइन नदीचे कांठीं गेट्स्हेड, दक्षिण षील्डस्, स्टाकटन व डार्लिंगटन;

व्यापाराचीं स्थळें—संडर्लंड हें कोळशांचें एक मोठें बंदर आहे. एथें जहाजें बांधितात.

विद्यापीठें—डर्ह्याम एथें लहानसें विश्वविद्यालय आहे.

इतिहास प्रसिद्ध स्थळें—नेव्हिलस क्रास एथें **तिसरे एडवर्डाची** राणी **फिलिपा** हिनें सन १३४६ त **स्काटांस** जिंकिलें, व त्यांचा राजा **डेविड** यास कैद केलें.

३ कंबर्लंड.

मोठीं शहरें व गांवें—कार्लाइल (**ईडन नदी**), **व्हाइट हेवन** (किनारीं) व **केसिक.**

इतिहास प्रसिद्ध स्थळें—कार्लाइल एथें **स्काटांची** राणी **मेरी** सन १५६८ त कैदेंत ठेविली होती. एथें **जेम्स** नावांच्या तरूण **तोतयाशीं** व त्याच्या सरदारांशीं बऱ्याच झटापटी झाल्या. सन १७४५ त **कंबर्लंड**च्या **ड्यूकानें** हें शहर परत घेतलें. **बर्ग आपान स्यांड्स**—(रेतीवरचें खेडें) एथें पहिला **एडवर्ड** मरण पावला (१३०७).

व्यापाराचीं स्थळें—संडर्लंड एथें जाहाजें बांधण्याचा कारखाना आहे, व कोळशांचें बंदर आहे.

४ वेस्ट मोर्ल्यांड.

मोठीं शहरें व गांवें—कँडाल (**केन** नदी) व **आपलबी** (**ईडन** नदी).

इतिहास प्रसिद्ध स्थळें—कँडाल हें शहर **तोतयाच्या** सैन्यानें सन १७१५ त घेतलें होतें.

५ यार्क.

मोठीं शहरें व गांवें—**लीडस्** (**हंबर** नदी), **शेफीव्हडस्** (**डान** नदी), **ब्राडफर्ड** (**एअर** नदी), **हल्ल** (**हंबर**

नदी), हंडर्स्फील्ड (हंबर नदी), हाल्लिफाक्स (काल्डर नदी), यार्क (ऊस नदी), मिल्सबरो, वेक्फील्ड, स्कार्-बरो, डान्कयास्टर, व्हिटबी, व हारोगेट.

व्यापाराचीं स्थळें—शेफील्ड एथें शस्त्रें तयार होतात. हल्ल एथें बाल्टिक समुद्राकडील व्यापार चालतो.

हस्तकलेचीं स्थळें—मिड्ल्सबरो-एथें लोखंडाचा व्यापार आहे व तें मोठें बंदर आहे. लीड्स एथें लोंकरीचा कारखाना आहे. ब्राडफर्ड, हाड्र्सफील्ड वेकफील्ड, हाल्लिफाक्स हीं ही त्याविषयींच प्रसिद्ध आहेत.

विद्यापीठे—यार्क एथें धर्माध्यक्षाची जागा आहे, हें फार प्राचीन शहर आहे.

इतिहास प्रसिद्ध स्थळें--वेक्फील्ड एथें सन १४६० त मार्गरेट राणीनें यार्कीस्ट लोकांस जिंकिलें, आणि यार्कचा ड्यूक व त्याचा मुलगा रट्लंडचा ड्यूक यांना कैद करून ठार मारिलें. सन १४४२ त हल्ल एथें आपसांतील लढाईंत पहिल्या चार्लसास येऊ दिलें नाहीं. यार्क एथें सन २११ त रोमन बादशाहा सिव्हिरस हा मरण पावला. तिसरा रिचर्ड व त्याची राणी यांना एथें सन १४८३ त राज्याभिषेक जाहला. दुसरे रिचर्डच्या कारकीर्दीत एथील किल्यांत ५०० यहुद्यांनीं आपल्या बायकांस व मुलांस मारून आपणांस मारून घेतलें. मार्टनमूर एथें १६४४ त पार्लमेन्ट तर्फेच्या लोकांनीं पहिले. चार्लसचा पराजय केला. त्यावेळीं रूपर्ट राजपुत्र व क्रामवेल हे सैन्याधिपति होते, उत्तर अलर्टन् एथें स्टांडरची लढाई झाली (१११८), व तींत इंग्लंडचा जय झाला. पोंन्टि-फ्रॅक्ट एथें दुसरे रिचर्डास कैद करून मारिलें. सन १४८३ म्यॉटलाव रेव्हर्स व त्याचा मित्र यांचा ग्लुस्टर यानें धव

केला. टौटन एथें मार्गरेटला सन १४६१ त चौथे एडवर्डानें जिंकिलें. ही लडाई फार मोठी झाली, तींत ३७ हजार लोक पडले.

६ लांक.

मोठी शहरें व गावें—लिव्हरपूल (पर्सीनदी), मांचेस्टर (हवेंल नदी), प्रेस्टन (रिवेल नदी), बोलटन (क्रोल नदी), ओलड्हाम (मेडलाक नदी), ब्ल्याकबर्न (डाखेन नदी), राच्डेल (राच नदी), उइगन (डांग्लस नदी), बरो इनफर्नेस, साउथपोर्ट, व ल्यांक्यास्टर (लून नदी).

व्यापाराचीं स्थळें—लिव्हरपल इंग्लंडच्या वायव्येस मर्सीच्या मुखाजवळ असून कापसाच्या कारखान्याविषयीं प्रसिद्ध आहे; हें लंडनच्या खालोखाल आहे. याचा अमेरिकेशीं व्यापार चालतो. मांचेस्टर एथें सन १८३० त रेलवे सुरू झाली; हें मोठें बंदर आहे. बारोइन्फर्नेस एथें पोलादी पदार्थांचा व जहाजे बांधण्याचा कारखाना आहे. राचडेल एथें लोंकरीचें कापड होतें. लिव्हरपूल एथें जहाजें बांधतात.

हस्तकलेचीं स्थळें—मांचेस्टर एथें इंग्लंडांतील कापसाच्या कामापैकीं $\frac{5}{6}$ काम तयार होतें, हें मैदानांत असल्यामुळें सर्वकाळ धुरानें आच्छादित असतें. त्याचें शेजारीं-प्रेस्टन, ओलड्हाम, बोलटन व ब्ल्याकबर्न एथेंही तोच व्यापार चालतो. शेफील्ड हे मांचेस्टरच्या पूर्वेस आहे व एथें शस्त्रें तयार करण्याचा कारखाना आहे.

इतिहास प्रसिद्ध स्थळें—प्रेस्टन एथें क्रामवेल यानें राज्य सैन्याचा पराभव केला. हें तोतयाच्या सैन्याची हरकत न होतां घेतलें होतें; परंतु तेथून त्यांना लवकरच हांकून, शेफील्ड त्यांतील बऱ्याच लोकांचा वध केला. बरोब्रिज एथेंहि (हंबर

त दुसऱ्या एड्वर्डाच्या स्वारांनीं लांकस्टरचा अर्ल व त्याचे बंडखोर बारन पूल ओलांडीत असतां त्यांस जिंकिलें, आणि कैद करून ठार मारिलें. लांकस्टर एथील किल्ला जान आफ गान्ट याने बांधिला. हें शहर तोतयानें सन १७१५ त घेतलें होते. मांचेस्टर एथें १८ हजार पुस्तकांचें एक पुस्तकालय सन १८५२ त धर्मार्थ स्थापन झालें. हें तोतयानें सन १७४५ त आपलें मुख्य ठिकाण केलें होतें.

उदक स्थळें-सौथपोर्ट हें समुद्रस्नानाचें प्रसिद्ध स्थळ आहे.

मधल्या चौदा कौंटी किंवा प्रांत.

१ स्टाफर्ड.

मोठीं शहरें व गांवें—उल्व्हरह्यांप्टन् (स्मेस्टो नदी), स्टोक (ट्रेंट नदी), विलस्टन, वेड्नस्बेरी, बर्टन (ट्रेंट नदी), न्युकासल अंडर-लाईन, स्टाफर्ड (सो नदी) लिच्फील्ड.

हस्तकलेचीं स्थळें—उल्व्हरह्यांप्टन् व वेड्न्-स्बेरी एथें लोखंडांचे कारखाने आहेत. स्टाफर्ड व स्टोक एथें मातीचीं भांडीं (कुंभारी) करण्याचे कारखाने आहेत. विलस्टन, हान्ले, व बर्स्लेम एथेंही तेच कारखानें आहेत.

इतिहास प्रसिद्ध स्थळें—ब्लोअरहीथ एथें यार्कि-स्ट व लांकास्ट्रियन ह्यांची सन १४५९ त सहाव्या हेनरीचे कारकीर्दीत मोठी लढाई झाली व तींत लांकास्ट्रियन लोकांचा पराभव झाला.

२ डर्बी.

मोठीं शहरें व गांवें—डर्बी (डरवेंट नदी), म्याटलाक बक्स्टन, चेस्टरफील्ड (रादर नदी).

उद्क स्थळें-वक्स्टन हें हलक्या व पाचक पाण्याच्या विहिरींविषयीं प्रसिद्ध आहे.

हस्तकलेचीं स्थळें--डर्बी एथें रेशमाचा कारखाना आहे.

इतिहास प्रसिद्ध स्थळें-डर्बी एथें धाकटा तोतया सन १७४५ त आला होता.

नाटिंगहाम.

मोठीं शहरें व गांवें-नाटिंगहाम व न्यूआर्क (ट्रेंट नदी).

हस्तकलेचीं स्थळें-नाटिंगहाम एथें पायमोजे होतात.

इतिहास प्रसिद्धस्थळें-नाटिंगहाम एथील किल्लयांत **मार्टिमर** व दुसरे **एडवर्डाची** राणी यांना कैद केलें होतें. **गुलाबाच्या** लढायांत चवथा **एडवर्ड** व तिसरा **रिचर्ड** यांच्या सैन्यची एथें गाठ पडावयाची असें ठरलें होतें. सन १६४२ त एथें पहिले **चार्लसानें** आपसांतलि लढायांत आपले निशाण प्रथम उभारलें. **न्यूआर्क** एथें **जान** राजा सन १२१६ त मरण पावला. **स्टोक** एथें १४८७ त सातवा **हेनरी** आणि तोतया **लांबर्ट सिमनेल** यांची लढाइ झाली. तींत **लांबर्ट** यास कैद केलें, व त्याचा सांथीदार **लिंकन्**चा अर्ल यास ठार मारिलें.

४ लेस्टर.

मोठीं शहरें व गांवें—लेस्टर व लाफबरो (सोअर नदी).

हस्तकलेचीं स्थळें-लेस्टर एथें पायमोजे होतात.

इतिहास प्रसिद्ध स्थळें-लेस्टर एथें तिसऱ्या **रिचर्डास, बास्वर्थफील्ड** एथील लढाई झाल्यावर आणून पुरिलें. **कार्डिनल उल्सी** एथील मठांत वारला. **लटर्सवर्थ** एथें

सन १३८४ त उइक्लिफ मरण पावला. वास्त्वर्थ एथें रिच्मंडच्या अर्लानें तिसऱ्या रिचर्डाचा पराभव केला (१४८५). त्या लढाईनें गुलाबांच्या लढाया संपल्या. त्या सन १४५५ त सुरू झाल्या होत्या. रिच्मंडचा अर्ल हा पुढें सातवा हेन्री झाला.

५ वारिक.

मोठीं शहरें व गांवें—बर्मिंगह्याम (रिआ नदी) काव्हेंट्री, (सो नदी) लेमिंग्टन, वारिक (सेव्हर्न नदी) रुग्बी, स्ट्रात्फर्ड (आव्हन नदी),

हस्तकलेचीं स्थळें—बर्मिंगह्याम एथें सर्व धातूंचे कारखानें आहेत. काव्हेन्ट्री एथें फितीचा व्यापार चालतो.

इतिहास प्रसिद्ध स्थळें—बर्मिंगह्याम शहराला रूपर्ट राजपुत्रानें सन १६४३ त वेढा दिला व तें घेतलें. एज्-हिल् एथें पहिला चार्लस व पार्लमेंटपक्षीय लोक यांजमध्यें सन १६४२ त लढाई होऊन राजपक्षीय लोकांचा जय झाला. स्ट्रात्फर्ड एथें शेक्सपियर सन १५६४ त जन्मला व १६१३ त वारला व पुरला.

उदकस्थळें—लेमिंग्टन एथें हलक्या व पाचक पाण्याच्या विहिरी आहेत, ह्मणून एथें लोक फार येतात.

विद्यापीठें—रुग्बी एथें मोठी नामांकित अशी एक सरकारी शाळा आहे.

६ ऊस्टर.

मोठीं शहरें व गांवें—डड्ले (सेव्हर्न नदी) ऊर्स्टर (सेव्हर्न नदी), किडरमिन्स्र.

इतिहास प्रसिद्ध स्थळें—ईव्हशाम एथें एड्वर्ड, राजपुत्रानें लेस्टरच्या अर्लाला सन १२६५ त जिंकिलें,

तिसरे हेनरीस जखम झाली व लेस्टर प्राणांस मुकला. ऊर्स्टर एथें झामवेलानें दुसऱ्या चार्ल्सास पूर्णपणें जिंकून त्यास वेषांतरानें राज्य सोडून पळून जाण्यास लाविलें (१६५१).

हस्तकलेचीं स्थळें—डड्ले एथें मोटा लोखंडाचा कारखाना आहे. किडर्मिन्स्टर एथें सत्रंज्या व गालीचे तयार होतात.

७ आक्सफर्ड.

मोठीं शहरें व गांवें--आक्सफर्ड (टेम्स नदी) उडस्टाक (इव्हेन्लोड नदी), वान्चेरी.

विद्यापीठें—आक्सफर्ड-एथें जगांत श्रीमंत असें विश्वविद्यालय आहे. एथें प्राचीन प्रौढ भाषांचें (लाटीन व ग्रीक) उत्तम शिक्षण मिळतें. हें आल्फ्रेड धी ग्रेट यानें स्थापिलें, कोणी तें त्याच्या मुलानें स्थापिलें, असें म्हणतात.

इतिहास प्रसिद्ध स्थळें—आक्सफर्ड एथें एड्मंड धी आयर्नसाइड हा १०३७ त मारला गेला. पहिला रिचर्ड व जान हे एथें जमन्ले. एथें माटिल्डा ही स्टीफनाचें भयानें आपले संरक्षण करण्याकरतां आली होती. सन १५५५ त डड्ले आणि ल्याटिमर यांना एथें जिवंत जाळिलें. बल्यर्न एथें वारिकच्या अर्लानें चौथ्या एड्वर्डाच्या सैनचा सन १४६२ त पराभव केला, उड्स्टाक-एथें इलिजाबेथ राणीला तिचे बहिणीनें कैद केलें होतें.

८ बकिंगह्याम.

मोठीं शहरें व गांवें—ऐलसबेरी, ब्रेटमारलो, बकिंगह्याम (मोठीऊस नदी), ईटन (टेम्स नदी),

विद्यापीठें—ईटन एथें (उइंजरा नजीक) मोठी नामांकित शाळा आहे.

९ मिडलसेक्स.

मोठीं शहरें व गांवें—लंडन (टेम्स नदी) ब्रेन्ट्फर्ड हारो, अक्स्ब्रिज्ज.

नामांकित स्थळें—लंडन हें इंग्लंडचीं राजधानी असून मोठें संपत्तिमान् व जगांत मोठें विख्यात असें व्यापाराचें ठिकाण **टेम्स** नदीचें कांठीं आहे. एथें मोठ्या इमारती—**१ टावर**-एथें शस्त्रांचा मोठा संग्रह आहे व एथें बडे लोक कैदेत ठेवितात. २ **वेस्ट्मिन्स्टर** अब्बी एथें **इंग्लंड**ांतील मांठमोठे बडे लोक पुरले आहेत. त्यांत पहिला **एड्वर्ड** व त्याची बायको, **फिलिपा**; दुसरा **रिचर्ड**; पांचवा व साहवा **एडवर्ड**; **मेरी**; **इलिजाबेथ**; पहिला **जेम्स**; दुसरा **चार्ल्स**; तिसरा **विलियम**; **आन**; आणि दुसरा **जार्ज** हे पुरले आहेत. ३ **सेंटपालचें मंदीर**-एथें धर्माध्यक्ष असतो, व हें **ब्रिटनांत** मोठें सुंदर देऊळ आहे. ४ **पार्लमेंट** सभेचे वाडे. ५ राणीसाहेबांचा **बकिंगह्याम** वाडा एथें जामनींतून चहूंकडे जाण्यास आगगाडीचे रस्ते केले आहेत. एथील **टेम्स** नदीवर पुष्कळ पूल असून नदी खालून जाण्यास एक बोगदा आहे एथें जहाजें इतकीं असतात कीं त्यांच्या डोलकाठ्या दुरून पाहिल्या असतां तें स्थळ इमारती लांकडांचें मोठें रानच आहे असें वाटतें. एथील वस्ती ४२ लक्षांची आहे. शहरची लांबी १० मैल व रुंदी सुमारें ७ मैल आहे. एथील व **ब्रिटनांतील** वाह्यांना बहुत मजले असतात व त्यांना सज्जे नसतात. रस्त्यांच्या दोन्ही बाजूंस पायांनीं जाणाऱ्या लोकांकरितां उंचवट्याच्या वेगळ्या वाटा केल्या असतात. गाड्या व घोडीं मधून जातात. एथें रात्रीं धुराचे दिवे लागतात. लंडनच्या पश्चिम भागाला **वेस्ट मिन्स्टर** म्हणतात. **सौथआर्क**, टेम्स नदीच्या दक्षिणेस आहे.

हस्तकलेचीं स्थळें—हिंट्फील्डस् (लंडनचा

एक भाग), एथें रेशमाचा मोठा कारखाना आहे. सौथमार्क एथें जहाजें बांधितात. ब्रिटनांतील $\frac{1}{3}$ जहाजें बांधण्याचें काम एथ चालत.

इतिहासप्रसिद्ध स्थळें:—बार्नेट एथें चवथें एड्वर्डानें सन १४७१ त वारिक यास जिंकिलें व त्यासह १० मनुष्यांचा प्राण घेतला. लंडन् शेजारीं कॅन्सिंगटन एथें तिसरा उइलियम, मेरी, आन कारोलाईन ह्या राण्या व दुसरा जार्ज हीं राज घराण्यांतिल माणसें मरण पावलीं व्हिक्टोरिया राणीचा जन्म एथेंच झाला. ३ स्मिथ्फील्ड एथें दुसऱ्या ३ रिचर्डास वाट टायलर, २० हजार लोकांसह येऊन भेटला, व एथेंच तो मारला गेला. एथील हांप्टन कोर्ट नामक वांड्यांत सहावा एड्वर्ड जन्मला व त्याची आई जेन सीमूर एथें मरण पावली. हा वाडा उइल्सीनें बांधून आठवे हेनरीला दिला होता.

विद्यापीठें—हारो व उइन्चेस्टर एथील सरकारी शाळा मोठ्या प्रसिद्ध आहेत.

१० हार्फर्ड.

मोठीं शहरें व गांवें—सेन्ट आलवन्स (कोलेंन नदी), हार्फर्ड (ली नदी) वेर.

इतिहास प्रसिद्ध स्थळें—सेंन्ट आलवन्स, निकोलस ब्रेक्स्पियर ह्मणून जो इंग्रज गृहस्थ पोप झाला होता तो एथें जन्मला होता. त्यानें आपणास ४ था एड्रियन हें नांव सन ११५४ त घेतलें होतें. एथें दुसरे रिचर्डाचे कारकीर्दीत यार्काच्या ड्यूकानें लांकास्टरच्या ड्यूकाबरोबर लढण्याकरतां सैन्य जमविलें होतें. यार्कचा ड्यूक, रिचर्ड, यानें एथेंच सन ४५५, त ६ वे हेन्रीस जिंकून कैद केलें. मार्गारेट

राणीनें वारिक्च्या अर्लाला एथेंच जिंकिलें, व सन १४६१ त आपला नवरा, ६ वा हेनरी यास मुक्त केलें.

११ बेड्फर्ड.

मोठीं शहरें व गांवें—बेड्फर्ड (मोठी ऊस नदी) ल्यूटन (लीं नदी), डन्स्टेबल.

हस्तकलेचीं स्थळें—डन्स्टेबल व ल्यूटन एथें चटयांच्या टोप्या, वगैरे जिनसा तयार होतात.

१२ हंटिंग्डन.

मोठीं शहरें व गांवें—हंटिंग्डन व सेंट ईव्हज (मोठीं ऊस नदी).

१३ नाथ्यांप्टन.

मोठीं शहरें व गांवें—नाथ्यांप्टन पीटर्सबरो (नेन् नदी).

हस्तकलेचीं स्थळें—नाथ्यांप्टन एथें बूट व जोडे तयार होतात.

इतिहास प्रसिद्ध स्थळें—नाथ्यांप्टन एथें यार्कचा ड्यूक व सहावा हेन्री यांमध्यें मोठ्या कडाक्याची लढाई होऊन सहावे हेन्रीचा पराजय झाला, व त्यास कैद केलें (१४६०). **फादरिंगे**—या किल्लयांत तिसरा एड्वर्ड जन्मला, स्काट लोकांची राणी मेरी हिला एथें पकडून ठार मारिलें (१५८७). **होल्डेन्बी** किल्लयांत सन १६४७ सालीं पाहिल्या चार्ल्सास पार्लमेंट पक्षीय लोकांनीं कैदेंत ठेविलें होतें. **नेस्बी** एथें क्रामवेल यानें पहिल्या चार्ल्साचा पराजय केला.

१४ रट्लंड.

मोठीं शहरें व गांवें—ओकह्याम (रीक नदी).

पश्चिमेकडील सहा प्रांत.

१ ची किंवा चेस्टर.

मोठी शहरें व गांवें— बर्कन्हेड व स्ट्राक्पोर्ट (मर्सी नदी), म्याकलस्फील्ड, चेस्टर (डी नदी), क्यू.

व्यापाराचीं स्थळें—बर्कन्हेड-हें मोठें बंदर आहे. व तें लिव्हरपुलास जमीनी खालून केलेल्या बोगद्यानें जोडिलें आहे. एथें जहाजेंही बांधतात.

हस्तकलेचीं स्थळें—म्याकलस् फील्ड एथें रेशमी-चा मोठा कारखाना आहे.

२ श्राप (स्याल्होप).

मोठीं शहरें व गांवें—श्रूज्बेरी (सेव्हर्न नदी). ब्रिज्जनार्थ, वेलिंगटन्, मचवेन्लाक (सेव्हर्न नदी).

इतिहास प्रसिद्ध स्थळें—बास्काबेल एथें दुसरा चार्लस पराभव पावल्यावर येऊन ओकाच्या ढोलींत लपून राहिला होता.

३ हरेफर्ड.

मोठीं शहरें व गांवें—हरेफर्ड (वाय नदी), लेम्स्टर (लग्ग नदी).

इतिहास प्रसिद्ध स्थळें—हरेफर्ड हें स्टीफन यानें सन ११४१ त घेतलें. एथें तिसरा हेन्री व त्याचे ड्यारन यांमध्यें बऱ्याच झटापटी झाल्या. एथें ४ थे हेन्रीची विधवा क्याथराइन हिचा दुसरा नंबरा ओयन ट्यूडर यास सन १६४१ त कैद करून त्याचा प्राण घेतला. हें शहर रकाट लोकांनीं वेढा देऊन घेतलें होतें. व तेथें आप-सांतील लढायांत बऱ्याच चकमकी झडल्या. मार्टिमर्सक्रास

एथं यार्किस्ट व लांकास्ट्रियन यांमध्यें सन १४६१ त लढाई होऊन मार्गारेटच्या सैन्याचा यार्कच्या ड्यूकानें अगदीं मोड केला.

४ मानमुथ.

मोठीं शहरें व गांवें—न्यूपोर्ट (उस्क नदी) मानमुथ (वाय नदी).

इतिहास प्रसिद्ध स्थळें—मानमुथ एथें ५ वा हेन्री जन्मला, म्हणून त्यास मानमुथ म्हणत. एथें १४०५ त एक मोठी लढाई झाली.

५ ग्लास्टर.

मोठीं शहरें व गांवें—ब्रिस्टल (खालील ओव्हन नदी) चेलटनह्याम (चेल्ट नदी), स्टौड (स्टौड नदी), ग्लास्टर (सेव्हर्न नदी), सिसेस्टर.

व्यापाराचीं स्थळें—खालील ओव्हन नदीच्या मुखाजवळ ब्रिस्टल एथून किनाऱ्या किनाऱ्यानें अयर्लंडाशीं मोठा व्यापार चालतो; एथें कांचेचा, साबणाचा, व ओतींव पितळेचा मोठा कारखाना आहे.

उद्क स्थळें—चेलटनह्याम हें हलकें व पाचक पाण्याविषयीं प्रसिद्ध आहे.

इतिहास प्रसिद्ध स्थळें—ग्लास्टर एथें एथेल्स्टन राजा मेला (९४०), स्टीफनास एथे कैदेत ठेविलें होतें, तिसरे हेन्रीस सन १२१६ त एथें राज्याभिषेक झाला, दुसरा एडवर्ड एथें पुरला आहे. बर्कले किल्ल्यांत दुसऱ्या एड्वर्डास सन १३२७ त कैद करून क्रूरपणानें मारिलें. डोर्निंग्टन एथें राजपक्षीय लोकांचा सन १६४५ त पराजय झाला. टयूक्सबेरी एथे चवथा एड्वर्ड यानें मार्गरेट व

तिचा मुलगा यांस जिंकून कैद केलें (१४७१), तिला लंडन टावर एथें नेल्यावर तिचा नवरा लवकरच मेला.

६ समरसेट.

मोठी शहरें व गांवें—बाथ (खालील ओव्हन नदी टान्टन (टोन नदी), फ्रोम, ब्रिज्वाटर, वेल्स.

उदक स्थळें—बाथ एथील पाणी हलकें व पाचक आहे. एथें उन्हाळीं (ऊन्ह पाण्याचे झरे) आहेत.

इतिहास प्रसिद्ध स्थळें—आथेल्नी या बेटांत आल्फ्रेड राजा डेन्स लोकांना भिऊन लपून राहिला होता. ब्रिज्ज्वाटर एथें मानमुथच्या ड्यूकास सन १६८६ त राज्याभिषेक झाला. ब्रिस्टल एथें स्टीफनच्या पायांत बेड्या घातल्या होत्या (११४१). हें शहर राजपक्षीय लोकांनीं सन १६४३ त वेढा देऊन घेतलें, तें पुन्हां क्रामवेलनें सन १६४५ त वेढा देऊन परत घेतलें; दुसरा चार्ल्स उर्स्टरची लढाई सुरू झाल्यावर एथें पळून येऊन राहिला होता. सेजमूर-एथें मानमुथच्या ड्यूकाचा राजसैन्यानें सन १६८५ त पराजय केला. टान्टन एथें वार्बेक व त्याचे अनुयायी आले होतें; एथें दुसरे जेम्सावर स्वारी करण्याकरितां जेव्हां मानमुथचा ड्यूक आला होता तेव्हां त्यानें राजा ही पदवी घेतली.

पूर्वेकडील ५ प्रांत.

लिंकन.

मोठीं शहरें व गांवें—लिंकन व बोस्टन उइथ-ह्याम नदीच्या कांठीं. ग्रिम्स्बी—(हंबर नदी), स्टांफर्ड.

इतिहास प्रसिद्ध स्थळें—लिंकन एथील किल्ला पहिल्या उइलियमानें सन १०८६ त बांधिला, तो स्टीफनानें

वेढा देऊन माडपासून घेतला. पुढें तो तेथेंच कैद झाला. एथें
दुसरे हेन्रीस सन ११५८ त राज्याभिषेक झाला. एथें सन १२१७
त फ्रेंचाचा तिसरे हेन्रीनें पराजय केला. स्टांफर्ड एथें हारल्ड
राजानें नार्वेचा राजा आणि टाश्टिग यांस जिंकिलें(१०६६).
एथें सन ११९० व १२९० त ज्यू लोकांना फार पीडा दिली.

२ कॅंब्रिज.

मोठीं शहरें व गांवें—कॅंब्रिज (क्याम्प्रनदी), ह्विस्विच, इलाय, न्यूमार्केट.

विद्यापीठें कॅंब्रिज एथें मोठें व प्राचीन विद्यालय असून त्याची गणित विद्येविषयीं मोठी प्रसिद्धि आहे. बेकन, न्यूटन व मिल्टन हे एथेंच तयार झालें.

इतिहास प्रसिद्ध स्थळें-- कॅंब्रिज हें शहर ड्यानिश लोकांनीं सन ८७९ त व १०१० त असें दोनदां जाळिलें; सन १२८१ मधें एथील पुस्तकालय वाट टायलर्सचे सांथ्यांनीं जाळिलें.

३ नार्फक.

मोठीं शहरें व गांवें—नारिच, यार्माथ (येर नदी), किंग्स्लीन.

हस्तकलेचीं स्थळें—नारिच एथें शाली व क्रेप नामक कापड होतें. यार्माथ एथें मासे भरण्याचें काम चालतें.

४ सफक.

मोठीं शहरें व गांवें—इप्सिच (आरवेल नदी), बेरिसेंट एडमंड्स्, लोस्टाफ्ट (पूर्व किनारा).

इतिहास प्रसिद्ध स्थळें--इप्सिच एथें कार्डिनल वुल्सी सन १४७१ त जन्मला.

५ एसेक्स.

मोठीं शहरें व गांवें—कोल्चेस्टर (कोल नदी), चेम्सफर्ड (चेलमर नदी), हारिच;

व्यापाराचीं स्थळें—हारिच हें मोठें बंदर आहे.

इतिहास प्रसिद्ध स्थळें—हारिच एथें दुसरे जेम्सानें डच लोकांस सन १६६५ त जिंकिलें. एथें चवथ्या जार्जाच्या कारोलाईन राणीचें शव पुरलें आहे (१८२१), टिलबेरी किल्ला-एथें इलिजाबेथ राणीनें आपले सैन्यास सन १५८८ त आरमेडा येत आहे म्हणून उत्तेजनार्थ व्याख्यान दिलें. वाल्थम आबी-एथें १०६६ त हारोल्ड व त्याचे भाऊ यांस पुरलें आहे.

दक्षिणेकडील ९ प्रांत.

१ केंट.

मोठीं शहरें व गांवें—ग्रेनेज, चाटम (मेडवे नदी) डलिच डेप्टफर्ड, डोव्हर (डोव्हर खाडी), मेडस्टोन (टेम्स नदी), कान्टरबेरी, (रर्रेर नदी), ग्रेव्हसेंड, रोचेस्टर, टनब्रिज्वेल्स, फाक्स्टन, शिअरनेस, डील.

व्यापाराचीं स्थळें—डोव्हर हें फ्रान्साला नजीकचें बंदर आहे. फाक्स्टन व न्यूहेवन एथून फ्रान्स देशांशीं आगबोटीनें दळणवळण चालतें.

आरमाराची स्थळें—डलिच व चाटम हीं आरमाराचीं ठिकाणें आहेत. शिवाय डलिच एथें दारू गोळा असून चाटम एथें आरमार संबंधी सामानाचा मोठा साठा असतो.

नामांकित स्थळें—ग्रेनेज हें लंडनापासून ६ मैल लांब असून वेधशालेविषयीं प्रसिद्ध आहे. एथून इंग्रज भूगोल शास्त्रवेत्ते रेखांश मोजतात.

उद्गस्थळें:—टन्ब्रिज एथें हलके व पाचक पाण्याच्या विहिरी आहेत, ह्मणून एथें पुष्कळ लोक येतात.

इतिहास प्रसिद्ध स्थळें--डील ह्या गांवीं सन ५५ त ज्यूलिअस सीजर येऊन उतरला होता अस्में ह्मणतात.

ऐलसफर्ड--एथें **साक्सन** व ब्रिटन यांची सन ४५५ त लढाई झाली. **साक्सनांचे** सरदार हेन्जिस्ट व होर्सा हे होते; त्यांतील होर्सा मारला जाऊन हेन्जिस्ट हा पुढें केंटचा राजा झाला. **ब्लाकहीथ** एथें वाट् टायलरचें बंडवाले सैन्य सन १३८१ त जमलें होतें. ४ था हेन्री व कुस्तनतुनियाचा (तुर्कस्थानचा) बादशाहा यांची गांठ सन १४०० त पडली. **कान्टरबेरी** एथें स्टिफन राजा मरण पावला (११५४), टामस आ बेकेट हा एथील देवळांत सन ११७१ त मारला गेला. कृष्णकवच्च राजपुत्र व ४ था हेन्री हे एथें पुरले आहेत. **क्लेरेंडर्ड** एथें हेन्जिस्ट यानें ब्रिटन लोकांचा सेनापति वर्टिगर्न यास सन ४९७ त जिंकिलें. **डार्ट्फर्ड** एथें वाट्टायलरची बंडाळी मुरू झाली (१३८१). एथें १५९० त कागदाची पहिली गिरणी सुरू झाली. **डेप्ट्फर्ड**--एथें तिसरे उइलियमाचे कारकीर्दीत रशियाचा झार, पीटर धी ग्रेट, हा गोदींत शिकत होता. **डोव्हर** एथें तिसरे हेन्हरीचा मुलगा एडवर्ड यास लेस्टर यानें कैदेत ठेविलें होतें. सन १८५१ त समोरचे फ्रान्साच्या किनारीं नेण्याकरितां तारयंत्राची तार समुद्रांत टाकिली. **फेवरशाम** एथें स्टीफन यास ११५४ त पुरलें. **गुड्विन्सयांड्स** एथें गुड्विनच्या अर्लाच्या जमिनी ...या, त्यांना भोंवतीं मजबूत बांध नसल्यामुळें समुद्रानें पाणी आंत शिरून त्या बडून गेल्या. त्यावरून ह्या जागेला तें नांव पडलें आहे. **ग्रेनेज** एथें ६ वा एडवर्ड सन १५५३ त मरण पावला.

आठव्या हेन्रीच्या मुली मेरी व इलिजाबेथ एथें जन्मल्या. मेड्स्टोन एथें आयर्सांगील युद्ध चालू असतां सन १६४८ त एक लढाई झाली. स्यान्ड्विच एथें सन १०१५ त क्नयान्यूट हा राजा येऊन उतरला होता. हे इंग्लंडच्या रक्षणार्थ डोव्हर नजीकच्या पांच बंदर पैकीं एक आहे वाल्मूर किल्ला यांत वेलिंग्टनचा ड्यूक मरण पावला (१८५२)

विद्यापीठें—कान्टरबेरी एथील धर्माधिकारी हा इंग्लंडांतील सर्व धर्माधिकाऱ्यांत श्रेष्ठ आहे. एथें एक मोठें भजन मंदीर आहे. एथेंच सहावें शतकाचे अखेरीस, आंग्ल लोकांना ख्रिस्ती धर्माचा उपदेश, सेंट आगस्टाईन यानें प्रथम केला.

२ ससेक्स.

मोठीं शहरें व गांवें—ब्राइटन (दक्षिण किनारीं), हेस्टिंग्ज (इंग्लिश खाडी), ल्यूज (ऊस नदी), चिचेस्टर.

उदक स्थळें—ब्राइटन एथें समुद्र स्नाना करितां पुष्कळ लोक येतात.

इतिहास प्रसिद्ध स्थळें—हेस्टिंग्ज एथें विजयी वुइलियम व हारोल्ड यांचे युद्ध सन १०६६ त होऊन हारोल्डाचा पराजय झाला, व तो मरण पावला. ल्यूज एथें सन १२६४ त तिसऱ्या हेन्रीस लेस्टरचा अर्ल सायमन यानें जिंकून त्यास व त्याचा मुलगा एड्वर्ड यास त्याच्या अनुयायांसह कैद केलें.—बीचीहेड या भूशिरापाशीं इंग्लिश व डच यांच्या आरमाराचा फ्रेंच लोकांनीं पराजय केला (सन १६९०)

२ सरे.

मोठीं शहरें व गांवें—क्रायडन, रिचमंड, किंग्स्टन (टेम्स नदी), गिल्फर्ड (वे नदी).

इतिहासप्रसिद्ध स्थळें—रिच्मंड एथें दुसरा व तिसरा एड्वर्ड, ७ वा हेन्री. व इलिझाबेथ, हीं एथें मरण पावलीं; एथें मेरीनें आपली बहीण इलिझाबेथ हिला कैदेत ठेविलें होतें. या शहरचें नांव पूर्वी पीन होतें.

४ बर्कशायर.

मोठीं शहरें व गांवें—रेडिंग, उईंजर, आबिंग्डन.

हस्तकलेचीं स्थळें—रेडिंग एथील बिस्किटें (विशेष. भजीं), प्रसिद्ध आहेत.

नामांकित स्थळें—उईंजर एथें जो राजवाडा आहे तो विजयी उइलियमापासून आजपर्यंत सर्व राजांचें राहण्याचें मुख्य ठिकाण आहे.

इतिहास प्रसिद्ध स्थळें—न्यूबेरी एथें राजकीय पक्षाचे लोकांनीं पार्लमेंट पक्षाचे लोकांस सन १६४३ त जिंकिलें; परंतु त्यांचा उत्तम सरदार लार्ड फाकलंड हा त्या लढाईंत पडून मारला गेला. रेडिंग एथें पहिला हेन्री जन्मला, वान्डेज एथें आल्फ्रेड धी ग्रेट जन्मला (८४९). रनिमीड एथें जान राजास मात्रा बार्डावर सही घालावयास अगत्य पाडिलें.

५ उइल्ट.

मोठीं शहरें व गांवें—सालिसबेरे, ट्रोब्रिज, आणि डेव्हिजेस.

नामांकित स्थळें—सालिसबेरे एथें सर्व ब्रिटन बेटांत उंच असा एक देवळाचा कळस आहे. याच्याजवळ सालिसबेरे मैदानांत स्टोनहेंज म्हणून एक चमत्कारिक दगडी खांबांची ओळ लोकांची इमारत आहे.

इतिहास प्रसिद्ध स्थळें—क्लारेन्डन एथें सन ११४६

त दुसरे हॅन्रीनें पाद्री लोकांचा वाढलेला अधिकार कमी करण्याकरितां एक सभा भरवून क्लारेन्डचे कायदे ठरविले. हेच राजाचे व थामस आ बेकेटचें भांडण उत्पन्न होण्यास कारण झाले. ते कायदे तो व पोप मान्य करिनात. एथ्यांड्रयून एथें डेन लोकावर आल्फ्रेड्चा मोठा जय मिळाला. सालझ्बेरी एथें वर्किंगहामच्या ड्यूकाचा शिरच्छेद तिसरे रिचर्डाचे हुकुमावरून सन १४८३ त केला. स्टोन्हेंज एथें पूर्वी न्याय दरबार होऊन अपराध्यांस बुडी कांद्यांत घालून जाळात.

६ हांप.

मोठीं शहरें व गावें--पोर्टस्मौथ (दक्षिण किनारीं) सौथ्यांप्टन (इरचिन् नदी) उइंचेस्टर, रैड.

आरमाराचीं स्थळें—पोर्टस्मौथ हें इंग्लंडांतील आरमाराचें मुख्य ठिकाण अमून मोठें तटबंदी शहर आहे एथें जहाजेंही बांधतात.

व्यापाराचीं स्थळें--सौथ्यांप्टन एथें समुद्रावरून येणाऱ्या डाकेंचे उतरण्याचें ठिकाण आहे.

विद्यापीठें—उइंचेस्टर हें सरकारी शाळेविषयीं प्रसिद्ध आहे.

इतिहास प्रसिद्ध स्थळें--१हर्स्ट किल्ला-एथें पहिले चार्लसास सन १६४८ त कैद केलें होतें. २ सौथ्यांप्टन एथें कय न्यूटास राज्याभिषेक झाला. एथून पूर्व, व पश्चिम हिंदी बेटांस व भूमध्य समुद्राकडे डाक जाते ३ स्ट्राथ्फील्डसे-एथें वेलिंग्टनच्या ड्यूकाकरितां, त्यानें नेपोलियनची खोड मोडून टाकिली म्हणून पार्लमेंटानें कांहीं जमीन विकत घेतली आहे: तेथें एक सध्या तीन रंगी निशाण फडकत असतें. ४ उइंचेस्टर-एथें एग्बर्ट, माटिल्डा, अल्फ्रेड दि ग्रेट, वएड्वर्ड दि

कान्फेसर यांस राज्याभिषेक झाला. कान्यूट व अलफ्रेड हे एथेंच पुरले आहेत.

७ डार्सेट.

मोठीं शहरें व गांवें—वेमाउथ, पूल, ब्रिड्पोर्ट, डार्चेस्टर.

इतिहासप्रसिद्ध स्थळें—१ क्रान्बोर्न-एथें बोआडिशिया व रोमन लोक यांमध्यें सन ६१ त लढाई झाली. २ लाइम एथें मानमुथचा ड्यूक दुसऱ्या जेम्साशीं लढण्यास येत असतां सन १६८५ त उतरला होता. ३ फोर्टलयान्ड बेट एथें ८ व्या हेन्रीनें सन १५३६ च्या सुमारास किल्ला बांधिला. ४ साफ्ट्स्बेरी एथें सन १०३६ त कान्यूट मरण पावला.

८ डेव्हान.

मोठीं शहरें व गांवें—१ प्लीमुथ, २ एक्झेटर, ३ टार्की, ४ टिव्हर्टन.

इतिहास प्रसिद्ध स्थळें--१ आबट न्यूटन-एथें आरेंजचा राजपुत्र उइलियम हा सन १६८८ त उतरल्यावर त्यानें आपलें मान्यतेचें पत्र वांचिलें. २ एक्झेटर-हें सन ८७६ त डेन लोकांनीं घेतलें होतें. परंतु आल्फ्रेडानें तें त्यांच्यापासून परत घेतलें. हें सन १०६७त पहिल्या उइलियमानें घेतलें सन ११३६त हें स्टीफनच्या हातीं लागलें. पर्किन् वारबेक व त्याचे सोबती सन १४९७त एथें आले होते. हें राजपक्षीय लोकांनीं सन १६४३ त घेतलें आणि पार्लमेंट पक्षाय लोकांनीं १६४६ त घेतलें. ३ स्ट्रेटन्हेल्-एथें सन १६४३ त राजपक्षीय व पार्लमेंटपक्षीय ह्यांची लढाई होऊन राजपक्षीय लोक विजयी झाले.

आरमारार्ची स्थळें—प्लिमुथ हें दुसऱ्या प्रतीचें

आरमारचें ठिकाण आहे. हें बंदरांत समुद्राचे पाणी शिरूं नये म्हणून बांधलेल्या दगडी बांधाविषयीं प्रसिद्ध आहे. एथें दक्षिणेस समुद्रांत खडकावर **एडिस्टोन** नामक दीपगृह आहे. एथें जहाजेंही बांधितात.

उदकस्थळें—टार्कीं एथील पाणी फार पाचक असल्यामुळें एथें पुष्कळ लोक हवा खाण्यास येतात.

कार्नवाल.

मोठीं शहरें व गांवें—१ **ट्रूरो**, २ **पेन्झान्स**, ३ **फालमौथ**, ४ **वाड्मिन.**

व्यापाराचीं स्थळें—**पेन्झान्स** हें लहानसें बंदर असून अगदीं पश्चिमकडील गांव आहे.

इतिहासप्रसिद्धस्थळें-१ **पड्रियनची भित**-रोमच्या **पड्रियन** बादशहाने सन १२१ मध्ये **पिक्ट** आणि **स्काट** यांचा इंग्लंडास उपद्रव होऊं नये म्हणून टाईन नदीपासून **सालवे** खाडीपर्यंतही भित बांधली. ही पूर्वी मातीची होती. ती ४० कोस असून, १२ फूट उंच आणि ८ फूट जाड होती-ती **सिव्हिरस** बादशहाने सन २०८ मध्यें दगडांची बांधली-२ **गर्नसी आल्डर्नी, जर्सी** आणि **सार्क** हीं बेटें इंग्लिश खाडींत असून विल्यम उद्दालियमापासून सन १०६६ त इंग्रजांच्या हातीं आलीं-तीं पूर्वी-उद्दालियमाच्या इनामांपैकीं होतीं-३ **वाईट** बेटांतील किल्ला, **कार्डिस ब्रुक.** एथे क्रामवेलाने सन १६४७-४८ मध्यें पहिले **चार्लसास** कैद करून ठेविलें होतें. **जॉन** राजानें **मॅग्नाचार्टावर** सही दिल्यावर सैन्य जमविण्याकरितां तो एथें येऊन राहिला होता. **व्हिक्टोरिया** राणीसाहेबांच्या समुद्राचा हवा खाण्याचा वाडा एथें आहे. एथेंच **फिनिशियन** लोक प्राचीनकाळीं व्यापाराकरितां येत असत. व कथील आणि

लोखंड हीं नेत असत. ४ इंग्लिश खाडी:—एथें सन १५४५ त इंग्लिशांच्या आरमारानें स्पेनच्या आरमारास जिंकिलें, व एथेंच इलिजाबेथच्या कारकीर्दीत सन १५८८ त स्पानिआर्ड लोकांच्या अजिंक्य आरमाराची धूळधाण झाली. ५ मान बेट:-पूर्वी स्काट चें होतें. ते तिसरे एडवर्डाचे कारकीर्दीत सारमच्या अर्लानें सन १३१४ मध्यें जिंकून घेतलें व तें तेव्हांपासून इंग्लिशांच्या ताब्यांत आहे. तें त्यानें जिंकून घेतल्याबद्दल त्यास मानचा राजा असा किताब मिळाला होता.

वेल्स.

उत्तरेकडील सहा प्रांत.

१ फ्लिंट.

१ मोठीं शहरें व गांवें—१ होली वेल, २ मोल्ड, ३ फ्लिंट, ४ असाफ

इतिहास प्रसिद्ध स्थळें—१ फ्लिंट एथें लांकास्टरचा ड्यूक, हेन्री, यानें दुसरे रिचर्डास गांठून त्यास सन १३९९. मध्यें कैद केलें.

२ डेन्बी.

१ मोठीं शहरें व गांवें—रेक्सहाम, डेन्बी, लान-गाथलेन.

३ कर्नार्व्हन.

मोठीं शहरें किंवा गांवें—१ कर्नार्व्हन २ बांगर ३ कान्वे.

२ इतिहास प्रसिद्ध स्थळें—१ कर्नार्व्हन हें शहर

१२८२ त पहिले एड्वर्डानें घेतलें. सन १४०२ मध्यें ग्लेंडावर यानें त्यास वेढा दिला होता.

४ आंगल्सी.

१ मोठीं शहरें व गांवें—१ होलीहेड २ बोमारीस.

२ इतिहासप्रसिद्ध स्थळें—बोमारीस एथील किल्ला पाहिले एड्वर्डानें बांधिला. तो किल्ला क्रामवेल्च्या सैन्यानें १६४२ त घेतला. २ आंगल्सी हें बेट सन ७८ मध्यें रोमन लोकांनीं घेतलें. तेव्हां त्यांनीं तेथील जुने धर्माधिकारी ड्रुइड लोक, यांतील बरेच लोक मारिले. सन ९०० मध्यें डेन्स लोकांनीं तें जाळून फस्त केलें. पुढें इंग्रजांनीं पाहिले एड्वर्डाचे कारकीर्दीत सन १२८२ त उद्ध्वस्त केलें.

५ मेरीआनेथ.

मोठीं शहरें व गांवें--१ डालजेथ्के २ बाला.

इतिहासप्रसिद्ध स्थळें—१ हार्लेचकिला हा ओएन ग्लेंडावर यानें १४०४ मध्यें घेतला; सन १८०८ मध्यें इंग्रजांनीं घेतला एथें सन १४५९ त मार्गरेट राणी आश्रयास आली होती. सन १६४७ त हा किल्ला क्रामवेल्च्या सैन्याच्या हातीं लागला.

६ मान्ट्गामेरी.

मोठीं शहरें व गांवें—१ वेल्शपूल २ मान्ट्गामेरी.

दक्षिणेकडील सहा प्रांत.

१ कार्डिगान.

मोठीं शहरें व गांवें–१ आबरिस्टविथ २ कार्डिगान.

इतिहास प्रसिद्ध स्थळें—१ कार्डिगान एथें सन ११३६ त इंग्रज आणि वेलश यांमध्यें मोठी लढाई झाली.

२ राडनार.

मोठीं शहरें व गांवें—प्रेस्टन.

३ पेम्ब्रोक.

मोठीं शहरें व गांवें—१ पेम्ब्रोक २ हारफर्ड्वेस्ट.

३ सेन्ट डेविड्ज.

इतिहास प्रसिद्ध स्थळें—१ मिल्फर्ड हेवन-एथें सन १४०६ त इंग्रजास फ्रेंच आरमारावर जय मिळाला. लांकास्टरचा ड्यूक हेन्री याशीं सामना करण्याकरितां दुसरा रिचर्ड आयर्लंडांतून परत येत असतां एथें उतरला होता. सन १०८५ त रिचमन्डचा अर्ल (सातवा हेन्री) तिसरे रिचर्डाशीं सामना करण्याकरितां एथें उतरला होता. चौथा जार्ज आयर्लंडांतून सन १८२१ त परत येत असतां हवेच्या विशेष गारठ्यामुळें या आखांतांत राहिला होता. २ पेंब्रोक एथें सातवा हेन्री सन १४५७ त जन्मला.

४ कर्मार्थन.

मोठीं शहरें व गांवें—१ कर्मार्थन २ ल्यानेथ्ली.

इतिहास प्रसिद्ध स्थळें—१ कर्मार्थन एथील किल्ला ओएन ग्लेंडावर यानें १४०५ त घेतला सन १६४८ त हा किल्ला पार्लमेंटरी सैन्यानें पाहिले चार्लसापासून हिसकावून घेतला व पाडून टाकिला.

५ ब्रेक्नाक.

१ मोठीं शहरें व गांवें—ब्रेक्नाक.

२ इतिहास प्रसिद्ध स्थळें—१ बिल्थ गांवा जवळच

पहिले एड्वर्डानें वेलश लोकांना सन १२८२ मध्यें जिंकिलें. व त्या लढाईत ल्यू वेलिन् राजपुत्र ठार मारला गेला.

६ ग्लामार्गन.

मोठीं शहरें व गांवें—१ कार्डिफ २ मॉर्थर्टिड्वील्, ३ स्वान्सी.

इतिहास प्रसिद्ध स्थळें—१ कार्डिफ एथील किल्ल्यांत पहिले उईलियमाचा मुलगा राबर्ट यास त्याचा भाऊ हेन्री यानें २८ वर्षें (मरणापर्यंत) कैदत ठेविलें होतें.

हल्ली कलेचीं स्थळें—१ मॉर्थर्टिड्विल एथें कोळसे व लोखंड यांचे मोठे कारखाने आहेत. २ कार्डिफ व स्वान्सी हीं बंदरें अहेत. एथून कोळसा अतिशय बाहेर जातो.

लोकसंख्या—(सन १८९१ सालीं झालेल्या मनुष्य गणतीवरून) लंडन. ४२,५०,०००, लिव्हर्पूल ५,१८,०००, मॅन्चेस्टर ५,०५,०००, बर्मिंगहाम ४,२१,०००, लीड्स ३,६९,००० शेफील्ड ३,२४,०००, ब्रिस्टल २,२२०००, ब्रॅड्फर्ड २,१६,०००, नॉटिंगहाम २,१२,०००, हल्ल २,००,०००, टाइन नदीच्या कांठचें न्यूकासल १,८६,०००, पोर्ट्समौथ १,५१,०००; कार्डिफ १,२९,०००, स्वान्सी ९०,०००;.

दुसरा भाग.

स्काट्लंड.

स्काट्लंडच्या उत्तरेस व पश्चिमेस अट्लांटिक महासागर; पूर्वेस उत्तर किंवा जर्मन समुद्र; आणि दक्षिणस इंग्लंड व पेरिश समुद्र हे आहेत. स्काट्लंडचें क्षेत्रफळ सुमारें ३०,००० चौरस मैल आहे, व तें सिलोन पेक्षां १॥ पटीनें मोठें

आहे. स्काट्लंडचा किनारा अति वांकडा तिकडा असून समुद्राच्या फाट्यांनीं अतिशयित फाटला आहे.

समुद्राचे फांटे—पूर्वेस **फोर्ट**, **टे**, व **मोरे** यांच्या खाड्या; उत्तरेस **पेंट्लयांड**ची सामुद्धुनी, **आर्कनी** बेटे आणि **स्काट्लंड** ह्यांचेमध्यें आहे; पश्चिमेस **लिन्हे**, **क्लाईड** आणि **सालवे** यांच्या खाड्या. **पेन्टलयांड** खाडी पाण्याच्या जोरदार प्रवाहाविषयीं प्रसिद्ध आहे. **सालवे** खाडी फारच उथळ असून भरतीचे पाणी फार लवकर निघून जातें.

भूशिरें—**सेंट आब्ज् हेड**, **बारिक** प्रांतांत असून **स्काट्लंड**ांतील अगदीं उत्तरेकडचें टोंक आहे. **राथ** हें अगदीं ईशान्येकडचें टोंक आहे. **गालोवेचें मूल्** हें अगदीं दक्षिण टोंक आहे.

बेटें—उत्तरेस. **शेट्लंड** आणि **अर्कनी**; पश्चिमेस-**हेब्रेडेज** किंवा पाश्चिमात्य बेटें आणि वायव्येस **बूट** आणि **आरन**. **आर्कनी** बेटांचे बाहेरील व आंतील असें दोन भाग आहेत. त्यांत ल्यूइज व **स्काइज** हीं बेटें अनुक्रमें मोठीं आहेत.

पृष्ठभागाचे ३ विभाग आहेत—उत्तरेस, डोंगरी मुलूख; मध्यें, सुपीक प्रदेश आणि दक्षिणेकडे, उंचवट्याचा प्रदेश. देशाचा पृष्ठभाग डोंगरांच्या ३ रांगांनीं व्यापिला आहे. त्या रांगा नैर्ऋत्य दिशेकडून ईशान्येकडे गेल्या आहेत—उत्तर रांग; मध्यें **ग्रांपियन**, आणि दक्षिणेस **लोथर्स** व **चिव्हिअट** टेकड्या. **ग्रांपियन** पर्वताचें उंच शिखर-**बेन्नेव्हिस** हें ४,४०६ फूट उंच आहे. व हें **ब्रिटिश** बेटांतील डोंगरांत उंच आहे. **बेन्माक धु** ह्याची उंची, बहुतेक तितकीच आहे.

नद्या:—**ट्वीड** ही नैर्ऋत्येस असून तिनें देशाची दक्षिण सीमा झाली आहे. **फोर्थ** आणि **टे** ह्या आप आपल्या नांवाच्या

खाड्यांस मिळतात ते हो स्काट्लंडांतील मोठी लांब नदी आहे. तिची लांबी १०५ मैल आहे. स्टे मोरे खाडीराशीं महा समुद्रास मिळते. ही मोठी वेगवत्तर आहे. क्लुईड ही वायव्येस आपल्या नांवाच्या खाडीस मिळते. तिच्यांतून जहाजें फार येतात व तिचे काठीं जहाजें बांधण्यांचा मोठा कारखाना आहे. डी, आणि डान ह्या आबर्डीनच्या समद्रास मिळतात.

स्काट्लंडांत सरोवरें पुष्कळ असून तीं सौंदर्याविषयीं प्रसिद्ध आहेत. त्यांत लोमंड व काट्रीन हीं मुख्य आहेत. लोमंड हें ब्रिटन मध्यें मोठें आहे.

हवा—एथील हवा इंग्लंडाहून थंड व ओलसर आहे.

उत्पन्न—फोर्थ आणि क्लाइड ह्यांच्या कांठीं कोळसा अतोनात सापडतो. लोथर्स रागे-धील शिशाच्या टेंकड्यांत शिसें सांपडतें. एथील लोक इंग्रजांकरितांमेंढ्या व बैल फार पाळतात. हेरींग व साल्मन हे मासे एथें फार धरतात. आणि कापूस, लोखंड, ताग, लोकर व लाकूड यांचे पदार्थ बरेच हातानें करितात.

लोक—एथील वस्ती सुमारे ४०,००,००० ची आहे. एथील सखल जमिनीवरचे लोक व इंग्रज लोक हे एकाच कुलां-तले आहेत. परंतु उंचवट्याच्या जमिनीवरील लोक सेल्ट किंवा गेल आहेत. सावधगिरीविषयीं स्काच लोक प्रसिद्ध आहेत. शाळा विपुल आहेत, व त्यांत मोठे मोठे ग्रंथकार निपजले आहेत. रोमन लोक या देशाला कयालेडोनिया व लोकांस पिक्ट ह्मणत. सन ३०० त अयर्लंडांत स्कट किंवा सेल्टिक या लोकांनीं स्काट्लंडांत येऊन पिक्ट लोकांस जिंकिलें. त्यावरून त्या सर्व देशास स्काट्लांड हें नांव पडलें. सन १६०३ मध्यें एथील राजा ६ वा जेम्स हा इंग्लंडाचे गादीवर बसला. सन १७०७ मध्यें एथील पार्लमेंट इंग्लंडां-

तील पार्लमेंटास जोडिलें. एथील वस्ती दर चौरस मैलास १३५ या मानानें आहे. एथील धर्म प्राटेस्टंट आहे. देशाचे ३३ प्रांत आहत.

उत्तरेकडील १० प्रांत.

प्रांत	मुख्य शहरें
१ अर्कनी व शेटलंड बेटें.	कर्कवाल आणि लर्विक.
२ केथनेस	उइक, थसौं.
३ सुथर्लांड	डार्नाक
४ रास	टेन, डिंगवाल, स्टानोंवे.
५ क्रामर्टी	क्रामर्टी.
६ इन्व्हर्नेस	इन्व्हर्नेस फोर्ट उइलियम.
७ नेर्न	नेर्न.
८ मारे किंवा एलिजन	एलिजन २ फोरेस.
९ बाम्फ	बाम्फ.
१० आबर्डीन	आबर्डीन, पिटरहेड.

मधले १० प्रांत.

१ किन्कार्डिन	स्टोनहोवन
२ फोर्फार	डंडी, आर्ब्रोथ, मान्ट्रोज फोफीर ब्रेचिन.
३ पर्थ	पर्थ, क्रीफ.
४ फाइफ	डंफर्म्लाइन कर्कोलडी, सेंट आंड्रुज, कुपार.
५ किन्रास	किन्रास.
६ क्लाकमानन	आलोस, क्लाकमानन, डोल्लार.
७ स्टर्लिंग	स्टर्लिंग. फाल्कर्क.

८ डंबार्टन	डंबार्टन, हेलेन्सबुर्ग कार्किन्टिल्लाक.
९ आर्गाइल	क्याम्बेलटौन, डन्कन, ओबन, इन्व्हरारी.
१० बूट	राथ्से.

दक्षिणेकडील तेरा प्रांत.

१ आईर	किल्मनार्कि, आईर, इरव्हील,
२ रेनूफ्रयू	ग्रीनाक, पेस्ली पोर्ट-ग्लासगो, रेन्फ्रयू.
३ लानार्क	ग्लासगो, एयरड्राय, ला-नार्क;
४ लिन्लिथ्गो किंवा पश्चिम लोथियन	बाथगेट, लिन्लिथ्गो;
५ एडिंबरो (मध्य लोथिअन)	एडिंबरो, लीथ
६ हाडिंग्टन (पूर्व लोथियन)	हाडिंग्टन, डंम्बार, प्रे-स्टन् प्यान्स.
७ बेरिक	डन्स, ग्रीन्ला.
८ राक्सबर्ग	हाविक, केल्सो, जेडबर्ग, मेल्रोज;
९ सेल्कर्क	गालाशील्स, सेल्कर्क;
१० पीबल्स्	पीबल्स्.
११ डंफ्रीज	डंफ्रीज, ॲनन, मोफट.
१२ कर्कुब्रे	कर्कुब्रे.
१३ उइग्टौन	स्ट्रानरेअर, उइग्टौन, पोर्टपाट्रिक.

१ प्रसिद्ध व नामांकित स्थळें—एडिन्बरो (एड्विन्चें शहर) हें शहर फोर्थ खाडीचे कांठीं असून सन १४३७ त स्काटलंडची राजधानी झाली-एथील होलीरूड वाड्यांत तेथील राजे राहत असत. तेथें एक नामांकित विश्वविद्यालय आहे. हें युरोपखंडांत मोठें सुंदर चित्रासारखें शहर आहे. २ लीथ-फोर्थ खाडीवर असून एडिंबरोचा एक भाग आहे. व तें त्यास सध्यां जोडिलें आहे. ३ ग्लासगो-हें क्लाईड नदीच्या कांठीं असून एथें मोठा व्यापार चालतो. गावांत अतिशय गिरण्या असल्यामुळें धूर इतका पसरतो कीं तें दुरून जळक्या गांवासारखें धुरकट दिसतें. एथें वाफेचीं यंत्रें करण्याचा व शिल्पकलेचा मोठा कारखाना आहे. एथील वस्ती सुमारें लंडन इतकी आहे. ४ पेस्लेः-गोच्या पाश्चिमेस सुमारें ७ मैल आहे व, एथें शिवण्याच्या दोऱ्यांच्या मोठा कारखाना आहे. पूर्वी एथें शाली होत. ५ डंबार्टन एथें खडकावर एक किल्ला आहे. ६ ग्रीनाक—हें क्लाइडनदीच्या मुखाजवळ मोठें बंदर आहे. ७ स्टर्लिंग-हें फोर्थवर असून एथें एक किल्ला आहे. व तो स्काटलंडच्या राजांचें राहण्याचें मोठें आवडतें ठिकाण होतें. ८ टे नदीच्या कांठीं पर्थ हें एकवेल स्काटलंडची राजधानी होती. त्याच्या शेजारी स्कोन एथें एक शिळा असे व तिजवर एथील राजांना राज्याभिषेक होई. ती शिळा सध्यां वेस्टमिन्स्टर एथें आहे. ९ पर्थच्या पूर्वेस सेन्टअंन्ड्रूज-एथें स्काटलंडातील फार प्राचीन विश्वविद्यालय आहे. १० डंडी-हें टे खाडीच्या कांठीं असून हें स्कालंडांत तिसरें मोठें शहर आहे. एथें तागाच्या कापडाचा मोठा कारखाना आहे. ११ अबर्डीन हें पूर्व किनारीं असून एथें बरींच घरें दगडाचीं बांधलेलीं आहेत. हें स्काटलडांत चवथें शहर आहे. एथें व्यापार बराच चालतो.

एथें एक विश्वविद्यालयही आहे.–११ पीटरहेड–हें शहर आगदीं पूर्वेकडे असून एथें देवमाशाची शिकार विशेष चालते. १३ वालमोरल हें अबर्डीनच्या पश्चिमेस असून राणीसाहेबांचें उन्हाळ्यांतील राहण्याचें ठिकाण आहे. १४ इन्व्हर्नेस हे उत्तर डोंगरी प्रांतांतील मोठें शहर आहे. १५ उइक एथें हेरिंग मासे धरण्याचा मोठा धंदा चालतो.

इतिहासप्रसिद्ध स्थळें--१ आश्रिम (सालवे) एथें सन १६९१ त तिसरे उइलियमास दुसरे जेम्सावर जय मिळाला. २ वानाक्बर्न (स्टर्लिंग) एथें ब्रूस हा सेनापति असतां स्कॉट् लोकांनीं दुसरें एड्वर्डास सन १३१४ त जिंकिलें. ३ वाथवेलब्रिज (लानार्क)–एथें राजपक्षीय लोकांनीं कठहे नांटर्स यांस १६७९ मध्यें पूर्णपणें जिंकिलें. ४ कलोडेन (इन्व्हर्नेस) एथें १४४६ त कंबर्लंडच्या डयूकानें तोतयाच्या सैन्याचा पूर्णपणें पराभव केला. ५ डंबार्टन–हें शहर अनुक्रमें पहिला एडवर्ड, वेलिअल, ब्रूस, स्काट्लंदची राणी मेरी, पहिला चार्लस, आणि क्रामवेल यांच्या ताब्यांत गेलें होतें. ६ डंबार (हार्डिंगटन)–एथें पहिलें एड्वर्डानें वेलिअल ह्यास १२९६ त जिंकिले व त्यास राज्याचा राजीनामा देण्यास लाविलें. वानाक्बर्नची लढाई शाल्यावर दुसरा एडवर्ड एथें येऊन राहिला होता. सन १६५० त स्काट लोकांचा क्रामवेलानें पराभव केला७ डन्डलन (पर्थ)–एथें आरगाईलच्या डयूकानें तोतयाचे सैन्यास सन १७१५ त मागें हटाविलें. ८डन्सीमेन (पर्थ) एथें म्याकबेथ व नार्थबर्लंडचा डयूक यांमध्यें १०५७मध्यें मोठी लढाई झाली. शेक्सपियर कवीनें केलेल्या म्याकबेथच्या काव्यानें या शहराची कीर्ति अजरामर झाली आहे ९ एडिंबरो हें शहर तिसऱ्या जेम्सानें सन १४४२ त आपली राजधानी केली. ६ वा जेम्स एथें १५६६ त जन्मला.

पहिला व दुसरा **चार्लस** यांनां एथें राज्याभिषेक इ०स०१६१३ त व १६५१ यांत अनुक्रमें झाला. हा किल्ला **क्रामवेल**च्या हातीं सन १६५० त लागला. एथें धाकटा किंवा तरुण **तोतया** सन ११४५ त येऊन राहिला होता. १० **फाल्कर्क** (**स्टार्लिंग**) एथें पहिले **एडवर्डानें वालेसास** जिंकिल्याबद्दल प्रसिद्धी आहे. ११ **फाकलंड** (**फाईफ**) एथें ६ वे **जेम्सापर्यंत स्काट** लोकांचा राजवाडा होता; ५ वा **जेम्स** एथें सन १५४२ त मेला. १२ **ग्लाड्स्मूर** एथें **तोतया**च्या सैन्यानें राजाच्या सैन्याचा सन १७४५ त पराजय केला. १३ **ग्लास्गो** (**लानार्क**) एथें **वालेस**यानें सन १३०० त **पर्सी**चा पराजय केला. १४ **हालिडन हिल्** (बरिक) एथें तिसरे **एडवर्डानें** सन १३१३ त **स्काच** लोकांस जिंकिलें, आणि **बेलिअल** यास राज्यावर बसविलें. यावेळेस ३० हजार **स्काच** प्राणास मुकले. १५ **इन्व्हर्नेस** हें शहर पहिले **एडवर्डानें** घेतलें. राजकीय सैन्य नें तें सन १६४५ त वेढा देऊन घेतलें. **क्रामवेला**नें पुन्हां १६५१ त घेतलें. १६ **लांक्सार्इड** एथें **स्काटिश** सरदार लोकांनीं **इं**थांची राणी **मेरी** इचे सैन्याचा १५६८ त मोड केला. १७ **लाकलेव्हन** (**किन्रास**) यास **इंग्लिशां**नीं १३०१ आणि १३३५ त वेढे दिले होते. **स्काटां**ची राणी **मेरी** ही एथें १५६७ त कैदेत ठेविली होती. १८ **मुसेलबर्ग** (**एडिंबरो**) एथें ६ व्या **एडवर्डा**च्या कारकिर्दीत **स्काटां**चा पराभव झाला.

मोठमोठ्या शहरांची लोकसंख्या. (१८९१ प्रमाणें) **ग्लास्गो** ७,९१,००, **एडिंबरो** २,६५,०००, **डंडी** १,५६,०००, **आबर्डीन** १,२३,०००, **लीथ** ७०,०००, **पेस्ली** ६६०००.

तिसरा भाग.

आयर्लंड.

मर्यादा—आयर्लंडच्या पूर्वेस उत्तर खाडी, आयरिश

समुद्र आणि सेन्ट जार्जेसची खाडी; दक्षिणेस, पश्चिमेस व उत्तरेस आट्लांटिक महासागर.

क्षेत्रफळ—आयर्लंडचें क्षेत्रफळ ३२५०० चौरस मैल आहे, तें स्कालंडापेक्षां थोडें मोठें आहे. आयर्लंड हें युरोपांत तिसरें मोठे बेट आहे व ग्रेट ब्रिटनाचा सुमारें तिसरा हिस्सा आहे. त्याचें मूळचें नांव एरिन असें आहे.

भूशिरें—पश्चिम किनारा खाड्यांनीं फार फाटला आहे. डब्लिनच्या शेजारीं हौथ हेड आणि दक्षिणेस केपक्लियर बेटांत क्लियर भूशिर हीं मुख्य आहेत.

बेटें—उत्तरेस राथलीन आणि पश्चिमेस अचील हीं मोठीं बेटें आहेत. आयर्लंडाच्या भोवतीं सुमारें ५०,००० बेटें व खडक आहेत. परंतु त्यांत २५० त मात्र वस्ती आहे. राथलिनच्या नजीक स्वयंभू व राक्षसी असा एक दगडी खांबांचा समदाय आहे. त्याला जायन्ट्स् कॉजवे ह्मणतात.

अखातें व खाड्या—उत्तरेस-फोइल व स्विली या खाड्या; पश्चिमेस गालवे अखात; नैर्ऋत्येस-वानट्री अखात, व इशान्येस-बेल्फास्ट खाडी, ह्या मुख्य आहेत.

डोंगर—दक्षिणेस व पश्चिमेस लहान मोठ्या टेकड्या आहेत. नैर्ऋत्य किनारीं म्याज्जिलीकडीच्या रांगेत कार्न्. च्युअल्ल हें उंच शिखर नैर्ऋत्य किनारीं आहे. त्याची उंची सुमारें ३४१४ फूट आहे.

नद्या—शानन नदी नैर्ऋत्येस वहात जाऊन अट्लांटिक समुद्रास मिळते. हिची लांबी २२४ मैल असून २१३ मैल पर्यंत तींत जहाजें चालतात. ही ब्रिटिश बेटांत मोठी नदी आहे. ही नदी अल्लेन, री, व डेर्ग, ह्या सरोवरातून वहात जाते. बोइन आणि लिफी ह्या ईशान्येस वहात जाऊन ऐरिश समुद्रास

मिळतात. वारो ही नदी शुअर शाखेसह आमेयीस वहात जाऊन ऐरिश समुद्रास मिळते.

सरोवरें—आयर्लंडांत सरोवरें फार आहेत. त्यांत ईशान्येस-ने-हें ब्रिटिश वेटांत मोठे आहे. किलार्नें हीं सरोवरें नैर्ऋत्येस असून देखाव्यानें फार सुंदर आहेत.

हवापाणी—हवा समशीतोष्ण असून ओलसर आहे. तें बेट नेहमीं इतकें थिरवेचार असतें कीं त्यास पाचूचें बेट म्हणतात. एथें कुरणें फार आहेत. ओट. बटाटें, सातु, ताग, अंबाडी हीं ऐथील मुख्य उद्भिज्जें आहेत. एथून लोणी तागाची वस्त्रे व गुरें बाहेर फार जातात. सालमन माशाची शिकार नद्यांतून फार चालते. एथें विषारी सर्प नाहींत.

लोक—आयर्लंडांत लोक वस्ती सुमारें ५० लक्ष आहे तेथील मुळचे लोक सेल्टिक कुळांतले आहेत. परंतु पूर्वेस व व उत्तरेस ब्रिटनांतून पुष्कळ लोक येऊन राहिले आहेत. त्यांचा व्यापार मुख्यत्वे करून ब्रिटनाशी चालतो. ते लोक उद्योगी नाहींत. परंतु ममताळू, उदार, व आनंदी आहेत. त्यांची मूळची भाषा गेलिक आहे. ती पश्चिमेस चालते.

धर्म—तेथें बहुतकरून रोमन कथाथलिक धर्म चालतो. कांहींचा प्राटेस्टंट चालतो. अयर्लंडाचे मुख्य विभाग चार आहेत. उत्तरेस अल्स्टर, मध्ये लिन्स्टर. व कानट आणि नैर्ऋत्येस मन्स्टर. त्यांचे पोटभाग किंवा प्रांत ३२ आहेत.

१ अलस्टर भागांत.

प्रांत	मुख्य शहरें व गांवें.
१ आंट्रिम्	१ बेल्फास्ट, २ लिस्बर्न, ३ कारिकफर्गस्.
२ डौन	१ न्यूरी, २ डौनप्याट्रिक, ३ डोनाघेडी.

३ आर्मा	१ आर्मा.
४ मोनाघन	१ मोनाघन, २ क्लोन्स,
५ काव्हन	१ काव्हन.
६ फर्माना	१ एनिस्किलेन.
७ टेरोन	१ स्ट्राबेन, २ ओमा.
८ लन्डन्डेरी	१ लन्डन्डेरी, २ कोलेरेन्,
९ डोनेगल	१ लिफर्ड.

२ कानाट भागांत.

१ लेट्रिम	१ शानन कांठचें कारिक
२ रास्कामन	१ रासकामन, २ बोइल,
३ स्लिगो	१ स्लिगो,
४ मेयो	१ बालिना, २ कासेल-बार, ३ वेस्ट पोर्ट्,
५ गालवे	१ गालवे आणि टुयुआम.

३ मंस्टर भागांत.

१ क्लेअर	१ एनिस, २ किल्रश.
२ लिमेरिक	१ लिमेरिक,
३ टिपरेरी	१ क्लान्मेल, २ टिपरेरी, ३ थर्लस.
४ वाटरफर्ड,	१ वाटरफर्ड २ डंगर्व्हान.
५ कार्क	१ कार्क, २ किन्सटौन, ३ यूघल, ४ बांडन, ५ किन्सेल.
६ केरी	१ ट्राली, २ किलर्नी.

४ लीन्स्टर भागांत.

१ डब्लिन	१ डब्लिन, २ किंगस्टोन

२ लौथ	१ ड्राएडा, २ डंडाक.
३ पूर्वमीथ	१ नाव्हन, २ ट्रिम.
४ पश्चिममीथ	१ आथलोन, २ मुलिंगर.
५ लांगफर्ड	१ लांग्फर्ड,
६ किंग्सकौंटि	१ टुलेमोर, २ पार्सन्सटौन.
७ क्विन्सकौंटि	१ मेरिवरो.
८ किलकेनि	१ किलकेनि.
९ कार्लो	१ कार्लो.
१० किलडेर	१ आर्थी, २ नेस ३ मेनूथ.
११ उइक्लो	१ आर्क्लो, २ उइक्लो,
१२ वेक्सफर्ड	१ वेक्सफर्ड, २ न्यूरास.

मोठीं, व व्यापाराचीं शहरें, नामांकित स्थळें, व विद्यापीठें—पूर्वेस १ डब्लिन हें लिफी नदीच्या काठीं राजधानीचें सुंदर व मोठें शहर आहे. एथें ट्रिनिटी पाठशाळा आहे. एथें लार्ड लेफ्टनेंट किंवा राणीचा प्रतिनिधि राहतो, २ क्विन्सटौन हें डब्लिनचें बंदर आहे. ३ डब्लिनच्या पश्चिमेस मेनूथ-एथें रोमन क्याथलिक पाठशाळा आहे. ४ बेलफास्ट हें ईशान्येस त्याच नांवाच्या खाडीच्या मुखाजवळ आहे. एथें जाहाजें बांधतात व मोठा व्यापार चालतो. हें डब्लिनच्या खालोखाल आहे. ५ दक्षिणेस कार्क. एथील बंदर उत्तम आहे. येथून अन्नसामुग्रीचा व्यापार बाहेर देशीं मोठा चालतो-६ शासनच्याकाठीं लिमारिक एथें जरीचा मोठा कारखाना असून तें पश्चिमेचें मोठें बंदर आहे. ७ कार्क वेटांत क्वीन्सटौन-हें अमेरिकेची डाक येण्याचें बंदर आहे-८ गालवे आणि ९ स्लिगो हीं पाश्चिमेस आणखीं दुसरीं बंदरें आहेत. बेलफास्ट, कार्क व गालवे एथें राणीच्या पाठशाळा आहेत-१० उत्तरेस फाइलवर लंडनडेरी एथून अन्नसामुग्रीचा बाहेर देशीं मोठा व्यापार चालतो. ११ ईशान्येस

आर्मा एथें धर्माध्यक्ष राहतो-डबलीनच्या उत्तरेस बाएनी नदीवर ड्राएडा याचेच नजीक बाएनीची लढाई सन १६९० त झाली. १३ ईशान्येस शूरच्याकाठीं वाटर्फर्ड हें मोठ्या व्यापाराचें बंदर आहे. १४ आग्नेयीकडे किलकेनी एथें लोंकरीचा व्यापार चालतो. १५ दक्षिणेस याहाल याचे आसपास सर वालटर राली यानें आपले शेतांत बटाटे प्रथम लाविले.

मोठमोठ्या शहरांतील लोकसंख्या—डब्लिन् ३,६२०००, बेलफास्ट २,५६०००, कार्क ७५०००, लिमरिक ३७०००, लइन्डेरी ३३०००

ब्रिटिश बेटांत कोणता माल कोठून येतो:—

१ धान्य—संयुक्त संस्थानें, हिंदुस्थान रशिया, ईजिप्त, जर्मनी, कानडा.

२ कापूस—संयुक्त संस्थानें, हिंदुस्थान, ईजिप्त ब्रेझिल.

३ साखर—जर्मनी, पश्चिम हिंदीबेटे, फ्रान्स, ब्रेझिल, मारिशास बेटें.

४ लोंकर—आस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, हिंदुस्थान, जर्मनी.

५ सोनें, रुपें—संयुक्त संस्थानें, आस्ट्रेलिआ, मेक्सिको.

६ रेशीम—फ्रान्स, चीन, बेलजयम.

७ इमारती लांकूड—कानडा, रशिया, स्वीडन, संयुक्त संस्थानें.

८ चहा—चीन, हिंदुस्थान, सीलोन.

९. कातडीं—हिंदुस्थान, संयुक्त संस्थानें, दक्षिण अमेरिका.

१० लोणी—फ्रान्स, हालंड, डेन्मार्क'
११ गुरें ढोरें, मेंढ्या.—जर्मनी, हालंड, संयुक्त संस्थानें, पोर्च्युगाल, डेन्मार्क, स्पेन.
१२ गळीताचीं धान्यें—हिंदुस्थान, रशिया.
१३ बुंद—सीलोन, ब्रेझील, हिंदुस्थान, पश्चिम हिंदीबेटे.
१४ द्राक्षासव फ्रान्स, स्पेन, पोर्च्युगाल.
१५ मीठ घालून वाळविलेले जनावरांचे विशेष भाग—संयुक्त संस्थानें व जर्मनी.
१६ फळें ग्रीस, स्पेन, टर्की, फ्रान्स.
१७ ताग रशिया, बेलजयम, हालंड.
१८ तंबाखू संयुक्त स्थानें, स्पानिश पश्चिम हिंदी बेटें.
१९ राकेल संयुक्त संस्थानें, रशिया.

इंग्लंडच्या राणीचे राज्याखालील प्रदेश-९० लक्ष चौरस मैल आहे. व त्यांत लोकवस्ती सुमारें ३४॥ कोटी आहे. म्हणजे सर्व पृथ्वीच्या पृष्ठ भागापैकीं $\frac{1}{6}$ आणि लोकवस्तीचा $\frac{1}{14}$ आहे.

चवथा भाग.

ब्रिटिश लोकांच्या वसाहती, परदेशीय संस्थानें व तीं घेतल्यांचीं सालें; वगैरे.

यूरोपांत

स्पेनच्या दक्षिणेस, जिब्राल्टर (१७०४), व भूमध्य समुद्रांत माल्टा (१८००).

एशियांत.

ब्रिटिश हिंदुस्थान (१७४० तें १८७७), ब्रह्मदेश, (१८२४-८६); लंका (१७९६-१८१५); पेडन (१८३९);

क्षैप्रल (१८७८); स्ट्रेट्स लेट्लमेन्ट्स (वसाहती) सिंगापूर (१८१९), पिनांग किंवा प्रिन्स आफवेलसचें बेट (१७८६), वेलस्ली प्रांत (१८००), मलाका (१८२५); हांगकांग (१८४२); लाबुआन (१८४७); आस्ट्रेलिया (१७७८-१८५०); टास्मानिया (१८०३); न्यूझीलंड (१८४१-२); फीजी बेटें (१८७४) उत्तर बोर्निओ (१८८६); नव्या गिनीचा कांहीं भाग (१८८८) आणि सारावाक (१८४०).

आफ्रिकेंत.

पश्चिम किनारीं—सेरालिओने (१७८७) व गिनी वसाहती गोल्डकोस्ट (१६६१); आट्लांटिक महासागरांत-सेन्ट हेलेना (१६७१) व असेन्शन (१८१५), ही बेटें; दक्षिणेस-केपकालनी (१८१५) नाटाल (१८४३), ब्रिटिश-मध्यआफ्रिका इ०; आणि पूर्वेस-ब्रिटिश पूर्वआफ्रिका (१८९०) मारिशस (१८१०) व सकोट्रा हीं बेटें.

अमेरिकेंत.

उत्तरेस—कानडाचें राज्य (१७५९), मध्य अमेरिकेंत-हांडुरस (१७६३), उत्तर व दक्षिण अमेरिका याच्या-मध्यें-ब्रिटिश पश्चिम हिंदी बेटें (१६११-१८०३) दक्षिण अमेरिकेच्या उत्तरेस-ब्रिटिश ग्वायना (१८१४), दक्षिण अमेरिकेच्या नैऋत्य टोकापलीकडे फाकलंड बेटें (१७७१), ब्रिटिश कोलंबिया (१८७१), व्हान कव्हर बेट (१७७१), प्रिन्स एड्वर्ड बेट (१७६३), न्यूफाउन्डलांड (१५८३), बर्म्युडाज (१६०९).

इंग्लंडापासून हिंदुस्तानास रस्ते

१ अतित्वरेनें येण्यास—लंडनापासून (डोव्हरची सामु-

द्रधुनी खेरीज) इटलीमध्यें ब्रिंडिसीपर्यंत आगगाडी आहे. तेथून थेट मुंबईस आगबोट येते. पूर्वी स्वेझचा कालवा नव्हता तेव्हां ब्रिंडिसीपासून आलेक्झांड्रिया (आफ्रिकेंत) पर्यंत आगबोट जाई. तेथून आगगाडीनें स्वेझपर्यंत जात. तेथून आगबोटीनें मुंबईस येत. सध्यां लंडनपासून मुंबईस येण्यास १६ दिवस लागतात. लंडनापासून थेट मुंबईपर्यंत आगबोटीनें आल्यास २५ दिवस लागतात. मध्यें जिब्राल्टर व माल्टा एथें वरवा करावा लागतो. इतर जहाजें केप आफ गुडहोप-कडून येतात व त्यांस ३ महिने लागतात.

इंग्लंडच्या इतिहास संबंधाचीं ब्रिटिश बेटां बाहेरील स्थळें व त्यांचे प्रसिद्धीचीं कारणें.

यूरोपांत-फ्रांस.

एजिन् कोर्ट—एथें सन १४१५ त पांचवे हेन्रीस जय व फ्रेंचांस अपजय. ओर्लिएन्स आणि बुर्बोन एथील डयूकांस कैद व अलेन्शान, ब्राबन्ट व वार एथील डयूक मरण पावले.

आमेन्झ्—एथे पीटर दी हर्मिट राहत असे. यानेंच धर्मयुद्धें उत्पन्न केलीं. एथें तिसरे एड्वर्डानें फ्रान्साचा राजा फिलिप यास वंदन केलें. एथें ग्रेटब्रिटन, हालंड, फ्रान्स आणि स्पेन यांच्या तहनाम्यावर सन १८०२ मध्यें सह्या झाल्या.

आन्जू—हा प्रांत, दुसरे हेन्रीस त्याचा बाप आन्जूचा काउन्ट, यांचेकडून मिळाला. तें शहर १२५८ त तिसरे हेन्रीनें फ्रान्सास विकलें. एथें सन १४२१ त एक लढाई झाली, तींत फ्रेंचांचा जय झाला.

अक्विटेन—हा प्रांत विजयी उइलियमा बरोबर इंग्लं-

इच्या राज्यांत सामिल झाला. तो पुनः सन १३७७ त फ्रान्सास जोडिला. पुढें सन १४१८ त पांचवे हेन्रीनें पुनः जिंकून घेतला. पुढें तो प्रांत सहावे हेन्रीनें अजी गमावला.

ओर्लिएन्स—एथें सन १४२९ त आर्कच्या जोनला इंग्लिशांवरोवर लढत असतां जय मिळाला.

क्याले—दुसरे रिचर्डाचे कारकीर्दीत ग्लुस्टरच्या डयूकास कैद करुन एथें पाठविलें होतें. सन १३४७ त हें शहर तिसऱ्या एडवर्डानें जिंकून घेतलें. सन १५५८ त मेरीचे कारकीर्दीत तें शहर फ्रेंचांनीं पुनःपरत घेतलें.

क्रेसी—सन १३४६ त तिसरा एडवर्ड आणि कृष्णकच राजपुत्र यानीं फ्रेंचांचा एथें पराभव केला.

गिएन—सन १४५१ त फ्रेंचांनीं इंग्रजांबरोबर एथें लढाई करुन कालेशिवया इंग्रजांचे सर्व प्रांत जिंकून परत घेतले.

जाबराय किल्ला—पहिले उइलियमाचा मुलगा रावर्ट एथें पळून येऊन राहिला होता व एथेंच त्याचा भाऊ हेन्री यानें त्यास कैद केलें.

ट्रोइज—सन १४२० त एथें इंग्लंड, फ्रान्स आणि वर्गंडी यांमध्यें झालेल्या तहानें असें ठरलें होतें कीं पांचव्या हेन्रीला फ्रान्साचा राजा, सहावा चार्लस, याची मुलगी कॉथराइन द्यावी आणि त्यास तेथील राजप्रतिनिधी करावें व चार्लसचे मागून राजाही करावें.

नार्मंडी—एथील डयूक उइलियम यानें सन १०६६ त इंग्लंड जिंकून घेतलें. त्याच्या पश्चात् त्याचा मुलगा रावर्ट याचे ताब्यांत तो प्रांत आला; परंतु त्याचा धाकटा भाऊ पहिला हेन्री यानें त्याजपासून तो प्रांत हिरावून घेतला. सन

११५८ त तिसऱ्या हेन्रीनें तो फ्रान्सास विकला. पुढें पांचव्या हेन्रीनें तो प्रांत सन १४१७ त हल्ला करून परत घेतला. सन १४५१ त तो प्रांत पुन्हा फ्रान्सानें सहावे हेन्रीपासून हिरावून घेतला.

पाइटिअर्स एथें सन १३५६ त कृष्णकवच राजपुत्रानें फ्रेंचांचा पूर्ण पराभव करून त्यांचा राजा जान यास कैद करून लंडनास पाठवून दिलें. तो तेथें बरेच दिवस होता व तेथेंच मरण पावला.

पारीस—एथें सन १४२२ त सहाव्या हेन्रीला फ्रान्साचे गादीवर राज्याभिषेक झाला.

फ्लयांडर्स—एथें तिसरा एडवर्ड सन १३४० त लढाई देण्याकरितां उतरला होता. दुसऱ्या रिचर्डानें हांकून लाविल्यावर हेन्री बोलिंब्रोक हा एथें उतरला होता. मार्गरेट राणी गुलाबांच्या लढायांत एथें होती.

बोर्डो—हा प्रांत, दुसऱ्या हेन्रीचें आक्विटेनची इलियनार इच्याशीं लग्न झाल्यामुळें इंग्लंडास जोडिला. कृष्णकवच राजपुत्र एड्वर्ड यानें एथील लढाईत फ्रान्साचे राजास जिंकून एथें कैद करून आणिलें होतें. दुसरा रिचर्ड हा सन १३६७ त एथें जन्मला.

बूलोन—दुसरा एड्वर्ड सन १३१३त एथें यात्रेस आला होता. हें शहर आठव्या हेन्रीनें सन १५४२ त जिंकून घेतलें परंतु ४,००,००० क्राऊन घेऊन तें फ्रान्सास परत दिलें. हें शहर सन १८०६. त इंग्रजांनीं दारूचे बाण टाकून जाळून टाकिलें.

ब्रिटेन—हेंजिस्ट या बरोबरच्या लढायांत कित्येक ब्रिटन लोक एथें येऊन राहिल्यामुळें याचें मुळचें नांव आर्मोरिया जाऊन हें नांव पडलें. दुसरे हेन्रीचा मुलगा जाफ्री यानें एथील

वारसदारिणीशीं लग्न लाविल्यावरून हा प्रांत इंग्लंडचें स्वाधीन झाला.

रूएन—एथें सन १०८७ त पाहिला उइलियम मरण पावला. हें शहर पांचव्या **हेन्री**नें हल्ला करून घेतलें. सन १४२२ त पांचवा **हेन्री** एथें मरण पावला. एथेंच सहाव्या **हेन्री**चें कारकीर्दीत **ओर्लिएन्स**ची कुमारिका **इंग्लिश** लोकांनीं जिवंत जाळिली. सन १४४३ त चवथा **एड्वर्ड** एथें जन्मला. सहावे **हेन्री**चे कारकीर्दीत सन १४४९ सालीं **समरसेट**च्या ड्यूकास हें शहर **फ्रेंचांस** द्यावें लागलें.

लाहोग मूशीर—एथें तिसरा **एड्वर्ड** येऊन उतरला होता. **ब्लेक** यानें **डच** लोकांस एथेंच जिंकिलें. **उइलियमास** सन १६१२ त दुसरा **जेम्स** आणि **फ्रेंच** यांशीं लढताना जय मिलाला.

हार्फ्ल्यूअर—एथें पांचवे **हेन्री**नें सन १४१५ उतरून हें शहर **इंग्लिशां**ची वसाहात केली. एथूनच **रिच्मंड**चा **अर्ल हेन्री** हा तिसऱ्या **रिचर्ड**बरोबर लढाई करण्यास सन १४८५ त जहाजांत बसून निघाला.

स्पेन.

आलमान्झा—एथें **जर्मनी**चा बादशहा **चार्ल्स** आणि **इंग्रज** यांस सन १७०७ त **फ्रेंचां**नीं जिंकिलें.

अरेगान—सातवे **हेन्री**ची बायको **काथराईन** ही एथील होती. ती त्याचा भाऊ **अर्थर** यास दिली होती, तो मेल्यावर तिच्याशीं **हेन्री**नें लग्न लाविलें हेंच **पोपा**शीं भांडण होण्याचें मुख्य कारण होय. त्यानें तिचा पुढें घटस्फोट केला, हें व तें इंग्लंडांतील धर्म सुधारणेचें मूळ कारण झालें.

कास्टाइल (स्पेन)—एथे सन ११६७ कृष्णकवच

राजपुत्रानें फ्रँचांस जिंकिलें. दुसरे रिचर्डाचे कारकीर्दीत लांक्यास्टरच्या ड्यूकानें यावर हक्क सांगितला होता.

केडीझ—हार्वर्ड व एसेक्स यांनीं एथच्या बंदरांतील जहाजें जाळून हें शहर घेऊन लुटिलें. सन १६२५ त हें शहर घेण्याकरितां पाहिले चार्लसानें पाठविलेलें आरमार व्यर्थ गेलें.

जिब्राल्टर—हें सन १७०४ त सर जार्जरूक यानें जिंकून घेतलें व तें अद्याप इंग्लिशांच्या ताब्यांत आहे.

ट्राफल्गार—एथील भूशिरानजीक सन १८०५ त लार्ड नेल्सन यानें फ्रेंच व स्प्यानिश यांच्या आरमारांवरोवर लढून जय मिळविला ,परंतु तो स्वतः एथें प्राणास मुकला.

पिरिनीज—या भागांत स्पानियार्ड लोकांशीं लढत असतां सन १८१३ त उवेलिंगट्न यास जय मिलाला.

बार्सिलोना—हें शहर पीटर्बरोच्या अर्लानें सन१७०५ त जिंकून घेतलें होतें, परंतु सन १७१४ त फ्रेंच व स्पानियार्ड यांनीं तें जिंकून परत घेतलें.

माड्रिड—पहिला चार्ल्स वर्किंगह्यामचा ड्यूक हे राजाला मुलगी पाहण्याकरितां वेषांतरानें एथें आले होते. एथें उवेलिंग्टन ब्रिटिश सैन्यासह सन १८०६ त उतरला होता.

बेल्जम.

घेन्ट—तिसऱ्या एडवर्डाचा मुलगा जान हा एथें जन्मला होता ह्मणून त्यास घेन्टचा जान असें ह्मणत.

टुर्नें—आठवें हेन्रीनें हें शहर घेऊन उलसीला दिलें व त्यास तेथील बिशप (धर्माधिकारी) ची जागा दिली होती. हें शहर फ्रेंचांनीं, ब्रिटिश व त्यांचे साथी यांजपासून १७४५ त घेतलें. याचे आसपास ब्रिटिश व आस्ट्रियन आणि फ्रेंच यांमध्यें सन १७९३ त लढाई होऊन ब्रिटिशांचा पराजय झाला; पुढें त्यांनीं फ्रेंचांस सन १७९६ त जिंकून हांकून दिलें.

फान्टेनोई—एथें सन १७४५ त फ्रेंचांनीं कंबर्लंडचा

ड्यूक, डच व आस्ट्रियन यांशीं मोठी लढाई करून त्यांस जिंकिलें.

ब्रुसेल्स—सन १७०६ मध्यें या गांवच्या किल्यात **मार्लबरो**च्या स्वाधीन केल्या. एथें **वाटर्लू**च्या लढाई पूर्वी सन१८१५ मध्यें **ब्रिटिश** लोकांच्या सैन्याचा तळ होता. एथें १८९० राज्यक्रांति होऊन **हालंड** व **बेल्जम** हे देश स्वतंत्र झाले.

रामिलीज—एथें सन १७०६ मध्यें **मार्लबरो** यास फ्रेंचांबरोबर जय मिळाला.

वाटर्लू—**मार्लबरो** यानें एथून फ्रेंचांस पळवून लाविलें. परंतु सन १८१५ च्या १८ व्या तारखेस एथें **उवेलिंग्टन**च्या ड्यूकानें फ्रेंचांचा पूर्ण पराभव करून, **नेपोलियन** याची पक्की खोडकी जिरविली.

हालंड.

ऊट्रेक्ट एथें सन १७१३ त झालेल्या तहानें **आन राणी**च्या (**स्पेन**तील वारशाच्या) लढाया संपल्या, व इंग्लंडांत **प्राटेस्टंट** शिवाय गादीवर बसवूं नये; **फ्रान्स** व **स्पेन** एथील राज्यें विभक्त व्हावीं, **डंकर्का**चा नाश आणि **अमेरिकेंत** इंग्लिशांनीं वसाहती वाढवाव्या, असें ठरलें. या तहानें **ब्रिटन**ला **हड्सन** आखाताचा मुलूख, **न्यूफाऊंडलंड**, **नोवास्को**शिया, **जिब्राल्टर** व **मिनोर्का** हीं मिळालीं.

ब्रेडा—दुसरा **चार्लस** हा प्रजासत्ताक राज्यांत एथें येऊन राहिला होता. एथील तहानें **डच** लोकांनीं **न्यूयार्क** शहर इंग्लिशांस दिलें.

रिस्विक—एथें तिसरा **उइलियम** याजवरोबर सन सन १६९७ त फ्रेंचांनीं तह केला.

स्कूज—एथें तिसऱ्या एड्वर्डानें फ्रेंचांबरोबर सन १६९७ त जय मिळविला.

हालंड—चवथा एड्वर्ड गुलाबांच्या लढायांत एथें पळून येऊन राहिला होता. पहिले जेम्सानें आपला जावई बोहेमियाचा राजा यास मदतीकरितां एथें सैन्य पाठविलें होतें. आडमिरल (अरमारावरील मुख्य) डंकन यानें एथील अरमाराचा सन १७९९ मध्यें नाश करून टाकिला. तिसरा उइलियम हा इंग्लंडचे गादीवर बसण्याचे अगोदर एथील एक न्यायाधीश होता.

हेग—प्रजासत्ताक राज्यांत दुसरा चार्ल्स हा एथें कांहीं दिवस राहिला होता.

जर्मनी.

डेन्टिन्जेन—दुसरे जार्जानें एथें फ्रेंचास स्वतः सन १७४३ त जिंकिलें.

बोहेमिया—एथील अंध राजा क्रेशीच्या लढाईंत मारला गेला. तेव्हां त्याचे मुकुटांतील पंख व त्यावरील खूण ही प्रिन्स आफ वेल्स यानें आपल्या टोपीस लाविलीं. तीं तेव्हांपासून वेल्सचा राजपुत्र आपले टोपींत बाळगीत आहे. पहिल्या जेम्साची मुलगी, इलिझाबेथ हिचें लग्न एथील राजाबरोबर झालें होतें. तिचा मुलगा जार्ज हा इंग्लंडचे गादीवर बसला. कारण इंग्लंडच्या गादीवर बसण्यास तोच जवळचा प्राटेस्टंट वारस होता.

ब्लेन्हीम—एथें सन १७०४ त मार्लबरोच्या डयूकानें फ्रेंचास जिंकिलें. त्या कामाबद्दल त्यास उडस्टाक एथें कांहीं जमीन इनाम दिली आहे. व तेथेंच त्यास एक भव्य वाडाही पार्लमेन्टानें बांधून दिला आहे.

मेन्टज--एथील किल्यांत, पाहिले रिचर्डास तो धर्म युद्धाकडून परत येत असतां आस्ट्रियाचा ड्यूक लिओपोल्ड यानें सन ११९० कैद करून ठेविलें होतें.

हानोवर— इंग्लंडाचे गादीवर सध्यां असणारें राजकूल हें एथील आहे. व्हिक्टोरिया राणीसाहेब जेव्हां गादीवर बसल्या तेव्हां एथील कायद्यानें राज्यावर स्त्री अधिकारी होत नाहीं म्हणून राणीसाहेबांच्या मागून वारसदार होणारा कंबर्लंडचा ड्यूक हा एथील गादीवर बसला. एथवर हा प्रांत इंग्लंडच्या राज्याचा भाग होता.

डेन्मार्क.

आंग्लेन--हें गाव स्लेस्विकपाशीं आहे. एथील लोकांनीं इंग्लंडास येऊन पूर्व आंग्लिअंची वसाहत करून हेप्ट राज्यही स्थापन केलें. तें राज्य सप्तराज्यापैकीं एक होतें. त्या संस्थानाचा अंमल वाढून सर्व देशास आंग्लल्यांड (आंग्लिलोकांचा देश) याचा अपभ्रंश इंग्लंड होऊन असें नांव पडलें.

प्राशिया.

एस्सलाचापेली—या गांवीं दोन मोठे तह झाले. त्यांवरून हें गांव प्रसिद्धीस आलें. त्या दोन तहांतील पहिला तह सन १६७८ त ग्रेटब्रिटन, फ्रान्स, हालंड, हंगारी स्पेन, व जिनोआ यांमध्यें झाला, व दुसऱ्या तहानें आस्ट्रिया एथील वारशाबद्दलच्या लढाया बंद झाल्या.

भूमध्यसमुद्र.

एल्बा—हें बेट १७७६ त इंग्लिशांस मिळालें होतें परंतु तें त्यानीं १७१७ त सोडून दिलें. सन १८१४ मध्यें

नेपोलियन बोनापार्ट यास एथें कैदेंत ठेविलें होतें. परंतु तो तेथून सुटून परत फ्रान्सांत पळून आल्यावर त्यास पुनः **वाटर्लू** एथें जिंकून कैद केलें व **सेंटहेलिना** एथें ठेवून दिलें (१८१५)

कार्सिका—हें बेट **इंग्लिशांनीं** १७९४ त घेतलें. ही **नेपोलियन बोनापार्टची** जन्मभूमि होय.

माल्टा—हें बेट १८०० त **इंग्लंडास** मिळालें. तें पुढें स्वतंत्र झालें होतें. कांहीं दिवसांनीं तें रशियाचे स्वाधीन होणार असें कळल्यावरून **इंग्लिशांनीं** तें पुनः आपले ताब्यांत घेतलें. एथें उत्तम किल्ला आहे.

मेसिना—हें शहर पहिल्या **रिचर्डानें धर्मयुद्धास** जातांना सन ११९० त जिंकून घेतलें होतें.

सैप्रस—रशिया व तुर्कस्थान या मध्यें लढाई चालली असतां **इंग्लिशांनीं तुर्कांस** मदत करून त्यांचा बचाव केला. पुनः त्यांचा जहर लागल्यास **तुर्कांनीं** हें बेट **इंग्लिशांस** राहावयास सन १७७८ त दिलें आहे. हें पूर्वी पहिले **रिचर्डानें** प्यालेस्टैन एथें सन ११५८ त **धर्मयुद्धास** जातांना जिंकून घेतलें होतें.

आशियाखंड.

तुर्कस्थान.

अस्केलन—हें शहर **प्यालेस्टैन** प्रांतांत असून **सारासीन** (मुसलमान) राजा **सालाडिन** याच्या ताब्यांत होतें.

एकर—हें शहर **प्यालेस्टैन** प्रांतांत असून पहिले **रिचर्डानें धर्मयुद्धास** जातांना दोन वर्षें वेढा देऊन सन ११९१ त घेतलें. पुढें तें **सारासीन** लोकांनीं १२९१ त पुनः परत जिंकून घेतलें. **तुर्कस्तान, मिसर** (इजिप्त) यांतील लढाई चालू असतां हें शहर सन १८४० त **इंग्लिशांनीं** जिंकून घेतलें.

अर्वस्तान.

एडन—कान्स्टनटाइन बादशहाच्या कारकीर्दीत एथें रोमची व्यापाराची मोठी वसाहत होती. तें सन १८४० ईस्ट इंडिया कंपनीनें प्रथम विकत व नंतर तोफाचा मारा करून घेतलें. सध्यां तेथें कोळशाची वखार आहे, व मुंबईच्या ताब्यांतील लहानशी वसाहत आहे.

अफगानिस्तान.

काबूल व गिजनी—एथें सन १८४१ त मोंठ्या लढाया होऊन इंग्लिश लोकांची प्राणहानि फार झाली, सन १८४२ पुनः लढाई होऊन ३८४९ शिपायांपैकीं एकजण मात्र शिलक राहिला. परंतु लवकरच जनरल पोलाक साहेबाने स्वारी करून त्यांचा पराजय केला.

हिंदुस्तान.

अग्रा—मराठ्यांच्या लढायांत सन १८०३ मध्यें हा प्रांत इंग्लिशांस मिळाला.

अहमदाबाद—सन १८१८ मध्यें मिळाला.

अजमीर—एथें प्रथम एक वखार होती. हें शहर सन १८१८ त मिळालें.

अलवाल—हें शहर (सतलजचे कांठीं) सन १८४६ मध्यें शीक लोकांशी लढून घेतलें.

अलाहाबाद—यांतील कांहीं भाग अयोध्येच्या नबाबा बरोबर झालेल्या तहावरून सन १७६८ त मिळाला. त्यांतील शहर अलाहाबाद सन १८०१ मध्यें मिळालें. बाकी राहिलेला प्रांत पेशव्यांना गुजराथेंत व कर्नाटकांत तितक्या किंमतीचा भाग देऊन मिळविला.

अलमोरा—सन १८१५ त मिळाला.

अर्कट—हें शहर **क्लाइव्ह** साहेबानें १७५१ त घेतलें. पुढें तें **फ्रेंचांचा** सरदार **लाली** यानें सन १७५८ त जिंकून परत घेतलें. पुढें सन १७६० त **इंग्लिश** सरदार **सर आयरकूट** याचे स्वाधीन झालें. नंतर सन १७८० त **हैदरअल्ली**नें तें पुनः घेतलें, आणि १८०१ त तें पुनः **इंग्लिशां**स मिळालें.

अर्गांव—हें शहर मराठ्याबरोबर झालेल्या लढाईत जनरल **वेलस्ली** यांस सन १८०३ मध्यें मिळालें.

आसाम व आराकान—हे प्रांत ब्रह्मदेशचे राजापासून सन १८२६ त झालेल्या तहावरून मिळाले.

असई—हें शहर व किल्ला मराठ्या बरोबरच्या लढायींत सन १८०३ मध्ये **लार्ड वेलस्ली** यानें जिंकून घेतलें.

कलकत्ता—एथें १६४५ त वखारीचा पाया घालून सन १६१० त वखार घातली. सन १७०० मध्यें विकत घेऊन तटबंदी केली. सन १७५६ त **सुराज उद्दवला** यानें घेऊन तेथें १४६ **इंग्लिश** लोकांस कोंडिलें होतें. त्यांचा सूड **क्लाइव्ह** साहेबानें उगवून परत घेतलें. सन १७७३ त ही मुख्य राजधानी झाली.

कर्नाटक—हा प्रांत **सर आयरकूट** यानें **हैदर अल्ली**स सन १७८१।८२ मध्यें जिंकून घेतला. पुढें **टिपू** सुलतानानें सन १७९० त परत घेतला. सन १८०० पासून तो प्रांत **इंग्लिशां**च्या स्वाधीन आहे.

कड्लूर—हा प्रांत सन १७९५ त **इंग्लिश**ास मिळाला.

कानपूर—एथें सन १८५७ त **इंग्लिशां**ची मोठी कत्तल झाली.

चिलिअनवाला—एथें **शीक** लोक व **इंग्लिश** सरदार **लार्डह्यूगो** यामध्यें मोठी लडाई होऊन **शीक** लोकांचा पराजय झाला. व हें शहर मिळालें.

गुजराथ—एथील सन १८४९ त झालेले लढाईनें **पंजाब** प्रांत खालसा झाला.

टेवाय व टेनासरीम, ये, मर्गुइव मार्टाबान—हे प्रांत अवाचें राजापासून सन १८२६ त मोठी लढाई होऊन मिळाले.

दिल्ली—एथें **होळकराचा** सन १८०४ मध्यें **लार्डलेक** यानें पराजय करून ही घेतली, व सन १८५७।५८ त बंडवाल्यापासून **सरजान लारेन्स** यानें जिंकून घेतली.

पान्देचरी—हें **सर आयर कूटनें** सन १७६१ त **फ्रेंचा**पासून घेतलें. परंतु सन १७६२ त झालेल्या तहानें पुनः त्यांचें त्यांस परत दिलें.

पाटना हें शहर सन १७६३ त घेतलें.

पंजाब—सन १८४९ त **गो व हार्डिज** यांनीं हा प्रांत जिंकून घेतला.

प्लासी—एथें **सुराज उद्दवला** व **क्लाइव्ह** यांचें सन १७५७ त युद्ध होऊन **बंगाल, बहार व ओरिसा** हे प्रांत मिळालें.

फेरोजशहा व फेरोजपूर—एथें **शीक** लोकांबरोबर सन १८४५ त लढाया होऊन त्यांचा पराभव झाला.

बक्सर—एथें सन १७६४ त मोठी लढाई झाली.

बरेली—सन १८५८ त हें शहर घेतल्यावर १८५७ च्या बंडाची समाप्ति झाली.

भरतपूर—लार्ड **लेक** यानें १८०५ त व लार्ड **कांबर मिअर** यानें सन १८२६ त एथील किल्ला जिंकून घेतला.

मद्रास—एथें सन १६४० त **सेन्ट जार्ज** किल्ला बांधला व सन १७४६ त हें शहर जिंकून घेतलें.

मियानी--एथें सन १८४३ त मोठी लढाई होऊन शीक लोकांचा सर **चार्ल्स नेपियर** यानें पराभव केला.

मलबार—टिपू सुलतानानें सन १७९२ त दिला.

मिरत—एथें सन १८५७ चें बंड सुरू झालें.

मुडकी—एथें **सर राबर्ट सेल** यानें सन १८४५ त शीक लोकांचा पराभव केला.

मुंबई—**पोर्चुगाल**च्या राजानें आपली मुलगी **कॅथरीन** इचें लग्न दुसरे **चार्ल्स**ाबरोबर केलें. तेव्हां तिला दिलेल्या आंदणा. पैकीं हें एक बेट होय. हें **ईस्ट इंडिया** कंपनीस सन १६६८ त वर्षास १० पौंड प्रमाणें भाड्यानें दिलें होतें. तें तिसऱ्या **उइलि**यमानें सन १६९१ त त्या कंपनीच्या स्वाधीन केलें.

मुलतान—सन १८४८।४९ यांत जिंकून घेतलें.

लाहोर—**सोब्रान** एथील लढाईनंतर सन १८४६ त इंग्लिशांच्या ताब्यांत आलें.

श्रीरंगपट्टण--म्हैसूरच्या लढायांत **हैदर** व **टिपू** यांस जिंकून सन १७९९ त **वेअर्ड** साहेबानें जिंकून घेतलें.

सिंध—सन १८४५ त **सर चार्ल्स नेपियर** यानें जिंकून घेतला.

सुरत—एथें इंग्लिशांनीं पहिली वखार सन १६१२ त बांधिली.

सोब्रान—एथें सन १८४६ त शीक लोकांचा **लार्ड ह्यूगो** यानें पराभव केला.

हैदराबाद—सन १८४३ त सिंधच्या अमिरापासून जिंकून घेतली.

चीन.

कन्तान, अमोई, फूचू, निंगपो, शांघाई हांग

क्वांग—एथें **युरोपियन** लोकांस व्यापार करण्याची परवानगी १८४०।२ त मोठी लढाई होऊन मिळाली, व **हांगकांग** हें बंदर ब्रिटिशांस मिळालें.

ब्रह्मदेश.

अवा-ब्रह्मदेशाबरोबर सन १८२४ त झालेल्या लढा. ईंत घे तलें.

पेगू—सन १८५२ त तंटा होऊन हा प्रांत मिळाला.

मंडालें—सन१८८६ मध्यें तिसरी मोठी लढाई होऊन ब्रह्मदेशचा राहिलेला सर्व भाग जिंकून घेतला. एथील राजास रत्नागिरी एथें नेऊन ठेविलें आहे.

रंगून व **प्रोम** हीं मोठीं शहरें-लढाई होऊन सन १८२४ व १८५२ त अनुक्रमें घेतलीं.

हिंदीमहासार.

आस्ट्रेलिया—हें बेट सन १६१६ त **डच** लोकांनीं शोधून काढिलें. सन १७७० त कप्तान **कूक** यानें या बेटाचा पूर्वेकडील जास्त शोध लाविला. सन १७८७ मध्यें काळ्या पाण्याच्या शिक्षेचे अपराधी इंग्लंडांतून एथें येऊं लागले. सन १८५२ त एथें सोन्याच्या खाणी सापडूं लागल्यापासून एथील वस्ती फार वाढली. **सिडनी** ही एथील राजधानी आहे.

उवेलस्ली प्रांत-ही अरुंद पट्टी सन १८०० मध्यें मिळाली.

पिनांग—हें बेट सन १७८६ मध्यें विकत घेतलें.

बोर्निओ—बेटाचा उत्तर भाग व **लाबुआन** हें बेट सन १८४७ त मिळालें.

मलाका—हें प्रथम सन १७९५ त इंग्लिशांनीं घेतलें. **एमिएन्झ** एथील तहानें तें **डचांस** मिळालें. सन १८०७ त तें इंग्लिशांनीं पुनः घेतलें. पुढें तें **डचांस** सन १८१५ त दिलें.

पुढें सन १८२४ त सुमात्रांतील वाट्याबद्दल चिन्सुरा किल्ला व हें बेट अशी इंग्लिशांस त्यांजकडून मिळालीं.

सिंगापूर-हें बेट सन १८१९ त विकत घेऊन इंग्लंडच्या राज्यास जोडिलें.

सिंहल (लंका)—हें इंग्लिशांनीं सन १७९६ त डच लोकांस जिंकून घेतलें. एथील राजा जुलमी असल्यामुळें त्याच्या प्रजेच्या विनंतीवरून त्या राजास पदच्युत करून १८१५ त तें इंग्लिश राज्यास जोडिलें.

आफ्रिका.

अबुकीर आखात—सन १७९७ त नेल्सन यानें एथें फ्रेंचांस जिंकिलें. या लढाईस नाईल नदीची लढाई म्हणतात. या विजयाबद्दल नेल्सन यास नाईलचा बारन ही पदवी मिळाली. आबरक्रांबी यानें फ्रेंचांबरोबर एथें लढून सन १८०१ त हें शहर इंग्लिशांच्या स्वाधीन केलें.

असेन्शन—हें बेट सन १८१५ पासून इंग्लिशांच्या ताब्यांत आहे.

किरो—(मिसरमध्यें) हें शहर बेअर्ड साहेबानें हिंदुस्तानांतून शिपायांसह एथें सन १८०१ मध्यें येऊन जिंकून घेतलें.

केपकालनी—हा प्रांत पूर्वी डच लोकांच्या ताब्यांत होता. तो इंग्लिशांनीं १७९५ त घेतला. परंतु एक दोन वेळ परत देतां घेतां सन १८१५ त कायमचा मिळाला.

नाताळ—हें नाताळाच्या दिवसांत मिळालें म्हणून त्यास तेंच नांव ठेविलें आहे तें सन १८४३ त मिळालें.

मोरेश्यस—हें बेट फ्रेंचांपासून सन १८१० त घेतलें.

लेगोस—हें बेट सन १८६१ त मिळालें.

सेन्ट हेलिना—हें बेट सन १६७३ त घेतलें. एथें **नेपोलियन बोनापार्ट** यास **वाटर्लू**चे लढाईत जिंकल्यावर **इंग्लिशां**नीं त्यास कैद करून ठेविलें होतें. तेथें तो १८२१ त मरण पावला. पुढें सन १८४० त त्याचीं हाडें वगैरे **प्यारिस** एथें पुरण्याकरितां नेलीं.

सिरालेओन—हें बेट सन १७८७ मध्यें घेतलें.

सोकोट्रा—हें बेट इंग्लिशांच्या ताब्यांत आहे.

अमेरिका.

अमेरिका—हें खंड **जान काबेट** याने सन १४९७ त शोधून काढिलें. **सर वाल्टर राले** हा तेथें गेला होता व त्यानें त्यास **व्हर्जिनिया** हें नांव ठेविलें. सन १६०९ मध्यें **लार्ड डेलावार** यानें एथें पहिली वसाहत केली. सतरावे शतकांत इंग्रज लोकांनीं उत्तर अमेरिकेंत पुष्कळ वसाहती केल्या. धर्माचे बाबतींत अति त्रास होऊन पुष्कळ लोक स्वदेश सोडून इकडे येऊन राहिले व त्यांना बरेच **फ्रेंच** लोकही मिळाले. सन १७५९ त उत्तर व दक्षिण कानडा इंग्लिशांनीं **फ्रेंचां**पासून घेतले. सध्यां उत्तर कानडा मात्र त्यांच्या ताब्यांत आहे. सन १७६५-६७ मध्यें कित्येक जिनसांवर इंग्रजांनीं जकात बसविली. ती वसाहतींतील मंडळीस न आवडून त्यांनीं तंटा केला व आपलें स्वातंत्र्य सन १७८२ त स्थापित केलें. १३।१४ संस्थानें एकत्र होऊन सन १८१२ मध्यें दुसरी एक लढाई सुरू होऊन ती सन १८१४ मध्यें संपली. त्या लढाईंत जें निशाण वापरीत होते, त्यावर १४ मोठे ठिबके व त्या संस्थानांच्या संख्येइतके पट्टे काढिले होते.

आल्बनी—सन १६६४ त मिळालें.

ग्वायना—(दक्षिण अमेरिकेंत) हा प्रांत सन १८०१ मध्यें इंग्लिशांच्या ताब्यांत आला.

जमेका—(पश्चिम हिंदी बेटांत) एथील गुलामांत सन १६६१ त मोटी बंडाळी झाली. तेव्हां त्यांस मुक्त करण्याकरितां व त्यांच्या मालकांचें नुकसान भरून देण्यास एकंदर २० लक्ष पौंड सरकारानें खर्च केले.

न्यूफौन्डलंड—हें युट्रेक्टच्या तहानें इंग्लिशांस सन १७१३ मध्यें मिळालें

बंकर्सहिल (टेंकडी)—एथें इंग्लिश व अमेरिकन लोकांमध्यें मोठी लढाई सन १७९५ त होऊन इंग्रजांचा जय झाला, परंतु त्यांचें नुकसान फार झालें.

बोस्टन—एथील लोकांनीं सन १७०६ त चाहाचीं जहाजें समुद्रांत पालथीं केलीं, कारण इंग्लिशांनीं त्यांवर जकात बसविली होती. अमेरिकेंतील लढाईचें हेंच मुख्य कारण झालें. इंग्लिशांनीं तें बंदर बंद करूनच सन १७७५ त त्या शहरास वेढा दिला व अमेरिकन लोकांचा पराजय करून सन १७७६ त तें शहर अगदीं सोडून दिलें.

मिसिसिपी—प्रांत फ्रेंचांपासून १७६३ त मिळाला.

यार्कटाउन (शहर)—एथें सन १७८१ मध्यें अमेरिकन लोक इंग्लिशांसीं लढत असतां विजयी झाले. त्यांचा सरदार वाशिंग्टन यानें इंग्लिश सरदार लार्ड कार्नवालिस यास त्याचे ७ हजार सैन्यानिशीं वेढा देऊन त्यांजकडून आपलें स्वातंत्र्य कबूल करून घेतलें. व तेव्हांपासून अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें स्वतंत्र झालीं.

सारागोटा—एथें अमेरिकन सरदार वाशिंग्टनी यानें इंग्लिशांस सन १७७७ त जिंकिलें.

हंडुरस—हा प्रांत **स्प्यानिआर्ड** व **इंग्लिश** यांमध्यें तंटे होतां होतां सन १७९८ मध्यें **इंग्लिशांस** कायमचा मिळाला.